[redacted] उ

म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
क्र. : ४९

[redacted]यण आप

REFBK-0000662

१९११.

किंमत ८ आणे.

दा. ५ ६९२

मुलांस थोडा उपदेश.

६६२

———:o:———

...रि नारायण आपटे

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत छापिलें.

REFBK-0000662

इ० स० १९११.

किंमत ८ आणे.

पुणें येथें **आर्यभूषण** छापखान्यांत **नटेश अप्पाजी द्रविड** यांनीं छापिलें व **हरि नारायण आपटे** यांनीं प्रसिद्ध केलें.

सदर पुस्तकाचे सर्व हक्क पुस्तककर्त्यांनें राखून ठेविले

प्रस्तावना.

येथील नूतन मराठी विद्यालयाच्या चालकांनीं आज सुमारें पंधरा वर्षें, आपल्या शाळेंत एक फार हितकर क्रम ठेविला आहे. मुलांस उन्हाळ्याची सुट्टी देण्याच्या दिवशीं वसंतपूजन करून, त्या उत्सवप्रसंगीं त्यांस उपयुक्त असा उपदेश करावयाचा व तो उपदेश छापवून त्याची एक एक प्रत प्रत्येक मुलांस द्यावयाची. या उपदेशांपैकीं बरेचसे उपदेश लिहिण्याचा मान खालीं सही करणारास दिला होता. सध्यां नीतिशिक्षणाचें महत्व लोकांस विशेष प्रकारें कळूं लागल्यामुळें त्या शिक्षणास उपयोगी अशीं साधनें निर्माण करण्याकडे पुष्कळांचें लक्ष्य लागलें आहे. तेव्हां हे सर्व उपदेश एकत्र प्रसिद्ध केल्यास कदाचित् उपयोग होईल, असें वाटून पुस्तक प्रसिद्ध करण्यास वरील शाळे-च्यासुपरिंटेंडंट कडे परवानगी मागितली व ती रा. विनायक गणेश आपटे सुपरिंटेंडंट यांनीं मला दिली याबद्दल त्यांचे मी फार आभार मानतों.

" वाचन " व " वेळ " हे दोन निबंध मीं कानिट-कर मंडळीच्या माजी " **मनोरंजन** " नांवाच्या मासिक पुस्तकांत प्रसिद्ध केले होते, ते या पुस्तकांत शोभण्याजोगे आहेत म्हणून यांत प्रसिद्ध केले आहेत.

पुणें, ता. १।५।११,
वै. शु. ३ शके १८३३.

हरि नारायण आपटे

विषयानुक्रमणिका.

राजनिष्ठा.

आजच्या आनंदाचें कारण-इंग्रजी राज्यापासून फायदे-चोरांचिलटांचें भय नाहीं-न्याय-प्रवासाचें सुख व सोय-दुष्काळांत प्राणहानि होत नाहीं-टपाल-तारायंत्र-धर्माचारांबद्दल स्वातंत्र्य-शिक्षण-आरोग्यरक्षण-बादशहांचें चरित्र-बादशहांवरलें आपलें प्रेम कसें दाखवावें?-बादशहास वेदोक्त आशीर्वाद-आशीर्वादपर वेदमंत्र.

--पृष्ठें १ ते १२.

१

सभ्यता.

विश्रांति घेण्याचा हेतु-उजळणी करण्याची जरूरी-सभ्यपणाचा धडा-सभ्यपणा कशाकशावर अवलंबून असतो?-पोषाख-चालचलणूक-मनाचा निर्मलपणा-मुलांच्या हातांत सर्वांच्या सुखाची किल्ली आहे.-सभ्यपणानें वागणें हें मुलांच्या हातांत आहे.-व्यायामाची जरूरी-आपल्या वयाला विशोभित असें कांहीं करूं नये.

--पृष्ठें १ ते १६.

२

उद्योग.

मुलांच्या अंगचे दोन महत्वाचे अवगुण-ज्ञान मिळविण्याची इच्छा नसणें-आळस-कोणत्याही कामीं 'उद्यां, उद्यां.' हा मंत्र लावूं नका.-आळस घालविण्यास उपाय दृढनिश्चय-सर्व गोष्टींत माफकपणा-थोडें थोडें नियमित करणें-जें काय करणें तें मनःपूर्वक करणें-उद्योगाचें महत्त्व-जीवितमहिमा.

—पृष्ठें १७ ते ३२.

३

आत्मसंयमन

विश्रांतीचा योग्य उपभोग–ज्ञान मिळविण्याची इच्छा–सगळ्यांतलें थोडें थोडें आणि एकांतलें सगळें मुख्य कर्तव्य विसरूं नये.–शाळांतील अभ्यास–दिरंगाई–मनाला वाटेल तें करण्याची इच्छा–आत्मसंयमन–' नाहीं ' ह्मणण्याचें धैर्य अभ्यासानें येतें.–' नाहीं ' ह्मणण्याचे धडे शिकण्यास प्रसंग पुष्कळ– मन स्वाधीन ठेवा.

--पृष्ठें ३३ ते ४९.

४

जुन्या काळचा उपदेश.

जुन्या काळचा विद्यार्थ्यास उपदेश–खरें बोलणें–आपलें कर्तव्य करणें–देव व पितर यांचेसंबंधीं आपलीं कर्तव्यें–आईबापांस देव माना–पाहुण्यांचा देवांप्रमाणें सत्कार करा–घेण्यापेक्षां देण्यांत आनंद विशेष–योग्य माणसांची सल्ला घ्यावी.

--पृष्ठें ५० ते ६६.

५

आनंद.

सुट्टीचा आनंद–आनंद ह्मणजे काय ?–तो कसकशापासून होतो ?–नित्य आनंद–खरा आनंद–आपलीं कर्तव्यें कोणतीं ?–शरीरास जपणें–मन निर्मल ठेवणें–तुह्मी बलांची पुंजी करा–शरीरबल–ज्ञानबल हीं मिळवा.

--पृष्ठें ६७ ते ८२.

६

मुलांनीं काय करावें ?

परमेश्वराचे आभार–आज्ञाभंग–रोग झाल्यावर औषध घेण्यापेक्षां तो होऊंच नये असें करावें–आज्ञापालन हें तुमचें पहिलें कर्तव्य–

र्तव्य करण्यांत तत्पर असणें–व्यवस्थितपणा–वेळेचा सदुपयोग
रणें–पुस्तकें वाचणें तीं कोणतीं वाचावीं ?–मोठ्यांचीं चरित्रें–
वासवर्णनें–इतिहास–इंग्लंडचा इतिहास अवश्य वाचावा–मनास
ल्हास देणारे खेळही खेळावे.

–पृष्ठें ८३ ते १००–.

७

बाळपणीं काय शिकावें ?

बाळपण ह्मणजे मनुष्याच्या आयुष्यांतले नांगरणीपेरणीचे दिवस
ांत–बाळपणांत कशाची पेरणी करावयाची ?–सत्याच्या आवडीची
रणी केली पाहिजे–अपराध करणें व तो छपविणें–धनगराच्या
ोराची गोष्ट–स्पष्टपणें खोटें बोलणें–खोटें भासविणें–अमंगळ शब्दां-
ा तिरस्कारा–कोणीं काम सांगितल्यास तें उत्सुकतेनें करावें–चांग-
ा मुलगा–कनवाळूपणा–भलत्याच कामीं मदत करूं नये–योग्य
ळीं दुसऱ्याच्या उपयोगीं पडा.

––पृष्ठें १०१ ते ११४.

८

वाचन

शिक्षण कसें मिळतें ?–स्वानुभवजन्यज्ञान–परानुभवजन्यज्ञान–
ाषा–मुद्रणकला–वाचनाचें महत्व–सध्यां पुस्तक हेंच गुरुमुख–
ाष्ट्रांचा इतिहास–व्यक्तींचे इतिहास–वाचनानें मोठमोठ्या पंडितांच्या
कवींच्या हृद्गताचें ज्ञान–वाचनप्रेम वाढल्यास काय काय लाभ
ोतात ?–मनोरंजन–वाचावें काय ?–व तें कसें ?–वाचनाची
ोडी.

––पृष्ठें ११५ ते १३६.

९

वेळ कसा घालवावा ?

पांच मिनिटांनीं काय होतें आहे ?–काल अमर्याद आहे–पण आपल्या वांट्यास किती याचा विचार–तात्कालिक व क्षणिक सुख–दूरवर्ती परंतु सतत सुख–सदुपयोगांत काळ घालाविणें–उद्यांवर भिस्त होतां होई तों न टाकणें–वेळ आपला दास केला पाहिजे–ससा व कांसव–खरी विश्रांति–क्षणांक्षणांनीं विद्या, कणांकणांनीं द्रव्य–सर वुइलियम जोन्स यांची वेळाची वांटणी–वेळाचा शिस्तवार उपयोग–विलक्षण बुद्धीपेक्षां निश्चय व उद्योग हीं अधिक अवश्य–वेळ ह्मणजे पैसा, वेळ ह्मणजे सुख–कांहीं ध्यानांत ठेवण्याजोगे नियम.

––पृष्ठें १३१ ते १४४.

१०

खेळ.

खेळापासून काय शिकतां येईल ? मुलें–खेळ कसे खेळतात ?–खेळांतलीं तत्वें–खेळाच्या मुळाशीं व व्यवहाराच्या मुळाशीं असणारीं तत्वें एकच–अंगीं कोणकोणतीं बळें पाहिजेत ?–शरीरबळ, ज्ञानबळ, निश्चयबळ व नीतिबळ–खेळ खेळण्यास अंगीं असावे लागणारे गुण–सलोख्याची आवड–शिस्त–आज्ञाधारकपणा–सावधानता–एकचित्तता–स्वाभिमान–स्वपक्षाचा अभिमान–निरालस्य–दुसऱ्याला मदत करण्याची बुद्धि–न्यायीपणा व खरेपणा–फिरून यत्न करून पहाण्याची इच्छा–खेळाचें महत्व–मुलांचीं कर्तव्यें सहा प्रकारचीं–स्वतःसंबंधीं–कुटुंबासंबंधीं–स्नेह्यांसंबंधीं–गांवासंबंधीं–देशासंबंधीं व राजासंबंधीं–देवासंबंधीं–खेळांत शिकले जाणारे सर्व गुण व्यवहारांत फार जरूर–आपल्याला येणारी विद्या दुसऱ्यास देणें.

––पृष्ठें १४५ ते १६६.

११

विश्रांति.

जुन्या काळचा शांतिमंत्र—सुट्टी ह्मणजे काय?—विश्रांति ह्मणजे नुसतें हातपाय ताणून पडणें नव्हे—अभ्यासांत पालट ह्मणजे खरी विश्रांति—नवीन ज्ञान मिळविण्याची हांव—सुट्टीचा उपयोग कांहीं नवीन ज्ञान मिळविण्याकडे करावा—पोट भरण्याशिवाय माणसानें इतर गोष्टी केल्या पाहिजेत—आज हजारों शोध व सुधारणा झाल्या त्या कशामुळें?—दोन नांगरांची गोष्ट—कामपालट ह्मणजे खरी विश्रांति—हाताच्या कौशल्याचीं कामें—सुट्टींतल्या वेळाचें मुलांचें वेळापत्रक—दीर्घसूत्री विनश्यति—सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥

—पृष्ठें १६७ ते १८०.

१२

पहावें काय आणि तें कसें ?

नेहमीं ज्ञान मिळवावें—आपल्या सभोंवार काय आहे तें सगळें पहाण्यासारखेंच आहे—पण तें जवळ जाऊन पाहिलें पाहिजे—आपल्या सभोंवतालचीं तीन राज्यें—गुलाबाच्या झाडाची कुंडी—पृथ्वीचे विभाग—जमिनीचें राज्य—वनस्पतिराज्य—प्राणिराज्य—एकेका राज्याची त्रोटक माहिती—दगड, धोंडे व त्यांच्या जाती—झाडें—झाडांच्या जाती—प्राण्यांचें राज्य—प्राण्यांच्या जाती—परमेश्वराची प्राप्ति करून घेण्यास त्यानें निर्मिलेल्या सृष्टीचें ज्ञान करून घेतलें पाहिजे—आपल्यावरील जबाबदाऱ्या—शरीरबळ—बुद्धिबळ—ज्ञानबळ—बारीकसारीक गोष्टींत चांगलें वळण—स्वावलंबन—आज्ञाधारकपणा—नियमितपणा—नेमस्तपणा.

—पृष्ठें १८१ ते २०५.

१३

मुलांचीं कर्तव्यें.

कित्ता पाहिजे–मुलांची रोजची वागणूक–आईबापांसंबंधीं मुलांचीं कर्तव्यें–आईबापांस साहाय्य–त्यांची आज्ञा पाळणें–आत्म-संयमन–गुरूंसंबंधीं मुलांचीं कर्तव्यें–शरीराचे रोग–मनाचे रोग–कुटुंबासंबंधीं कर्तव्यें–शाळेसंबंधीं–कर्तव्यें–चारही प्रकारचीं मुलांचीं कर्तव्यें– तीं केल्यानें मुलें मोठेपणांतल्या त्यांच्या कर्तव्यांस योग्य होतात.

––पृष्ठें २०६ ते २१८

बादशहा पांचवे जॉर्ज यांच्या
राज्याभिषेकाचे मंगल दिवशीं
(ता० २२ जून १९११)
पुणें म्युनिसिपालिटीच्या शाळांतील विद्यार्थ्यांस
केलेला उपदेश.

मुलांनो,

आज तुह्मां साऱ्यांना या जागेंत एकत्र जमविलें आहे, आम्ही तुमच्यांत येऊन बसलों आहों, ही जागा उत्तम प्रकारें शृंगारली आहे, जिकडे तिकडे आनंदीआनंदच दिसतो आहे, पुष्कळ ठिकाणीं निशाणें, तोरणें उभारलीं आहेत. इतका आनंदाचा उत्सव आपण कशाकरितां करितों आहों बरें ? आतांच तुमच्यापैकीं कांहीं मुलांनीं व मुलींनीं उंच व मधुर सुरांत **राजगीत** गाइलें, आपण सर्व त्या वेळीं बादशहांच्याबद्दलचा आपला आदर दाखविण्यासाठीं उभे राहिलों होतों, आणि शेवटीं आनंदानें टाळ्यांचा कडकडाट केला, तो कशाबद्दल ? या प्रश्नाचें उत्तर आतां मी तुम्हांला थोडक्यांत सांगतों. खाऊ घेण्यासाठीं उतावीळ होऊं नका. एखादी आनंदाची गोष्ट झाली म्हणजे साखरा वांटतात शेरणी वांटतात, पण ती कोणाच्याही हातावर ठेवण्याच्या आधीं " आज आनंदाचें अमुक अमुक कारण घडलें म्हणून ही साखर आपणांस देतों " असें सांगण्याची चाल आहे. त्या चालीप्रमाणें करूं या.

मुलांनो, आज इंग्लंड देशांत आपल्या बादशहांस सर्व जगावर पसरलेल्या इंग्रजी राज्याच्या सिंहासनावर बसवून राज्याभिषेक होत आहे. ज्यांच्या दयाशील छत्राखालीं आपण इतके सुखी आहों, ते आपले बादशहा **पांचवे जॉर्ज** आज धर्मसंस्कार करून घेऊन गादीवर बसणार. तेव्हां त्या आपल्या बादशहांचा जयजयकार करण्यासाठीं आपण येथें जमलों आहों.

मुलांनो, तुम्ही आह्मी सध्यांचे काळीं किती सुखी आहों आणि ते कोणामुळें, याची तुह्मांला कल्पना नाहीं, म्हणून तुम्हांला तें सर्व समजावून सांगतों.

इंग्रजी राज्यापासून फायदे.

आज तुम्हांला दागदागिने घालून खुशाल वाटेल तिकडे जातां फिरतां येतें; चोरांचिलटांचें भय वाटत नाहीं.

कोणीं अन्यायानें तुम्हांला लुबाडलें, किंवा तुमची कोणीं खोडी केली, किंवा कोणीं तुह्मांला विनाकारण वाईट बोललें, तरी सुद्धां त्याला तत्काळ शासन होतें.

तुह्मी आज सकाळीं सात वाजतां पुण्याहून निघालां कीं, दहा साडेदहा वाजतां मुंबईस जेवावयाला जातां. पुनः तेथून रात्रीं निघालां कीं दुसरे दिवशीं रात्रीं प्रयागाला व पहांटे काशीविश्वेश्वराच्या दर्शनाला जातां. तुमच्याजवळ वाटेल तेवढें जडजोखीम असलें, तरी तें कोणी नेईल हें तुमच्या मनांत सुद्धां येत नाहीं. पूर्वीच्या काळीं काशीयात्रेला सहा सहा महिने सुद्धां पुरत नसत, आणि पांचपंचवीस माणसांची तरी सोबत असल्याखेरीज आपला गांव सोडण्याची सोय नव्हती; पण आज आपण अगदीं

एकटे, हातांत एक लहानसें पाकीट घेऊन काशीपासून रामेश्वरापर्यंत व सोरटीसोमनाथापासून जगन्नाथापर्यंत आठां दिवसांत तीर्थयात्रा करून येतों !

कोठें दुष्काळ पडला तर पूर्वी त्या प्रांतांतल्या माणसांस टांचा घांसून अन्नअन्न करीत मरण्यापलीकडे दुसरें कांहीं करतां येत नसे; परंतु आज नुसत्या आपल्या देशांतूनच इकडचें तिकडचें धान्य आणून दुष्काळानें पीडिलेल्यांना वांचावितां येतें असें नव्हे, तर जगाच्या दुसऱ्या टोंकापासून धान्य आणवून त्या लोकांचे प्राण वांचवितां येतात.

जेथें पाण्याचा दुष्काळ असल्यामुळें शेतें पिकण्याला मारामार पडे, तेथें कालव्यांच्या द्वारानें पाणी नेल्यामुळें धान्याची रेलचेल उडत आहे.

आपले कोणी स्नेही किंवा नातलग आपल्यापासून शेंकडों कोसांवर गेले असले तरी एकमेकांचें कुशल वर्तमान एकमेकांना अवघ्या एक पैशांत आणि फार तर तीन दिवसांत कळवितां येतें आणि विशेषच तांतडी असली तर चोवीस पैसे दिले ह्मणजे तारायंत्रानें एकमेकांची खुशाली एका तासांत कळते !

आज कोणी आह्मांला आमचीं धर्मकर्में करण्यास मनाई करीत नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या धर्मविचारांप्रमाणें देवाची पूजा करण्यास कोणत्याही प्रकारची आडकाठी नाहीं. कोणी आमचे देव उचलून टाकीत नाहीं, फोडीत नाहीं. उलट एका धर्माच्या माणसानें मूर्खपणानें दुसऱ्या धर्माच्या माणसाला त्रास दिला, तर सरकार त्या त्रास देणाऱ्या इसमास तत्काळ शासन करतें.

सर्वांना शहाणे करून त्यांना सर्व गोष्टींचें ज्ञान होईल अशा तजविजी करण्याकरितां आपलें सरकार जितके प्रयत्न करावयाचे तितके करतें, अतोनात पैसा खर्च करतें, आणि ज्यायोगानें आपल्या या हिंदुस्थानदेशाची भरभराट होईल ते सर्व उपाय तें करीत असतें. लहानपणापासून तुह्मांला लिहिण्या वाचण्यास शिकविण्यासाठीं शाळा घातल्या आहेत; पुढें जास्त ज्ञान होण्यासाठीं कॉलेजें आहेत; ज्याला कोणाला विशेष प्रकारच्या विद्या शिकावयाच्या असतील, त्याच्यासाठीं त्या त्या प्रकारच्या विद्या शिकण्याकरितां शाळा व कॉलेजें आहेत. कोणास शेतकी, कोणास यंत्रकला, कोणास वैद्यकी, कोणास शिल्पशास्त्र—जें ज्यास शिकावयाचें असेल, त्याला तें सहज शिकतां यावें, एवढ्याकरितां जितक्या ह्मणून सोयी शक्य, तितक्या सर्व फारच उत्तम प्रकारानें करून ठेविल्या आहेत. या देशांतली विद्या पुरी होऊन आणखी शिकावयाचें असेल तर त्यास सरकार खर्चावेंचास लागणारे पैसे देऊन परदेशांसही पाठवितें !

लोकांचें मन चांगलें सुशिक्षित व्हावें म्हणून या तजविजी झाल्या, परंतु सरकार लोकांच्या शरीराबद्दलही फार काळजी घेतें. जेथें म्हणून शक्य, तेथें लहानमोठे दवाखाने ठेवून व त्यांवर योग्य डॉक्टरांची नेमणूक करून सरकार गरीब लोकांस फुकट औषधपाणी देतें. ज्याला घरीं कोणी शुश्रूषा करण्यास नाहीं, त्याला इस्पितळांत नेऊन त्याची चांगली शुश्रूषा करून व त्यास औषधपाणी आणि पथ्याचें देऊन बरें करतें. कोठें रोगराई विशेष झाली, किंवा सांथीचा रोग झाला, तर फार लोक प्राणास मुकूं नयेत म्हणून पाण्यासारखा पैसा खर्च करून लोकांचे प्राण

वांचविले जातात व रोगाचें मूळ बींच नाहींसें करून टाकण्यासाठीं विलक्षण प्रयत्न होतात.

सारांश, मनुष्याला यत्किंचितही दुःख होऊं नये, जितकें शक्य तितकें सुख मिळावें, म्हणून सरकारचे अहोरात्र प्रयत्न चाललेले असतात.

हें सर्व ज्यांच्या राजछत्राखालीं घडतें आहे, ज्यांच्या सामर्थ्यामुळें आम्ही इतके निर्घोर राहून आपापले उद्योग-धंदे चालवितों, संसार करतों, आनंदीआनंद करतों, त्या आपल्या महाराजाधिराज **जॉर्ज महाराजांस** आज इंग्लंडांत राज्याभिषेक आहे; आणि त्या आनंदाच्या प्रसंगीं आपणास झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरितां आपण येथें जमलों आहों.

मुलांनो, आज तुम्हांला त्यानिमित्त सुट्टी आहे. पण सुट्टी म्हणून तुम्ही घरीं नुसते आनंदांत बसण्यांत खरी मौज नाहीं.

आनंद करावयाचा तो आपल्या इष्टमित्रांच्या संगतींत सर्वांनीं एकत्र जमून केला, तर तोच खरा आनंद. तसा आनंद करण्यासाठीं तुम्हांला येथें जमविलें आहे.

बादशहा पांचवे जॉर्ज यांचें चरित्र.

आज ज्या महाराजांस राज्याभिषेक होणार, त्यांचा जन्म इ. स. १८६५ सालीं जूनच्या ३ तारखेस इंग्लंड देशांत झाला. पुढें त्यांचें बाळपणचें शिकणें झाल्यानंतर त्यांस विशेष शिक्षण द्यावयाचें, तें आरमारासंबंधीं द्यावयाचें असा त्यांच्या वडील मंडळींचा विचार होऊन त्यांच्या बाराव्या वर्षींच त्यांस **ब्रिटानिआ** नांवाच्या लढाऊ

जहाजावर, तेथलें लष्करी काम शिकण्यास ठेविलें. तेथें त्यांना राजपुत्र म्हणून कोणी स्वस्थ बसूं देत नसे. सकाळीं सहा वाजले नाहींत तों उठून इतर शिकाऊ उमेदवारांप्रमाणें त्यांचेकडून सर्व कांहीं कामें करून घेतलीं जात. त्यांच्यांत व इतर विद्यार्थ्यांत कांहींही फरक ठेविलेला नव्हता. आपण म्हणजे कांहीं निराळे आहों असा विचारच त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं नये, अशाकरितां ही खबरदारी घेतली जाई. त्यांस दोन वर्षेपर्यंत सक्त मेहनत घेऊन शिक्षण संपादावें लागलें. दोन वर्षें त्या जहाजावर पुस्तकी व प्रत्यक्ष शिक्षण झाल्यावर त्यांस दुसऱ्या एका लढाऊ जहाजावर ठेवून नाना प्रकारची माहिती होण्यासाठीं प्रवासास नेण्यांत आलें. सुमारें तीन वर्षें त्यांच्याकडून प्रवास करविल्या-नंतर ते परत स्वदेशीं गेले. आपले महाराज या वेळीं ब्रि-टिश अंमलाखालच्या बहुतेक देशांत गेले होते. या प्रकारें जहाजावर शिक्षण घेण्याकरितां ते प्रवास करीत असतांना त्यांना अगदीं साध्या कामगाराप्रमाणें सर्व कामें करावीं लागत. परंतु तीं करण्यास ते कधींही मागें घेत नसत. दुसऱ्यानें ‘ मी आपलें काम करतों ’ असें त्यांस म्हटलें तर त्यांस मोठा राग येत असे. रात्रींचा पहारा करण्याचें त्रासाचें कामही ते नियमितपणें व अगदीं शिस्तीनें करीत; कधीं चुकत नसत. कोणतेंही काम करण्यांत कुचरपणा ह्मणून करावयाचा नाहीं, हा त्यांचा निर्धारच. एकदां त्यांच्या प्रवासांत एका बंदरांत तुर्कस्थानचे बादशहा त्यांस भेटण्यासाठीं त्यांच्या जहाजावर आले, तों हे युवराज इतर कामगारांप्रमाणेंच कोळशाच्या धुरानें व कीटानें

कळकट मळकट झालेला पोषाख घालून इतर खलाशां-बरोबर हौसेनें व नेटानें काम करीत आहेत, असें त्यांस दिसलें ! त्यांना आपल्या पदवीचा अभिमान बिलकुल नसे. उलट त्यांची आपल्या मित्रमंडळीस ताकीद अशी असे कीं, "मी राजपुत्र ह्मणून येथें आलों नाहीं. तुह्मी जसे चार विद्यार्थी तसाच तुमच्या संगतींत विद्या संपादन करण्यासाठीं मी आलों आहें. तेव्हां मला तुह्मी '**प्रिन्स जॉर्ज**' (राजपुत्र जॉर्ज) असें सुद्धां ह्मणूं नका. तुह्मी आपल्या इतर मित्रांना हांका मारतां त्याप्रमाणेंच मला एकेरी नांवानें हांक मारीत जा ! "

यात्रमाणें प्रवासशिक्षण झाल्यानंतर ते परत इंग्लंडास गेले, व आरमारासंबंधीं वरच्या दर्ज्याचें शिक्षण घेण्यासाठीं कॉलेजांत जाऊं लागले. तेथें त्यांनीं इतरांप्रमाणें पांच परीक्षा देऊन उत्तम नांव मिळविलें. पुढें त्यांनीं वेगवेगळ्या दहा जहाजांवर हुद्यांचीं कामें केलीं व त्या कामांतली त्यांची हुशारी पाहून परीक्षकांनीं त्यांस अनुक्रमानें क्याप्टन, ॲडमिरल वगैरे पदव्या दिल्या.

१८९३ सालीं त्यांचा **प्रिन्सेस मेरी ऑफ् टेक्** यांच्याशीं विवाह झाला. त्या त्यांच्या पत्नी आज आपल्या **महाराणी मेरी** आपल्या पतीबरोबर अभिषिक्त होणार आहेत. महाराजांस पांच मुलगे व एक मुलगी अशीं सहा मुलें आहेत.

१९०५ सालीं ते हिंदुस्थानांत प्रवास करून स्वदेशास म्हणजे इंग्लंडास परत गेले. तेथें गेल्यावर त्यांनीं आपल्या लोकांस सांगितलें कीं, " हिंदुस्थानच्या लोकांबद्दल माझें मत फारच उत्तम झालें आहे. ते लोक फार राजनिष्ठ,

त्यांचा स्वभाव फार सरळ व शांत, त्यांची रहाणी अगदीं साधी आणि ते मोठे धर्मनिष्ठ आहेत. त्यांच्याशीं आपण प्रेमानें वागलों, तर आपलें त्यांच्यावर राज्य करण्याचें काम अगदीं सोपें होईल."

बादशहांचे ठिकाणचें आपलें प्रेम कसें दाखवावें ?

मुलांनो, या त्यांच्या भाषणावरून तुह्मांला कळलेंच असेल कीं, जे महाराज आज गादीवर बसणार त्यांच्या मनांत आपल्याविषयीं फार प्रेम आहे. आणि ते आपले बादशहा आहेत, तेव्हां आपलेंही त्यांच्या ठिकाणीं तसेंच प्रेम असलें पाहिजे. खरोखर पाहिलें, तर कोणासही " तूं आपल्या बापावर प्रेम कर, आईवर प्रेम कर " असें सांगण्याची जरूरी नसते. आपलें आपल्या आईबापांवर प्रेम असतेंच असतें. त्याचप्रमाणें आपल्या राजावर प्रेम करा, त्याच्या ठिकाणीं निष्ठा ठेवा, हें कोणास सांगण्याची खरोखर जरूरी नाहीं. तें आपोआपच उत्पन्न होतें व दिसून येतें. आपलें आपल्या आईबापांवर प्रेम आहे, हें कशावरून दिसतें ? आपण त्यांचीं आवडतीं कामें बिनतक्रार केल्यानें, त्यांची आज्ञा पाळल्यानें, ते ज्यांची आज्ञा आपणांस पाळण्यास सांगतील त्यांची आज्ञा पाळल्यानें, त्यांना त्यांच्या कामांत आपल्याकडून होईल तितकी मदत केल्यानें, त्यांना कोणी वाईट म्हटल्यास तसें म्हणणारांस झिडकारून टाकल्यानें; सारांश, जिकडून त्यांच्या मनास संतोष होईल, असें सर्व कांहीं केल्यानें आपलें आपल्या आईबापांवरलें प्रेम दिसून येतें.

आपल्या राजावरलें प्रेम सर्वांस दिसून येण्यास मार्ग तरी तेच. जें आपल्या राजांस व त्यांनीं नेमिलेल्या अधिकाऱ्यांस पाहिजे आहे तें केल्यानें त्यांचा संतोष आहे. त्यांना काय पाहिजे? त्यांना एवढेंच पाहिजे कीं, तुम्हीं त्यांची आज्ञा पाळावी; त्यांना तुमच्या कल्याणाची पूर्ण काळकळ आहे. तेव्हां ते कधीं कांहीं तुमच्या अहिताचें करतील असें मनांतसुद्धां आणूं नये. तुम्हीं आपापसांत कधींही भांडूं नये. अगदीं गुण्यागोविंदानें आपापलीं कामें करून सुखांत रहावें, परस्परांचा मत्सर किंवा द्वेष करूं नये; आपल्या बादशहाचें हें आपणांस शांति व सुख देणारें राज्य चांगल्या प्रकारें चालण्यासाठीं जें काय आपल्याला करतां येईल तें मोठ्या उत्साहानें व आनंदानें करावें; बादशहांना किंवा त्यांनीं नेमिलेल्या अधिकाऱ्यांना कोणी वाईट ह्मटल्यास त्याला झिडकारून टाकावें व तसें न बोलण्याबद्दल बोध करावा; त्यांच्या कामांत कोणी विघ्नें आणूं लागला, तर त्याचा निषेध करावा. त्यांचा कोणी द्वेष करूं लागला, तर त्याचा तिट्कारा करावा.

असें केलें म्हणजे आपलें आपल्या बादशहावर खरें प्रेम आहे, हें दिसेल. मुलांनो, आपले **जॉर्ज** महाराज आपणापासून दूर आहेत, परंतु त्यांचे अधिकारी गव्हर्नर जनरल, गव्हर्नर, कमिशनर, कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर, पोलिस सुपरिंटेंडंट व तसेच इतर अधिकारी हे त्यांच्याच आज्ञेवरून आपल्या हितासाठीं झटत आहेत; त्यांच्याच आज्ञेवरून राज्य चालवीत आहेत. त्या अंमलदारांची आज्ञा आपण कधीं मोडली नाहीं, त्यांच्याविषयीं प्रेमबुद्धि व आदरबुद्धि ठेविली म्हणजेच आपली राजनिष्ठा खऱ्या

प्रकारानें महाराजांस कळून येईल. ज्याप्रमाणें परमेश्वरावर, आपल्या गुरूंवर व आपल्या आईबापांवर आपली निष्ठा असते, भक्ति असते, प्रेम असतें, त्याप्रमाणेंच आपल्या राजांवर, त्यांनीं नेमिलेल्या अधिकाऱ्यांवर व अंमलदारांवर आपण निष्ठा ठेविली पाहिजे, भक्ति ठेविली पाहिजे व प्रेम ठेविलें पाहिजे. त्यांची आज्ञा मोडल्यास, त्यांचा अनादर केल्यास ते शासन करतील या भीतीनें नव्हे, तर ते राजाच्या आज्ञेनें आपल्या हितासाठीं झटत असतात हें मनांत आणून कृतज्ञतेनेंच त्यांच्यावर प्रेम केलें पाहिजे. तसें आपण केलें म्हणजे आपल्या राजांस संतोष होणार आहे.

मुलांनो, तुह्मांला सांगावयाचें तें सांगितलें. आतां आपल्या या नूतन महाराजांना आपल्या जुन्या चालीप्रमाणें वेदमंत्रांनीं आशीर्वाद देऊं, व त्यांस चिरायु करण्याविषयीं त्या परम दयाळू परमेश्वराजवळ प्रार्थना करूं. आपल्या परम पूज्य परम पवित्र ऋग्वेदांत राजास अभिषेक करतांना ह्मटले जाणारे कांहीं मंत्र आहेत, त्यांतले कांहीं आपण ह्मणूं व मी त्यांचा अर्थही तुह्मांस सांगतों.

हे महाराजा, आपण सिंहासनावर बसलां आहां. या देशावर सुखानें राज्य करा आपण अढळ असा. आपण कायम असा. आह्मी सर्व प्रजाजन आपलें कल्याण चिंतूं; आपणास राजनिष्ठ राहूं. आपलें साम्राज्य कधींही क्षीण न होवो !

आपण पर्वताप्रमाणें अचल रहा, इंद्राप्रमाणें अचल रहा, व राज्य चालवा.

इंद्र या नवीन अभिषिक्त राजास आपलें साहाय्य देत आहे. सोम त्याचें शुभ चिंतीत आहे. ब्रह्मणस्पतिही त्याचें शुभ चिंतितो.

आकाश अढळ आहे. पृथ्वी अढळ आहे. पर्वत अढळ आहेत. हें सर्व विश्व अढळ आहे. त्याचप्रमाणें आह्मां प्रजाजनांचा हा राजा अढळ होवो.

वरुण याला अढळ करो; बृहस्पति याला अढळ करो; इंद्र व अग्नि याला साहाय्य देऊन अढळ करोत.

तथास्तु.

आतां आजच्या आनंदाप्रीत्यर्थ बादशहा पांचवे **जॉर्ज** यांच्या नांवानें त्रिवार जयघोष करून टाळ्या वाजवा आणि खाऊ घेऊन आनंदानें घरोघर जा.

मराठी ग्रंथ संग्रहालय

अभिषिक्त राजास आशीर्वाद ! *

आ त्वाहार्षमन्तरेधि ध्रुवास्तिष्ठाविचाचलिः ।
विशस्त्वा सर्वा वाञ्छन्तु मा त्वद्राष्ट्रमधिभ्रशत् ॥१॥
इहैवैधि माप च्योष्ठाः पर्वत इवाविचाचलिः ।
इन्द्र इवेह ध्रुवस्तिष्ठेह राष्ट्रमु धारय ॥ २ ॥
इममिन्द्रो अधीधरद्ध्रुवं ध्रुवेण हविषा ।
तस्मै सोमो अधिब्रवत्तस्मा उ ब्रह्मणस्पतिः ॥ ३ ॥
ध्रुवा द्यौर्ध्रुवा पृथिवी ध्रुवासः पर्वता इमे ।
ध्रुवं विश्वमिदं जगद्ध्रुवो राजा विशामयम् ॥ ४ ॥
ध्रुवं ते राजा वरुणो ध्रुवं देवो बृहस्पतिः ।
ध्रुवं त इन्द्रश्चाग्निश्च राष्ट्रं धारयतां ध्रुवम् ॥ ५ ॥

---

* ऋग्वेदमण्डल अध्याय १२, सूक्त १७३.

मुलांस थोडा उपदेश.

कुळीं कन्यापुत्र । होती जीं सात्विक ॥
तयांचा हरिख । वाटे देवा ॥ १ ॥

तुकाराम.

१.

मुलांनो,

आज आतां तुम्हांला सुटी झाली म्हणजे सुमारें महिना दीड-महिना तुमची व माझी गांठ पडणार नाहीं; तेव्हां तुम्हांला 'या' असें म्हणण्यापूर्वी चार गोष्टी सांगाव्या असें माझ्या मनांत आहे.

घटका दोन घटका चालून आलें म्हणजे पाव-अर्धी घटका विश्रांति घ्यावी; दिवसभर मेहनत केली म्हणजे संध्याकाळच्या प्रहरीं घटकाभर करमणूक करावी आणि रात्रभर स्वस्थ झोंप घ्यावी; सहा दिवस चांगले श्रम केले म्हणजे सातवे दिवशीं स्वस्थ विश्रांति घ्यावी; असें आजपर्यंत लोक करीत आले. वर्षांतून पांच पंचवीस दिवस सण म्हणून मानून लोक आनंदांत व विश्रांति घेण्यांत घालवितात याचा हेतु काय बरें? पुढें काम करण्यास ज्यास्त हुशारी यावी, मनाला व शरीराला आलेला थकवा, आपल्या पुढच्या मेहनतीच्या आड येऊं नये, हाच नव्हे काय? झालें तर मग! आजपासून सुमारें दीड महिना जी तुम्हाला सुटी मिळणार आहे, त्या सुटीचा तरी हेतु हाच आहे कीं, आज जवळ जवळ सहा महिने जी तुम्हीं आम्हीं मेहनत केली, तिच्यामुळें आलेला थकवा घालवून टाकावयाचा. पुनः आपण जून महिन्यांत कामाला लागलों म्हणजे शरीर काय किंवा आप-

लें मन काय, दोनही अगदीं ताजीं तवानीं असावींत. आपल्याला करावयाचें तें काम मोठ्या उल्हासानें व्हावें. आज सुटी मिळते आहे म्हणून जशीं तुमचीं तोंडें अगदीं प्रफुल्लित दिसत आहेत, तशीं पुनः कामाला सुरुवात करण्याच्या दिवशीं आमच्या दृष्टीस पडावीं. तुम्हांपैकीं कित्येक आपल्या आईबापांपासून आज चार सहा महिने दूर असल्यामुळें त्यांच्या भेटीसाठीं उत्सुक झाले असतील; कांहींना आपल्या इतर नातेवाईकांस भेटण्याची उत्कंठा झाली असेल; तेव्हां त्या सर्वांना आपल्या इच्छा तृप्त करून घेण्याला ही सुटी फार उपयोगी आहे. सारांश, मनास व शरीरास दोहोंसही योग्य विश्रांति मिळावी म्हणून ही सुटी आहे, तर तिचा तुम्हीं साऱ्यांनीं चांगला उपयोग करून घ्यावा.

परंतु एक गोष्ट मात्र तुम्ही लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, ही जी विश्रांति घ्यावयाची तिच्या योगानें तुमच्या अंगांतली तरतरी जाऊन आळस मात्र शिरूं देतां कामा नये. डोंगराच्या शिखरावरून एकसारखें घडघडत येऊन कोठें तरी पडणाऱ्या दगडाप्रमाणें तुम्ही आपली स्थिति होऊं देऊं नका. अशा दगडाची स्थिति काय होते हें तुम्हांला ठाऊक आहे? तो दगड वरून घडघडत येत असेल तेव्हां त्याच्या अंगांत इतका वेग असतो कीं, कांहीं पुसूं नये. पण एकदां कोठें तरी त्यानें विश्रांति घेतली, म्हणजे मग त्याच्या अंगचा सगळा वेग पार नाहींसा होतो. तो ज्या ठिकाणीं पडेल त्या ठिकाणीं त्याच्या अंगावर माती पडून वीत वीत थर झाला, किंवा वेडेंवांकडें गवत उगवलें तरी तो हलत नाहीं; उलटा अधिक अधिकच बसतो. वरून घसरत येतांना घांसून घांसून जें त्याला तेज आलेलें असतें, तें पार दिसेनासें होतें! तर या दगडासारखी विश्रांति घेऊं नका. आजपर्यंतची जी तुमची तरतरी आहे, आजपर्यंतच्या अभ्यासानें जणूं काय घांसून पुसून तुम्हांस तेज आलें आहे, तें गमावेल अशी विश्रांति घ्यावयाची नाहीं. तुम्हांला ठाऊकच आहे कीं, आरसा रोज रोज पुसला नाहीं, तर त्यावर मळ बसून, त्यांत आपलें तोंड चांगलें दिसत नाहीं. त्याचप्रमाणें भांड्यावरून हात

फिरला नाहीं तर तें स्वच्छ राहवयाचेंच नाहीं. रामदासस्वामींनीं म्हटलेंच आहे कीं,

महादर्पण खतलें* । तेणें मुख आच्छादलें ॥ १ ॥
धातुवरी आला मळ । तेणें लोपलें निर्मळ ॥ २ ॥
मुखें न होतां उच्चार । तेणें बुडे पाठांतर ॥ ३ ॥
नाहीं दीपाचा विचार । दास ह्मणे अंधकार ॥ ४ ॥

तेव्हां तुम्ही आतांपर्यंत जें शिकलां, त्याच्यावर थोडीबहुत उजळणी जर तुम्हीं केली नाहीं, तर मग तुमचीही स्थिति मळलेल्या आरशाप्रमाणें अगर काळ्या पडलेल्या भांड्याप्रमाणें होईल. दिवा लावला आहे; परंतु त्यांत तेल आहे नाहीं हें पाहून, वातबीत सारून काजळी झाडली नाहीं, तर कांहीं वेळानें दिवा जाऊन अंधार पडेल. तेव्हां आजपर्यंत शिकलांत त्याची दिवसांतून तास दोन तास उजळणी करीत जा. आतां सुटींत करण्यासाठीं म्हणून तुम्हांस कोणी नवीन अभ्यास नेमून देत नाहीं. जे झाले आहेत त्यांची नीट व्यवस्था ठेवा. घर चांगलें भक्कम बांधलें तरी पण त्याची वास्तपुस्त ठेवली नाहीं, आठ चार दिवसांनीं धूळ वगैरे झाडून कोळिष्टकें काढलीं नाहींत, भिंतीवरून हात फिरविला नाहीं, पडलें झडलें पाहिलें नाहीं, तर तें लवकरच मोडकळीस येईल. तेंच जर हें सारें केलें, तर घर पण घर राहील! ज्यांनीं मूळ घर बांधतांनाच काळजी घेतली नसेल, आपलें कसें तरी लिचेंपिचें बांधलें असेल, त्यांनीं डागडुजीकडे जास्त लक्ष्य दिलें पाहिजे हें उघड आहे. ज्यांनीं गेल्या सहामाहींत योग्य असा अभ्यास केला नाहीं, त्यांनीं या विश्रांतीच्या दिवसांत थोडीशी अधिक मेहनत केली पाहिजे; तरच त्यांचें कल्याण होणार आहे. लहानशीच चूक आहे तोंपर्यंत सुधारण्यास कठिण पडणार नाहीं. अंगरखा थोडा फाटला असेल त्याच वेळीं शिवण्याची खबरदारी घेतली, तर पुढें पुष्कळ आयास वांचतात. गेल्या परिक्षेंत जे पास झाले नाहींत, त्यांनीं

* मळानें भरलें.

या आतां सांगितल्या गोष्टींकडे चांगलें लक्ष्य देऊन आपल्या अभ्यासांत असलेला उणेपणा भरून काढावा. आज थोडा आहे तों तो भरून काढावा; पुढें तो अधिक अधिक वाढत गेला, ह्मणजे मग कधींच भरून येणार नाहीं आणि जन्मभर पश्चात्तापास मात्र कारण होईल. असो.

आतां मीं तुम्हांस सांगितलें खरें कीं, " सुटींत करण्यासाठीं म्हणून तुह्मांस कोणी नवीन अभ्यास नेमून देत नाहीं; " पण तसें नाहीं. मी आज जो उभा राहिलों आहें, हा तुम्हांस एक नवीन धडा नेमून देण्यासाठींच उभा राहिलों आहें. तो धडा मी आतां तुम्हांला समजावून देतों. भिऊं नका, तोंडें वाईट करूं नका. मी धडा देणार आहें तो तुमच्या विश्रांतीच्या, आनंदाच्या अगर सुखाच्या आड येणारा नाहीं; इतकेंच नव्हे, तर तो धडा तुम्ही चांगला शिकलांत तर तुम्हांला या तीनही गोष्टी हव्या तेवढ्या मुबलक प्राप्त होतील. हा धडा शिकण्याकरितां तुम्हांला पुस्तक घेऊन एकाच ठिकाणीं तास दोन तास बसायला नको. हा धडा असा आहे कीं, तो पाहिजे तेव्हां, पाहिजे त्यानें, पाहिजे त्या ठिकाणीं शिकावा. " अहो येतां जातां बसत उठतां कार्य करितां । सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां " घरीं दारीं सर्वत्र शिकतां येईल असाच तो धडा आहे, आणि तो शिकत जावा तसतसा आपल्याला अधिक अधिक आनंद होतो; आपल्या सभोंवार असतील त्यांस सुख होतें; तो आपण कितीही घोकला तरी त्याची कटकट कोणास होणार नाहीं. असा विलक्षण धडा आहे तरी कोणता ? तो कळण्याची तुम्हांला मोठी उत्सुकता झाली असेल नव्हे ? ऐका तर मग. मी जें आज तुम्हांला विशेष शिकावयास सांगणार आहें, तें ' सभ्यपणाचा धडा ' हें होय. आजपर्यंत तुम्हांला सभ्यपणा नव्हता, असें माझें म्हणणें नाहीं; परंतु तो तुमच्या अंगीं कायम राहून त्याचा अधिकाधिक उदय व्हावा अशी माझी फार फार इच्छा आहे; त्याच्याविषयींच आज मी थोडेंसें विवेचन करणार आहें.

मुलांनो, सभ्यपणा या शब्दांत किती अर्थ येतो, याचा कधीं तुह्मीं विचार केला आहे काय ? या शब्दांत जितका अर्थ येतो, तितका सगळा यथास्थितपणानें मी जर सांगेन म्हटलें, तर सात आठ तास देखील पुरणार नाहींत; तेव्हां अगदीं थोडक्यांत सांगतों म्हणजे झालें. 'सभ्यपणा' या शब्दाचा अर्थ अंतर्बाह्य निर्मळपणा. ज्याचें शरीर व मन दोनही निर्मळ तो खरा सभ्य. नीटनेटक्या पोषाखाचा मनुष्य पाहिला ह्मणजे आपण एकदम तो कोणी तरी सभ्य गृहस्थ असावा, असें समजतों. त्याचप्रमाणें एखाद्या माणसाचा पोषाख आपला कसाबसा दिसला, आणि प्रथमदर्शनीं आपणास तो सभ्य वाटला नाहीं, तरी त्याचें आपलें दोन घटका बोलणें झालें म्हणजे त्याची रीतभात, आचारविचार चांगले दिसले तर त्यास आपण सभ्य ह्मणतों; तेव्हां सभ्यपणा हा पोषाखावर, चालचलणुकीवर आणि मनाच्या शुद्धतेवर असतो. या तीनही गोष्टी ज्याच्या अंगीं परिपूर्ण तो खरा सभ्य. तेव्हां तुम्हांला जर सभ्य व्हावयाचें असेल आणि तुम्हीं व्हावें, अशी माझी, तुमच्या आईबापांची, तुमच्या स्नेह्यांसोबत्यांची, सारांश, तुमचें सदासर्वदा कल्याण व्हावें असें ज्याला ज्याला वाटतें त्या प्रत्येकाची अतिशय इच्छा आहे. तेव्हां तुम्हांला आपल्या अंगीं सभ्यपणा यावा आणि आम्हां सर्वांना संतोष व्हावा असें तुह्मांला वाटत असेल, तर या आतां सांगितलेल्या तीन गोष्टींकडे लक्ष पुरवा. नीटनेटका पोषाख करायला शिका; आपली चालचलणूक चांगली करा आणि मन गंगेच्या पाण्याप्रमाणें शुद्ध निर्मल राहूं द्या. या तीन गोष्टी तुह्मीं साधल्या म्हणजे मग तुमच्या अंगीं सभ्यपणा परिपूर्ण आला म्हणून समजा.

मुलांनो, इंग्रजींत सभ्य गृहस्थ किंवा सुजन, याला Gentleman असा शब्द आहे. याचा अर्थ अगदीं उघड आहे–Gentle सौम्य, man गृहस्थ–सौम्य गृहस्थ–पोषाखांत सौम्य, बोलण्याचालण्यांत सौम्य, विचारविकारांतही सौम्य. हा सौम्यपणा आपल्या अंगीं आणणें हेंच तुह्मांला शिकवावें असें माझ्या मनांत आहे; परंतु ज्याप्रमाणें मी इतर धंदे तुम्हांस शिकविसों,

त्याप्रमाणें हाही शिकविणार. इतिहास शिकवावयाचा किंवा संस्कृत शिकावावयाचें, किंवा भूमिति शिकवावयाची, ह्मणजे शिक्षक काय करतो ? तर समजावून देतो. अवघड असेल तें सवघड करितो. मुलांकरितां त्यानें पाठ व तयार करून उपयोग नाहीं. अभ्यास करावयाचा तो मुलाचा मुलानेंच केला पाहिजे. त्याचप्रमाणें आज जो हा धडा मी तुह्मांस शिकवितों आहें, तो योग्य रीतीनें समजावून सांगतों. तो आपलासा करून घेण्यास काय काय करावें लागतें तें सांगून वाट दाखवून देतों; हें सर्व सांगून तुमच्या एकदां मनांत उतरलें, ह्मणजे पुढचें काम तुमचें आहे. अभ्यास करावयाचा तो तुमचा तुम्हीं मन लावून केला पाहिजे; आणि तो तुम्ही कराल व त्याचीं योग्य फलें मिळवाल. अशी माझी पक्की खातरी आहे.

मी आतांच तुम्हांला सांगितलें कीं, सभ्यपणा हा पोषाखावर, चालचलणुकीवर व मनाच्या निर्मलपणावर अवलंबून असतो. आतां या तीन गोष्टींतून एक एक गोष्ट घेऊन आपण तिचा निरनिराळा विचार करूं.

परंतु पोषाखाचा विचार करूं लागण्यापूर्वी ज्या आपल्या शरीरावर तो पोषाख घालावयाचा त्या शरीराच्या स्वच्छतेसंबंधानें विचार केला पाहिजे; कारण शरीर स्वच्छ राखणें हें एक सभ्यपणाचें अंग आहे. मुळीं सभ्यपणा म्हणजे स्वच्छता—शुद्धता होय. शरीरानें, पोषाखानें, चालचलणुकीनें आणि विचारानें जो स्वच्छ तो सभ्य. तेव्हां शरीर स्वच्छ राखणें ही अगदीं आरंभींची गोष्ट, आणि विशेषतः तुम्हां लहान मुलांना तर हें विशेषच सांगितलें पाहिजे. कारण, तुम्हांपैकीं कित्येक—किंबहुना पुष्कळजण—शरीराच्या स्वच्छतेकडे द्यावें तितकें लक्ष्य देत नाहींत. सकाळच्या प्रहरीं शौचास जाण्याचा, स्वच्छ तोंड धुण्याचा, चांगलें अंग घासून आंघोळ करण्याचा फार कंटाळा करितात. वेळच्या वेळीं शौचास न जाणें हें शरीराच्या आरोग्याला फार घातक आहे. स्वच्छ तोंड धुतलें नाहीं, तर किती ओंगळपणा दिसतो ! दांतावर कीट चढून पिंवळेपणा येतो आणि मग कोणाशीं बोलण्यास

लाज वाटूं लागते. तोंडावर ओघळ दिसणें किती तरी हिडिस्! आंघोळ करतांना अंग जर चांगलें घासलें नाहीं, तर मळ जावा कसा? कावळ्यासारखी अंघोळ करणें अगदीं गैरशिस्त! उगीच डोक्यावर तपेलीभर पाणी ओतून थडथडा पळत जाणें सर्वथा टाका. तुह्मांपैकीं पुष्कळांना ही संवय असेल. इंग्रजींत यासंबंधानें ह्मण आहे ती सदैव लक्षांत ठेवा. पवित्रतेच्या आधींची पायरी स्वच्छता. पवित्रता मिळवूं पहाणाराला स्वच्छता साधलीच पाहिजे. शिवाय स्वच्छतेपासून शरीरास किती तरी सुख होतें! वाईट काम करणाऱ्या मुलाच्या मनाला जितकें दुःख, तितकेंच अस्वच्छ असणाऱ्या मुलाच्या शरीराला दुःख! एवढ्याकरितां मलीनता म्हणून आपल्या अंगावर राहूं देऊं नये. रोजच्या रोज स्वच्छ अंग धुवावें, बाहेर जाते वेळीं तोंडबिंड चागलें स्वच्छ धुऊन नंतर जावें.

आतां बाहेर जातांना पोषाख करावयाचा तो सभ्यतेला योग्य असा असावा. मुलांनो, पोषाख घालावयाचा हा मुख्यतः शरीर झांकण्याकरितां आहे; परंतु तो दुसऱ्यास दिसला असतांना त्याला त्यांत कांहीं वाईट वाटेल असा तो असूं नये. पोषाख असा असावा कीं, तो कसा केला आहे हें कोणाच्या विशेष लक्षांत येऊं नये; तो अगदीं स्वच्छ असावा, हें तुम्हाला सांगावयास नकोच; कारण, सभ्यपणाची आपली इमारत बांधावयाची ती मुळीं स्वच्छतेच्या पायावर. पोषाख अस्वच्छ असला तर लोकांस व आपणास दोघांसही वाईट. तेलों आपले कपडे ह्मणून भांडायाला येईल असे कपडे असूं नयेत; चांगले स्वच्छ ठेवावे. पोषाखांत उंचीपणा नकोच. मुख्य पाहिजे तो स्वच्छपणा. त्याचप्रमाणें जो पोषाख अंगावर असतांना लोक छचोर म्हणतील, असाही तो असूं नये. त्यांत साधेपणा, नीटनेटकेपणा असावा. कित्येक मुलें ओंगळपणांत व गयाळीपणांतच साधेपणा आहे असें समजतात. तीं ओंगळ, गयाळी, असा पोषाख करितात आणि कोणी, "असें कां?" म्हणून विचारतां, म्हणतात, "आम्हांला काय साध्या माणसांना? असाच बरा!" पण ही त्यांची केवढी मोठी चूक आहे! तुम्हांपैकीं अशी चूक करीत असतील, त्यांनीं ती अवश्य सुधारावी.

बरें, दुसरीं कित्येक मुलें असतात त्यांना नखरा–डामडौल–करण्यांतच नीटनीटकेपणा वाटतो. कानावर टोपी घालून ऐटीनें बसणें, अंगरख्याचे बंद अगर कोटाच्या गुंड्या मुद्दाम मोकळ्या सोडणें, बाकी सारे बंद बांधून गळ्याच्या तिथलीच अंगरख्याची गुंडी मोकळी सोडणें, यांतच कायती मजा आहे असें त्यांस वाटत असतें. पण ते फार वेडे ! नीटनेटकेपणा किंवा साधेपणा, असे बंद अगर गुंड्या मोकळ्या सोडण्यांत नाहीं; तर नीट बंद वगैरे बांधण्यांत, टोपी चांगली नीट घालण्यांत आहे. पोषाख ह्मणजे शरीराचा एक दागिना आहे असें समजतात, ते तो डौलानें, नखऱ्यानें, लोकांच्या नजरेस जरूर येईल अशा तऱ्हेनें घालतात; आणि ज्यांला नीट घालायला येत नाहीं ते आपला उणेपणा–आपला गयाळीपणा झांकण्यासाठीं साधेपणाची ऐट मारतात. मिळून दोघेही मूर्खच ! तेव्हां तुमच्यांतले जे कित्येक या दोन वर्गांपैकीं एखाद्यांत असतील, त्यांनीं तो वर्ग सोडून खऱ्या साधेपणाकडे व नीटनेटकेपणाकडे वळावें, व पोषाख स्वच्छ, साधा, आणि नीटनेटका करावा. गुंडी निघाली, बंद तुटला, तर वेळच्यावेळीं लावून घ्यावा, आळस करूं नये.

असा पोषाख तुम्हीं नित्य करूं लागलांत म्हणजे पोषाखानें दिसणारा सभ्यपणा तुम्हीं आपल्या स्वाधीन करून घेतलात असें पक्कें समजा.

आतां आपल्या विषयाच्या दुसऱ्या अंगाकडे वळूं. चालचलणुकीसारखी दुसरी कोणतीही महत्त्वाची गोष्ट नाहीं. तुह्मी चोरी करूं नका, लबाडी करूं नका, खोटें बोलूं नका, वाईट संगत धरूं नका इत्यादि गोष्टी मी तुह्मांला सांगत नाहीं, कारण हे अत्यंत नीच अपराध तुमच्या हातून स्वप्नांतही होत असतील असें मला वाटत नाहीं. एखादा दुसरा तुमच्यांत हे अपराध करणारा असेल, तर त्यानें वेळींच सुधारावें, नाहीं तर त्यास पुढें अतोनात यातना भोगाव्या लागतील.

मी कांहीं लहानसान परंतु फार महत्त्वाच्या पांच चार गोष्टींबद्दल थोडेंसें बोलणार आहें. मुलांनो, मी नुकतेंच जें तुह्मांला

सांगितलें कीं, सभ्यता म्हणजे पोषाखांत, चालचलणुकींत व विचारविकारांत सौम्यता असणें, तें तुमच्या ध्यानांत आहेच. चालचलणुकींत सौम्यता असणें हें सभ्यतेचें मुख्य अंग हें आतां सांगतों. नीट ध्यानांत धरा. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे, 'लहानसान—यःकश्चित् गोष्टींतही चांगुलपणा दाखविणें, हें सभ्यतेचें खरें लक्षण. गोड बोलणें, कोणाचें मन न दुखविणें, कोणींही कांहीं काम सांगितल्यास होतां होईतोंपर्यंत त्याला 'नाहीं' असें कधीं न म्हणणें, आपल्यासाठीं कोणाला कांहीं करण्याविषयीं सांगणें झाल्यास मोठ्या नम्रतेनें विनंति करणें, इत्यादि गोष्टी म्हणजेच सभ्यतेचें सार होय.' तुह्मांपैकीं पुष्कळ—पुष्कळच जण—ज्या गोष्टी करीत नाहींत त्या याच. नम्रतेनें व सौम्यपणानें वागणें म्हणजे कांहींच नाहीं. तुम्ही आपल्या गुरूशीं अथवा आईबापांशीं नम्रपणानें वागतां तें उत्कृष्टच. तें कर्तव्य तुम्ही बजावतां; परंतु तुमच्या बरोबरीचे जे आहेत त्यांच्यांशीं व तुम्हांहून लहान आहेत, त्यांच्याशींही नम्रपणानें व सौम्यतेनें वागूं लागल्याखेरीज तुम्हांला कोणी सभ्य समजणार नाहीं. उद्धटपणानें बोलण्यांत कोणास मौज वाटत असेल ती वाटो, मला तर त्यांत कांहींही चांगलें दिसत नाहीं. आपल्याला वर्गांत बसायला जागा पाहिजे असल्यास आपल्या स्नेह्याला, "ए! खालीं होरे. आम्हांला जागा नको का बसायला?" असें उद्धटपणानें सांगण्यापेक्षां, "मला थोडीशी दाटी होते आहे, अंमळ सरकून घेशील काय?" असें म्हणण्यांत खरोखर मोठेपणा आहे; परंतु मी एकच गोष्ट सांगण्याच्या या ज्या दोन पद्धति दिल्या आहेत, त्यांपैकीं पहिली कितीजण अनुसरतात, आणि दुसरी किती अनुसरतात याचें प्रमाण पहा बरें! मला वाटतें, शंभरांत एक, असें प्रमाण मोठ्या माराकुटीनें बसेल! ही स्थिति चांगली काय? उगीच उदाहरणांकरितां म्हणून एक, वर्गांत घटकोघटकीं घडणारी गोष्ट सांगितली; परंतु तुम्ही विचार करून पहाल तर अशा तऱ्हेचें वर्तन क्षणोक्षणीं घडतें असें तुह्मांला आढळेल. आपल्या स्नेह्याला हांक मारतांना त्यांचीं सरळ नांवें टाकून "नान्या,

विन्या, बाळ्या, हऱ्या " अशीं नांवें घेण्यांत काय विशेष आहे? त्याचप्रमाणें कोणीं कांहीं काम सांगितलें तर त्याला " चल, आमचं काय अडलं आहे? तुला हवं तर कर! " असे शब्द दिवसांतून कितीदां तुमच्या तोंडून निघतात? तुह्मांला जर कोणी विचारूं लागलें—विशेषतः तुमची बहीण जर तुम्हाला कांहीं विचारायला आली, तर तुम्ही कशीं उत्तरें देतां? माझ्या एका स्नेह्याच्या मुलीनें, पुस्तक वाचीत बसलेल्या आपल्या भावास एक दिवस सहज म्हटलें, " दादा, तूं काय वाचतो आहेस तें मला सांग रे." तिनें बिचारीनें अगदीं सौम्यपणानें विचारिलें; परंतु दादासाहेब तेवढ्यानेंच चढून जाऊन मोठ्या उद्धटपणानें तिला ह्मणतात, " चल, तुला काय पोरीला करायचं आहे बुकांतली गोष्ट ऐकून? चूलबोळकीं खेळ जा आपलीं! " हें त्या मूर्ख पोराचें उत्तर ऐकून कोणास हंसूं येणार नाहीं? मुलांनो, तुम्ही आपल्या बहिणींस असें उत्तर कधीं—कधींही देऊं नका. पुस्तकें वाचून ज्ञान मिळविण्याची तुम्हांला जशी इच्छा आहे, तशी त्यांनाही असते. ज्ञानापासून जसा तुम्हांला फायदा, तसा त्यांनाही होणार. उलट त्यांना जर वाचण्याची गोडी नसली, तर त्यांच्या मनांत ती उत्पन्न करा. उद्धट उत्तरें देऊन त्यांचा कधींही हिरमोड करूं नका. कोणाचा हिरमोड करूं नये. चांगल्या गोष्टींत उलट सर्वांस यथाशक्ति मदत करावी यांत सभ्यपणा आहे, हें चांगलें ध्यानांत ठेवा. तोंडावाटे कधींही अभद्र भाषण काढूं नका. अभद्र शब्द आपल्या शब्दकोशांतून अगदीं पिटाळून लावा. स्वप्नांत देखील त्यांचा विटाळ आपणांस होऊं देऊं नका. दुसरा कोणी उच्चारीत असला, तर त्याला तसें करूं नकोस म्हणून उपदेश करावा. तो न ऐकेल तर आपण तेथून उठून जावें. पुनः असल्या माणसाशीं संबंध ठेवूं नये. जे शब्द आपणांस सभ्य लोकांच्या देखत उच्चारण्यास लाज वाटेल, जे शब्द आपल्या बहिणीच्या, आईच्या वगैरे कानीं कधींही पडूं नयेत असें आपण इच्छितों, असले शब्द आपल्या तोंडांतून निघणें, म्हणजे केवढा हलकटपणा! असला हलकटपणा ज्याच्या अंगीं आहे तो सभ्यपणा

पावणार कसा ? तेव्हां आपण काय बोलतों, व आपले स्नेही काय बोलतात याजबद्दल अतिशय खबरदारी घेतली पाहिजे. ज्याची वाणी निर्मल, त्यानें सभ्यता बहुतेक मिळविली म्हणून समजावें.

बोलण्यांत बोल नसणें हें एक सभ्यतेला मोठें विघ्न आहे. तें-ही तुह्मीं टाळलें पाहिजे. आतां एक गोष्ट तुम्ही करतों म्हणून सांगावें, तुमच्या विश्वासावर लोकांनीं बसावें, आणि दुसऱ्या घटकेस तुम्हीं बदलावें, यासारखी असभ्यपणाची वागणूक दुसरी कोणतीही नसेल; तर ती तुम्ही अवश्य अवश्य टाळा.

आपल्या चालचलणुकीसंबंधानें इतकी सुधारणा तुम्हीं केली म्हणजे तुह्मीं सभ्यता संपादन केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें दोन अंगें झाल्यानंतर आतां आपण शेवटल्या अंगाकडे वळूं या.

मन निर्मल असणें, कोणतेंही काम करतांना तें शुद्ध हेतु धरून करणें, कोणाविषयीं हेवादेवा मनांत मुळींच राहूं न देणें, कप-टाला म्हणून थारा न देणें, रिकामा दिमाख, पोकळ अभिमान यांचा अगदीं नायनाट करणें, इत्यादि गोष्टी साधल्या म्हणजे सभ्यपणाचें तिसरें व अति महत्त्वाचें अंग आपलेंसें झालें ह्मणून समजावें. आपल्याला अमुक गोष्ट येते आहे असें समजून आप-ल्या वर्गांतला सोबती आपल्याला विचारायला आला तर त्याला मन मोकळें करून आपल्याला येत असेल तें सांगावें, कुचराई करूं नये. त्याला आपण सांगितल्यानें आपला नंबर वर जायचा तितका जाणार नाहीं असा वाईट—घाणेरडा विचार मनांत मुळीं शिरूंच देऊं नये. असला एक विचार एकच वेळ जरी आला, तरी उत्तम अंजिरांच्या टोपलींत एक नासका अंजीर पडल्यानें जी स्थिति होते ती व्हायची. ते जसे सारे अंजीर एकामुळें नासतात, तसे अशा एका कुविचारानें आपले सर्व विचार नासून जातात; तेव्हां असला विचार अंतःकरणाच्या दाराशीं देखील येऊं देऊं नये.

आपलाच हेका धरून बसणें—मी अमुक करा असें म्हणतों,

तें केलें तरच बरें—असा हट्ट घेणें तर फारच वाईट; आणि तुमच्या वयांत जर तुम्हीं हा अवगुण घालविला नाहीं, तर पुढें फारच अवघड जाईल. यायांनो, हा हट्टी स्वभाव—हा सगळ्यांत वाईट व निंद्य दुर्गुण—तुम्ही जितक्या लवकर टाळाल तितकें तुमचें कल्याण होईल. या हट्टी स्वभावामुळें किती नुकसानें होतात याचा पत्ताच नाहीं. आपल्यालाही सुख नाहीं, दुसऱ्याला नाहीं. कोणाचा म्हणजे संतोष त्यापासून होतो असें नाहीं. हट्ट घेऊन बसलांत म्हणजे क्षणभर मंडळी दादापुता करितात, पण तुमचें रडगाणें थोडक्यांत संपलें नाहीं म्हणजे वडील मंडळी संतापून जाऊन रट्टे देण्यापर्यंत येतात. तुम्हांला शिक्षा करण्यांत गुरूला किंवा वडिलांना संतोष का आहे ? उलट किती तरी वाईट वाटतें ! पण त्याचा दोष कोणाकडे ? सभ्यतेला अनुचित असें हट्टी वर्तन करणाऱ्या तुम्हांकडे, हें तुमचें तुम्हांला समजतेंच आहे.

तर, मुलांनो, हे वर सांगितलेले पोषाखाचे, चालचलणुकीचे व मनाचे दोष अजिबात काढून टाका. हे दोष गेले म्हणजे तुम्ही सभ्य झालांतच. प्रथम प्रथम कित्येक गोष्टी साधण्यास थोडेंसें कठिण जाईल; परंतु एकदां निश्चयपूर्वक यत्न केला म्हणजे तें सारें खास साधेल. सांगणें—शिकविणें काम आमचें; त्याचा अभ्यास करून तें आपलेंसें करणें हें काम तुमचें. आमचें काम आम्हीं केलें, तसें तुमचें काम तुम्ही करा. आज जो हा धडा मीं तुह्मांला दिला, तो चांगला पाठ करा, त्याचा अभ्यास करा, आणि सुटी संपल्यावर परत आलांत म्हणजे आपल्या वर्तनांत फरक झाला आहे असें आमच्या नजरेस येऊं द्या. ‘ जो गुण बाळा तोच जन्मकाळा ’ ही म्हण चांगली लक्ष्यांत धरा. आज जो गुण तुम्ही आपल्या अंगीं खिळवाल, तो आजन्म रहाणार ! तुमचें कल्याण अगर अकल्याण होणार तें आतां तुमच्या अंगीं जडणाऱ्या गुणावगुणांवर अवलंबून आहे. तुमचें मुख्य कर्तव्यकर्म आपल्या चांगल्या वागणुकीनें, स्वतःस व इतर सर्वांस सुख देणें हें होय. शरीराची स्वच्छता राखून व्यायाम वगैरेकडे चांगलें लक्ष पुरविलें

म्हणजे तुमचें शरीर सुखी होईल. आईबापांची व गुरूंची आज्ञा पाळून, आपल्या सद्वर्तनानें त्यांस सुख दिलें म्हणजे तुमच्या मनाला जें समाधान होईल तें केवळ अवर्णनीय! गोड व सौम्य अशा शब्दांनीं दुसऱ्यास बरें वाटविलेंत तर किती तरी मोठेपणा होतो! वेळेची किंमत जाणून–तो व्यर्थ घालवूं नका. खेळण्याच्या वेळीं खेळा, अभ्यासाचा वेळीं मन लावून अभ्यास करा. इतक्या सगळ्या गोष्टी तुम्ही योग्य तऱ्हेनें केल्या म्हणजे 'सभ्य' हें नांव मिळवून तुम्ही सुख संपादन केलें म्हणून समजा; आणि तुम्ही अशा तऱ्हेनें सुखी झालां म्हणजे गुरूंच्या व वडील मंडळींच्या आनंदास काय पारावार! तुमचें खरें सुख तेंच त्यांचें सुख!

तर आपल्या स्वतःस व इतर सर्वांस सुखी करण्याचें साधन, सर्वत्रांच्या सुखाचें भांडार उघडण्याची किल्ली तुमच्या हातांत आहे, तिचा उपयोग करा एवढेंच सांगणें आहे.

पुनः पुनः माझें तुम्हांला सांगणें आहे तें हेंच कीं, सभ्यपणानें वागणें हें अगदीं तुमच्या हातचें आहे. तें तुम्ही साधा. मनास वाटेल त्या वेळीं सरदाऱ्या दरकदाऱ्या मिळविणें हें आपल्या हातचें नाहीं. इच्छेस येईल त्या वेळीं श्रीमंत होणें अशक्य. प्रत्येकजण जर म्हणेल कीं, मी रावबहादूर रानडे, डा. भांडारकर, जास्टिस तेलंग इत्यादि मंडळीप्रमाणें विद्वान् होईन तर तेंही त्यास साधेलच असें नाहीं; आणि कधीं काळीं सतत श्रमानें, व दृढ निश्चयानें तसें होतां आलें, तरी फार थोड्यांस येईल! परंतु सभ्यतेनें वागणें हें कोणाला पाहिजे त्याला साधणार आहे. मग तो लहान असो थोर असो; धाकटा असो, वडील असो; तरणा असो, म्हातारा असो; श्रीमंत असो, गरीब असो; विद्वान् असो, अविद्वान् असो; पुरुष असो किंवा स्त्री असो; पोषाख अगदीं साधा पण नीटनेटका करणें; आपले विचार व आपलें मत स्पष्ट सांगणें, परंतु त्यांत उद्धामपणा नसणें; सत्यनिष्ठा, उदारता व कळकळ या तीन गोष्टी सदैव मनांत राखणें; गरिबांवर दया करणें, व गरजूंची गरज पुरविणें, सर्वांविषयीं आदरबुद्धि धरणें; आपणांहून ल[illegible] असतील त्यांना बरेंवाईट सांगणें व वडिलांस मान देऊन[illegible]

म्हणणें ऐकणें; ज्या स्थितींत आपण आहोंत त्या स्थितींत समाधान मानणें; कोणाचा हेवा-दावा न करणें, याचेंच नांव सभ्यपणा ! मनांत आणल्यास साऱ्यांना साधायला येईल, असें जें काय आहे तें हेंच ! सर्वत्रांच्या सुखाच्या भांडाराची जी किल्ली ती हीच, आणि ही तुमच्या स्वाधीन आहे; तर पुनः एकदां तुम्हांला सांगतों, नीट लक्ष्य द्या. ही किल्ली तुमच्या हातीं आहे. हिच्या साह्यानें तें भांडार खुलें करा. आपणही सुखी व्हा, आणि आम्हां सर्वत्रांसही सुखी करा. एवढें केलेंत म्हणजे तुमच्यासारखे धन्य कोणीच नाहींत; व तुम्ही धन्य झालांत म्हणजे आम्ही वडील मंडळी धन्य झालोंच !

मुख्यतः ज्या विषयावर मी आज चार शब्द तुम्हांस सांगणार होतों, तो विषय वास्तविक येथें आटपला; तथापि आणखी एक दोन गोष्टींविषयीं तुम्हांला थोडेंसें सांगावें असें माझ्या मनांत आहे.

पहिली गोष्ट " व्यायामाची जरूर " ही होय. शरीर जर नीट नसलें, तर सर्व गेलें म्हणून समजावें. आरोग्याचा मूळ पाया " अन्नपचन " हा होय. ज्याला खाल्लेलें अन्न पचत नाहीं, त्याच्या शरीराची दिवसानुदिवस माती होत जाणार म्हणून समजावें. यथास्थित जेवण जेऊन–मग तें जाडेंभरडें असो कीं मोठें मिष्ट असो–तें चांगलें पचविणें, यांतच आरोग्याचा आरंभ–किंबहुना तेंच आरोग्य; परंतु ज्याला शरीरश्रम करावयाचे नाहींत, त्याला अन्न पचत नाहीं; आणि अन्न पचत नाहीं म्हणून श्रमावांचून पचेल तितकेंच खावें लागतें. अर्थात् दिवसानुदिवस अन्न कमी जातें; व अधिकआगळें खाल्लेंच तर रोज अजीर्णाचा त्रास होऊन रक्त बिघडतें व शरीराचें तेज जातें. असें होणें चांगलें असें कोण म्हणेल ? या बाळपणीं जर तुम्ही नुसते जेठा मारून बसूं लागलां, तर पुढें तुमची स्थिति होणार कशी ? असें करूं नका. ज्यांना व घराच्या बाहेर जाण्यास परवानगी नसेल, त्यांनीं सूर्याला नमल्या स्कार घालावे. नमस्कार घालण्याचा व्यायाम सर्वांत उत्तम. राची स्या बाहेर जातां येईल त्यांनीं उघडया मैदानांत हिंडायला गर आट्यापाट्या, खो–खो, चेंडुदांडु, क्रिकेट वगैरे खेळ

खेळावे. बाळपणीं खेळायचें नाहीं, तर खेळायचें केव्हां ? एव्हांपासूनच मोठ्या माणसांप्रमाणें बसून गोष्टी सांगण्याची संवय लावून घेऊं नका. वयाच्या मानानें सर्व गोष्टी असाव्या. लहान वयांत, जोंपर्यंत संसाराची काळजी तुमच्या पाठीमागें नाहीं, तोंपर्यंत वडील माणसांना योग्य अशा गोष्टींत मन न घालतां आपला अभ्यास बरा कीं आपला खेळ बरा, असें माना. हे खेळ मनाला आनंद देऊन शरीराला सुख देतात. खेळ खेळणें हें पोरकटपणाचें लक्षण, असभ्य, असें मनांत मुळींच वाटूं देऊं नका. योग्य तऱ्हेनें खेळ खेळणें आणि सभ्यपणा यांचा विरोध काडीमात्र नाहीं.

आपल्या वयाला अगदीं विशोभित अशा गोष्टी करण्याची तुम्हांपैकीं कित्येकांस जी संवय लागली आहे ती मात्र फार वाईट. मोठी मंडळी ज्या सभांना जातात त्या सभांना आपण जाऊन बसणें; आणि तेथें जाऊन कांहीं एक न समजलें तरी " हा-हा-हा " करून टाळ्या पिटणें; ज्यांत आपल्याला कांहीं समजत नाहीं असे वर्तमानपत्रांतले लेख वाचून त्यांवर दुढ्ढाचार्याप्रमाणें खल करणें, यासारखा लहान मुलांच्या हातून होणारा मूर्खपणा दुसरा कोणताही नाहीं. अशा सभांस जाणें, आणि ज्या गोष्टींशीं आपला आज कांहीं संबंध नाहीं अशा गोष्टींचा काथ्याकूट करणें अगदीं—अगदीं सोडून द्या कसें ! ज्या सभा तुम्हांकरितां नव्हेत, त्यांकडे पाहूं देखील नका; जीं वर्तमानपत्रें तुमच्यासाठीं नव्हेत त्यांस शिवूं नका. बालबोधासारखें मासिक व "हरि आणि त्रिंबक " यासारखीं पुस्तकें हवीं तेवढीं वाचा. त्यांपासून तुमचा फायदा होईल. मुलांसाठीं म्हणून जीं व्याख्यानें असतील तीं जाऊन अवश्य ऐका. पण जिथें तुमचा संबंध नाहीं, तुम्ही गेलांत तर तुमचा फायदा नाहीं इतकेंच नव्हे, तर नुकसान आहे, तेथें तुम्ही जाऊं नका व जें तुमच्यासाठीं लिहिलेलें नाहीं तें तुम्ही मुळीं हातींही धरूं नका. ज्याप्रमाणें कांहीं वयापर्यंत चूक, चाकू, कात्री यांस तुम्हीं हात लावूं नये, त्याचप्रमाणें हें आहे. त्या सभांस जाण्याजोगें तुमचें वय झालें, व त्या गोष्टी योग्य रीतीनें

समजण्याची अक्कल तुम्हाला आली म्हणजे मग कोणी तुम्हांला नको म्हणणार नाहीं; परंतु सध्यां त्यांचें नांव देखलि घेऊं नका. आतां सुटीचे व व्याख्यानांचे दिवस आहेत तेव्हां प्रसंग येणार आहेत; तर ते टाळा आणि आत्मसंयमनाचा पहिला धडा शिका.

संपलें, आतां आज आणखी कांहीं गोष्टी मी सांगत नाहीं. सांगितल्या एवढ्या सर्वथा ध्यानांत धरून त्याप्रमाणें वागा, एवढेंच पुनः पुनः सांगून पुरे करतों.

मुलांस थोडा उपदेश.

म्हणोनि आळस सोडावा । यत्न साक्षेपें जोडावा ॥
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ १ ॥

श्रीरामदास.

२.

आज बरोबर वर्ष झालें, आपण याच ठिकाणीं जमलों होतों, तेव्हां मीं तुम्हांला " अंगीं सभ्यपणा कसा आणावा ? आणि सभ्यतेची योग्यता काय ? " हें सांगितलें, आणि तो त्या वेळचा उपदेश पुनः पुनः वाचून त्यापासून उपयोग करून घ्यावा, म्हणून त्याच्या प्रतीही तुम्हांस दिल्या. गतवर्षी जे कांहीं अवगुण मला तुमच्यांपैकीं पुष्कळांत दिसले, त्यांच्याविषयीं तुम्हाला बोध केला, त्याचप्रमाणें यंदाही मला एक दोन अवगुणांविषयीं तुम्हांला सांगावयाचें आहे. तुम्हीं लहान आहां, मी सांगतों या गोष्टी नीट ध्यानांत धरून आज जर तुम्हीं आपल्या अंगचे, मी सांगणार आहें ते अवगुण काढून टाकलेत, तरच ते जाण्याचा संभव आहे. घणांनीं ठोकून पक्क्या करून टाकलेल्या मेखेप्रमाणें, जर का ते एकदां पक्के अंगांत भिनले, तर मग ते कितीही तुम्हीं जोर केलात तरी उपटले जाणार नाहींत. क्षणोक्षणीं त्यांच्या वेदनांपासून दुःख होऊन पावलोपावलीं पश्चात्ताप मात्र होईल. हा पश्चात्ताप टाळावा, आजन्म सुखसमाधान मिळवावें, याची गुरुकिल्लीच आज मीं तुमच्या स्वाधीन करणार आहें. ती नीट जपून ठेवा. तिच्याकडे दुर्लक्ष्य करून तिला गंज चढूं देऊं नका. जर का एकदां तिला गंज चढला, तर तुह्मांला तो सुखासमाधानाचा खजिना पूर्णपणें बंद झालाच म्हणून समजा.

मीं आज ज्या एक दोन अवगुणांबद्दल तुम्हांला चार शब्द सांगणार आहें, ते अवगुण फार महत्त्वाचे आहेत. तुम्हांपैकीं पुष्कळांन—विशेषतः ज्यांच्यांशीं माझा स्वतःचा निकट संबंध अशांत—एक मोठी विलक्षण स्थिति मला दिसून आली; ती ही कीं, ज्ञान मिळविण्याची इच्छा नाहीं. खरोखर अशी स्थिति कां असावी मला तर कांहीं समजत नाहीं. मुलें म्हटलीं म्हणजे स्वभावतः फार चौकस असतात. कोणचीही नवी गोष्ट दृष्टीस पडली कीं, "ती अशी कां ?" "तशी कां नाहीं ?" असे शेंकडों प्रश्न करून तीं शिक्षकाला, किंवा ज्याला विचारतील त्याला त्रासवून सोडायचीं. असें असतांना येथें मीं पाहिलें तों शिक्षकानें आपण होऊन " अमुक नवीन गोष्ट तुम्हांला सांगतों, " असें म्हटलें, तर त्याचा तुम्हांला कंटाळा येतो; वर्गामध्यें शिक्षक ज्या गोष्टी विवेचन करून सांगेल, तेवढ्या सांगेल; त्या गोष्टींच्या संबंधानें अधिकउणा विचार करून, समजलें नसेल तेथें तुम्ही होऊन कांहीं प्रश्न कधीं विचारीत नाहीं. एकंदर दिसून येतें तें असें कीं, मुलांना स्वाभाविक अशी जी चौकसबुद्धि, तीच तुमच्यांत कमी होत चालली आहे, याबद्दल खरोखर फार वाईट वाटतें. या वयांत तुम्हांला म्हणजे काय शिकूं आणि काय नको अशी ज्ञानाची हाव सुटली पाहिजे. ती मुळींच न दिसतांना, तुमच्या ठिकाणीं एक प्रकारचा थंडपणा दिसतो हें बरें नव्हे. तुम्हां मुलांना पुष्कळ गोष्टी नव्या, तेव्हां प्रत्येक गोष्टीबद्दल आश्चर्य वाटून ती तशी कां झाली, कशी झाली, तिचा मागला पुढला संबंध काय, वगैरे गोष्टी केव्हां कळतील, असें होऊन जावें. जशी या उन्हाळ्यांत तहान लागते, केव्हां थोडेंसें पाणी मिळेल असें होतें, त्याचप्रमाणें तुमच्या या आयुष्याच्या उन्हाळ्यांत तुम्हांला ज्ञानाची तहान लागावी, आणि तें केव्हां मिळेल असें व्हावें; परंतु तुमच्याकडे पहावें तों असें दिसून येतें कीं, जणुं काय कोणच्याही गोष्टीपासून तुम्हांला आश्चर्य वाटतच नाहीं ! एखादें सुंदर फूल पहा, एखादा दगड पहा, एखादा विलक्षण तेजाचा तारा पहा, कीं रस्त्यानें येतां येतां एखादा मेलेला उंदीर पहा, सर्व गोष्टी तुम्हांला सारख्याच. आरसा

बिचारा निर्जीव; परंतु त्याच्यापुढें जर निरनिराळ्या वस्तु ठेवल्या, तर त्यांचीं त्यांचीं निरनिराळीं प्रतिबिंबें पडलेलीं दिसतात; पण तुमच्या अंतःकरणाच्या आरशांत सर्व वस्तूंचीं प्रतिबिंबें सारखींच म्हणा, किंवा मुळीं कोणच्याच गोष्टीचें प्रतिबिंब उठत नाहीं म्हणा. बरें यदाकदाचित् कांहीं गोष्टींचें प्रतिबिंब उठलेंच, तर त्या निर्जीव आरशाप्रमाणेंच तुमच्या मनाचीही स्थिति होते. जोंपर्यंत वस्तु समोर असते, तोंपर्यंत तिचें प्रतिबिंब; ती दृष्टी-आड झाली कीं लख्ख! अशी स्थिति कां? नव्या गोष्टी शिकण्याविषयीं एवढी उदासीनता कां? वर्गांतले धडे नाइलाजास्तव करावेच लागतात; नाहीं केले तर शिक्षा होते, म्हणून कसे तरी जेमतेम करायचे वेळेपुरते, असें जें तुमच्या मनांत नेहमीं वागतेंसें दिसतें, तें कां? या गोष्टींविषयीं आज थोडासा विचार करावा असें मी मनांत आणलें आहे. कारण माझा असा पक्का समज आहे कीं, ज्ञान मिळविण्याविषयींची ही उदासीनता आज जर तुमच्या अंगांतून निघून जाऊन तिच्या ऐवजीं ज्ञानाची तृष्णा तुम्हांला लागली नाहीं, तर आयुष्यभर तुम्ही असेच आंबलेले रहाणार. कोणचीही नवी गोष्ट निघाली, तरी तिच्यापासून होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांचा विचार करण्याची तुम्हांला कधींच इच्छा व्हावयाची नाहीं "अशी नवी गोष्ट निघाली आहे का? निघूं द्या! आपल्याला काय?" असल्या उद्गारांखेरीज दुसरें कधींच कांहीं तुमच्या तोंडून निघालेलें कानीं पडणार नाहीं. आणि असें झालें, म्हणजे मग तुमच्या हातून चांगलीं लोकहिताचीं कृत्यें तरी कशाला होताहेत? हो, कोणचीही नवी गोष्ट जाणून घेण्याची इच्छा होईल, तर तिचें तुम्ही ज्ञान मिळविणार, आणि असें ज्ञान मिळविलेंत तर त्याचा पुढें उपयोग करून तुम्ही सत्कृत्य करणार! पण मुळालाच जेथें गांठ नाहीं तेथें काय होणार? नदींत पडलेले ओंडके, किंवा काटक्याकुटक्या आणि तुम्ही सारखेच. जिकडे पाण्याचा ओघ जाईल, तिकडे ते ओंडके जायचे; बरें, कोठें गाळांत किंवा खडकावर राहिले, तर राहिले. आपण होऊन त्यांतून सुटण्याला, किंवा ओघाशीं झगडून

त्याच्या उलट वर जायला त्यांना थोडेंच येणार आहे ? ही जी ओंडक्यांची किंवा काड्याकुटयांची स्थिति तीच सगळ्या गोष्टींविषयीं उदासीनपणा बाळगणाऱ्या तुमची. जिकडे आयुष्याचा ओघ तुम्हांला नेईल, तिकडे तुम्ही जाणार. मध्येंच कांहीं विघ्नांनीं अडकावून ठेवलें, तर अडून बसणार. ओघाच्या उलट पोहूं लागून सपासप पाणी तोडून जाण्याची कांहीं तुमची छाती व्हावयाची नाहीं.

तर ही जी पुढें स्थिति होणार ती टाळावी, आणि ती खरोखर टाळावी असें वाटत असेल, तर आज तिचें बीं रुजत आहे, अंकुर डोकावत आहेत, तोंच त्यांचा नायनाट करावा, ही गोष्ट फार आवश्यक आहे.

आतां मीं तुम्हांला सांगितलेंच कीं, तुमच्यांत ज्ञान मिळवण्याची हाव—चौकसपणा—फार कमी दिसते. तुम्हांला कोणच्याही गोष्टींचें आश्चर्यच वाटत नाहीं असें दिसतें. याचें कारण काय तें शोधावयाचें आहे.

त्याचें कारण एकच आहे, तें कोणचें ? तर आळस. मुलांनो, हा उद्योगाचा शत्रु—आळस—तुमची फारच खराबी करीत आहे बरें! तुमच्या ठिकाणीं चौकसपणा दिसून येत नाहीं, तो याच्यामुळें. यानें तुम्हांला फार घेरलें आहे असें दिसतें. कोणचीही नवी गोष्ट दृष्टीस पडली तर साहाजिक तुम्हांला ती काय, कशी, हें समजून घेण्याची इच्छा व्हावी; पण हा लबाड आळस, हा तुम्हांला गोड गोड शब्दांनीं, नानाप्रकारच्या थापा देऊन तें जाणून घेण्याची खटपट करण्यापासून मागें वळवितो. तो म्हणतो:—"अरे, कसची आली आहे नवी गोष्ट ? आपला स्वस्थ पडला आहेस तो कां उगीच रिकामी माहिती मिळविण्याच्या खटपटींत पडतोस ? चार घटका असाच स्वस्थ पडून रहा. दोन घटका झोंप घे. झोंप नसली येत, तर दोन पत्त्याचे डाव खेळ; त्याचा कंटाळा आला, तर चार घटका दुसरा कांहीं तरी खेळ खेळ. पण उगीच, हें पहा, तें पहा, यांत काय तें विचार, त्यांत काय तें विचार, असल्या भानगडींत पडूं नकोस."

आणि तुह्मी असले वेडे, तुह्मी त्याच्या भुलथापांना भुलून तो सांगेल तसेंच वागतां. पण एखाद्या भामट्याप्रमाणें, तुमच्या डोळ्यांत धूळ टाकून तुमच्या अंगांतली तरतरी तो घेऊन जातो हें तुह्मी कसें विसरतां पहा ! त्याला खुशाल तुमच्या मनावर— आणि थोड्याच काळांत शरीरावरही–राज्य करूं देतां. उघडच आहे, आळसाचें मनावर राज्य झालें म्हणजे शरीरावरही होतें; कारण मनाचें राज्य शरीरावर असतें. होतां होतां अशी स्थिति येते कीं, मनाला पश्चात्ताप होऊन तें जरी आळसाला दूर सारूं लागलें, तरी शरीर त्याचें ऐकत नाहीं; तें आळसाच्याच ताब्यांत राहतें. कोणच्याही उद्योगाला पुढें सरकत नाहीं. आणि आळसानें इतकें ग्रासलें, म्हणजे तुमच्या उद्योगाचा सर्वच ग्रंथ आटपला. तुमच्या हातून मग कांहीं म्हटल्या कांहींसुद्धां होणार नाहीं. हा आळस आज तुम्हांला बरा वाटतो आहे, पण इतक्या वयांतच त्यानें तुमच्या मनांत ज्ञानाच्या संबंधानें किती उदासीनपणा आणला आहे तो पहा, म्हणजे तुमचा तुम्हांलाच समजेल त्याचा वाईटपणा किती आहे तो !

एवढ्याकरितां तुम्हांला आतां पुनः पुनः सांगणार आहें, तें हें कीं, या आळसाला आधीं धक्के मारून घालवून द्या. मारामारी करणें वाईट, म्हणून आम्ही तुम्हांला नित्य सांगतों, पण या वेळीं अगदीं मी तुम्हांला मुभा देतों; अगदीं खूप मारामारी करा; मागें हात ह्मणून घेऊं नका. कोणी त्याबद्दल शिक्षा करील अशी रतिभरसुद्धां भीति वाटूं देऊं नका–अगदीं सदर परवानगी आहे; नव्हे, माझी तुम्हांला सक्त ताकीद आहे, आज्ञा आहे, तुह्मी सपाटून मारामारी करा. कोणाशीं ?–तर आळसाशीं. गुलामाला एक क्षणभरसुद्धां तुमच्याजवळ उभें राहूं देऊं नका. क्षणभर उभें राहूं दिलेंत कीं तो तासभर राहणार, आणि तासभर उभा राहिला ह्मणजे हलकेच, “ दिली ओसरी तर हातपाय पसरी ” या म्हणीप्रमाणें त्यानें तुमच्या अंगांत प्रवेश केलाच म्हणून समजा; आणि एकदां अंगांत शिरला म्हणजे पक्का आगंतुकच तो, धक्के दिलेत तरी बाहेर निघायचा नाहीं. महारोग म्हणाना तो !

त्याला मग कसलेंही औषध लागू पडायचें नाहीं. त्यानें शरीर ग्रासून नाश केलाच समजावा. तेव्हां असल्या या नीच–याच्या-पेक्षां सुद्धां कांहीं वाईट विशेषणें सुचलीं तर त्याला लावावीं–शत्रूला हांकून देण्यासाठीं खुशाल मारामारी करा, आणि आपली शक्ति कसोटीला लावून पहा, अशी आज्ञा करण्याला मी मुळींच मागेंपुढें पहात नाहीं. आणखी, एकमेकांशीं धिंगामस्ती करण्यांत जो आवेश दाखवितां, फूटबॉल खेळतांना आपल्या बाजूला चेंडू आला ह्मणजे त्याला लाथा मारून दुसरीकडे घालविण्यांत जी उत्सुकता आणखी तरतरी दाखवितां, तीच उत्सुकता आणि तरतरी या आळसाला दूर झुगारून देण्यांत दाखवाल तरच खरें !

तुम्हांला आतां समजून येत नाहीं, पण हा आळस मोठा लबाड आहे बरें ! तो एकाच रूपानें तुमच्या अंगांत शिरत नाहीं. तो मोठा बहुरूपी आहे. तो रोज रोज नवें सोंग आणतो; पण बहुरूपी जसा नानातऱ्हेचीं सोंगें आणतों, पण आपला हेतु जो तुमच्यापासून पैसे काढण्याचा तो विसरत नाहीं, त्याचप्रमाणें या आळसरूपी बहुरुप्याचेंही आहे. प्रथमत: तो उद्योगीपणाचेंच रूप आणतों बरें का ! तो एवढेंच तुम्हांला येऊन म्हणतो कीं, " गडेहो, तुम्हांला मी उगीच रिकामटेंकडा दिसतों खरा, पण मी तसा नाहींहो ! निरनिराळे खेळ खेळतांना मंडळींच्या अंगांत मी कधीं तरी दृष्टीस पडतों का ? मुळींच नाहीं. खेळांत दंग झालेला एक तरी, स्वस्थ, रिकामा बसलेला असा दाखवा बरें ! कोणी धांवतो, कोणी पडतो, कोणी उड्या मारतो, त्या वेळीं काय त्याच्या अंगांत तरतरी नसते ? " असें या आळसानें म्हटलें म्हणजे तुम्हांलाही तें खरें वाटतें; पण अशा तऱ्हेनें तुम्हांला फसवून तो तुम्ही अभ्यासाचें वगैरे काम काढलें ह्मणजे काय तुम्हांला ह्मणतो, आहे का तुमच्या ध्यानांत ? तो ' नाहीं ' असें साफ कधींच ह्मणत नाहीं. निदान पहिल्या पहिल्यानें तुमच्यावर आपलें कायमचें राज्य होईपर्यंत तरीं तो तसें म्हणत नाहीं. तो म्हणतो दोनच शब्द. कधीं ह्मणतो, " करूं मग, " कधीं ह्मणतो, " करूं उद्यां, " बस ! पण

या दोन छोट्याशा शब्दांतच तो आपलें काम यथास्थित करून घेतो. मागतांना तो आपल्याला राहण्याला सवड मागतो ती फार थोडी. “ मग ” किंवा फार झालें तर “ उद्यां ” इथपर्यंतच त्याची मागणी असते. तो मोठा संतोषी आहे, परंतु सावधगिरी बाळगायची ती एवढ्याच संबंधानें कीं, त्याचें ‘ मग ’ आणि त्याचें ‘ उद्यां ’ हीं कधींच संपत नाहींत. ‘ मग ’ ला ‘ मग ’ आहेच, आणि ‘ उद्यां ’ ला ‘ उद्यां ’ आहेच. ‘ करूं मग ’ किंवा ‘ करूं उद्यां ’ म्हणून ज्या वेळाकडे करण्याचें काम, आळस ढकलतो तें ‘ मग ’ ‘ आतां ’ होण्याची, किंवा तें ‘ उद्यां ’ ‘ आज ’ होण्याची पाळी कधींच येत नाहीं. केव्हांही काम करण्याची वेळ येऊं द्या. आळसानें आपलें ‘ मग ’ किंवा ‘ उद्यां ’ हें पुढें ढकललेंच. मुळींच करायचें नाहीं, असें ह्मणण्याचें धारिष्ट त्याच्या अंगांत नाहीं हो ! मुळींच नाहीं. तो आपला सध्यांचा त्रास पुढें ढकलतो इतकेंच. एखाद्या लबाड, थापेबाज कर्जदाराप्रमाणें तो ‘ मग, मग ’ ‘ उद्यां, उद्यां ’ अशा थापा मारतो आणि तुम्हीही त्याच्या थापांवर भुलतां. “ चल, तुझें आम्हीं ऐकणार नाहीं. आम्हांला अभ्यास करावयाचा आहे, तो आम्हीं आतां करूं, आज करूं ” असें तुह्मी कधीं म्हणत नाहीं, हें फार वाईट. आज त्याला तुम्ही ढकलून देत नाहीं, गचांड्या मारून घालवीत नाहीं, तेव्हां उद्यां तो तुम्हांला ग्रासून बसेल. आणि मग तुम्हीं म्हटलें तरी त्याला घालविणें तुमच्या हातीं राहणार नाहीं.

त्याला घालवून दिलें पाहिजे, याला दुसरें कारण असें आहे कीं, तो आला म्हणजे एकटाच येत नाहीं, तर आपल्याच सारखी आपली कांहीं दुष्ट प्रजाही आणतो, आणि मग आपण व आपली ती प्रजा मिळून तुमच्या चांगल्या इच्छांचा, चांगल्या विचारांचा, आरोग्याचा, पार सत्यनाश करूं लागतो. इंग्रजींत एक म्हण आहे कीं, आळशाचें शरीर सैतानाचें मंदिर. आळस म्हणजे सैतानाचा एक हेरच आहे म्हणाना ! या हेराला ओळखून बाहेर घालवून लावा, त्याचा मुळीं संपर्क देखील होऊं देऊं नका.

नळाच्या राज्यांत शिरण्यासाठीं टपून बसलेल्या कलीनें जशी थोडकी संधि साधून पुढें त्याचा सर्वस्वी नाश करून टाकला, तसें तुमचें होऊं नये म्हणून मी हें पुनः पुनः तेंच तेंच सांगतों आहें, आणि ह्या आळसाची गोष्ट अशीच आहे कीं, ती किती वेळां जरी सांगितली, तरी पुरेशी नाहीं. जरा दुर्लक्ष्य झालें कीं त्यानें घेरलेंच ! आळसाला घालवून, उद्योगाची संवय लावून घेण्यास अतोनात श्रम करावे लागतात; परंतु उद्योगाची असलेली संवय घालवून लावून आळसाचें स्वागत करण्यास यत्किंचित्‌ही अवकाश लागत नाहीं. कारण उद्योग हा चांगल्या थोर पाहुण्याप्रमाणें आहे, तो आपण होऊन लुडबुड करून दुसऱ्याच्या घरीं जाणारा नव्हे. त्याला ज्या ठिकाणीं मान मिळतो, त्याची योग्यता जेथें समजली जाते, त्याला आग्रहपूर्वक आमंत्रण जेथून येतें, आणि आमंत्रण करणाराचें खरें प्रेम आपल्यावर आहे असें जेथें त्याला स्पष्ट दिसतें, तेथेंच तो जातो. आणि या सर्व गोष्टी कायम आहेत, त्यांत रतिमात्र कमीपणा झाला नाहीं, तोंपर्यंतच तो रहायचा; कमीपणा दिसूं लागला, कीं त्यानें आपलें बिऱ्हाड उचललेंच !

आळसाचें पहावें, तर त्याच्या अगदीं उलट; त्याच्या इतका लोंचट पाहुणा दुसरा कोणचाच नाहीं. त्याला बोलावणें धाडायला नको; तो आगंतुकाप्रमाणें दाराशीं येऊन गयावया करीत बसायचा. कींव करून आंत घेतल्यास त्यानें आपलें प्रस्त माजविलेंच. आपल्याला जागा मिळाल्याबरोबर आपलीं मुलेंबाळें—त्याच्याच मासल्याचीं लोंचट तीं—त्यानें आणलींच. मग त्याला घालवायला आटोकाट श्रम केले तरी त्याचें बिऱ्हाड उचलणें महा कठीण. फारच त्रास दिल्यास केव्हां केव्हां "जातों, जातों" म्हणून भुलथापा देईल, गेल्याचें मिष करील, पण दाराशींच लपून बसेल, व पुनः डोळा चुकवून केव्हांच आंत शिरेल. "

या आगंतुकाला आधीं आंत न येऊं देण्याला, आणि तो लोंचटपणानें आलाच तर त्याला धक्के मारून घालवून देण्याला

उत्तम रखवालदार म्हणला म्हणजे **दृढनिश्चय** होय. दृढनिश्चयाच्या जालीम मात्रेपुढें हा रोग क्षणभरसुद्धां टिकायचा नाहीं. परंतु ही गोष्ट विशेष लक्ष्यांत धरा कीं, औषध जें घ्यायचें तें अर्थात् रोग जसा अंगांत कमी अधिक भिनला असेल, त्या मानानेंच घेतलें पाहिजे. फारा दिवसांचा जुना व निर्ढावलेला रोग असला, तर मात्रेचे एक दोन वळसे केव्हांचिव्हां दिल्यानें काय होणार आहे? त्या सबंध मात्रेलाच तो खाऊन बसणार यांत तिळमात्र संदेह नाहीं. परंतु माझी अशी पक्की खात्री आहे कीं, तुमच्या अंगीं हा रोग अजून इतका भिनला नाहीं. उगीच त्याचें बीजारोपण होत आहे, तेव्हां आतांच जर त्याला ही मात्रा द्याल तर फार चांगलें होणार आहे. नाहीं तर अधिकाधिक बळावत जाऊन तो तुम्हांला ग्राशील आणि मग दिवसानुदिवस खालीं खालीं जात जात तुमच्या मनुष्यपणाचा पुरा लय होईल. तेंच तुम्ही दृढनिश्चयाचें साहाय्य घेतलेंत, आणि या आळसाशीं लढलांत तर तुमचें काम होईल.

निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तेंचि फळ ॥

हें साधु तुकारामाचें वाक्य नेहमीं लक्ष्यांत वागविलें पाहिजे. कारण आळसाला घालवून लावण्याला उत्तम उपाय जो मीं तुम्हांला सांगितला, त्याचें इंगितच त्यांत आहे. दृढनिश्चयाच्या योगानें किती बळ येतें, तें सांगून समजणार नाहीं. त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊनच पाहिला पाहिजे. ज्यानें कधीं आंबा चाखला नाहीं, त्याला त्याची गोडी सांगून काय समजायची आहे? प्रत्यक्ष आंबा आणून त्याचा रस त्याच्या जिभेवर घालावा तेव्हांच त्याची गोडी समजणार आहे. इकडचा डोंगर तिकडे करीन असें म्हटलें, तरी देखील दृढनिश्चय तुम्हांला तितकें बळ देईल. त्याच्या इतकें शक्तिवर्धक औषध कोणचेंच नाहीं. दुखणाईत मनुष्यानें 'मी आपल्या या दुखण्यांतून बरा होईनच' असा निश्चय मनांत केल्यास अर्धें अधिक दुखणें कमी होतें. तेंच "कसें होईल? आतां कसचा मी यांतून जगतों!" असें रडगाणें गायलें, म्हणजे

दुखणें दुणावतें. याचा अनुभव कितीकांना आलेला आहे. शरीररोगाची ही गोष्ट आहे, मग आळसासारख्या मानसिक रोगाची असेल यांत नवल काय? असेल नव्हे, आहेच! दृढनिश्चयाच्या पुढें आळसाचें कांहीं चालत नाहीं. तेव्हां तुम्ही दृढनिश्चयाची कांस धरा, त्यापासून ढळूं नका. त्यापासून तुम्हांला ढळवण्यासाठीं हा आळस नाहीं नाहीं ते उपाय करील, तरी त्याला भीक घालूं नका. त्याच्या दीनवाणी प्रार्थना ऐकून अंतःकरणाला मुळींच द्रव येऊं देऊं नका. तो मायावी राक्षस आहे. त्याचा वधच केला पाहिजे. आणि त्याच्या मर्मस्थानीं भेदून त्याचा वध करण्याला दृढनिश्चयाचें अस्त्र फार जबर. त्याचा उपयोग केला नाहीं तर मग संपलें. मग आळसाला जिंकण्याची गोष्ट स्वप्नींसुद्धां आणूं नका. एक दोन परकी भाषेंतल्या म्हणी आहेत, त्या मोठ्या ध्यानांत धरण्याजोग्या आहेत. "कोणत्याही गोष्टीचा आरंभ कायतो कठिण." "जड जातें काय तें पहिलेंच पाऊल." एकदां कोणच्याही गोष्टीस आरंभ केला, पहिलें पाऊल एकदां मोठ्या धीरानें टाकलें, म्हणजे मग कांहीं जड नाहीं. पण तो पहिला यत्नच जर पुरता निश्चय करून केला नाहीं, तर रामदासस्वामींनीं म्हटल्याप्रमाणें होणार.

अंतरीं नाहीं सावधानता। यत्न ठाकेना पुरता॥
सुखसंतोषाची वार्ता। येथें कैंची?॥

यत्न पुरता 'ठाकला' नाहीं, जितकी 'सावधानता' बाळगावयाची तितकी बाळगली नाहीं, म्हणजे मग काय होतें तें स्वामींनीं सांगितलेंच आहे. तें होऊं नये, 'सुखसंतोषाची वार्ता' सदैव मिळावी असें ज्याला मनापासून वाटत असेल, त्याला लागलीच स्वामी ह्मणतात:—

ह्मणोनि आळस सोडावा। यत्न साक्षेपें जोडावा॥
दुश्चितपणाचा मोडावा। थारा वळें॥

प्रारंभीं प्रारंभीं इतके दिवसांचा आपला सोबती जो आळस तो सोडण्याचें तुम्हांला जड जाईल. पण 'उद्योगाची,' 'यत्ना-

ची ' मैत्री जोडूं लागलां, आणि त्याच्या सहवासांत जें सौख्य आहे, त्याची रुचि तुम्हांला लागली, म्हणजे तुमचें तुम्हांलाच असें वाटेल कीं, आपण इतके दिवस सुख सुख म्हणून ज्याचे घुटके घेत होतों, तें केवळ प्रारंभीं गोड लागून अखेरीस अंगचा भडका उडविणारें अतिशय जालीम विष होतें.

आतां मीं तुम्हांला सांगितलेंच कीं, आळसाच्या बरोबर लढून त्याला घालवून लाविण्याचें काम हातीं घेतलें, म्हणजे तें पहिल्याप्रथम जड जाईल. पण जड जाईल, जड जाईल, असें नुसतें म्हणत बसण्यांत काय अर्थ आहे ?

लहान थोर काम नाहीं । केल्याविणें होत नाहीं ॥

तेव्हां प्रारंभ हा केलाच पाहिजे. आणि खरोखर जें काम अगदीं सोपें तें करण्यांत पुरुषार्थ तो कोणचा ? करायच्या गोष्टी फार अवघड असून सतत श्रमानें पार पाडल्या, तरच त्याचें महत्त्व ! हातीं घेतलेलें काम चिकाटी धरून शेवटास पोंचविणें याचेंच नांव दृढनिश्चय. एवढीशी अडचण आली कीं, " काय करूं ? कसें करूं " हा अष्टाक्षरी मंत्र जपात कुंथत बसण्यांत काय अर्थ आहे ?

उठा उठा तर निजूं नका । होईल कैसें ह्मणूं नका ॥
कशाही विघ्ना भिऊं नका । दीर्घोद्योगा सोडूं नका ॥

हा कविश्रेष्ठाचा उपदेश क्षणभरसुद्धां मनांतून ढळूं देऊं नका. तर आळसाशीं आणि त्यानें आणलेल्या विघ्नांशीं जी ही चकमक उडते आहे,

तींत लढोनी बहु धीरानें नांव गाजवा 'शूर' असें ॥

एकदां प्रारंभ केलात, आळसाला घालवून देऊन उद्योगाला थारा दिलात, ह्मणजे मग पुढचें काम जड जाणार नाहीं. सावधगिरी मात्र ठेवावी. तुम्हांला कोणी असें सांगत नाहीं कीं, उठल्यासुटल्या उद्योगांत असावें. मुळींच नाहीं. विश्रांति ही पाहिजेच. उद्योग झाला कीं विश्रांति झालीच. पण विश्रांति म्हणजे आळस नव्हे हो. विश्रांति इतक्याच बेताची पाहिजे कीं, पुन:

उद्योगाला लागतांच मन आणि शरीर हीं उत्साहपूर्ण असावीं, त्यांना तरतरी यावी. अशी तरतरी रहाण्याला ' कांहीं ' न करण्याची विश्रांति मुळींच उपयोगी नाहीं. उगीच उताणें पडून आढ्याकडे पाहण्यांत, किंवा उशीवर डोकें टेंकून या कुशीवरचें त्या कुशीवर वळण्यांत नाहीं, तर या उद्योगाचा कंटाळा आल्यास दुसरा उद्योग करण्यांत आहे. शाळेंतल्या अभ्यासाचा कंटाळा आल्यास, दुसरें एखादें मनोरंजक, उपदेशपर आणि मुलांना फार योग्य असें पुस्तक वाचावें; त्याचा कंटाळा आल्यास चित्रें काढावीं; तेंही फार झाल्यास, ज्यांत मनाला मौज वाटेल, असें दुसरें कांहींतरी काम काढावें. तें ज्याच्या त्याच्या आवडीनिवडीवर आहे. काम कोणचें कां असेना, त्यापासून कांहींतरी मनाला तरतरी आली पाहिजे, दुसरें कांहीं नाहीं. नानातऱ्हेचे आनंदोत्पादक खेळ हे तर फार उत्तम, परंतु या सर्व गोष्टींत तीन नियम फारच चांगल्या तऱ्हेनें ध्यानांत ठेवले पाहिजेत. ते हे. (१) सर्व गोष्टींत माफकपणा राखणें. (२) थोडें थोडें नियमितपणानें करणें. (३) कोणचीही गोष्ट करावयाची ती मनाच्या पूर्ण उत्साहानें करणें. या तीन गोष्टींविषयीं थोडक्यांत पृथक् पृथक् विचार करूं.

पहिली गोष्ट माफकपणा राखणें. कोणचेंही काम करावयाचें तें आपल्या हातून बेतानें होईल तितकेंच करावें. लागले काम करायला कीं अगदीं आजारी पडेपर्यंत श्रम करताहेत, असें उपयोगी नाहीं; जसें जेवायला बसलें कीं भूक ठेवून जेवण्यांतच चांगलेपणा आहे, असमाधान होई इतकें जेवणें फार वाईट, तशीच सर्व उद्योगांचीही स्थिति आहे. फाजील श्रम अत्यंत आळसाप्रमाणेंच सुखनाशक आहेत. परंतु या संबंधानें फारसें तुम्हांला सांगायला नको आहे. कारण, सध्याच्या तुमच्या स्थितीवरून तुह्मी फाजील श्रम करूं लागाल अशी भीति वाळगण्याचें मला कारण दिसत नाहीं; आणि यदा कदाचित् असली तरी तुम्हांला आतां ध्यानांत ठेवण्याजोगा जो दुसरा नियम सांगितला, तो जर तुम्हीं पाळलात, तर फाजील श्रम करण्याची कधींच तुम्हाला पाळी येणार नाहीं.

वेळच्या वेळीं आणि थोडें थोडें असें काम केलें म्हणजे एका दिवशीं फार काम करण्याची कधींच आवश्यकता पडत नाहीं. तसेंच कांहीं महत्त्वाचें काम असलें आणि आधीं त्याची कांहीं एक वार्ता नसतां उपस्थित झालें, तर गोष्ट निराळी. तेवढ्यापुरते तेवढे कमीअधिक श्रम करायलाच पाहिजेत. परंतु अशीं अचानक कामें वर्षांतून कितीदां येणार आहेत? नेहमींचीं जीं आपलीं कामें आहेत, तीं रोज नियमित वेळीं नियमित प्रमाणानें केलीं, आणि ज्या वेळचें काम त्या वेळीं केलें, म्हणजे मग आपल्यासारखें सुखी कोणीच नाहीं. मग कधीं धांदल करायला नको, आणि हें झालें नाहीं, तें झालें नाहीं, असें म्हणण्याची पाळीही नको ' थेंबें थेंबें तळें सांचे ' ही म्हण आपल्या कानीं रोज पडत असते, परंतु त्या म्हणींत जो विलक्षण अर्थ भरला आहे त्या अर्थाप्रमाणें कृति आपण कितीजण करतों ? करायचें तेव्हां प्राण जाईपर्यंत, नाहीं तेव्हां ' हरहर महादेव ! ' अशीच पाळी बहुशः असते नव्हे ? पण आपण असें पहात नाहीं, कीं सृष्टीचे सर्व व्यापार कसे चालले आहेत ? सृष्टींत सर्व गोष्टी नियमितपणें आणि शिस्तीनें चालतात, आणि आपण सृष्टीपैकींच एक; परंतु आम्हांला ज्ञान असल्यामुळें त्या सृष्टीच्या नियमानुसार चालण्याचें सोडून त्याच्या उलट जाऊं पाहतों ही केवढी चूक ? तुम्हीं आपल्या डाव्या बाजूस छातीवर हात ठेवलात म्हणजे तेथें धडधड असें काळीज उडत असतें तें समजतें. त्याचे ठोके किती नियमितपणानें पडत असतात पहा बरें. तेच जर कधीं जलद, कधीं अगदीं मंद असे अनियमितपणानें पडूं लागले, तर तुमच्या शरीराची घसण होण्यास कांहीं तरी विलंब लागेल काय ? त्याचप्रमाणें तुमच्या शरीराच्या निरनिराळ्या इंद्रियांनीं आपापलीं कामें वेळच्या वेळीं न करतां सर्वच अव्यवस्थितपणा केला, तर शरीराची काय व्यवस्था होईल कल्पना करा पाहूं ! मुलांनो, नियमितपणासारखा हितकारक गुण दुसरा कोणचाही नाहीं. मात्र तो दृढनिश्चयानें अंगीं वागविला पाहिजे.

तिसरी ध्यानांत ठेवण्याजोगी मोठी गोष्ट मी तुम्हांला सांगि-

तली ती ही कीं, कोणच्याही कामांत गुंताल ते अगदीं मन लावून गुंता. अर्धें मन इकडे, अर्धें मन तिकडे, असें होतां उपयोगी नाहीं. इंग्लंडचा महापुरुष ग्ल्याड्स्टन् यानें एकदां असें म्हटलें आहे कीं, " मी अभ्यासांत असलों, म्हणजे जितका अभ्यास होईल तितका करतों, आणि खेळत असलों तरीही जितकें खेळवेल तितकें खेळतों. " याचा अर्थ काय ? तर जें काम मी करीत असतों, त्यांत मी आपला पूर्णपणें गढून जातों. हातींच्या कामांत मन तल्लीन झालें नाहीं तर त्यांत तात्पर्य काय ? तरी पण एक गोष्ट मोठी लक्ष्यांत धरली पाहिजे ती ही कीं, मन तल्लीन व्हायचें तें इतकें कधींही होऊं नये कीं बाकी कोणच्याही गोष्टीचें भानच नाहींसें व्हावें. अशी स्थिति न होण्याला उपाय एकच आणि तो फार सोपा आहे. तो असा कीं, सकाळपासून रात्रीं निजेपर्यंतचा आपला वेळ, आपल्याला कामें करावयाचीं असतील, त्यांत विभागून टाकावा. असा तो विभागून टाकला म्हणजे मग एकाच कामाचा कंटाळा येत नाहीं, आणि रिकामटेकडा वेळही जात नाहीं. सुट्टीचे दिवस असतांना तुम्हांला वेळ मुबलक मिळतो, तेव्हां त्याप्रमाणें आपल्या वेळाची वांटणी करावी; शाळेचे दिवस असतील, तेव्हां अर्थात्च निरनिराळ्या तऱ्हेनें वेळ वांटला पाहिजे. तथापि साधारणतः पुढीलप्रमाणें वेळ वांटल्यास तो सर्वदां उपयोगी पडण्यासारखा आहे. तीन फार तर चार तास खाजगी अभ्यासाला, सुमारें तितके तास खेळण्याला, सात किंवा आठ तास झोंपेला. शाळेंत सहा तास जातातच, आणि चार तास इतर व्यवसायांना लागतात. अभ्यासाला सारे तीन तास म्हटले आहेत हें पाहून तुम्हांला आश्चर्य वाटायला नको. अगदीं मन लावून रोज तीनच तास अभ्यास करीत जा, तुम्हांला कधीं ह्मणतां कधींही वेळाची उणीव असायची नाहीं. परंतु तुह्मी नियमितपणानें अभ्यास करतां कुठें? करायचा ते दिवशीं सहा तास रात्रीं दोन वाजेपर्यंत जागून, नाहीं तर दोन महिन्यांत कांहीं नाहीं. वाईट तें हेंच !

परंतु आतां सांगितलेल्या वेळापत्रकाप्रमाणें वागाल, तर तुम्हांला कधींसुद्धां पश्चात्ताप होण्याला कारण होणार नाहीं.

त्याचप्रमाणें काम करायचें तें अगदीं शिस्तवार केलें पाहिजे. शिस्त म्हणजे व्यवस्थितपणा. दुसरें कांहीं नाहीं. कोणत्याही कामास आरंभ करावयाचा, तो आरंभापासून करावा, शेवटापासून करूं नये, किंवा मधूनच करूं नये. कांहीं तरी व्यवस्था करावी, आणि मग होतां होईल तों तीच पाळावी. मोठी अडचण आल्याखेरीज तींत बदल वगैरे करूं नये. म्हणजे सर्व गोष्टी सुयंत्रित चालतात.

या सर्व गोष्टी अंगीं बाणण्याला उपाय मीं प्रारंभीं सांगितला तोच दृढनिश्चय ! हा दृढनिश्चय धरा, दुसरें कांहीं सांगणें नाहीं. याला आपल्या स्वाधीन ठेवलेंत ह्मणजे सर्व कांहीं स्वाधीन होणार आहे. त्यांत जरा ढिलेपणा झाला कीं सर्व बुडालेंच समजा !

आणि हा दृढनिश्चय अंगीं येण्यास उत्तम मार्ग म्हटला ह्मणजे थोर पुरुषांचीं चरित्रें वाचणें, व त्यापासून बोध करून घेणें हा होय. नुसत्या उपदेशापेक्षां उदाहरण नेहमीं जास्त श्रेयस्कर असतें. कविवर्यांनींच म्हटलें आहे कीं,

थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचें पहा जरा ।
आपण त्यांच्या समान होऊं हाच सांपडे बोध खरा ॥

उद्योगाचें महत्त्व खरोखर काय आहे, हें त्यांच्या चरित्रापासून जितकें लवकर आणि उत्कृष्ट तऱ्हेनें आपल्या अंगीं बिंबेल तितकें नुसत्या उपदेशांनीं बिंबणार नाहीं. आतां सुमारें दीड महिना तुह्मांला सुट्टी आहे. खेळ खेळावयाचे ते मनमुराद खेळून उरल्या वेळांपैकीं कांहीं भाग गेल्या सहामाहींत झालेल्या अभ्यासांच्या उजळणीकडे लावा व कांहीं भाग आब्राहाम लिंकन, जार्ज वाशिंगटन, ग्लाडस्टन, वगैरे अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वाचून त्यांपासून बोध घेण्याकडे लावा. अशा पुरुषांच्या चरित्राचें अनुकरण करण्याचें मनांत वागवून जर तुम्ही आपले उद्योग करीत गेलां, तर ज्या उद्योगांत आपलें मन घालाल, त्या उद्योगांत तुम्ही उत्तम प्रकारचें यश मिळवाल व आपल्या आईबापांना आणि आप्त इष्टांना सुखसंतोष देऊन सर्वप्रकारांनीं सार्थक कराल.

उद्योगाचें केवळ माहेरघर जें अमेरिका खंड तेथल्या एका अत्यंत प्रसिद्ध कवीनें मनुष्यजन्माचा व उद्योगाचा महिमा गाऊन आपणां सर्वांस फार उत्तम प्रकारचा बोध केला आहे. तो लहानापासून थोरापर्यंत प्रत्येक मनुष्यानें मनांत ठसवून घेण्याजोगा आहे. जेव्हां म्हणून आळस तुमच्यावर झडप घालून तुम्हांला "यांत काय आहे ? त्यांत काय आहे ? जाऊं द्या कीं, कोण त्रास करतो !" असें म्हणायला लावून उद्योगापासून मागें वळवील, तेव्हां एकदां हा म्हणत जा. तुम्हांला लागलीच उद्योग करण्याविषयीं स्फुरण येईल. ही माझ्या अनुभवाची गोष्ट सांगून **लांगफेलो**च्या त्या कवितेचें भाषांतर हा पुढील फटका तुम्हांला अर्पण करतों. तो पाठ करा आणि त्याच्यापासून मला जसा फायदा होतो आहे तसा तुम्हांलाही होवो.

जीवितमहिमा.

(फटका.)

'असार जीवित ! केवळ माया !' रडगाणें हें गाउं नका ॥
येई झोंपा तो नर मेला संशय याचा धरूं नका ॥ ध्रु० ॥
वरूनि दिसते स्थिती न तैशी आंत सत्यता पूर्ण असे ॥
तथ्यपूर्णसंसार खरा हा मन लावुनियां जगा कसे ॥ १ ॥
"मेलों म्हणजे मिळविलि ! झालें सार्थक" माना मानिं न असें ॥
"मातिच तूं वा, मातित मिळशी !" आत्म्याला हें वचन नसे ॥ २ ॥
सुखदुःखाचे भोग भोगणें हा मुळिं जीवितहेतु नसे ॥
आतांपेक्षां उद्यां कांहिं तरि सराल पुढती करा असें ॥ ३ ॥
अपार विद्या काळ अल्प हा झरझर कैसा धांवतसे ॥
मोठी छाती, परि दर ठोका मृत्यु जवळ हें सुचवितसे ॥ ४ ॥
अफाट ऐशा विश्वरणांगणिं चकमक संसाराचि असे ॥
तींत लढोनी बहु धीरानें नांव गाजवा शूर असें ॥ ५ ॥
(चाल) मुकीं बिचारीं कुणिहि हंका ॥ अशीं मेंढरें बनूं नका ॥
गेल्या गोष्टी स्मरूं नका ॥ गत काळाचा शोक फुका ॥
पुढचा भासो कितिहि सुखाचा काळ भरंसा धरूं नका ॥ असार० ॥

जाते घडि ही अपुली, साधा, करा काय तें अतां करा ॥
चित्तामध्यें धैर्य धरा रे हरिवरि ठेवा भाव पुरा ॥ १ ॥
थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचें पहा जरा ॥
आपण त्यांच्या समान होऊं हाच सांपडे बोध खरा ॥ २ ॥
जग हें त्यजितां भवसागरिंच्या वाळवंटिवर तरी जरा ॥
चार पाउलें उमटवुं आपुलीं ठेवुं खुणेचा मार्ग बरा ॥ ३ ॥
संसाराचा सागर दुस्तर त्यांतुनि जाण्या पैलतिरा ॥
खटपट करितां गोते खातां निराश होउनि जाय पुरा ॥ ४ ॥
अशा नराच्या दृष्टिस पडतां आपुलिं पाउलें जराजरा ॥
कोणि ह्मणावें नाहिं ह्मणोनी येईल त्याला धीर बरा ॥ ५ ॥
(चाल) उठा उठा तर निजूं नका ॥ "होइल कैसें!" ह्मणूं नका॥
कशाहि विघ्नां भिऊं नका ॥ दीर्घोद्योगा सोडुं नका ॥
"धीर धरी तो गंभीर" असें शिका शिका रे विसरुं नका॥असा०॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

मुलांस थोडा उपदेश.

तापल्यावांचून नव्हे अळंकार ।
पिटूनिदां सार उरलें तें ॥ १ ॥
तुका म्हणे मन करावें पाठेळ ।
सहावेचि जाळ सिजेवरि ॥ २ ॥

तुकाराम.

३.

मुलांनो,

उद्योगांत निमग्न असतांना वेळ किती झपाट्यानें जातो हें समजत नाहीं असें म्हणतात, तें किती खरें आहे ? हां हां म्हणतां अभ्यासाचे सहा महिने गेले; आणि त्यांत अंग मोडून दृढनिश्चयानें श्रम केल्यामुळें जी विश्रांति तुम्हीं केवळ हक्कानेंच मिळविली असें म्हणण्यास हरकत नाहीं, त्या विश्रांतीचे दिवस येऊन थडकले. आतां दीड महिनापर्यंत विश्रांति घेण्याची, आपल्या गांवीं वगैरे जाऊन तेथली मौज अनुभवण्याची तुम्हांस
. सदर मुभा मिळणार. तेव्हां आजचा दिवस म्हणजे तुमचा मोटा
दमआनंदाचाच दिवस. फार वेळ बांधून ठेवलेल्या वासरास एक-
डतें, (सोडिलें असतां तें जसें वारा खाऊन हवें तसें आनंदानें बाग-
द्या. सहाप्रमाणें तुम्हीही बागडून आपल्या वडीलजनांना आनंद
कलां त्यांत महिनेपर्यंत येथें आमच्या शिकवणुकींत जें कांहीं शि-
परीक्षा होऊन तुमची हुशारी कितपत आहे कितपत नाहीं याबद्दल
धरून या सुटीच जो निकाल झाला तो मात्र ज्यानें त्यानें लक्ष्यांत
। भाग विश्रांतींत किती घालवावयाचा, आणि

किती नाहीं, याचा विचार करावा. आनंदाच्या दिवशींसुद्धां मी असले कडू शब्द उच्चारतों आणि तुमचा आनंद पूर्णपणें तुम्हांला अनुभवूं देत नाहीं, याबद्दल तुम्हांला थोडेंसें चमत्कारिक वाटेल, परंतु काय करणार ? पेरावें तसें उगवतें. कामाच्या दिवसांत ज्यानें विश्रांति घेतली असेल, त्याला विश्रांतीच्या दिवसांत काम करणें भाग पडणारच. ज्यांनीं गेल्या सहामाहींत अभ्यास करावयाचा टाकून मौज मारली असेल, त्यांना आतां मौजेच्या दिवसांत मौज मारतां यावी कशी ? आणि शहाणपणा करून जागें होऊन जर त्यानें अतोनात मौज न मारतां उद्दें काढण्याचें मनांत आणलें, तरच त्याचें पुढें कल्याण होणार आहे. मुलांनो, ही तर आपल्या आयुष्यांतली मौज आहे. जें ज्या वेळीं करावयाचें, तेंच त्या वेळीं अगदीं मन लावून केलें पाहिजे. तें जर का चुकलें, तर गेलेंच म्हणून समजा. अभ्यासाच्या दिवसांत योग्य असा अभ्यास न करतां विश्रांति घेतली कीं गेलेंच ! तें सुधारून घ्यायचें असें म्हटल्यास विश्रांतीच्या दिवसांत श्रम केले पाहिजेत. आणि 'हावऱ्या, तुझा सण कधीं ?' तर, 'गांवाच्या आधीं आणि गांवाच्या बरोबरही' असें जो करील त्याला लवकरच मुळींच सण न करण्याचाही प्रसंग येईल. ज्याला योग्य वेळीं योग्य काम करण्याइतकें मन आंवरून धरतां येत नाहीं, त्याची स्थिति अशीच होणार, कीं त्याला एक तर तें काम सोडून देऊन ' हरहर महादेव ' करीत बसण्याची पाळी आज नाहीं उद्यां येणार, किंवा सगळी मंडळी विश्रांति घेत असतील तेव्हां काम करीत बसण्याची पाळी येणार. आणि कामाच्या वेळीं विश्रांति घेऊन विश्रांतीच्या वेळींही विश्रांति घेणाराला कांहीं सुख होतें का म्हणतां ? छे ! ' अरेरे, आपण ही विश्रांति घेतों आहोंत, पण करतों तें बरें करीत नाहीं ' असें एकसारखें त्याचें मन खात असतें. मग त्या विश्रांतीचें सुख तें काय? तेव्हां तुमच्यापैकीं ज्यांनीं गेल्या सहा महिन्यांत आपला करावयाचा तेव्हा अभ्यास करून गेल्या सहामाही परीक्षेंत आपल्या उद्योगाचें फळ दाखविलें असेल, त्यांना आतां

तुम्हीं आपली हक्कानें मिळविलेली सुटी—विश्रांति—उत्तम प्रकारानें उपभोगा, असें सांगण्याच्या जरूरीपेक्षां, ज्यांनीं सहामाही परीक्षेत आपल्या तयारीचा कच्चेपणा—अर्थात् गेल्या सहामाहींत आपल्या कामाकडे केलेलें दुर्लक्ष्य—दाखविलें त्यांना, बाबांनो, तुह्मीं आपली विश्रांति मिळविली असें दिसत नाहीं, तरी ती उपभोगण्याकरितां ही सुटी तुम्हांला मिळते आहे, पण तुह्मी कांहीं तरी विचार करून आपल्या या सुटीचा अल्पभाग तरी झाल्या चुकींच्या दुरुस्तीकडे खर्च करा, असें सांगण्याची जरूरी फार दिसते. आणि म्हणूनच आज सर्वथा आनंदाचा दिवस असूनही मी प्रथमपासून तुमच्यांपैकीं अभ्यास न करणाऱ्या मुलांस उद्देशून थोडेंसें बोलतों आहें. बाकी मीं एवढें सांगितलें हें लक्ष्यांत ठेवून या सुटीचा तुह्मी यथास्थित उपभोग घ्या. खेळा, उडया मारा, हिंडायला जा, पोंहायला शिका, निरनिराळ्या खेळांत एकमेकांशीं चढाओढी लावा; सुंदर, बोधपर, मनोरंजक अशीं पुस्तकें वाचा; सारांश, वडिलांच्या मनाला वाईट वाटेल अशा अतिरेकास न जातां, जितके ह्मणून योग्य प्रकारानें मनाला व शरीराला आनंद करून घेण्याचे प्रकार तितके सगळे अनुभवून मौज करा. माझी तर अशी शिफारस आहे कीं, प्रत्येकानें कांहीं तरी नवीन गोष्ट—जी मनाला व शरीराला आनंद होऊन शिकतां येईल, ती अवश्य शिकावी. कोणाला कोणचे खेळ येत नसतील, तर ते त्यानें शिकून घ्यावे. किंवा दुसरे कांहीं मौजेचे प्रकार असून ते आपल्याला येत नसतील, तर ते ज्याला येत असतील त्याच्यापासून शिकून घ्यावे. मुलांनो, आनंद हा जो आहे, हा ह्मणजे अमक्या एकाच गोष्टींत किंवा एकाच खेळांत असतो असें नाहीं. खेळांत काय किंवा विद्येंत काय, मला असें वाटतें कीं, सगळ्याचें थोडें थोडें ज्ञान आपल्याला असावें. एक कोणचा तरी खेळ उत्तम तऱ्हेनें येत असावाच, पण त्याच्याखेरीज बाकी सगळा अंधार असें मात्र उपयोगी नाहीं. त्याचप्रमाणें एक कोणची तरी विद्या अगदीं चांगली यावी. परंतु बाकीच्या विद्यांचें नांवसुद्धां ठाऊक असूं नये हें मात्र बरें नाहीं. ' सगळ्यांतलें

थोडें थोडें आणि एकांतलें सगळें' असाच ज्ञानाचा किंवा खेळाचा प्रकार असावा. माझी पक्की खात्री आहे कीं, तुमच्यां-पैकीं बहुतेकांस एक किंवा दोन खेळांहून जास्त खेळ कांहीं येत नसतील; असें कां असावें ? मुलांचे म्हणून जितके खेळ, तितक्या सगळ्यांचें ज्ञान तुम्हीं कां करून घेऊं नये ? अशा ज्या या दीड दीड महिन्याच्या सुट्या तुम्हांला दिल्या जातात, त्या मुख्यतः खेळण्यांत व विश्रांतींत घालावयाच्या तर त्यांतही नानाप्रकारच्या करमणुकींनीं व खेळांनीं त्या चालवितां येण्याचें सामर्थ्य अंगीं असावें म्हणजे खरा आनंद होतो. कोणी कांहीं विषय काढल्यास त्यांत आपल्याला अगदीं गति नाहीं अशा स्थितींत असण्याची लाज वाटावी. आणि ती लाज दूर करण्याचा उत्तम मार्ग, संधि मिळाली कीं, त्या त्या गोष्टींचें व विषयाचें थोडेंबहुत ज्ञान करून घ्यावें हाच होय.

हें मी सांगतों आहें खरें, परंतु हें सगळें ज्ञान मिळविण्याच्या खटाटोपास लागून मुख्य कर्तव्य मात्र दृष्टीआड होतां कामा नये हो ! आपलें मुख्य कर्तव्य काय, हें पक्केपणीं लक्ष्यांत धरून, तें साधून मग हें सगळें बाकीचें साधावयाचें, ही गोष्ट लक्ष्यांतून दूर होऊं देणें उपयोगीं नाहीं. नाहीं तर, 'एकना धड भाराभर चिंध्या,' असें होऊन सगळाच प्रकार चमत्कारिक होऊन जा-यचा. जे काय पाहिजे आहे तें असें. एक किंवा दोन धड, मग चिंध्या कितीही असल्या तरी चालतील. उत्तम जरीपदराला जशा जरीच्या दशा विशेष शोभा देतात, त्याचप्रमाणें एक किंवा दोन विद्या आपल्या हातीं धड असल्या म्हणजे मग बाकीच्या अपुऱ्या विद्या शोभादायक व स्तुतीस पात्रच होतात तेव्हां मुख्य कर्तव्य एक कोणचें तरी पक्कें लक्ष्यांत धरलें पाहिजे. जें आपल्यास मुख्यतः साधावयाचें तें लक्ष्यांतून जाऊं देतां कामा नये. आणि तें साध-ण्यास योग्य वेळीं योग्य यत्न केले म्हणजे मग बाकीच्या वेळांत इतर मौजेच्या गोष्टी अगर ज्ञानाच्या गोष्टी मिळविण्याकडे खुशाल पाहिजे तसे यत्न करावे. तुम्ही आपलेंच घ्याना, तुमचें मुख्य कर्तव्य आपला शाळेंत चाललेला अभ्यास योग्य प्रकारांनीं

करावा व त्यांत चांगलें नांव मिळवावें. आणि तो अभ्यास चांगल्या प्रकारांनीं करण्याची योग्य वेळ शाळेंत घालविले जाणारे दिवस. तेव्हां आपल्या वेळाचा जितका म्हणून भाग अभ्यास करण्याकडे जरूर तितका घालविणें, व शाळेंत शिक्षकांनीं सांगितलेला धडा मुळींही चुकूं न देणें, हें तुमचें मुख्य कर्तव्य. तें साधून जो वेळ उरेल, तो वेळ दुसऱ्या कोणत्याही आवडत्या गोष्टीकडे लावावा. मग तो खेळाकडे असो किंवा एखाद्या आनंददायक पुस्तकाच्या वाचनाकडे असो. परंतु तुमच्यापैकीं पुष्कळांचें होतें काय, मुख्य कर्तव्य दृष्टीआड जातें व लहानसान गोष्टी ज्या त्या क्षणीं मोठ्या आनंदाच्या वाटतात, त्यांचाच मोह जास्त पडतो. अर्थातच जी तुमची अभ्यासाची म्हणून वेळ, ती जाते खेळांत, आणि खेळाची ती अर्थात् खेळांत जायचीच. असें होऊन सारा वेळ खेळांतच जातो आणि आज काय 'शब्द' पाठ झाले नाहींत, उद्यां काय 'एक्सरसाईस' लिहिला नाहीं, परवां 'उदाहरणें' केलीं नाहींत, आणि कधीं कधीं कोणचाच अभ्यास केला नाहीं अशी स्थिति होते. तुमच्या वयांत काय किंवा कोणच्याही वयांत काय, विश्रांति, खेळ, हीं मनाला अवश्य आवडतातच; आणि श्रम झाले म्हणजे त्यांची जरूरीच असते. त्यांतून तुमच्या वयांत तर अवश्य. तुम्हांला तुमच्या श्रमांपेक्षां विश्रांतीला अधिक काळ पाहिजे. आणि तो तितका देण्याला कोणीही कुरकूर करीत नाहींत. कुरकूर केव्हां उत्पन्न होते, जेव्हां तुम्ही काम शून्य वेळ आणि सगळाच वेळ खेळ असें करूं पाहतां तेव्हां. तुम्हांला दिसतेंच आहे कीं, तुम्ही वाढत चाललां आहां, त्या मानानें अर्थात् तुमच्या जबाबदाऱ्याही वाढत चालल्या आहेत. गतवर्षी जो मुलगा उजळणींत असेल तो यंदां पहिली किंवा दुसरी यत्ता शिकूं लागला. अर्थात् त्याच्या वयाच्या मानानें त्याचे अभ्यास वाढले. पहिल्यानें लहान म्हणून शाळेंत गेला गेला, नाहीं नाहीं, असें करून घरची मंडळी त्याचें कौतुक करीत, व मास्तरही कधीं बोलत नसत; परंतु थोडासा मोठा झाल्यावर अर्थात्च त्याच्या न जाण्याचें कौतुक नाहींसें होऊन

आतां वडील मंडळी व मास्तरही त्याला रागें भरतात. कां ? तर त्याच्या वयाच्या मानानें त्याचें ज्ञान वाढलें व त्याला कळूं लागलें--निदान त्याला कळूं लागावें—असें त्यांस वाटूं लागतें. तिसऱ्या इयत्तेंतला मुलगा चवथींत गेला, चवथींतला पांचवींत गेला, मराठींतला इंग्रजींत गेला, तसतसें त्याचें ज्ञान, आणि त्या ज्ञानाबरोबर त्याची जबाबदारी इतक्या सगळ्या गोष्टीही वाढल्या, हें त्याला आतां कळूं लागावें आणि लागतेंही. अर्थातच मुख्य कर्तव्य कोणचें आणि इतर सटरफटर गोष्टी कोणच्या, हेंही त्यास कळतें. त्याला कळूं लागतें कीं, माझ्या आतांच्या श्रमांवर माझें व माझ्या वडील मंडळींचें वगैरे पुष्कळ अवलंबून आहे. मी आतां उद्योग करीन तर पुढें मला स्वतःला व माझ्या मंडळींना स्वस्थतेनें राहण्यास सांपडेल. हें पूर्णपणें जरी नाहीं, तरी अंशतः तुमचें तुम्हांला कळतें. तुमच्यांपैकीं अत्यंत आळशी अनास्थेचा असा जो मुलगा असेल, त्यानें आपल्या मनाशीं पाहिजे तर असा विचार करावा कीं, " अभ्यास करणें हें अतिशय वाईट, आपल्या अहिताला कारण, " असें त्याला कधीं तरी वाटतें काय ? कधीं नाहींच वाटणार. ज्या वेळीं अभ्यास करावयाचा त्या वेळीं तो न करितां खेळाकडे मन गेलें कीं, त्याबद्दल पुढें त्याचें त्यालाच वाईट वाटत नाहीं असें नाहींच. परंतु खेळाच्या सुखाचा मोह पडतो. आणि तो मोह कांहीं दूर सारवत नाहीं. अभ्यास आणि खेळ हीं दोनही त्याच्यापुढें असतात. त्याची स्वभावतः प्रवृत्ति खेळाकडे. इकडे अभ्यास रहातो ही गोष्ट त्याच्या मनांत किंचित् तरी डांचतेच. पण आवडीचा जोर ज्यास्त होतो आणि ज्या वेळीं खरोखर अभ्यास होणें शक्य नाहीं, त्या वेळीं तो करूं असें म्हणून त्या आपलें आपल्यास खाणाऱ्या मनाला समाधान देऊन तो खेळाकडेच धांवतो. रात्रीं अभ्यास करण्याच्या वेळीं कोणी खेळाचा मोह घालून बोलावलें कीं, अभ्यास राहील म्हणून मनाला वाईट तर वाटतेंच, पण 'पहाटे उठून करूं,' 'शाळेंत लवकर जाऊन करूं,' 'मधल्या सुटींत करूं' असे बहाणे करून मनाचें तुटपुंजें समाधान करून त्यांतच तो गर्क होतो, आणि

अभ्यासाला अशा तऱ्हेनें झुगारून खेळाच्या गोत्यांत सांपडतो. जातो आस्यापास्यांत गुंतून. दमून भागून उशिरां येऊन निजतो तो उठतो सकाळीं सात वाजतां, आणि लागतो अभ्यासाची गर्दी करायला. पण त्यानें कुठें जुळतें ? शेवटीं त्रेधा व्हावयाची ती होतेच. असें कां ? असें कां होतें ? अभ्यास आणि खेळ यांत खेळाकडे चित्त विशेष जाऊन त्याच्या गोत्यांत तें कां सांपडतें ? या गोष्टीचें मूळ कारण काय आहे, आणि तें कारण कसें नाहींसें करतां येईल, याचाच आज मी थोडासा खुलासा करणार आहें. तें जें मूळ कारण आहे तें थोडें जबर आहे. तें तुह्मांला नडतें तसें मोठ्या माणसानाही नडतें. परंतु तें आजच्या तुमच्या वयांत जर तुम्हीं निर्मूळ करून टाकलेंत, तरच तुम्हांला पुढें नडणार नाहीं. एवढ्याकरितां त्या शत्रूचें निर्बीज करण्याचा यत्न तुम्हीं आतांपासून केला पाहिजे. हा शत्रु कोण हें आतां मी तुम्हांला सांगणार आहें. नीट लक्ष्य देऊन ऐका आणि त्याला नाहींसा करून टाकण्याकरितां जो उपाय मी सांगणार आहें, तो पक्का ध्यानांत घेऊन आपलासा करून टाका.

मुलांनो, हा तुमचा शत्रु म्हणजे 'मनाला वाटेल तें तावडतोब करण्याची इच्छा' होय. हिलाच आपण 'आवड' म्हणतों. आपल्याला जी गोष्ट आवडते, ती बरी, वाईट, हितकारक, अहितकारक याचा विचार मुळींच न करितां, आवडते तर करायची ही जी इच्छा, ती मोठी घातक आहे. वर एकदां बोलतां बोलतां मीं तुम्हांला फार वेळ बांधून ठेवलेल्या व एकदम रान्यावर सोडलेल्या वासराची उपमा दिली, परंतु ती उपमा केवळ तुमच्या अट्टाहास्य बागडण्यापुरती व आनंदी वृत्तीपुरतीच होय हो. कारण, त्या वासरांत आणि तुमच्यांत (म्हणजे पशूंत आणि माणसांत) एक मोठा भेद आहे. तोच भेद तर आपणांस पशूहून श्रेष्ठ करतो. तो कोणचा ? तर आपण आपली इच्छा आधीन ठेवूं शकतों, आपण त्या इच्छेच्या आधीन होत नाहीं. पशूप्रमाणेंच आपणहीं जर जें ज्या वेळीं मनाला येईल, तें त्याचा मागलापुढला विचार न करतां करीत सुटलों, तर

आपल्यांत आणि पशूंत अंतर काय ? कांहींच नाहीं; पण तसें नाहीं. आपल्याला विचार म्हणून कांहीं एक अजब देणगी देवानें दिली आहे. त्या देणगीचा उपयोग आपण योग्य तऱ्हेनें करणें हें अत्यंत अवश्य आहे. आपणास आवडतातशा जितक्या गोष्टी वाटतात, तितक्या सगळ्याच हितावह नसतात, किंबहुना त्यांतल्या पुष्कळशा अहितकारकच असतात. तेव्हां आवडीच्या गोष्टींत विचारानें निवड केली पाहिजे; इतकेंच नव्हे, तर ज्या आपल्याला साहाजिकपणें आवडत नाहींत त्या हितकारक आहेत, असें मनानें विचार करून सांगितल्यास नावडतीच पतकरिल्या पाहिजेत. केवळ आपल्या आवडीच्या स्वाधीन होणें हें फारच वाईट. इच्छा काय, जी गोष्ट बाहेरून झगझगित, दुःख न देणारी, मोहक अशी असेल तिकडे धांवणार; परंतु तिला आवरून धरण्यांतच खरी मर्दुमकी आहे. अगदीं अनावर झालेल्या हत्ती-घोड्यांस आकलतां येणें केव्हां केव्हां सोपें जातें, परंतु यःकश्चित् गोष्टीचा मोह पडला असतां इच्छेला आवरून धरतां येईनासें होतें. ह्मणून म्हणतों कीं, इच्छेचा उतावीळपणा हा आपला मोठा शत्रु समजला पाहिजे. त्याला ताब्यांत ठेवणें हें काम आपण प्रथमतः साधलें पाहिजे. आपल्या इच्छा आपल्या ताब्यांत ठेवण्याचा जो प्रयत्न, त्यालाच व केवळ आपल्या आवडी-प्रमाणें न करितां, विचार सांगेल त्याप्रमाणें करतां येण्याची जी शक्ति, तिलाच 'आत्मसंयमन' म्हणतात. मुलांनो, शब्द जरी मोठा जाडा व संस्कृत दिसतो, तरी भिऊं नका. आत्म ह्मणजे 'आपण' किंवा 'आपलें मन' आणि 'संयमन' ह्मणजे 'आवरून धरणें;' आपलें मन आवरून, आपणांस ज्या अनिष्ट इच्छा होतात—ज्या इच्छांप्रमाणें वागलें असतां आपलें अहित होणार—त्या इच्छा अगदीं आपल्या ताब्यांत ठेवणें, त्यांच्या म्हणण्याप्रमाणें न करणें, यालाच 'आत्मसंयमन' म्हणतात, दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां या इच्छाशत्रूचा पक्का पराजय करण्यास आपण आत्मसंयमनरूप विलक्षण तलवारीचा उपयोग केला पाहिजे. ही तलवार तुमच्या स्वाधीन तुम्हीं करून घेतली, तिला

पाहिजे तशी हाताळलीत, तरी तुम्हांला कधींच दुखापत होणार नाहीं, हें तुम्ही अगदीं पक्कें ध्यानांत धरा. बरें, ही तलवार त्या आपल्या इच्छाशत्रूवर चालविण्याला तुम्हांला प्रसंग थोडे सांपडतात असेंही नाहीं हो. मला वाटतें दिवसांतून निदान पांच पंचवीस प्रसंग असे येत असतील कीं, त्या वेळीं या तलवारीचा उपयोग केला असतां कार्यभाग उत्तम रीतीनें साधून शत्रूचें चंदन उडवितां येतें.

हा आत्मसंयमन नांवाचा गुण अंगीं न आणणें म्हणजे आपल्या स्वतःस व दुसऱ्यास विनाकारण दुःख करून घेण्यास मोठेंच साधन करून ठेवणें होय. जें ज्या वेळीं बोलावेंसें वाटेल, जें ज्या वेळेस करावेंसें वाटेल, तें, त्याचा बरा वाईट परिणाम काय होईल हा मुळीं विचार न करितां बोललें व केलें, तर त्यापासून केव्हां केव्हां किती मोठाले अनर्थ होतात, याची कल्पना तुह्मांला मुळींच नाहीं. मुलांनो, जें पहिल्या प्रथम दृष्टीस पडल्याबरोबर आपणांस चांगलें वाटतें, तें खरोखरी चांगलेंच असतें असें नाहीं. पुष्कळ वेळां असें होतें कीं, वस्तूचा अगर प्रसंगाचा वरचा देखावा मोठा मनमोहक दिसतो, परंतु जरा ज्यास्त शोध करून खालीं आंतल्या बाजूस पाहिलें कीं, घाण किंवा घातकपणा काय असतो तें दिसून येतें. मग जो केवळ मनमोहकपणावर भुलून त्या प्रसंगांत सांपडतो अगर वस्तूवर भुलतो, तो पश्चात्तापांत पडतो; आणि जो त्यांतून निसटतो, तो आपल्यास मोठा सुदैवाचा समजतो. मनाला बरें वाटलें कीं टाक उरकून, असें करणाऱ्या माणसाला लाखों संकटें येणारच म्हणून समजावें. कारण त्याला विचार करण्याइतकें सुद्धां आत्मसंयमन नाहीं ! तेव्हां माझा तर समज असा आहे कीं, सगळ्यांत विशेष जें कांहीं आपणांस शिकलें पाहिजे तें आत्मसंयमन होय. तें जो शिकला नाहीं तो बुडालाच म्हणून समजावें. एका इंग्रज ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, 'नाहीं' हा शब्द उच्चारून मन मागें फिरविण्यास जितकें धैर्य लागतें, तितकें दुसऱ्या कोणच्याच कृत्याला लागत नाहीं. ज्याप्रमाणें नदीच्या ओघांत

उलटें पोहण्यास जबरदस्त ताकद, धीर व दम लागतो, त्याचप्रमाणें आपल्या इच्छेच्या, आपल्या आवडीच्या विरुद्ध वागण्यासाठीं मन तयार करण्यास धैर्य लागतें.

हें धैर्य व ही ताकद स्वभावतःच अंगीं असेल तर असेल, नाहीं तर ती आणून यावयाची नाहीं असें मात्र नाहीं हो !' ज्याप्रमाणें तुमचा इतिहास, तुमचा भूगोल, तुमचें इंग्रजी, हीं तुम्हांला येण्यासाठीं परिश्रम करावे लागतात, व परिश्रम केले म्हणजे ते विषय तुम्हांला येऊं लागतात, त्याचप्रमाणें या आत्मसंयमनाचें आहे. इतर विषयांप्रमाणें यालाही अभ्यास लागतो. मुलांनो, अभ्यासाखेरीज कोणची गोष्ट येणें शक्य आहे ? तुम्हांला तुमची भाषासुद्धां अभ्यास केल्याखेरीज बोलतां येत नाहीं खरें. लहानपणीं तुम्ही तुमच्या वडील माणसांना बोलतांना ऐकतां. जें ऐकतां तें आपण उच्चारूं लागतां. पहिल्या प्रथम तुम्हांस शब्दांचा स्पष्ट उच्चार करतां येत नाहीं; परंतु पुनः पुनः तो उच्चार करून ते ते शब्द तुम्ही आपलेसे करून टाकितां. हा, रोज-दर घटकेला तुम्ही आपल्या बोलण्याच्या भाषेचा अभ्यासच करीत आलां नाहीं तर काय ? त्याचप्रमाणें तुम्हांला जो विषय येत नाहीं असें तुम्हांला वाटतें किंवा अनुभवाला येतें, त्या विषयांत तुमची गति व्हावी अशी इच्छा असली तर तुम्ही, ' एकदां विसरलों, पुनः करूं ' असें म्हणून अभ्यास कारितां कीं नाहीं ?

तेव्हां ज्याप्रमाणें तुमच्या भाषाज्ञानाचें व वर्गांतील अभ्यासक्रमांतल्या विषयांच्या ज्ञानाचें आहे, त्याचप्रमाणें या आत्मसंयमन नांवाच्या अत्यंत उत्तम सद्‌गुणाचेंही आहे. अभ्यासानेंच तो तुम्हांला साध्य होईल. आत्मसंयमनाची किंमत फार मोठी विलक्षण आहे. ती मोजूं म्हटल्यानें कधींच यावयाची नाहीं. माझा तर समज असा आहे कीं, सगळ्या सद्‌गुणांचें मूळ या एका सद्‌गुणांत आहे. आणि विशेष मौज ही आहे कीं, तो गुण अंगीं आणणाराला कोठें फी भरून शाळेंत जाण्यास नको. तो गुण शिकविण्यास शिक्षक असलाच पाहिजे असें नाहीं. त्याची

गुरुकिल्ली एकदां हातीं आली, म्हणजे आपलें आपणालाच भांडार खुलें करतां येतें. अगदीं लहानपणापासून तों अगदीं शंभर वर्षांचे म्हातारे होईपर्यंत आपणांस या सद्गुणाची आवश्यकता लागते, आणि तो अंगीं आणावा अशी इच्छा असल्यास रोज लाखों प्रसंग येतात. परंतु इतर विषयांप्रमाणें याचेंही आहे, एवढें मात्र लक्ष्यांत धरा. पूर्ववयांत–विशेषतः तुमच्या वयांत–असतांना जर आपल्या मनाला आवरून धरण्याचे वारंवार प्रयत्न केले, तर ते साधतात, आणि आत्मसंयमनाचा अत्यंत अवश्य गुण अंगीं येतो; पण एकदां का आपल्या इच्छेच्या स्वाधीन होण्याचीच लालूच आपणास लागली, एकदां का इच्छेनें आपल्यावर ताबा चालविला, आणि आपल्यास गुलाम करून सोडिलें, तर आपण आत्मसंयमन या गुणाच्या प्राप्तीची आशाच सोडावी ! निदान तो गुण अंगीं आणणें फार कठीण किंबहुना अशक्य पडतें. एवढ्याकरितां, मुलांनो, मी तुम्हांला एव्हांपासून हा गुण संपादन करण्यासाठीं येवढ्या आग्रहानें सांगतों आहें.

आतां मी तुम्हांला सांगितलेंच कीं, या गुणाची प्राप्ति करून घ्यावयाला कोठें दूर जावें लागत नाहीं, कोठें शाळेंत जावें लागत नाहीं, कांहीं नाहीं. आपल्या हातीं आहे; आणि ज्या वेळीं त्या गुणाचें बीज आपल्या अंतःकरणांत रुजत घालतां येईल व मग एकसारखी त्याची मशागत करून, त्याला पाणी घालून त्याचा चांगलीं फळें धरणारा वृक्ष बनवितां येईल. असे प्रसंगही आपणांस थोडेथोडके येतात असें नाहीं. दिवसांतून कमींत कमी पांच पन्नास वेळां ते येतात. ते कोणचे ते पहाः—

हल्लीं कच्च्या आंब्याचे दिवस आहेत. तुमची जीभ मोठी लचाड, तिला एखादी कैरी घेऊन खावीशी वाटते. दांत आंबून सांगतात, ‘ नको खाऊं. ’ वडील माणसें सांगतात ‘ फार नको खाऊं; ’ परंतु जीभ आणि तिच्या मदतीला तुमचें मन सांगतें “ खा, खा. एक कैरी खाल्ल्यानें काय होतें ? दांत आंबले तर कोय खावी म्हणजे लवकर चांगले होतात. वडील माणसें उगाच कांहीं तरी सांगतात ! त्यांनीं लहानपणीं अशाच खाल्ल्या

असतील. तें कांहीं नाहीं. घ्या एक टोपलींतली कैरी आणि घ्या ठेवून ! कांहीं होत नाहीं. " मुलांनो, तुमच्या एका मनाचा हा असा आग्रह पडतो बरें. आणि दुसरें मन फारच हलक्या आवाजानें पण याच्या उलट सांगत असतें. अशा वेळीं जर तुम्ही, " नाहीं ! माझें मन ' खा ' म्हणतें, तरी मी खाणार नाहीं " असें म्हणून निश्चयानें आपली आवड दूर सारलीत, तर ' आत्मसंयमना ' चा उत्तम धडा शिकलांत म्हणून समजा. हा एक प्रसंग झाला. आतां दुसरा घ्या. केव्हां केव्हां असें होतें कीं, ऐन जेवायला बसण्याची वेळ, फार तर पंधरा वीस मिनिटांचा अवकाश असतो; अशा वेळीं आपण सकाळीं शाळेंतून आलेलें असावें. सकाळीं शाळेंत जातांना आपण आळस करून स्नान केलेलें नसावें. अशा वेळीं घरीं जाण्याबरोबर तुम्हांला पंधरा मिनिटांची सुद्धां फुरसत मिळत नाहीं. स्नान करण्याइतकी देखील सवड चालत नाहीं, तर आधीं कांहीं तरी खायला पाहिजे, किंवा पाणी प्यायला पाहिजे. घरचीं माणसें केवळ तुमच्या हिताचें ह्मणूनच सांगतात कीं, स्नान करा आणि जेवायला बसा. त्यावेळीं कांहीं एवढें खाल्लें. किंवा पाणी प्यालें, तर भूक मरेल, जेवण धड जाणार नाहीं आणि नुसतें पाणीपाणीच करीत सुटाल. पण नाहीं; घरच्या माणसांचें न ऐकतां आपलाच हेका खरा करावासें तुम्हाला वाटतें. मग तुमचे लाड करणारीं माणसें असल्यास तीं त्रासून तुम्हाला तुमच्या हेक्याप्रमाणें वागूं देतात, परंतु त्याचा परिणाम त्यांनीं पहिल्या प्रथम सांगितल्याप्रमाणेंच होतो. तुमच्या भुकेचें वगैरे मातेरें होतें. बरें, तुमच्या घरच्या माणसांनीं कठोरपणा धरून तुमचा हेका चालूं दिला नाहीं, तर तुमचें मोठें हत्यार हातपाय आपटून रुसून कोपऱ्यांत जाऊन बसणें, तें तुम्ही उपसतां आणि तिकडूनही आपलें नुकसान करून घेतां. क्वचित् असा हट्ट करण्याबद्दल मारही बसतो. खाण्यापरी खाणें नाहीं, जेवणापरी जेवण नाहीं, व मनाची वृत्ति बरी नसल्यामुळें भुकेचें खोबरें होतें तें निराळेंच. अशा वेळीं आपला हेका सोडून स्नान करून सुध्या मतानें पाटावर येऊन बसलें

असतां किती समाधानानें जेवण जातें! आणि आपल्यास व सगळ्या घरांतल्या माणसांसही किती सुखसमाधान होतें! पहा, अशा वेळीं आपला हेका, आपली आवड, हीं दूर सारून मन आवरणें हें किती चांगलें आहे! हा एक दुसरा प्रसंग झाला. आतां आणखी एक प्रसंग सांगतों पहा. उद्यां शाळेंत अमुक अमुक अभ्यास दिले आहेत, ते योग्य तऱ्हेनें करणें हें मुख्य कर्तव्य; परंतु मध्येंच मनाला वाटलें कीं, शेजारच्या मुलाकडे बेझिक खेळायला जावें. मुलांनो, मीं तुम्हांला प्रारंभींच सांगितलें आहे कीं, खेळ अवश्य खेळावे. एक नव्हे, जितके म्हणून सभ्य व शरीराला आणि मनाला आल्हादकारक खेळ असतील, तितके सगळे खेळतां यावे आणि तुम्हांला येत नसले, तर ते ते तुम्ही शिकावे; परंतु ज्या कामाची जी वेळ त्याच वेळीं तें काम करीन, भलत्या वेळीं भलतें काम करण्याची इच्छा झाली, तर ती अगदीं आवरून धरीन असें मनाला वाटलें पाहिजे. समजा कीं, आतां सांगितल्याप्रमाणें तुह्मांला बेझिक खेळण्याची इच्छा झाली, तर तो एक आत्मसंयमन करण्याचा प्रसंग होय. लालचावलेलें मन तुह्मांला ह्मणतें ' चल खेळायला, अभ्यास मग करतां येईल.' त्या मनाचा निषेध करून त्या वेळीं त्याला अभ्यास करण्यालाच लावणें हें आत्मसंयमनाचा अभ्यास करणेंच होय. मुलांनो, आतां सांगितलें अशा प्रकारचे किती प्रसंग दिवसांतून तुह्मांला येतात, याचा विचार तुम्हीं कधीं केला आहे? क्षणभर तुमच्या मनाशीं आतांच का कराना? तुमचें तुम्हांला चांगलें दिसून येईल कीं, एक नाहीं, दोन नाहीं, कमींत कमी पांच पन्नास प्रसंग तुम्हांला येतात. रोज याप्रमाणें पन्नास वेळां जर तुम्हीं आपल्या इच्छांना आपल्या सद्विचारांच्या स्वाधीन ठेवलेंत, तर आत्मसंयमनाचा किती अभ्यास तुमच्या हातून होईल याचा विचार करा.

पहा, ' आत्मसंयमन ' ' आत्मसंयमन ' ह्मणजे कांहीं फार अवघड आहे असें नव्हे. अवघड नाहीं असा पक्का मनाचा निर्धार करून जो त्याच्या लाभासाठीं झटेल, त्याला तें अवघड जाणार नाहीं. परंतु जो आपल्यास तें साधावयाचें नाहीं असाच आग्रह

असतां किती समाधानानें जेवण जातें! आणि आपल्यास व सगळ्या घरांतल्या माणसांसही किती सुखसमाधान होतें! पहा, अशा वेळीं आपला हेका, आपली आवड, हीं दूर सारून मन आवरणें हें किती चांगलें आहे! हा एक दुसरा प्रसंग झाला. आतां आणखी एक प्रसंग सांगतों पहा. उद्यां शाळेंत अमुक अमुक अभ्यास दिले आहेत, ते योग्य तऱ्हेनें करणें हें मुख्य कर्तव्य; परंतु मध्येंच मनाला वाटलें कीं, शेजारच्या मुलाकडे बेझिक खेळायला जावें. मुलांनो, मीं तुम्हांला प्रारंभींच सांगितलें आहे कीं, खेळ अवश्य खेळावे. एक नव्हे, जितके म्हणून सभ्य व शरीराला आणि मनाला आल्हादकारक खेळ असतील, तितके सगळे खेळतां यावे आणि तुम्हांला येत नसले, तर ते ते तुम्ही शिकावे; परंतु ज्या कामाची जी वेळ त्याच वेळीं तें काम करीन, भलत्या वेळीं भलतें काम करण्याची इच्छा झाली, तर ती अगदीं आवरून धरीन असें मनाला वाटलें पाहिजे. समजा कीं, आतां सांगितल्याप्रमाणें तुह्मांला बेझिक खेळण्याची इच्छा झाली, तर तो एक आत्मसंयमन करण्याचा प्रसंग होय. लालचावलेलें मन तुह्मांला ह्मणतें ' चल खेळायला, अभ्यास मग करतां येईल.' त्या मनाचा निषेध करून त्या वेळीं त्याला अभ्यास करण्यालाच लावणें हें आत्मसंयमनाचा अभ्यास करणेंच होय. मुलांनो, आतां सांगितलें अशा प्रकारचे किती प्रसंग दिवसांतून तुह्मांला येतात, याचा विचार तुम्हीं कधीं केला आहे? क्षणभर तुमच्या मनाशीं आतांच का कराना? तुमचें तुम्हांला चांगलें दिसून येईल कीं, एक नाहीं, दोन नाहीं, कमींत कमी पांच पन्नास प्रसंग तुम्हांला येतात. रोज याप्रमाणें पन्नास वेळां जर तुम्हीं आपल्या इच्छांना आपल्या सद्विचारांच्या स्वाधीन ठेवलेंत, तर आत्मसंयमनाचा किती अभ्यास तुमच्या हातून होईल याचा विचार करा.

पहा, ' आत्मसंयमन ' ' आत्मसंयमन ' ह्मणजे कांहीं फार अवघड आहे असें नव्हे. अवघड नाहीं असा पक्का मनाचा निर्धार करून जो त्याच्या लाभासाठीं झटेल, त्याला तें अवघड जाणार नाहीं. परंतु जो आपल्यास तें साधावयाचें नाहीं असाच आग्रह

धरून बसेल, त्याला तें मुळींच साधणार नाहीं. ' गणित ' विषय फार कठिण, तो आपल्याला येणार नाहीं असा ज्यानें आपल्या मनाचा निर्धार केला, त्याला तो कधीं येणार नाहीं हें पक्कें समजावें. परंतु ज्याला त्या विषयाचें खरें ज्ञान मिळविण्याची खरी इच्छा असते, त्याला तो विषय तितका कठीण जाणारच नाहीं. त्याचप्रमाणें आपलें मन आवरून धरण्याविषयींचें आहे. सर्व गुणाच्या प्राप्तीसाठीं श्रम केले पाहिजेत, मग प्रसंगांनाही कमतरता नाहीं, आणि सिद्धिही लवकर आल्यावांचून राहणार नाहीं. खाण्यांत, पिण्यांत, बोलण्यांत, निजण्यांत, बसण्यांत मितपणा असला तर फार हितावह होतें, आणि हा मितपणा साधण्यास आत्मसंयमनासारखें दुसरें साधन नाहीं. तें साधन साधून घेतलें पाहिजे. एखादा जिन्नस जिभेला बरा लागला, कीं तो ' आणखी खावा, आणखी खावा ' म्हणून जीभ लोलुपते, अशा वेळीं तिला दाबणें फार जरूर. पाणी चांगलें बर्फाचें अगर मडक्यांतलें आहे, हौसा जाईल तितकें, असें वाटतें. अशा वेळीं त्या इच्छेस दाबणें फार जरूर. मोठी मंडळी बसली आहे आणि कांहीं गोष्टी चालल्या आहेत, मध्येंच आपली जीभ चुरुचुरु बोलूं ह्मणते, तिला आवरणें फार जरूर. सकाळीं सात वाजून गेले, परंतु आंथरुणांतच पडून आणखी एक झोंपेचा चुटका घ्यावासा वाटतो, त्या वेळीं मनाला आवरण्याची किती जरूर आहे! आपल्या धाकट्या बहिणीनें सहजिक आपली दऊत लवंडली, तिला चापटी मारून एक गालगुच्चा अगर चिमटा घ्यावासा वाटतो, त्या वेळीं हात आवरण्याची किती जरूर आहे बरें! अशा एकना दोन! कितीतरी गोष्टी मला तुमच्या रोजच्या क्रमांतच तुह्मांला दाखवितां येतील! परंतु तितक्या त्या सगळ्या सांगून काय करावयाचें आहे? एकंदरींत, आत्मसंयमन म्हणजे काय, तें साधण्यास प्रसंग कोणते, व ते कसे साधावे, येवढें तुमच्या लक्ष्यांत येण्याइतकें तुह्मांला सांगितलें म्हणजे झालें. पुनः पुनः तुम्हांला सांगावयाचें इतकेंच कीं, तुम्ही हा आत्मसंयमनाचा म्हणजे आपल्या इच्छा अनावर झाल्या तर त्यांस दाबून धरतां येण्याचा गुण अवश्य शिका. तो तुमच्या

अंगीं आला म्हणजे तुम्हांला कोठें अडचण पडावयाची नाहीं. तुमचा राग, तुमचा द्वेष, तुमचा आळस, कोणचाही अवगुण तुमच्यावर ताबा करूं शकणार नाहीं. आपलें मन आपल्या ताब्यांत असलें म्हणजे दुसऱ्या अवगुणांच्या ताब्यांत तें जाणार कसें ? आतां कोणी कदाचित् म्हणेल कीं, एवढ्या तेवढ्या बारीकसारीक प्रसंगांत मन आवरून धरलें, तरी तें सदोदित आपल्या ताब्यांत राहणार कसें ! तर, मुलांनो, याला उत्तर एवढेंच कीं, बारीकसारीक प्रसंगाची काळजी तुम्ही घ्या, म्हणजे मोठमोठे प्रसंग आपोआपच निभावतात. मन तितकें तयार होतेंच; हा नियमच आहे. कणाकणांची काळजी घेतल्यास राशि आपोआप बनतात. क्षणाक्षणांची काळजी घेतली कीं, तास आपोआप होतात. त्याचप्रमाणें प्रसंगाप्रसंगांची काळजी घेतली कीं, आत्मसंयमन हा गुण आपोआप लाभतो. कठिण जें काय आहे तें दर प्रसंगाची काळजी घेणें हेंच. तें साधा. तें साधणें म्हणजेच बहुतेक काम करणें आहे. साधु तुकारामांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे.

तापल्यावांचून नव्हे अळंकार ।
पिटूनियां सार उरलें तें ॥
तुका म्हणे मन करावें पाठेळ ।
सहावेचि जाळ सिजेवरी ॥

हें ध्यानांत धरलें पाहिजे. चांगला ताव देऊन तापवून ठोकून तयार केल्याखेरीज अलंकार कसा बनणार ? त्याचप्रमाणें कांहीं पक्कान्न खाण्यायोग्य तयार करण्यास त्या पदार्थाला जाळ लावल्याखेरीज व त्यानें तो सोसल्याखेरीज कसें होणार ? मनाचेंही तसेंच. त्याला आपल्या ताब्यांत आणावयाचें, तें म्हणेल त्याप्रमाणें आपण करावयाचें नाहीं, तर आपण म्हणूं त्याप्रमाणें त्याला करावयाला लावावयाचें, अशी ताकद अंगांत आणावयाची असल्यास त्याला दर प्रसंगीं चाबूक ओढले पाहिजेत. ज्याप्रमाणें रानवट किंवा नवा घोडा तयार करावयाचा असला म्हणजे

चाबूकस्वार त्याला वठणीस आणण्यासाठीं तडातड चाबकाचे तडाखे उडवितो, त्याप्रमाणेंच तुमच्या मनास तुम्हीं केलें पाहिजे. सध्यां शरीराप्रमाणेंच तेंही कोवळें आहे. पाहिजे तसें वहकतें, तर त्याला आतां सांगितल्या अशा प्रसंगीं चापून आपल्या ताब्यांत आणण्यास झटा.

संपलें. याहून या वेळेस मला आतां आणखी कांहीं सांगावयाचें नाहीं. आतां सांगितलें आहे हें ध्यानांत धरा; आणि थोडीशी अभ्यासाची उजळणी मधून मधून करून आपली सुटी मोठ्या मौजेंत व आनंदांत घालवून पुनः जून महिन्यांत आपल्या पुढल्या अभ्यासाला उल्हासानें सुरुवात करण्यासाठीं या.

मराठी ग्रंथ ... सभा

मुलांस थोडा उपदेश.

४

वेदमनूच्याऽऽचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति ।

सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्याय-प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् । देव-पितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि । तानि सेवितव्यानि । नो इतराणि । यान्यस्माकꣳसुचरितानि । तानि त्वयोपास्यानि नो इतराणि । ये के चास्मच्छ्रेयाꣳसो ब्राम्हणाः । तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम् । श्रद्धया देयम् । अश्रद्धयाऽदेयम् । श्रिया देयम् । ह्रिया देयम् । भिया देयम् । संविदा देयम् । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् । ये तत्र ब्राह्मणाः सम्मर्शिनः । युक्ता आयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथाः। अथाभ्याख्यातेषु । ये तत्र ब्राम्हणाः सम्मर्शिनः । युक्ता आयुक्ता अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तेषु वर्तेरन् । तथा तेषु वर्तेथाः। एष आदेशः । एष उपदेशः । एषा वेदोपनिषत् । एतदनुशासनम् । एवमुपासितव्यम् । एवमुचैतदुपास्यम् ॥

तैत्तिरीयोपनिषत् । शिक्षाध्याये ११ अनुवाकः

मुलांनो,

अध्ययन होऊन मुलगा गुरुजीपासून दूर जाऊं लागला कीं, त्याला निरोप देण्यापूर्वी गुरूनें त्याच्या हिताचे चार शब्द सांगण्याची पद्धति आजकालची नाहीं. ती आपल्या या भरत-खंडांत आज हजारों वर्षें चालत आली आहे. मुलाची मुंज

६६२

झाली कीं, त्याला कोणा तरी सत्पात्र गुरूच्या स्वाधीन करून त्याचें अध्ययन करावयाचें अशी आपली जुनी चाल. मुंज झाल्यापासून तों मुलाचें अध्ययन पुरें होईपर्यंत मुलगा पूर्वीच्या काळीं सर्वथा गुरुजीच्या ताब्यांत असे. कधींमधीं आपल्या आईबापांस भेटण्यास जात असेल. ही उत्तम चाल हल्लीं आपल्यांत अगदीं बंद पडली आहे, हें बरें झालें नाहीं. असो.

आतां मीं सांगितलेंच कीं, सुटीचे दिवस सुरू होण्याचे पूर्वी हल्लीं आह्मी ज्याप्रमाणें तुम्हांला तुमच्या हिताच्या चार गोष्टी सांगतों, त्याप्रमाणेंच आपले पूर्वज व आपल्या देशाचे केवळ दीपक असे जे ऋषि, ते आपल्या विद्यार्थिसमूहाला प्रसंगानुसार उपदेश करीत असत. अशा या प्राचीन ऋषींनीं आपल्या विद्यार्थ्यांस केलेल्या उपदेशांपैकीं एक सुंदर उपदेश माझ्या पहाण्यांत आला. तोच या प्रसंगीं तुमच्या कानावर घालावा आणि मनावर ठसेल अशा तऱ्हेनें त्यांतील प्रत्येक वाक्याचें विवरण करून सांगावें, असें आज मीं मनांत आणलें आहे. जो उपदेश मी आज तुम्हांला करणार आहें, तो आज तुह्मांलाच काय, परंतु मागें होऊन गेलेल्या सर्व माणसांना अत्यंत उपयोगी पडला आणि पुढें होणाऱ्या सर्व माणसांस उपयोगी पडल्यावांचून कधीं रहाणार नाहीं, असा आहे. तो आमच्याच लोकांना उपयोगी पडणार असा नाहीं, तर तो पाहिजे त्याला, पाहिजे त्या काळीं, पाहिजे त्या स्थळीं उपयोगी पडणार. उपदेश फार लांबलचक आहे असेंही नाहीं. अगदीं थोडयांत, अत्यंत गोड रीतीनें सर्व कांहीं गोष्टींचें सार त्यांत आणलें आहे. तेव्हां आतां त्याचें जास्त वर्णन न करितां मूळ उपदेश काय आहे तो समग्र येथें देतों. आणि मग त्यांतील एक एक मुद्याची गोष्ट घेऊन विवरण करूं.

अध्ययन झाल्यानंतर आचार्य आपल्या विद्यार्थ्यांस उपदेश करितातः—खरें बोलत जा । आपलें कर्तव्य करीत जा । आपल्या अध्ययनाची हयगय करूं नकोस । सत्यापासून चळूं नकोस । कर्तव्यापासून चळूं नकोस । जें हितकारक त्यापासून चळूं नकोस । जें मंगलकारक त्यापासून चळूं नकोस । जें शिकला आहेस तें

जागृत ठेवण्यांत व तें दुसऱ्यास शिकविण्यांत मुळींच आळस करूं नकोस। देव आणि पितर यांच्याप्रीत्यर्थ जीं कर्में करावयाचीं तीं विसरूं नकोस। आई ही ज्याचा देव असा हो। बाप हा ज्याचा देव असा हो। आचार्य ज्याचा देव असा हो। घरीं आलेला पाहुणा ज्याचा देव असा हो। जीं कृत्यें सर्वथा निर्दोष तीं करावीं। दुसरीं करूं नयेत। आह्मी जीं चांगलीं कृत्यें करतों, तींच तुह्मी करा। दुसरीं करूं नका। आपल्या पेक्षां श्रेष्ठ असे लोक आहेत त्यांचा मान राखून, या ब्रता म्हणून त्यांस संतुष्ट करा। कोणाला कांहीं द्यायचें तें श्रद्धेनें द्यावें। श्रद्धेवांचून देऊं नये। आनंदानें द्यावें। गरिबपणानें द्यावें। भिऊन द्यावें। प्रेमपूर्वक द्यावें। कोण्या वेळीं कसें वागावें, काय करावें, हें कळेनासें झाल्यास, चार विचारी लोक वागत असतील त्याप्रमाणें वागत जावें। मग ते तुमचे नेमलेले शिक्षक असोत किंवा दुसरे कोणी असोत, त्यांची बुद्धि निष्ठुरपणाची नसली व ते धर्मशील असले म्हणजे झालें। त्याचप्रमाणें, ज्या गोष्टी चांगल्या कीं वाईट याविषयीं संशय उत्पन्न झाला असेल, त्यांच्यासंबंधांतही चार विचारी लोक वागत असतील, त्याप्रमाणें वागत जावें। मग ते तुमचे नेमलेले शिक्षक असोत किंवा दुसरे कोणी असोत, त्यांची बुद्धि निष्ठुरपणाची नसली व ते धर्मशील असले ह्मणजे झालें। हीच आमची आज्ञा। हाच आमचा उपदेश। आम्ही तुम्हांला नियम घालून देतों ते हेच। यांप्रमाणें वागत जा। यांप्रमाणेंच वागत जावें।

पहा. मीं आधीं सांगितल्याप्रमाणें हा उपदेश किती सुंदर आहे! प्रत्येकानें हा पाठ करण्याजोगा आहे आणि तो तुह्मीं करावा असें माझें तुम्हांला सांगणें आहे. या उपदेशांतील एक एक मुद्दा फार लक्ष्य लावून पाहिला पाहिजे. सर्व गोष्टी अशा तऱ्हेनें त्यांत बांधल्या आहेत कीं, त्यांचें महत्त्व एकंदरींत अगदीं सारखें आहे, तरी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आधीं. मग दुसरा, मग तिसरा, अशी सुंदर रचना आहे. ती कशी ती आपण आतां पाहूं.

उपदेशांतलें अगदीं पहिलें वाक्य काय? तर ' **खरें बोलत**

जा. ' इतर सगळ्या गोष्टी एकीकडे ठेवून पहिल्या प्रथम हा खरें बोलण्याचाच उपदेश केला आहे, यावरूनच त्या मुद्याचें महत्त्व मनांत आणा. आईबापांना देवांप्रमाणें मान, गुरूला देवाप्रमाणें मान, इत्यादि गोष्टी सांगितल्या, पण त्या केव्हां ? मागून. इतकेंच नव्हे, तर देवाप्रीत्यर्थ जीं काय कार्यें करावयाचीं तीं करीत जाण्याविषयींचा उपदेश देखील मागून. देवकार्यापेक्षांही सत्याचें महत्त्व जबर. कांहींही होवो, कधीं खोटें म्हणून बोलूं नये. एक वेळां दुसऱ्या कित्येक गोष्टी योग्य तऱ्हेनें हातून घडल्या नाहींत तरी हरकत नाहीं, पण सत्यापासून ही आपली जीभ चळूं देऊं नका. **खरें बोलत जा**, हा उपदेश अगदीं पहिल्या प्रथम करण्याला एक तर कारण हें कीं त्याचें महत्त्व अत्यंत. दुसरें हें कीं, सत्यापासून जीभ चळल्याचा दोष आपल्या हातून जितक्या वेळां घडतो, तितक्या वेळां दुसरा कोणताही घडत नसेल. तुम्ही आपल्याच मनांत विचार करा आणखी पहा कीं, एका दिवसांत आपण थट्टेंत म्हणा अगर चांगलें बोलत असतांना म्हणा, किती खोटें बोलतों तें ! शिवाय वर्गांतले धडे झाले नसले म्हणजे होणारी शिक्षा टाळण्याकरितां ज्या कांहीं सबबी पुढें येतात, त्यांची तर गणतीच नको ! खोटें बोलण्याचा दुर्गुण अत्यंत वाईट, पण जडतो फार लौकर, आणखी फार लोकांना. **खरें** म्हणजे काय, ह्याचें विवेचन करीत बसण्याची माझी इच्छा नाहीं. कारण **खरें** म्हणजे काय हें ज्याला त्याला अंतर्यामीं अगदीं पक्कें समजतें. त्याचप्रमाणें खोटें म्हणजे काय याचीही व्याख्या देऊन विवरण करीत बसण्याची आवश्यकता नाहीं. आपण खोटें बोलण्याच्या पूर्वींच तें आपल्याला ठाऊक असतें. आणि एकदां बोलून गेलों म्हणजे त्याची जी रुखरुख लागते, तिच्यामुळें तें पाठीमागूनही फारच चांगलें ध्यानांत राहतें. खोटें बोलण्याची संवय एकदां जडली म्हणजे ती होतां होईल तों सुटत नाहीं. एवढ्याकरितां ही अत्यंत दुष्ट संवय कधीं जडूंच देऊं नये. कोणचीही वाईट गोष्ट हातून घडली, म्हणजे तिच्या परिणामापासून आपल्याला त्रास सोसावा लागेल, तो टाळण्या-

साठीं बहुशः खोटें बोलण्यास प्रारंभ होतो. शिक्षकांनीं कांहीं लिहून आणण्यास सांगितलें, आणि तें लिहून आणलें नाहीं, आळस केला, आतां त्या आळसाबद्दल शिक्षा होणार हें खास, असें असलें, म्हणजे 'डोकें दुखत होतें,' किंवा 'ताप आला होता,' किंवा 'आईबापांनीं पुष्कळ काम सांगितलें होतें,' अथवा 'कोठें पाठविलें होतें,' अशा सबबी तुम्हांपैकीं कितीजणांच्या तरी तोंडांतून निघतात! त्या सबबी शिक्षक लोक कधीं बहुतकरून खऱ्या मानीत नाहींतच. शिक्षा व्हावयाची ती होतेच. इतकेंच नव्हे, तर केव्हां केव्हां करावयाचें तें काम केलें नाहीं आणि वर खोटें सांगितलें याबद्दल दुप्पट शिक्षा होते. तुम्हांपैकीं कित्येकांना उगीच थापा मारण्याचीही संवय असते, तीही अतिशय वाईट. आपली प्रतिष्ठा वाढविण्याकरितां, किं व सहज मौजेनें म्हणून मधेंच एखादी थाप ठेवून द्यावी; अगर एखादी कांहीं चमत्कारिक गोष्ट पाहिली असली तर तिचें वर्णन करून सांगतांना आपल्या पदरचें कांहीं तरी तिखटमीठ लावून द्यावें अशी संवय असते. उगीच एखादें वीतभर किरडूं तुमच्या नजरेस पडलें, तर त्याचा दोन हात लांब सोलासारखा जाड साप बनवून तुम्ही त्याचें वर्णन देतां. अशा थापांपासून दुसऱ्या कोणाचें नुकसान जरी यदाकदाचित् झालें नाहीं, तरी तुमचें स्वतःचें अतोनात नुकसान होतें हें पक्कें लक्ष्यांत धरा. कारण, सहजीं सहजीं म्हणतां म्हणतां थापा मारणें हें तुमच्या अंगवळणींच पडून खरें बोलणें तुम्हांला फार जड जाऊं लागतें! मनुष्य स्वभावतः अत्यंत सत्यप्रिय. स्वभावतः खोटें बोलण्याची त्याला कधीं इच्छा होत नाहीं. ती अतिशय निंद्य, दुष्ट, अनिष्ट अशी संवय तो केवळ भित्रेपणामुळें व मूर्खपणामुळें लावून घेतो. त्या संवयीपासून कधीं कोणाचें हित होत नाहीं. खोटें बोलण्याचे प्रकार तरी एक दोन आहेत का? ते अनेक आहेत. कित्येक शब्दांनीं आणखी अर्थानें दोनही तऱ्हांनीं खोटें बोलत असतात. कित्येक लुच्चे लोक असे असतात कीं, ते खोटें बोलूनश्या बोलून अशी शिताफी करितात कीं, शब्दांत पकडलें जाऊं नये. या वाईट लो-

कांचें खोटें बोलणें इसापनीतींतील भाजीविक्याच्या दुकानांतील भोपळ्याची खाप चोरणाऱ्या भामट्यांच्या खोटें बोलण्याप्रमाणें असतें. एकानें खाप चोरून दुसऱ्याजवळ दिली. पहिल्यास विचारतां तो म्हणतो, " बाबारे, माझ्याजवळ तुझी भोपळ्याची खाप असेल, तर देवाची शपथ! " दुसऱ्यास विचारतां तो म्हणतो, " मी तुझी खाप चोरली असेल तर देवाची शपथ ! " या भामट्यांनीं उच्चारलेले शब्दच पाहिले, तर ते अगदीं खरे होते. एकाजवळ नव्हती व एकानें चोरली नाहीं; परंतु त्यांनीं खोटें सांगितलें नाहीं असें कोणी तरी ह्मणेल काय ? आपल्या मनांत एक अर्थ, आणि दुसऱ्याच्या मनांत भरवावयाचा तो भलताच अर्थ, अशी शब्दरचना करून बोलणें, ह्मणजे अतिशय निंद्य प्रकारानें खोटें बोलणेंच होय. असली संवय ज्यांच्या अंगीं असेल, त्यांच्यासारखे नीच तर कोणीच नव्हत. त्यांच्यापासून त्यांचें स्वतःचें व दुसऱ्यांचेंही जितकें नुकसान होतें, तितकें दुसऱ्या कशापासून होत नाहीं. एवढ्याकरितां जें काय बोलावयाचें तें खरें, सरळ, त्यांत कांहीं आढेवेढे, कांहीं पांचपेंच मुळींच न ठेवतां बोलत जावें. एक गोष्ट खोटी सांगितली कीं, तिचा खरेपणा भासविण्याकरितां दुसरी आणि दुसरीचा खरेपणा भासविण्याकरितां तिसरी, असा एकसारखा प्रकार सुरू होतो, आणि खोटें बोलणारा मग आपल्याभोंवतीं एखाद्या कोळ्याप्रमाणें जाळें पसरूं लागतो व शेवटीं आपला आपणच त्या प्राणघातक जाळ्यांत गुरफटला जाऊन आपली हानि करून घेतो. एवढ्याकरितां सत्याचा अत्यंत सरळ मार्ग सोडून असत्याच्या कांट्यांकुट्यांनीं भरलेल्या आडमार्गांत जाऊं नये हेंच उत्तम. जन्माला आल्यापासून तों मरेपर्यंत आपल्याला आपला जगांतला प्रवास उत्तम प्रकारें करण्याची इच्छा असल्यास अत्यंत सोपा मार्ग सत्याचाच. तोच मार्ग सरळ. त्याच मार्गानें आपला प्रवास अत्यंत उत्तम रीतीनें पार पडणार. एवढ्याकरितां प्राचीन गुरूंनीं पहिल्या प्रथम जो उपदेश केला तो खरें बोलण्याविषयीं.

खरें बोलत जा.

ज्यानें सत्याचा मार्ग धरिला, त्याला पुढला उपदेश अगदीं सहजच अंमलांत आणण्याजोगा आहे. तो काय ? तर '**आपलें कर्तव्य करीत जा.**' जो जो म्हणून मनुष्य जन्माला येतो, त्याला त्याला या जगांत येऊन कांहीं तरी कर्तव्य आहेच. तें ज्याचें त्यानें उत्तम प्रकारें केलें म्हणजे जगांत कधीं कोणाला त्रास व्हावयाचा नाहीं, कधीं कोणाला दुःख व्हावयाचें नाहीं, कांहीं नाहीं. परंतु चुकतें तें हेंच कीं, जो तो मनुष्य आपलें कर्तव्य करण्याचें टाकून भलतेंच कांहीं करीत बसतो. तुह्मां मुलांचें शाळेंत, घरीं, वगैरे अमुक एक कर्तव्य असें ठरलेलें आहे. तें तेवढें तुह्मीं केलें ह्मणजे पुढें प्रत्येक स्थितींत आपलें कर्तव्य काय तें जाणून त्याप्रमाणें वागण्याची तुम्हांला उत्तम संवय लागेल. परंतु आजच जर तुम्हांला आपलें स्वतःचें कर्तव्य काय तें सोडून, यांत तोंड घाल, त्यांत तोंड घाल, असें करण्याची दुष्ट संवय लागली, तर तुमचा सर्व आयुष्यक्रम बिघडला म्हणून समजा. सध्यां तुमचें कर्तव्य काय हें तुमचें तुम्हांला समजत नाहीं असें नाहीं. सत्य ह्मणजे काय, कर्तव्य म्हणजे काय, या गोष्टी कधीं फारसें विवरण करून सांगण्याची जरूरी नसते. त्या ज्याच्या त्याला चांगल्या माहिती असतात. परंतु तेवढ्याच वगळून बाकीच्या गोष्टी करण्याकडे त्याची प्रवृत्ति होते. तशी होऊं न देण्याविषयीं चांगली खबरदारी घेतली पाहिजे. सध्यांच्या वयांत तुमचें कर्तव्य इतकेंच कीं, आईबाप व गुरु यांच्या आज्ञेंत वागून त्यांचा संतोष राहील, त्यांना आनंद होईल, तुम्ही त्यांचीं मुलें व विद्यार्थी आहां हें पाहून त्यांना अभिमान वाटेल, अशा तऱ्हेची वागणूक ठेवणें. सध्यां आईबाप व गुरु सांगतील त्याप्रमाणें तुम्हीं वागलां म्हणजे तुम्ही आपल्या कर्तव्यास उत्तम प्रकारें जागलां असें झालें. त्यांतच तुमचें कल्याण आहे. हें कर्तव्य कोणचें हें विस्तारानें पुढील वाक्यांतून सांगितलें आहे. आचार्य म्हणतात:—" आपल्या अध्ययनाची हयगय करूं नकोस. " आतां काय, आपल्याला सुटी आहे; आपलें शिकणें संपलें; आतां नुस्ती विश्रांति घ्यावयाची असें समजून, झालेल्या अभ्यासांची हयगय होऊं दिली कीं ते

अभ्यास गेलेच म्हणून समजा. ते कांहीं जागृत राहणार नाहींत. त्यांची वारंवार उजळणी केलीच पाहिजे. भांडीं उजळ ठेवावयाचीं असलीं म्हणजे दिवसांतून एकदां तरी जसा त्यांच्यावरून हात फिरविला पाहिजे, नाहीं तर तीं अगदीं मळिण होऊन जातात, त्याप्रमाणेंच झालेल्या अभ्यासाचें आहे. ते नीट तरतरीत रहावे अशी इच्छा असली तर सुटीच्या दिवसांतही रोज एकदां किंवा एक दोन दिवसाआड त्यांची उजळणी केली पाहिजे. ती न केली, जर तेवढ्या कामांत हयगय केली तर ते अभ्यास विसरलेच म्हणून समजावें; आणि असे ते विसरून गेले ह्मणजे इतके दिवसांची मेहनत अगदीं वांया गेली म्हणून समजावें. पुनः शाळा सुरू झाली कीं, ‘ पहिले पाढे पढो पंचावन ’ अशी स्थिति व्हावयाची ! मला नाहीं वाटत अशी स्थिति यावी असें तुमच्यांपैकीं एकाला तरी वाटत असेलसें ! म्हणून म्हणतों कीं, झाल्या अभ्यासाची बिलकूल हयगय करूं नका. तुमच्या हिताच्या, तुमच्या कल्याणाच्या अशा ज्या गोष्टी आहेत त्या याच होत. तेव्हां सत्य बोलणें, कर्तव्याला जागणें, सत्यापासून न ढळणें, कर्तव्य न विसरणें, आपल्या अध्ययनाची चांगल्या प्रकारानें काळजी घेणें, इत्यादिक ज्या हितकारक व कल्याणकारक गोष्टी त्या दृष्टीआड होऊं देऊं नका. त्यांजवर नेहमीं दृष्टि देऊन आपलें वर्तन ठेवा.

आपला स्वतःचा झालेला अभ्यास जागृत ठेवावा इतकेंच नव्हे, तर आपल्याला जें कांहीं येतें आहे, तितक्यांत दुसऱ्या कोणाला कांहीं शिकवितां आलें, तर अवश्य अवश्य शिकवीत जा. आपल्याला येतें आहे, याच आढ्यतेनें जाऊं नका. आपल्याला येतें आहे, तें दुसऱ्याला शिकाविल्यानें दुसऱ्या शिकणाराचाच फायदा होतो असें नव्हे, तर आपला स्वतःचाही अतोनात फायदा होतो. आपल्याला जें कांहीं येतें येतें असें आपल्याला वाटत असतें, तें खरोखर चांगल्या कसाला लागतें, आणि जर आपल्याला येतें असा नुसता भ्रम असेल, तर तो पार निघून जातो; खरोखर येत असेल, तर त्याला सुंदर खासा उजळा बसतो; शिवाय ज्याला आपण शिकवूं तो मनुष्य कृतज्ञ

होऊन आपल्यास मानूं लागतो. हा फायदा लहानसान नाहीं. आपल्या वर्गांतला किंवा दुसऱ्या कोणच्या वर्गांतला मुलगा आपल्यास एखादें उदाहरण विचारण्यास आला, किंवा दुसरें कांहीं विचारण्यास आला, तर त्याला कधींही हिडिस फिडिस न करितां आपल्याला येत असेल तें मन मोकळें करून सांगावें. त्याला आपल्याइतकें आल्यास तो आपल्या बरोबरीचा होईल, किंवा त्याचा नंबर आपल्यावर जाईल, अथवा आपल्या बरोबरीनें त्याला मार्क मिळतील, असले मूर्खपणाचे विचार कधींही मनांत आणूं नयेत. ज्याचें मन नीच, त्याच्याच मनांत असले कुत्सित विचार येतात.

देव व पितर यांच्या प्रीत्यर्थ जीं कर्में करावयाचीं तीं विसरूं नकोस. या वाक्यांत तुमचीं धर्मसंबंधीं कृत्यें कायतीं करण्याविषयीं बजाविलें आहे. रोजची संध्या करणें किंवा नमस्कार घालणें, देवाची पूजा करणें, अगर देवदर्शन घेणें इत्यादि जीं धर्मकृत्यें तीं करण्यास कधींही चुकूं नका. एखाद्या आपल्या बरोबरीच्या अगर आपल्याहून श्रेष्ठ माणसानें आपल्यावर कांहीं उपकार केला किंवा आपल्या हिताची गोष्ट केली म्हणजे आपण त्याचे केवढे तरी उपकार मानितों आणि त्याला केवढा मान देतों! त्याचप्रमाणें पुनः केव्हां तसलेंच कांहीं हित कृत्य करण्याची पाळी आली तर त्याचेकडे धांव घेतों. ही जर आपल्या मनुष्यामनुष्यांतली स्थिति, तर ज्यानें आपल्यासाठीं हें सर्व जग निर्माण केलें, त्यांतील वस्तूंत आपल्याला सुख देणारा व उपयोगीं पडणारा असा गुण ठेविला; ज्यानें आपणास जन्मास घालून अशा स्थितीस आणलें त्याच्या उपकारांचें स्मरण करून त्याची प्रार्थना करणें, त्याला शरण जाणें, त्याला आळविणें, त्याची भक्ति करणें, इत्यादि गोष्टी अवश्य कर्तव्यांतल्या नाहींत काय? दिवसाच्या चोवीस तासांपैकीं कांहींना कांहीं तरी काळ देवाच्या स्मरणांत, प्रार्थनेंत अगर जेणेंकरून त्याचा संतोष होईल अशीं कृत्यें करण्यांत घालविणें हें अत्यंत अवश्य आहे. पितरांच्या प्रीत्यर्थ जीं कांहीं कृत्यें करावयाचीं

त्यांचें सध्यांच्या वयांत तुमचेकडे काहीं नाहीं, आणि कित्येक वर्षें तें मुळींच न येवो !

आई ही ज्याचा देव असा हो. बाप ज्याचा देव असा हो. जगन्नियंत्या परमेश्वराविषयीं जीं काय कर्तव्यें तीं करण्याविषयींचा उपदेश झाल्याबरोबर पाहिला उपदेश हा कीं, तूं आपल्या आईबापांना देवाप्रमाणें मानून वागणूक कर. त्यांतहीं प्रथमतः आई. 'न मातुः परदैवतं,' आईसारखें दुसरें दैवत नाहीं, असें म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. आई हें परम दैवतच होय. तिच्या संतोषाकरितां आपण काय न करावें ! मुलांनो, तिनें तुमच्यासाठीं आजपर्यंत किती कष्ट सोसले, किती खस्ता खाल्या, आपल्या स्वतःच्या जिवाला किती त्रास करून घेतला, याची कल्पना तरी तुम्हांला होते काय ! तुम्ही जन्मण्यापूर्वीपासून तुमच्या सुखासाठीं ती किती जपली, तुम्हांला खोकला होऊं नये, तुम्हांला ताप येऊं नये, म्हणून तिनें आपल्या खाण्यापिण्यांत सुद्धां किती बेत ठेवला, याची कल्पना तरी तुम्हाला होणार आहे ? तुम्ही अगदीं परस्वाधीन, केवळ मांसाचा लोळा गोळा असे पडलेले असतां तुमच्या प्रत्येक हालचालीकडे अहोरात्र लक्ष्य देऊन तुमची जोपासना किती विलक्षण तऱ्हेनें तिनें केली, याचा विचार तुमच्या मनांत कधीं आला आहे ? तुम्ही आजारी असतांना तुह्मांला अंगाखांद्यावर घेऊन रात्रीच्या रात्री जागरणें करून, केव्हां असें ठेवून, केव्हां तसें ठेवून, केव्हां पाळण्यांत घालून, केव्हां गाणीं गाऊन, तुम्हांला सुख होण्यासाठीं जे जे उपाय केले आहेत ते तुमच्या मनांत कधीं येतात काय ? तुम्हांला बोलायला येत नव्हतें, तेव्हां तुमच्या इच्छा समजून, पुढें तुम्हांला शब्द उच्चारण्याला शिकवून, तुम्ही चालण्याचा यत्न करूं लागलां असतां तुम्हांला बोटाचा आधार देऊन, तुमची जोपासना केली; तुम्हांला थोडथोडें ज्ञान दिलें; हें सगळें जिनें केलें, त्या आईला देवाप्रमाणें मान; ती तुझा देवच असें मानणारा हो, असा उपदेश आचार्यांनीं केला, व त्याप्रमाणें वागण्याविषयीं

आग्रहपूर्वक सांगितलें, तर त्यांत नवल काय ? मुलांनो, आईचें महत्त्व कधींच पुरतेपणीं कोणास वर्णन करून सांगतां यायचें नाहीं. आज काय किंवा पुढें तुम्ही धनंतर मोठे झा-लांत म्हणजे तरी काय, तिचें तुमच्याविषयींचें प्रेम निरंतर जशाचें तसेंच कायम राहणार, त्यांत अणुमात्र अंतर पडणार नाहीं. तुमच्या जिवाला अणुमात्र दुःख झालें तरी तिच्या जिवाला दुःख होणार. तुह्मांला कांटा टोंचला, तर तिच्या डोळ्याला टचूकन् पाणी येणार. तुमच्याकरितां आजपर्यंत तिनें कष्ट सोसले, तितके कष्ट सोसण्याचा पुनः प्रसंग आला तरी ती कधीं मागें घेणार नाहीं. फार तर काय, तुम्हांला वांचविण्याकरितां जळत्या निखाऱ्यांवरून चालत जाण्याचा प्रसंग आला तरी ती तितकें करील, परंतु तुमचा जीव वांचवील. इतक्या सगळ्या गोष्टी जी तुमच्याकरितां करण्यास तयार, जिचें हृदय सदैव तुमच्याकरितां तिळतिळ तुटणार, जिच्या कळकळीसारखी कळकळ दुसऱ्या कोणाही प्राण्यास तुमच्याविषयीं कधीं वाटणार नाहीं, त्या आईला तुम्हीं देव तर काय, परंतु देवापेक्षांही अधिक मानलें पाहिजे. कारण, तुम्हीं तिला जितकें मानाल तितक्या मानानें तुम्ही देवाला मानणार असें खास समजा. ज्याला आईची भक्ति नाहीं, त्याला देवाची भक्ति नाहीं, ही खात्री. परंतु आपल्या आईवर इतकी भक्ति करणारीं, आईच्या मनाला अणुमात्र असंतोष, असमाधान किंवा त्रास न देणारीं अशीं मुलें किती सांपडतील ? आपल्या रिकाम्या हट्टानें, छांदिष्टपणानें, विनाकारण रडण्यानें आपल्या आईला त्रास दिला नाहीं असें खात्रीनें सांगणारीं मुलें या एवढ्या समूहांत किती निघतील ? आईनें एखादी गोष्ट सांगितल्याबरोबर ती विनतकरार, मुकाट्यानें करणारीं मुलें फार क्वचित्, तिला त्रास देणारींच फार; असें कां व्हावें ? माझें जर ऐकाल, या आजच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा जर निश्चय कराल, तर तुम्ही कधींही याउप्पर आपल्या आईला त्रास देणार नाहीं. तिला जिकडून सुख होईल, जिकडून समाधान होईल, तें कराल. तिच्या मर्जीविरुद्ध बिल-

कूल वागणार नाहीं. तुमच्या अहिताची अशी गोष्ट ती कधींही तुम्हांला सांगणार नाहीं. देवाप्रमाणें तिची भीति बाळगा. तिचें तुह्मांवर जें प्रेम आहे, तें एका परमेश्वराखेरीज कोणामध्येंही सांपडणार नाहीं. तिचें प्रेम निरपेक्ष, निराकांक्ष, निर्मल, असें आहे. तुमच्यापासून अमुक मोबदला मिळावा, तुम्हीं तिचे अमुक हेतु पुरवावे, या हेतूनें ती कधींच तुमच्यावर प्रेम करीत नाहीं. अशा प्रेमाचा मोबदला, तुम्ही तिच्यावर तसेंच प्रेम करावें, तिचा आदर ठेवावा, तिला सुख द्यावें, दुःख देऊं नये, एवढ्यानेंच तिला मिळणार आहे, आणि तुमच्यावर जें तिनें ऋणाचें ओझें लादलें आहे, त्यांतून कदाचित् अंशतः यानेंच सुटाल. आई हाच ज्याचा देव असा हो, हा उपदेश करण्याचा हेतु हाच होय.

ज्याप्रमाणें आई त्याचप्रमाणें बापही आपणांस देवाप्रमाणें असला पाहिजे. त्यानें आपल्याकरितां थोडे थोडके कष्ट सोशिले असतात असें नाहीं. आमच्या हिताकरितां, आमच्या कुशलतेकरितां, तो काबाडकष्ट करीत, अगर चाकऱ्या करीत, रानोरान, गांवोगांव, देशोदेश हिंडत असतो, त्या वेळीं ऊन, तहान कांहीं पहात नाहीं; आपल्या तोंडचा घांस तुम्हांला देतो; आपल्या अंगांला कपडा नसला तरी तुम्हांला कपड्यांची वाण पडूं देत नाहीं; त्या बापाची योग्यता देवासमान मानली पाहिजे, यांत शंका काय? अगदीं लहानपणीं आपला व बापाचा संबंध कमी असतो, तरी जों जों आपली वाढ होत जाते, तों तों त्यांच्याशीं संबंध अधिकअधिक वाढत जाऊन तोच आपली शरीराची व मनाची वाढ पूर्ण होण्यास कारण होतो. ते त्याचे उपकार त्यास प्रतिदेव समजून आपलें त्याच्याशीं वर्तन राखिलें, तरच त्याच्या उपकारांस योग्य असें आमचें वर्तन झालेंसें होईल.

पुढें म्हटलें आहे कीं, "**गुरु ज्याचा देव असा हो.**" एका कवीनें ह्मटलें आहे, "आईबाप हीं जन्म देणारीं, परंतु गुरु हा जीवन देणारा होय." याचा अर्थ काय? जन्म देणारा आणि जीवन देणारा या दोहोंचा अर्थ काय? मुलांनो, याचा

अर्थ अगदीं सोपा आहे. जन्म देणें म्हणजे या जगांत आणून सोडणें; परंतु जीवन देणें म्हणजे या जगांत आल्यावर आयुष्य-मार्गाला लागून त्यांतून उत्तम प्रकारें वहिवाटून जाण्यास शक्ति देणें; या आयुष्यमार्गांत ज्या कित्येक अडचणी, जीं कित्येक संकटें येतील, त्यांचा परिहार करण्याचीं साधनें आपल्या हातांत आणून देणें; या आयुष्यप्रवासांत वेळोवेळीं जी सामुग्री लागावयाची ती सिद्ध करून देणें. अशी शक्ति दिली, अशीं साधनें आपल्या हातांत दिलीं, व अशी सामुग्री सिद्ध करून दिली, तरच हा आयुर्मार्ग सुलभ होणार; तरच आपण यांतून निभावून जाणार. तशी शक्ति, तशीं साधनें, तशी सामग्री नसली, तर मग काय, कोणच्या आडमार्गाला जाऊन कोठें व केव्हां खड्यांत पडूं याचा मुळींच नेम नाहीं. तेव्हां या सर्व गोष्टी जो ममतेनें आपणांला देतो, आपला या जगांतला वास जो अगदीं सुखकर करण्याला झटतो, तोच गुरु. या सर्व आवश्यक गोष्टींचें सार विद्या होय. ती विद्या आम्हांला ज्या गुरूपासून मिळते तो देवाप्रमाणें नव्हे तर काय ह्मणावें ? विद्या हें एक अमृत आहे; तें देवासच लाभलेलें; तें ज्याच्यापाशीं आहे व तें जो आपणांस केव्हां ममतेनें, केव्हां निष्ठुरपणानें पाजतो, तो प्रत्यक्ष देवच होय. तो आपल्याला केव्हां केव्हां निष्ठुरपणानें वागवितो, यावर जाऊं नये. तो अमृत पाजीत असतां आपण तें विष म्हणून थुंकून टाकूं लागलों, किंवा तें त्यानें आपल्या जवळही आणूं नये म्हणून पळून जाऊं लागलों, तर तो होतां होईल तों दादा बाबा करून आपल्या विनवण्या करितो; आपण नच ऐकलें तर धाक दाखवितो; तरीही न ऐकलें, तर चौदाव्या रत्नाचाही प्रयोग तो करितो; परंतु हें सर्व कशासाठीं ? तो आपल्या स्वतःच्या हितासाठीं का ? त्याला तुम्हांला झोडण्याची हौस आहे म्हणून का ? छे, छे. तो तुम्हांला शिक्षा करितो, ती केवळ तुमच्या हितासाठीं. तो तुह्मांला झोडपतो तें केवळ दुःखानें. त्यांत त्याला सुख ? छे, छे ! मुलांनो, ही कल्पनासुद्धां मनांत आणूं नका. तुमच्या वेदना

पाहून गुरूला सुख कसलें ? छड्या खाऊन वेडींवांकडीं तोंडें दृष्टीस पडलीं म्हणजे त्याला आनंद कसला होणार ? तुम्हांला दुखणें आलें असतां, तुमची आई जशी आधीं ममतेनें घे म्हणून, तुम्हीं ऐकिलें नाहीं तर एखादा धपाटा पाठींत घालून कडू औषध तुमच्या घशांत ओतण्यास मुळींच मागें पुढें पहात नाहीं, तें परिणामीं तुमच्या हितास कारण होणार अशी तिची पक्की खात्री असते; त्याचप्रमाणें गुरूचें आहे. तुम्हांला आळसानें घेरलें असलें म्हणजे, तुम्हीं गुण्यागोविंदानें न ऐकल्यास धपाटा देऊन पण विद्यारूप–आरंभीं कडू व परिणामीं हितकारक–औषध तो पाजणारच ! त्याची किंमत तुम्हांला पुढें कळते. यास्तव या अत्यंत प्राचीन, परंतु सदैव खऱ्या व अत्यंत उत्तम उपदेशांत " गुरूलाही प्रत्यक्ष देवच मान ," असें सांगितलें आहे.

अतिथि म्हणजे आपल्या घरीं येणारा पाहुणा, तोही तुम्हीं देवाच्या ठिकाणीं मानावा. तुमच्या घरीं जो कोणी येतो तो तुम्ही त्याच्याशीं मोठ्या प्रेमानें बोलावें, त्याच्या उपयोगी पडावें, त्याला सुख द्यावें एवढ्यासाठीं येतो. पाहुण्याचा पाहुणचार करणें हें तुमच्या हातचें नाहीं. तें तुमच्या वडील माणसांचें काम आहे. परंतु जेवढें तुमच्या हातून होईल, तेवढें करून तरी तुम्ही त्यांना संतोष दिला पाहिजे. त्याच्याशीं गोड गोड भाषण करावें, त्यानें काम सांगितलें तर तें आतुरतेनें व आनंदानें करावें. लहान मुलें, तुमच्या बरोबरीच्या वयाचीं किंवा तुमच्याहून लहान अशीं आलीं तर त्यांच्याशीं भांडूं नये. आपल्या खेळण्याच्या जिनसा असतील त्या त्यांना द्याव्या. आपल्याला कोणी कांहीं खाऊ दिला तर आधीं त्यांना त्यांतला भाग द्यावा. सारांश, आपण परक्याच्या घरीं आहों, आपल्या मायेचें येथें कोणीच नाहीं, असें त्यांना वाटूं नये. त्यांला असें भासावें, कीं आपण आपल्या घरींच आपल्या माणसांत आहों.

पुढें जीं तीन वाक्यें आहेत, त्यांचें विशेष विवेचन नकोच. कां कीं, वर सांगितलेल्या सर्व गोष्टी केल्यात, वरच्या वाक्यांतून

केलेल्या उपदेशाप्रमाणें वागलांत कीं, तुमच्या हातून दूषणीय कृत्यें कधीं घडावयाचींच नाहींत. जीं कृत्यें अगदीं सर्व लोकांना मान्य तींच तुम्हीं करावीं. विद्यार्थी हा बहुधा शिक्षकाचें अनुकरण करणारा होतो, हें पक्कें जाणून व आपल्या शिरावर केवढी थोरली जबाबदारी आहे हें पक्कें समजून आम्ही आपलें वर्तन ठेवावें व आम्ही ठेवीत आलों आहों, ठेवतों आहों आणि पुढें असेंच ठेवूंही. जें तुम्ही करूं नये असें आम्हांस वाटतें तें आमच्या हातून घडत नाहींच. परंतु त्यांतूनही त्या प्राचीन काळच्या ऋषींच्या या उपदेशांत त्यांनीं म्हटलें आहे तींच वाक्यें तुमचेपुढें ठेवून तुम्हांला असें सांगतों कीं, अमक्या चांगल्या कृत्यांचें अनुकरण करा, इतर कृत्यें असल्यास त्यांचें अनुकरण करूं नका.

ज्यांना आम्ही पूज्य मानितों, त्यांना तुम्ही पूज्य माना, त्यांचा आदर करा, इत्यादि गोष्टी आतां तुम्हांला सांगावयास पाहिजेत असें नाहीं. जे मान देण्यास योग्य, त्यांना आम्ही मान देतों हें पाहूनच तुम्ही तसें करणार. परंतु साधारणतः कधीं कोणाचाही अनादर करीत जाऊं नये. हल्लींच्या मुलांना मर्यादा नाहीं, मोठ्या माणसांचा मान ठेवण्याची संवय नाहीं, असें फार लोकांचे तोंडून हल्लीं ऐकूं येतें. इतर मुलांविषयीं तें खरें असो वा नसो, परंतु तुम्ही तरी निदान आपल्या वर्तनानें तें अगदीं खोटें आहे असें दाखवा. मोठ्या माणसांच्या सभांस कधींही जाऊं नका. कोणाच्याही भाषणास कधीं निंदादर्शक ' हुर्यो ' शब्द उच्चारूं नका, किंवा टाळ्या वाजवूं नका. तुमचें तें करणें आम्हांस अणुमात्र आवडणार नाहीं. या सुटींत ठिकठिकाणीं सभा होतात, तेथें कोठें तुमचीं तोंडें दृष्टीस पडल्यास तें आमच्या असंतोषास कारण होईल, हें पक्कें ध्यानांत ठेवा.

पुढील उपदेश कोणालाही कांहीं देण्याच्यासंबंधानें आहे. एका महान् साधूनें म्हटलें आहे, ' घेण्यापेक्षां देणें अत्यंत आनंददायक. ' त्याचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. तुमच्यांपैकीं पुष्कळांस आपल्या जवळची कांहींही जिन्नस दुसऱ्या कोणास कधींही

देऊं नये असें वाटतें. दुसऱ्याजवळची घेण्यास मात्र तुम्हाला कांहीं वाटत नाहीं. हें अगदीं वाईट, मोठ्या आप्पलपोटेपणाचें लक्षण, तें अगदीं टाकून द्यावें. आपल्याजवळ जें काय असेल नसेल, तें सारें दुसऱ्याला द्यावें असें कोणाचेंच म्हणणें नाहीं, परंतु आपल्यापाशीं काय असेल त्याचा भाग दुसऱ्यांना अवश्य द्यावा. तो देण्यांतही प्रेम, आदर, विनय हीं असूं द्यावीं. कसें तरी कंटाळून त्रासून, नाइलाज ह्मणून कांहीं तरी द्यायचें, यांत कांहीं अर्थ नाहीं. थोडेंच कां होईना, परंतु हंसून, सुखानें, समाधानानें, ज्याला द्यायचें त्याच्याशीं गोड बोलून द्यावें. त्या तसल्या देण्यापासून जो आनंद होतो, तसा कशापासूनही होत नाहीं.

अडचणीच्या वेळीं चार विचारी लोकांच्या संमतीनें जें काय करावयाचें असेल तें करावें; त्याचप्रमाणें ज्या गोष्टी संशयात्मक असतील, त्या करते वेळींही चार चौघां विचारी मंडळीच्या सल्ल्यानेंच काय तें करावें. हा उपदेशही फार महत्त्वाचा आहे. परंतु सध्यांच्या तुमच्या वयांत तुम्हांला तुमचे आईबाप सर्व कामांत सल्ला देण्याला, तुमच्या अडचणी दूर करण्याला तयार आहेत, तेव्हां सध्यां कांहीं तुम्हांला या उपदेशाप्रमाणें वागण्याचा प्रसंग नाहीं व तो मुळींच लवकर न येवो ! मीही त्याचें विवरण करण्याचे भानगडींत पडत नाहीं.

हा उपदेश तर संपला. याहून आणखी कांहींही सांगणें नाहीं. आतांपर्यंत सांगितलें आहे, त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय तुम्हीं केला व तो निश्चय कृतींत आणला, ह्मणजे मला काय किंवा कोणासही कांय, तुम्हांला कधीं अधिक उपदेश करण्याची जरूरीच पडणार नाहीं. तुम्हांला जें जें कांहीं वारंवार सांगण्यांत येतें, तें तें सर्व या लहानशा उपदेशांत उत्तम प्रकारानें आलें आहे. प्राचीनकाळीं हा उपदेश प्रत्येक विद्यार्थी पाठ करीत असे आणि हल्लींही पुष्कळ ब्राम्हण मंडळी तो पाठ ह्मणतात, परंतु अर्थ न समजतां. तो मूळ संस्कृत उपदेशही मुखपृष्ठावर साद्यंत दिला आहे. त्याचा आतां तुम्हांला अर्थ समजून दिला आहे. हीं त्या

अर्थाचीं पुस्तकेंही दिलीं आहेत, तर आपापल्या शिक्षकाकडून त्याचे उच्चार नीट शिकून घेऊन तो या सुटींत पाठ करा, आणि सुटी संपल्यावर परत आलां ह्मणजे नीट म्हणून दाखवा. नुसता ह्मणूनच दाखवूं नका, तर त्यांतील अक्षरानुअक्षर तुमच्या मनावर बिंबलें असून त्याचा परिणाम तुमच्या वर्तनांत उत्तम प्रकारें झाला आहे, असेंही दाखवा.

मुलांस थोडा उपदेश.

म्हणोनि जें जें उचित। आणि अवसरें करूनि प्राप्त॥
तें कर्म हेतुरहित। आचरें तूं॥

*   *   *   *   *

तैसा स्वधर्मरूप मख। हाचि सेव्य तुम्हा एक॥
ऐसें सत्य लोकनायक। बोलता झाला॥

ज्ञानेश्वर.

५.

मुलांनो,

आजचा तुमचा हा दिवस मोठ्या आनंदाचा. लहानपणीं काय किंवा मोठेपणींही काय, 'सुटी' 'विश्रांति' म्हटली, म्हणजे मनाला आनंद होतोच. हा अनुभव सर्वांना आहे. तेव्हां आतां आपल्याला महिना दीड महिना 'सुटी' मिळणार, हा सुखविचार पुढें उभा राहून तुमचीं मनें व त्याच्याबरोबर शरीरेंही आनंदानें नाचूं उडूं लागलीं आहेत, हें अगदीं साहजिकच आहे. आणि तुमच्या मनाची व शरीराची वृत्ति इतकी उल्हासित झालेली पाहून आमचाही आनंद दुणावला आहे. वर्ष सहा महिने श्रम करण्यासाठीं तुमच्या पाठीमागें एकसारखी तसदी लावून त्या श्रमांचें थोडेंबहुत चीज झालेलें पाहून तुम्हांला विश्रांति देण्यांत व आम्हीही घेण्यांत आम्हांला आनंद होतो तो निराळा आणि तुम्हांला आनंदित पाहून जो आम्हाला आनंद होतो तो निराळा. हे दोनही आनंद आज आम्हांला झाले आहेत, यामुळें तुम-

त्याचप्रमाणें आमच्याही मनोवृत्ति फार उल्हसित झालेल्या आहेत. आणि या अशा उल्हसित वृत्तींत आपण उभयतांही असतांना, आज चार वर्षें एक फार चांगलें काम करीत आलों, तें आतां करावयाचें आहे. तें काम कोणचें ? तर एकमेकांचा निरोप घेण्यापूर्वी आम्ही तुम्हांला चार उपदेशपर शब्द सांगणें, आणि तुम्ही ते सावधान चित्तानें ऐकून घेऊन त्याप्रमाणें वागण्यासाठीं कायावाचामनानें झटणें. चला तर आपण हें काम करूं. अत्यंत उल्हासानें चंचल झालेल्या आपल्या मनास व शरीरास एक अर्धा तास तुम्ही आवरून धरा आणि एकाग्र मन करून आम्ही काय सांगणार इकडे लक्ष द्या.

मुलांनो, आतां तुम्हांला आनंद झाला आहे. लहानापासून मोठ्यापर्यंत सर्व माणसांची तरी नेहमीं इच्छा काय असते ? आपल्याला सदोदित सुख व्हावें, आपल्या आनंदांत कधीं कमी पडूं नये हीच. या आपल्या पृथ्वीच्या पाठीवर असा एक तरी मनुष्य–किंबहुना प्राणी–सांपडेल काय, कीं त्याला सुख मिळावें, आनंद व्हावा, अशी मुळींच इच्छा नाहीं ? लहान असो, मोठा असो, ज्याला त्याला इच्छा ही कीं, आपल्याला सुख व्हावें, दुःखाचा स्पर्शसुद्धां होऊं नये. जी म्हणून आनंदाची स्थिति ती सदासर्वदा असावी, अशी ज्याला त्याला इच्छा. मनुष्यमात्राची–प्राणिमात्राची–खटपट, सततची आनंदस्थिति–सततचें सुख–मिळावें यासाठीं चाललेली असते. तुमचीही इच्छा तीच, माझीही इच्छा तीच; येथें जितकी मंडळी बसली आहे, तितक्यांची इच्छा तीच;–सर्व पृथ्वीवरल्या प्राणिमात्राची इच्छा तीच. आणि ही इच्छा तृप्त करून घेण्याकरितांच सर्व खटपटी चाललेल्या असतात. सदासर्वदा अशा खटपटींना यश येतें असें नाहीं. पण मनुष्य आपल्याकडून खटपट करीत असतो. तुम्ही शाळेंत असतांना उत्तम प्रकारानें अभ्यास करितां; कां ? तर शिक्षकांनीं चांगलें म्हटलें, आईबापांनीं चांगलें म्हटलें, आणि आपण आपलें काम केलें, म्हणजे जो मनाला आनंद होतो तो आपल्याला मिळावा म्हणून.

आम्ही आपल्याकडून होईल तितके श्रम करून शिक्षणाचे काम चांगल्या प्रकारानें बजावण्यास झटतों; कां ? तर आपण होऊन अंगावर घेतलेलें हें जबाबदारीचें काम यथामति, यथाशक्ति मन लावून केल्याच्या समाधाना-पासून होणारा आनंद, व तुमच्या मातापितरांनीं चांगलें झट-ल्याचा आनंद आह्मांला लाभावा. तुमचे आईबाप तुमच्या संवर्धनासाठीं करावे लागणारे सर्व श्रम आपल्या सुखाकडे अणु-मात्र न पाहतां करितात; कां ? तर तुमचें कल्याण करणें, तुमचें संवर्धन उत्तम प्रकारें करून तुम्हांला तुमच्या पायावर उभें राह-ण्याची ताकद आणून देणें हें जें आपलें काम, तें केल्यापासून होणारें समाधान–अर्थात् आनंद–आपल्याला मिळावा म्हणून. हीच स्थिति इतरांचीही आहे. त्यांच्या सर्व खटपटी आतां सां-गितल्याप्रमाणेंच केवळ आनंदाच्या लाभासाठींच आहेत. मुलां-नो, आतां तुमचे, आमचे व तुमच्या पालकांचे सर्व प्रयत्न आ-पापल्या मनाला आनंदाचा लाभ व्हावा एवढ्यासाठींच आहेत असें सांगितलें. यावरूनच तुम्ही विचार करा कीं, ‘ आनंदा ’चें महत्त्व किती आहे तें ! एक क्षणभर तुमचा आनंद नाहींसा करतों, असें जर कोणीं कोणाला म्हटलें, तर लागलीच कशी स्थिति होते ती पहा. तेव्हां अशी जी सर्वत्रांना सदा सर्वदा हवी अशी वस्तु ती उत्पन्न होते कशापासून ? ती आहे काय ? आणखी सदोदित आपल्या स्वाधीन ती असावी एवढ्याकरितां काय केलें पाहिजे ? याचा आपण विचार करून या तीनही प्रश्नांना अगदीं समर्पक अशीं उत्तरें मिळालीं, आणि त्या उत्त-रांचा यथायोग्य उपयोग आपण करूं लागलों, म्हणजे ही अमोल वस्तु आपणाला सततची लाभलीच म्हणून समजावी. तर मग या प्रश्नांचीं समर्पक उत्तरें शोधण्याच्या खटपटीला आप-ण लागूं या.

पहिला प्रश्न-काय ? कीं ‘ आनंद ’ उत्पन्न होतो कशापासून ? हा प्रश्न ऐकून तुम्हांला मोठें आश्चर्य वाटेल नाहीं ? आतां जर तुम्हांला एकेकाला विचारलें कीं, ‘ आनंद होतो कशापासून ? ’

नर किती तरी निरनिराळीं उत्तरें येतील. एक म्हणेल, ' शाळेंत जाण्याचा, आणखी अभ्यास करण्याचा त्रास चुकल्यापासून !" दुसरा म्हणेल, ' खाण्यापिण्याची चंगळ असून कोणी रागें भरायला नाहीं, कशाची वाण नाहीं असें असल्यापासून ! " तिसरा म्हणेल, ' जें ज्या वेळीं कांहीं करावेंसें वाटेल, तें त्या वेळीं करायला मिळाल्यापासून ! '—कोणी कांहीं सांगेल, कोणी कांहीं सांगेल. एकंदरींत एवढी गोष्ट खरी कीं, निरनिराळ्यांचीं निरनिराळीं उत्तरें येतील. सर्वांचा हेतु एकच, कीं आपल्याला आनंद मिळावा; परंतु तो आनंद कशापासून मिळेल याच्यासंबंधानें काय तो मतभेद. हा वरवर मतभेद दिसेल खरा, परंतु मुलांनो, हा खराखुरा मतभेद नव्हे बरें. आनंदाचें मूळ आहे एकच. खरा आनंद—खोटा, क्षणभर टिकून पुढें जन्मभर दुःखांत लोटणारा नामधारी आनंद नव्हे—उत्पन्न होतो तो एकाच गोष्टीपासून. ती गोष्ट कोणती ती पहा. आज जो तुम्हांला आनंद झाला आहे, हाच कशापासून उत्पन्न झाला आहे तें पहा, म्हणजे तुम्हांलाच ती गोष्ट कोणची तें समजेल. आतां तुम्ही सगळेजण उत्तर द्याल कीं, आजचा आमचा आनंद आम्हांला महिना दीड महिना सुटी मिळणार आणि रगड खेळायला सांपडणार, या विचारापासून उत्पन्न झाला आहे. गोष्ट खरी आहे. तुह्मांला आतां सुटी मिळणार, विश्रांति मिळणार म्हणून आनंद झाला आहे, पण विचार करा कीं, ' सुटी ' ' विश्रांति ' या शब्दाच्या पूर्वी काय ? जेव्हां सहा महिने ' काम ' केलेंत तेव्हां आतां सुटी. गेल्या सहामाहींत योग्य तऱ्हेनें ' श्रम ' केलेत म्हणून आतां विश्रांति. या भावी विश्रांतीपासून " खरा खरा आनंद " कोणाला आहे ? ज्यांनीं आजपर्यंत खरे खरे श्रम केले, आणि ही विश्रांति मिळावी अशी योग्यता अंगीं आणली, त्यांना. ज्यानें कांहीं श्रम केले नाहींत, ज्यानें आपले अभ्यास योग्य तऱ्हेनें केले नाहींत, परीक्षेंत ज्याचा निकाल अगदीं वाईट झाला असेल, त्याला आतां या घटकेला जरी आनंद झाला असला, तरी तो खोटा, आणि अगदीं अल्प काळपर्यंत टिकणारा, सर्व सुटी-

भर टिकणारा नव्हे. उद्यां गेल्या सहामाहीच्या परीक्षेचा निकाल पालकांकडे गेला, म्हणजे ज्यांनीं अभ्यासांत कसर केली असेल, त्यांचे पालक त्यांस रागें भरणार, नांवें ठेवणार, ते खेळूं लागले कीं, अभ्यास करण्याविषयीं टोंचणी लावणार–अर्थातच त्या सगळ्या आनंदाचा विरस होणार. कारण काय? तर आनंद ह्मणजे आपण जें कर्तव्य करावयाचें, जें आपण करावें अशी आपल्या शिक्षकांची व पालकांची इच्छा, आणि जें आपल्या भावी आयुष्यक्रमांतल्या सतत सुखाला आदिकारण, तें केल्याबद्दलचें समाधान. आपण करावयाचें तें केलें नाहीं, भलतेंच केलें, असा विचार वारंवार वारंवार मनांत येऊन आपलें मन आपल्याला खाऊं लागलें म्हणजे मग काय राहिलें? मग आनंद कसला? मनाची शांति आणि समाधान तोच आनंद. आनंद कांहीं दुसरा आहे? शिक्षकांनीं व मातापितरांनीं अमुक गोष्ट करण्याला सांगितली, अमुक गोष्ट नेहमीं अमुक वेळीं अमुक प्रकारानें करावी अशी त्यांची आज्ञा, ती आज्ञा आपण अगदीं यथासांग बजाविली, आतां आपणांस ते चार चांगले शब्द बोलतील, आणि आपल्याला खेळण्याला मोकळें सोडतील किंवा आपल्याला अमुक एक जिन्नस देतील, या विचारांनीं जो आनंद होतो, तोच आनंद खरा; इतर सर्व आनंद खोटे व क्षणिक, हें तुमच्या मनालाच विचारून बघा, म्हणजे चांगलें प्रत्ययाला येईल. सारांश काय कीं, आतां विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचें समर्पक उत्तर हें कीं, ‘ आनंद ’ हा ज्यानें त्यानें आपलें कर्तव्य योग्य काळीं योग्य तऱ्हेनें बजावल्यानें उत्पन्न होतो. हें पहिल्या प्रश्नाचें उत्तर निघालें. तेव्हां आतां दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर काढण्यास फारसे श्रम पडणार नाहींत. कारण, तें पहिल्या प्रश्नाच्या उत्तरांतच अंतर्गत आहे. आणि तें एकवार मघांशीं सांगितलें गेलेंही आहे. दुसरा प्रश्न काय? तर “ आनंद ही वस्तु आहे काय? ” मुलांनो, आनंद म्हणजे “ आपलें काम आपण योग्य वेळीं योग्य तऱ्हेनें केलें म्हणजे होणारें समाधान. ” हें समाधान तुमच्या मनांत आज असलें, तरच तुम्हांला आनंद

झाला असें म्हणतां येईल. ' अरेरे, आपण अमक्या विषयाचा नीट अभ्यास केला नाहीं, त्यामुळें त्या विषयांत आपण गेल्या परीक्षेंत नापास झालों, आतां घरीं निकालाचें छापील कार्ड आलें म्हणजे वडील रागें भरतील, ' अशी रुखरुख ज्यांच्या ज्यांच्या मनाला या वेळीं लागून राहिली असेल, त्यांना आनंद आहे कुठें ? ज्यांच्या मनाला तळमळ त्यांना शांति कसली ? समाधान कसलें ? आणि आनंद कसला ? खरा आनंद त्यांनाच कीं, ज्यांना कोणत्याही प्रकारची रुखरुख नाहीं. आपण जसें वागावें, जसा अभ्यास करावा, अशी आपल्या वडिलांची व आपल्या शिक्षकांची इच्छा, त्याप्रमाणें आपण खरोखर मनापासून वागलों, आणि त्याचें चीजही झालें, अशी ज्यांच्या मनाची खात्री असेल, परीक्षेच्या निकालाचें कार्ड घरीं जाईल केव्हां आणि आपल्या वडिलांच्या नजरेस तें पडून आपण त्यांच्या तोंडचे चांगले शब्द ऐकूं केव्हां, अशी उत्सुकता ज्यांना ज्यांना या वेळीं वाटत असेल, त्यांना त्यांना खरा आनंद आहे. आपण ज्या तीन प्रश्नांचीं उत्तरें काढण्याचें काम हातीं घेतलें होतें, त्यांतल्या दोहोंचीं उत्तरें दिलीं. तेव्हां आतां तिसऱ्या प्रश्नाकडे वळूं या. हा प्रश्न सगळ्यांत अधिक महत्त्वाचा आहे. तो कोणचा ? तर हा ' आनंद ' आपल्यास सदासर्वदा कसा प्राप्त होईल ? आज आहे तसाच उद्यां, तसाच परवां, तसाच एक वर्षानें आणि दहा वर्षांनीं कसा राहील ? बाळपणांत आहे, तोच तरुणपणीं, आणि तोच वृद्धपणीं राहील असें कसें करतां येईल ? मुलांनो, हा आनंद कशापासून उत्पन्न होतो, आणि हा काय आहे, याचे गुणधर्म काय आहेत, हें ज्याला कळलें, त्याला या तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर देणें कांहीं अवघड नाहीं. ज्या गोष्टींपासून तो आनंद उत्पन्न होतो, त्या गोष्टी आपल्या ताब्यांत ठेवल्या, त्या गोष्टी आपण आपल्याशा केल्या, म्हणजे आनंद हा व्हायचाच, हें पक्कें लक्षांत धरलें पाहिजे. सूर्य उगवला, कीं प्रकाश पडायचाच, ही गोष्ट जशी सदा सत्य आहे, त्याचप्रमाणें हीही गोष्ट सदा सत्य आहे कीं, आपल्या कर्तव्याला आपण जागून तें योग्य तऱ्हेनें बजावलें, कीं

त्यापासून होणाऱ्या समाधानाचा, अर्थात् आनंदाचा लाभ हा व्हावयाचाच. तो दूर लोटला तरी तो तुमच्याजवळ पुनः येणारच. कधीं नष्ट होणार नाहीं. सृष्टीचे जे कित्येक अपरिहार्य नियम आहेत, त्यांपैकींच हा एक नियम आहे असें झटलें तरी चालेल. हें जर खरें आहे तर त्या आनंदाच्या सदैव लाभासाठीं काय केलें पाहिजे, याचें उत्तर शोधायला लांब जायलाच नको. बाळपणीं काय, तरुणपणीं काय, किंवा वृद्धपणीं काय, जें जें म्हणून कांहीं आपलें कर्तव्य असेल, तें तें यथाकालीं, यथायोग्य करीत गेलें कीं, ‘ नित्य ’ असा जो ‘ आनंद ’ तो आपल्याला लाभलाच म्हणून समजावें. आपण आपलें काम केलें असें मनाला पक्कें वाटलें, आपलें मन आपल्याला खाण्यास जागा राहिली नाहीं, म्हणजे पूर्ण समाधानवृत्ति झालीच, आणि अशी समाधानवृत्ति झाली, म्हणजे आनंदाला काय पारावार !

तेव्हां, ज्या तऱ्हेचा आनंद आज तुम्हांला झाला आहे—तुम्हांला झाला आहे हा खरा आनंद आहे असें मी धरून चालतों आहें—हा आनंद जर आपल्याला सदोदित मिळावा, कधींही आपण त्याला मुकूं नये, असें खरोखर तुम्हांला वाटत असेल, तर, मुलांनो, आपलें कर्तव्य यथायोग्य तऱ्हेनें बजावा, एवढेंच तुम्हांला सांगणें आहे. त्यांत जर चुकलांत, तर त्या आनंदाला मुकलांत. मग तो तुम्हांला कोणच्या म्हणतां कोणच्याही दुसऱ्या उपायांनीं मिळणार नाहीं. त्याबद्दल अणुमात्र शंका बाळगूं नका. तेथें दया माया कांहीं नाहीं. अतिशय समतोल असा कांटा तो आहे. एवढें तेवढेंसुद्धां अधिक अगर कमी वजन त्याला सहन व्हायचें नाहीं. एक रतिभर कर्तव्य केलेंत, तर रतिभरच समाधान आणि आनंद मिळणार. अधिक कधीं मिळणार नाहीं. ही स्थिति लहानापासून थोरापर्यंत सर्वांची आहे. मनुष्य मोठा असला म्हणून त्यानें आपलें कर्तव्य केलें नाहीं, तरी त्याला समाधान मिळून आनंद होईल, असा प्रकार मुळींच नाहीं. पण मोठ्या माणसाविषयीं तुम्हांला सांगून काय करावयाचें आहे ? तुम्हांला सांगायाचें, तें तुमच्या स्वतःविषयीं. कारण, मोठ्या माणसापेक्षां आज तुमच्या-

वर मोठी जबाबदारी आहे. तुह्मांला अजून मोठें व्हावयाचें आहे. मोठेपणीं हें समाधान मिळविनां येण्याची ताकद अंगांत येण्याला आजपासून तुम्ही चिंता करीत गेलें पाहिजे. ज्याप्रमाणें विद्याभ्यासाची गोष्ट आहे, त्याचप्रमाणें कर्तव्यापासून न चळण्याच्या अभ्यासाची गोष्ट आहे. विद्याभ्यास लहानपणीं यथायोग्य झाला, तरच तो पुढेंही चालवितां येतो. लहानपणीं अभ्यास मुळींच केला नाहीं आणि पुढें त्याच्यासाठीं हजारों खटाटोपी केल्या, तरी कांहीं होत नाहीं. त्याचप्रमाणें लहानपणीं आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष्य करण्याची अत्यंत अनिष्ट संवय अंगीं जडली आणि मोठेपणीं ती टाकण्यासाठीं धडपड सुरू झाली. तर त्या धडपडीला यश येण्यास फार मोठी मारामार पडते. एवढ्याकरितां सांगतों कीं, जे काय कल्याणकारक गुण तुम्हांला निरंतर उपयोगी पडणार, ते आज आपल्या अंगीं आणाल तर होणार आहे.

मुलांनो, आतांपर्यंत तुम्हांला सांगितलें कीं, " आपण आपलें कर्तव्य केलें " असें मनाला खात्रीनें वाटून जें समाधान होतें, तोच आनंद, आणि हा आनंद सदैव आपल्याला लाभावा अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें सर्वदा आपलें कर्तव्य कोणचें तें मनांत आणून तें योग्य तऱ्हेनें बजावीत जावें. इतकें तुमच्या लक्ष्यांत आल्यावर पुढें तुम्हांला सांगावयाचें तें हें कीं, " तुमचीं कर्तव्यें " कोणतीं? मुलांनो, साधारणतः विचार केला, तर तुम्हांला असें दिसून येईल कीं, मनुष्यमात्राला तीन प्रकारचीं कर्तव्यें असतात. १ स्वतःसंबंधीं कर्तव्यें; २ कुटुंबासंबंधीं कर्तव्यें; व ३ लोकांसंबंधीं कर्तव्यें. आपण उत्तम प्रकारें जगलें पाहिजे, आपल्या स्वतःचें योग्य तऱ्हेनें पोषण केलें पाहिजे, इत्यादि गोष्टी स्वतःसंबंधींच्या कर्तव्यांत येतात. आपण ज्यांच्यावर अवलंबून आहोंत, ज्यांनीं आपल्याला वाढविलें वर्तविलें, जे आपल्या सुखशांतीला कारण, असे जे आपले आईबाप, भाऊबहिणी, बायकामुलें, त्यांच्या सुखासाठीं व आनंदासाठीं ज्या कित्येक गोष्टी आपण अवश्य केल्या पाहिजेत, त्या गोष्टी कुटुंबसंबंधीं कर्तव्यांत येतात. आणि ज्या लोकांत आपण राहतों, व ज्यांच्या

श्रमांवर आपल्या अनेक गरजा भागतात, व आपणाला एक-ट्याला किंवा आपल्या सगळ्या कुटुंबांतल्या माणसांनाही ज्या गोष्टी करणें अगर मिळणें अशक्य, त्या गोष्टी ज्यांच्या साह्यानें आपणास लाभतात, असा जो इतर लोकांचा समाज, त्यांच्या संबंधानें ज्या गोष्टी करणें आपणास भाग आहे, त्या गोष्टी लोकां-संबंधीं कर्तव्यांत येतात. हीं तीनहीं कर्तव्यें ज्याच्याकडून यथाकालीं यथायोग्य तऱ्हेनें होतील, त्यालाच तो नित्य आनंद लाभणार. इत-रांना लाभणें शक्यच नाहीं. आणि हीं कर्तव्यें आपल्या हातून यथायोग्य बजावलीं जावीं व आपल्याला तो नित्य आनंद प्राप्त व्हावा असें तुम्हांला वाटत असेल, तर आतां या वयापासून त्या प्रयत्नाला लागा. पुढें करूं म्हणाल, तर कधींही पूर्ण यश येणार नाहीं, ही गोष्ट पक्की लक्ष्यांत ठेवा. जीं आतां तुम्हांला मीं तीन प्रकारचीं कर्तव्यें सांगितलीं, तीं एकवटलीं म्हणजे उत्तम मनुष्याच्या आयुष्यक्रमांतलीं सर्व कर्तव्यें त्यांत आलीं. त्या कर्तव्यांच्या बाहेर कर्तव्यें राहिलींच नाहींत. हीं तीन प्रका-रचीं कर्तव्यें ज्याच्या हातून आपल्या आयुष्यक्रमांत उत्तम प्रका-रानें पार पडलीं त्यानें खराखरा पुरुषार्थ मिळविला. महान् साधु पुरुष ज्ञानेश्वर यांनीं काय म्हटलें आहे, पहा.—

म्हणोनि जें जें उचित। आणि अवसरेंकरूनि प्राप्त॥
तें कर्म हेतुविरहित। आचरें तूं॥

ज्याला त्याला त्यांचा उपदेश हाच कीं, बाबारे, जें जें ज्या ज्या काळीं उचित, तें कोणचाही हेतु मनांत न धरतां आपलें कर्तव्य म्हणून कर. जो आपला धर्म, जें आपलें कर्म, जें आपलें कर्तव्य, तें कधींही कोणच्याही सबबीनें टाळतां कामा नये.

तैसा स्वधर्मरूप मख। हाचि सेव्य तुम्हां एक॥
ऐसें सत्यलोकनायक। बोलता जाहला।
देखा स्वधर्मातें भजाल। तरी कामधेनु हा होईल॥
मग प्रजा हो न संडिल। तुमचें कदा।

ज्ञानेश्वरमहाराजांचें ह्मणणें कीं, बाबांनो, आपलें कर्तव्य यथोचित प्रकारानें बजावणें हाच मोठा थोरला यज्ञ. तुम्ही जो सदासर्वदा करायला पाहिजे, तो हाच यज्ञ. हा स्वधर्म-स्वकर्तव्यरूपयज्ञ तुम्हीं केलात, म्हणजे तुमच्या हातीं एक कामधेनुच सांपडली. तिच्यापासून मग तुम्हांला जें जें काय पाहिजे असेल, तें तें सर्व प्राप्त होणार आहे. सर्व आनंदाचें आदिस्थानच मग तुमच्या हातीं सांपडलें. हीं कर्तव्यें किती प्रकारचीं आहेत, हें मीं थोडया वेळापूर्वीं तुम्हांला सांगितलेंच. आतां त्यांचा थोडक्यांत पृथक् पृथक् विचार करूं. कर्तव्यांचा पहिला प्रकार स्वतःसंबंधीं कर्तव्यें हा होय. मुलांनो, एवढें पक्कें लक्ष्यांत धरा कीं, हीं पहिल्या प्रकारचीं कर्तव्यें जितक्या उत्तम रीतीनें तुम्ही बजावाल, तितक्या मानानें बाकीचीं दोन प्रकारचीं कर्तव्यें तुमच्या हातून बजाविलीं जाणार आहेत. एवढ्याकरितां मी मुख्यतः आज तुम्हांला या पहिल्या प्रकारच्या कर्तव्यांविषयीं व तीं आपल्या हातून उत्तम प्रकारानें पार पाडण्यास काय काय साधनें अवश्य आहेत त्यांविषयीं सांगणार आहें. कां कीं, तुम्ही आपल्या स्वतःच्या संबंधाचीं कर्तव्यें जर चांगल्या तऱ्हेनें बजावाल, आणि आपल्या ठिकाणीं शारीरिक, मानसिक वगैरे शक्तींचा उत्कृष्ठ सांठा करून ठेवाल, तरच तुमचे हातून कुटुंबसंबंधीं कर्तव्यें आणि लोकांसंबंधीं कर्तव्यें होतील. तुमच्या स्वतःजवळ स्वतःच्या रक्षणापुरतेंही शरीरबल किंवा बुद्धिबल नसलें, तर तुमच्या हातून तीं दुसरीं कर्तव्यें पार पडणार कशीं ? बाबांनो, तुम्ही स्वतःचें पोट भरण्याइतकी शारीरिक व मानसिक शक्ति अंगांत आणाल, तेव्हां कुटुंबाच्या पोषणाचा भार सहन कराल, आणि मग जगांतल्या इतर लोकांना साहाय्य करण्याला धांवाल. एवढ्याकरितां स्वतःच्या संबंधाचीं कर्तव्यें तीं आधीं केलीं पाहिजेत, अर्थात् जीं कांहीं तीन प्रकारचीं कर्तव्यें तुम्हांला सांगितलीं, त्या सर्वांच्या मुळांशींच शारीरिक व मानसिक बल जमविणें हीच गोष्ट होय. स्वतःचें पोषण करण्यास, कुटुंबाचा भार वाहण्यास तयार होण्यास व परोपकारांत खर्च करण्यास शारीरिक व मानसिक शक्तीची कांहीं

तरी—नव्हे चांगलीच—पुंजी पाहिजे. ही पुंजी जर नसली, आणि आपलीं कर्तव्यें करण्याचा व्यापार आपण सुरू केला, तर लवकरच आपलें दिवाळें वाजणार ह्मणून समजावें. आणि असें दिवाळें एकदां वाजलें, म्हणजे मग सगळ्याच गोष्टींची इतिश्री झाली ! असें दिवाळें वाजूं नये, आपल्या व्यापारांत आपल्याला चांगलें यश यावें, म्हणून दूरदर्शी व्यापारी आधींच चांगली पुंजी करतो. त्याप्रमाणें आपण केलें पाहिजे. शारीरिक आणि मानसिक दोनही बळांची पुंजी केली पाहिजे. अशी पुंजी करणें तुम्हांला या वयांत जितकें सोपें जाईल, तितकें सोपें दुसरें कोणच्याही वयांत जाणार नाहीं. किंबहुना मी म्हणतों कीं, प्रौढ वयांत असली पुंजी करणें केवळ दुःसाध्यच होय. ती या तुमच्या वयांतच केली पाहिजे. ज्या दोन प्रकारच्या शक्तींची पुंजी अवश्य केली पाहिजे, ते दोन प्रकारही आतां मीं तुम्हांला सांगितलेच. हे दोन प्रकार असे:—शरीरशक्ति व मनःशक्ति. एक असली आणि दुसरी नसली तरी कधीं चालणार नाहीं. दोनही शक्ति अगदीं भरपूर पाहिजेत, तरच वर सांगितलेलीं तीनही प्रकारचीं कर्तव्यें यथासांग हातून घडतील. प्रथमतः आतां आपण शरीरशक्तीचा विचार करूं. कारण, माझ्या दृष्टीनें तीच अधिक महत्त्वाची आहे. ज्याच्याजवळ बुद्धिबल मात्र रगड आहे, पण शरीरबल अगदीं शून्य, तो कांहींसुद्धां करण्याला समर्थ नसतो. तेंच ज्याच्याजवळ शरीरबळ मुबलक आहे, पण जो ठोंब्या आहे, तो चार हेलाच्या पाट्या तरी वाहून स्वतःच्या संबंधाचें एक कर्तव्य जें उदरपोषण तें तरी करून जगांत दिवस काढील. दुसरें असें कीं, जरत्कारू शरीरांत बहुतकरून सुदृढ मन राहूं शकतच नाहीं. सुदृढ शरीराला सुदृढ मनाची तादृश आवश्यकता नाहीं, पण मन खरोखर सुदृढ होण्याला सुदृढ शरीराची जरूर फार असते. एवढ्याकरितां मुख्यतः या वयांत तुम्हीं लक्ष्य दिलें पाहिजे तें शरीरबल वाढविण्याकडे. महाकवि कालिदासांनीं आपल्या एका सुप्रसिद्ध काव्यांत म्हटलें आहे कीं,

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

जीं जीं कांहीं कर्तव्यें करावयाचीं असतील, जें जें कांहीं धर्माचरण करावयाचें असेल, तें तें सगळें पार पाडण्यास शरीर हें मुख्य पहिलें साधन होय. हें साधन ज्याच्या हातीं नाहीं तो दुबळा करणार काय ? जो शरीरानें दुबळा तो सर्व प्रकारांनीं दुबळाच म्हणावा. असला दुबळेपणा मुळींच इष्ट नाहीं. करितां तुम्हीं आपलें लक्ष्य चांगल्या प्रकारानें आपली शरीरप्रकृति सुधारण्याकडे पुरवा. शाळेंत तुमचे सहा तास जातात, त्यांत तुमच्या मनाचें व बुद्धीचें बळ वाढविण्यासाठीं जितके कांहीं परिश्रम आमच्याकडून होतील, तेवढे आम्ही करीतच आहों; व तुमच्याकडूनही निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासादिकांनीं जितके श्रम करवावयाचे, तितके करवीत आहों, आणि जसजशी आवश्यकता अधिक उणी होईल, जसजशा नवीन कल्पना सुचत जातील, तसतशा त्या अमलांत आणून, तुमच्याकडून अगदीं थोडे मानसिक श्रम करवून तुमचें बुद्धिबळ व ज्ञानबळ जितकें वाढवितां येईल तितकें वाढविण्याविषयीं आमचा उद्योग अगदीं कायम राहीलच. तुमचें शरीरबळ वाढविण्यासाठींही आम्ही आपल्याकडून जितके योग्य उपाय तितके करीत आहों आणि जितकीं अवश्य साधनें तितकीं सर्व तुम्हांला सहज मिळतील असेंही करीत आहों. पण मुलांनो, या शरीरबलाच्या वर्धनासंबंधानें अशी स्थिति आहे कीं, त्याची तुमची तुम्हांलाच गोडी लागली पाहिजे. एखादा धडा तुम्हीं घरीं केला नाहीं, तर तो येथें तुमच्याकडून वाचवून किंवा तुमच्या देखत दुसऱ्याकडून वाचवून अगर त्याची चांगल्या तऱ्हेनें फोड करून तुमच्याकडून तयार करवितां येईल, व तुमच्या मनांत भरवून तुमचें ज्ञान वाढवितां येईल; पण शरीरबळाच्या वर्धनासाठीं जो काय अभ्यास करावयाचा, हा तुमचा तुह्मींच हौसेनें केला पाहिजे. त्यांत आमचा किंवा तालीममास्तरांचा तादृश उपयोग होणारा नव्हे. आमचा उपयोग एवढाच कीं, तुमच्या मनाचें रंजन होऊन तुमच्या शरीरबळाच्या वर्धनासाठीं नानाप्रकारचा व्यायाम

देणारे खेळ खेळण्यासाठीं त्या खेळांचीं बाह्य साधनें तुम्हांला द्यावीं. तालीममास्तरांचा उपयोग एवढाच होईल कीं, ते तुम्हांला नानातऱ्हांच्या खेळांचें व पकडांचें स्वारस्य सांगून तुमच्या मनांत हौस उत्पन्न करण्यास ते झटतील व तुमच्या अंगीं कळाकुशळाई आणतील. त्यासंबंधाचा जो कांहीं अभ्यास, जो कांहीं व्यायाम, तो तुमचा तुम्हींच केला पाहिजे. जी कांहीं चढाओढ, जी कांहीं चतुराई ती पाहून पाहून तुमची तुम्हींच मिळविली पाहिजे. तुमच्या तुमच्या मनांत त्यासंबंधाची हौस उत्पन्न झाली पाहिजे. मुलांनो, शरीरबल यथास्थित असणें ही लहानसान गोष्ट नव्हे हें पक्कें ध्यानांत धरा. शरीरबल उत्तम प्रकारचें असणें हें सर्व आनंदाच्या लाभाकरितां चालणाऱ्या खटपटींत यश मिळण्याला अगदीं आद्य साधन होय. तें मिळविण्याकरितां तुम्हीं अत्यंत मनापासून झटलें पाहिजे. दुबळ्या शरीरांत सगळेंच कुचकें असावयाचें, कधीं त्यांत आरोग्य रहावयाचें नाहीं. कधीं खाल्लेलें पचायचें नाहीं. अंमळ वाऱ्याची झुळूक जोरानें वाहूं लागली कीं, चढव कानटोपी आणि गुंडाळ गळपट्टा असें व्हायचें. अंमळ उन्हाची तिरीप लागली कीं, लागलें डोकें भणभणायला. आणि अशी ज्या शरीराची स्थिति, त्या शरीरांतलें मन चांगल्या कामाकडे थोडेंच लागलेलें असायचें ? सदासर्वदा, मला खोकला झाला काय, माझें डोकें दुखतें काय, माझ्या पोटांत मुरडतें काय, असल्या कुकल्पनांतच अर्धा वेळ जातो ! आणि उरलेला अर्धा त्या खोकल्याला, त्या डोकें दुखण्याला, त्या मुरडण्याला औषधें काय घ्यावीं याच्या विचारांत अगर वैद्यडाक्टरांच्या घरीं खेटे घालण्यांत जातो ! असलें दुबळें मन ज्याला नको असेल, त्यानें पहिल्यापासूनच आपलें शरीर दुबळें न राहूं देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि शरीर दुबळें राहूं नये असा प्रयत्न करावयाचा म्हटला म्हणजे निदान दोन तीन तास तरी रोज ज्यांत नानाप्रकारचे श्रम करावे लागतात असले खेळ खेळण्यांत, ज्यापासून कधीं कोणाला उपद्रव व्हावयाचा नाहीं अशी दंगामस्ती करण्यांत, प्रत्येक मुलानें घालविले पाहि-

जेत असें मला वाटतें. खेळ खेळावयाचे ते कधीं बैठे घरकोंबडे-पणाचे असूं नयेत. ज्यांत पायांना, हातांना वगैरे चांगला व्यायाम घडेल असले खेळ खेळावेत. कुठें, पत्ते, बिझिक, गंजिफा हे असले खेळ मनोरंजनाला चांगले असतील, पण शरीरबल अधिक करण्याला त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. या वयांत जे खेळ तुम्ही खेळायचे, ते असे पाहिजेत कीं, ज्यांत तुमचे हात-पाय वगैरे सर्व अवयवांना चांगला व्यायाम होईल, आणि त्या-योगानें तुम्हांला चांगली भूक लागून तुमचा आहार चांगला होईल, व आंथरुणाला पाठ लागतांच सहा सात तास चांगली गाढ झोंप लागेल व सकाळच्या प्रहरीं उठलांत कीं अगदीं ताजे-पणा वाटून अभ्यासाकडे दोनदोन तीनतीन तास एकाग्र चित्त लागेल. इथें सध्यां तुम्हांला असल्या खेळांच्या साधनांची कांहीं कमतरता नाहीं. परवां नुकताच जो शरीरशिक्षणांत उत्तम बनलेल्या विद्यार्थ्यांस बक्षिसें देण्याचा समारंभ झाला, त्या वेळीं तुम्हांला दिसलेंच कीं, तुम्ही जर इच्छा धराल तर हवे ते खेळ खेळण्यास व हवी तशी कसरत शिकण्यास तुमच्या या व्यायामशाळेंत सर्व साधनें आहेत. या साधनांचा तुम्ही अवश्य उपयोग करून घ्या. अशीं साधनें असून त्यांच्याकडे दुर्लक्ष्य क-रून आपलीं शरीरें जरत्कारू बनवूं नका. शरीरें जरत्कारू बन-लीं कीं तुमचीं मनें तसलींच किचकट बनतील. ज्यांचीं शरीरें किचकट त्यांचीं मनेंही त्याच मासल्याचीं होतात. मग त्यांच्या हातून महत्कृत्येंही होणें शक्य नाहीं; आणि त्यांच्या मनांत माठमोठाले उदात्त विचार व उदात्त इच्छाही उद्भवण्याची मारा-मार पडणार. तुम्ही भावीकाळचे मोठे लोक. तुमच्या हातून आपल्या देशाचें पाऊल कांहीं तरी पुढें पडणार आणि तुमचीं मुलें पुढें तुमचाच कित्ता गिरविणार, हें सर्व ध्यानांत घ्या. तुमच्यावर केवढी जबाबदारी आहे हें लक्ष्यांत धरा. आणि सर्व कर्तव्यांचें, सर्व महत्कृत्यांचें, सर्व धर्माचारांचें, सर्व पौरुषाचें आद्य साधन जें ' शरीर ' तें सुदृढ करण्याकरितां झटा. या संबं-धानें मी इतकें पुनः पुनः सांगतों याचें कारण असें कीं, तुम-

त्यापैकीं बहुतेकांचें तुमच्या शिक्षणाच्या या भागाकडे दुर्लक्ष्य असतें. आणि असें कां म्हणून विचारलें, तर तुम्ही असें उत्तर देतां कीं, " आमचे वडील खेळायला जाऊं नको म्हणतात. " पण तुमचे वडील तुम्हांला नको म्हणत असतील, तर ते तसें कां म्हणतात याचा विचार नाहीं तुम्ही करीत ? तुमचीं शरीरें सुदृढ असावीत, तुम्ही निरोगी असावें, कणखरपणाचीं कामें करण्यास तुमच्या अंगांत ताकद असावी, असें त्यांस वाटत नाहीं काय ? पण त्यांना असें भय वाटतें कीं, तुम्ही एकदां या तालमीच्या आणि खेळाच्या नादीं लागलांत तर अभ्यासाकडलें तुमचें लक्ष्य कमी होईल, आणि जें केवळ साधन त्याला महत्त्व जास्त येऊन, जें त्या साधनाच्या द्वारानें साधावयाचें, तें दूरच राहील. ही त्यांची भीति दूर करण्याचें काम तुमच्या हातांतलें आहे. खेळांत व तालमींत योग्य तितका वेळ घालवून आपल्या अभ्यासांत मुळींही कमीपणा येणार नाहीं, असें त्यांच्या नजरेला आणा, म्हणजे तुमची वडील मंडळी तुम्हांला कधींसुद्धां शरीर सुदृढ करण्यास झटूं नका असें म्हणणार नाहींत. सुदृढ शरीर हें एक मोठें साधन आहे—या साधनाच्या योगानें पुष्कळ आयुष्य, मनाची सुदृढता, पुष्कळ श्रम करण्याची ताकद इत्यादि अनेक गोष्टींचा लाभ होतो. आणि या गोष्टींचा लाभ झाला, म्हणजे आधीं सांगितलेलीं तीनही प्रकारचीं कर्तव्यें मनुष्याच्या हातून सहजीं घडतात. आतां सांगितलेली सामग्री असली म्हणजे मग आपलें स्वतःचें पोषण, आपल्या कुटुंबपरिवाराचें पोषण, आणि आपल्या देशांतील लोकांच्या साहाय्यार्थ व आपल्या देशाचें पाऊल पुढें पडावें एवढ्याकरितां करावे लागणारे प्रयत्न हीं सर्व कांहीं सहजगत्या आपणांस करतां येतात. आणि अशी ती कर्तव्यत्रयी आपल्या हातून घडली, म्हणजे प्रारंभींच सांगितलेला जो आनंद—नित्य आनंद—ज्याच्या प्राप्तीसाठीं मनुष्यमात्राचा यत्न चाललेला असतो—तो आपल्यास प्राप्त होतो.

मुलांनो, सध्यांच्या या तुमच्या वयांत तुम्हांस करावयाचीं तीं कर्तव्यें दोनच प्रकारचीं. एक स्वतःसंबंधाचीं आणि दुसरीं कुटुं-

बासंबंधाचीं. तुमचीं स्वतःसंबंधाचीं कर्तव्यें म्हटलीं म्हणजे कांहीं आज शरीरपोषणाची खटपट नव्हे, तर योग्य तऱ्हेनें व्यायामादि करून व कोणत्याही बाबतींत आचरटपणा न करितां मितपणानें राहून आपलें आरोग्य राखावयाचें, शरीर बळ वाढवावयाचें आणि विद्याभ्यासांत कसूर करावयाची नाहीं. कुटुंबसंबंधीं कर्तव्य म्हटलें म्हणजे मातापितरें व वडीलधारीं माणसें सांगतील त्या प्रकारें वागून, आपल्या आज्ञाधारकपणानें व सुशील स्वभावानें त्यांस सदैव आनंदांत ठेवावयाचें. कांहीं काळपर्यंत या कर्तव्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही कर्तव्यांचा तुमच्यावर बोजा नाहीं. अशी स्थिति जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत तुम्हीं कायावाचामनानें झटून **शारीरबलाची**, **बुद्धिबलाची**, आणि **ज्ञानबलाची** पुंजी करून ठेवा. तुम्ही मोठे झालांत आणि मोठमोठ्या जबाबदारीचीं कर्तव्यें तुमच्या अंगावर पडलीं म्हणजे मग या तीनही प्रकारच्या **बलाच्या** पुंजींत भर घालण्याला फारशी फुरसत सांपडणार नाहीं. विद्यार्थी अवस्थेंत जी काय पुंजी कराल, तींतून खर्च मात्र फार करावा लागेल, हें सर्व ध्यानांत धरून आतांच जंगी सांठवण करा, अशी कीं पुढें कितीही खर्चाचा बोजा आला, तरी दिक्कत वाटायला नको. आणि असें सांठवण करण्याची अत्यंत इष्ट संवय आज तुम्हांला लागली, म्हणजे पुढें त्या मोठ्या वयांतही अवकाश सांपडला, कीं तुम्हीं आपल्या सांठ्यांत भर घालण्यासाठीं झटाल. तीच संवय जर आतां लावून घेतली नाहींत, तर मग पुढें काय प्रसंग ओढवेल हें एकदां आतां सांगितलेंच आहे. तो प्रसंग टाळा. शरीरबल वाढवा, बुद्धिबल वाढवा, ज्ञानबल वाढवा, आम्हांला यश द्या, आईबापांना आनंद द्या, आणि स्वतःसंबंधीं, कुटुंबासंबंधीं व देशासंबंधीं जीं काय म्हणून कर्तव्यें, तीं सर्व तुमच्या हातून उत्तम प्रकारें पार पडतील अशी जी काय आमची व सर्वांची आज आशा आहे, ती पूर्ण होण्याचीं चिन्हें तुमच्या शरीरांत, मनांत व वर्तनांत दिसूं द्या.

मुलांस थोडा उपदेश.

आपण आपलें कर्तव्य करावयाचें तें बऱ्या प्रकारें करतों, एवढेंच म्हणून कोणी-ही समाधान मानून स्वस्थ बसूं नये; तर प्रत्येकानें आपलें कर्तव्य करावयाचें तें आपल्या हातून जितक्या उत्तम प्रकारानें व योग्य तऱ्हेनें होईल तितकें तें करीत असावें.

ADDISON.

६.

मुलांनो,

आज तीन वर्षें झालीं, असा आनंदाचा दिवस आपल्याला दिसला नाहीं; परंतु तीं वर्षें कोणच्या भयंकर स्थितींत गेलीं, याचा विचार केला म्हणजे त्याच्याबद्दल वाईट वाटण्याबरोबरच आपण सर्व त्यांतून पार पडून पुनः हा आनंदाचा दिवस साजरा करण्याला जगलों याच्याबद्दल आनंदही होतोच. दुःख भोगल्यानंतर जो सुखाचा काळ येतो, तो विशेषच आनंदकारक असतो. उन्हाच्या तापानें त्रासून जाऊन ' कोठें तरी सावली मिळेल का, मिळेल का ' असें करीत असलेल्यास एकदम एखादें दाटपालवाचें आंब्याचें अगर दुसरें तसेंच पुष्कळ छायेचें झाड दृष्टीस पडलें म्हणजे जो आनंद होतो तो आनंद सदोदित छायेंत असणाराला कोठून कळणार ? त्या दृष्टीनें पाहतां आज हा दिवस आपल्याला विशेषच आनंदाचा वाटतो आहे हें साहजिकच

आहे. एखादे दिवशीं आपल्या गुरूनें किंवा आपल्या आई-बापांनीं आपल्याला थोडाबहुत झणझणीत असा मार दिला म्हणजे आपल्याला वाईट वाटतें, दुःख होतें, गुरु व आईबाप मोठे निर्दय आहेत असें वाटतें, आपण केलेल्या अपराधाचें महत्त्व किती होतें हें ध्यानांत येत नाहीं, आणि त्याबद्दल केलेली शिक्षा मात्र फाजील कडक झाली असें आपल्याला वाटतें; परंतु गुरु व आईबाप निर्दय नसतात, इतकेंच नव्हे तर त्यांचीं अंतःकरणें तुमच्यासाठीं तिळतिळ तुटत असतात. शिक्षा करावी अशी त्यांची यत्किंचित्सुद्धां इच्छा नसते. परंतु तुमचें बरें झालें पाहिजे हें मनांत पक्कें धरून मुद्दामच त्यांना निष्ठुरपणा धरावा लागतो. तो निष्ठुरपणा धरितांना, त्यांच्या त्यांच्या मनाला काय वाटतें हें त्यांचें तींच जाणतात. तशीच स्थिति परमेश्वरानें पाठविलेल्या संकटांच्या बाबतींत आहे. तो जीं संकटें आपणांवर पाठवितो, तीं आपल्या हातून झालेल्या चुकांबद्दल शिक्षा म्हणूनच पाठवितो. आपले अपराध आपणाला दिसत नाहींत. शिक्षा झाली म्हणजे मग मात्र आपले डोळे उघडतात, अगर आपण त्याला दोष देऊं लागतों. दुःखानें मन वेडावून त्यास निर्दय म्हणतों, अगर त्याच्या कृतीस नांवें ठेवतों. परंतु वस्तुतः पहातां तो निर्दय नाहीं. तो दयेचा सागर आहे. ज्या कांहीं चुका आपल्या हातून घडतात, त्यांबद्दल आपले डोळे उघडावे म्हणून अशीं संकटें आपल्यावर पाठवून आपण आपल्या कर्तव्यांत पुनः चुकूं नये ह्मणून शिक्षा करणें त्यास भाग पडतें. याला दाखला फार लांब नको. तुम्हीं आपलेंच उदाहरण घ्या. आपला स्वतःचाच अनुभव घ्या. गुरूंनीं किंवा वडील मंडळींनीं केलेल्या आज्ञा तुम्हीं मोडतां. त्या आज्ञा मोडल्या असतां तेवढ्या वेळेपुरतें नुकसान काय झालें हें जर पाहूं गेलें, तर तें नुकसान मोठेंसें नसेल हेंही खरें. परंतु वयानें, विद्येनें, अनुभवानें वगैरे अनेक कारणांनीं आपल्याहून श्रेष्ठ अशा लोकांचें न ऐकण्याची एकदां चटक लागून मोठमोठाल्या कर्तव्यांत तुम्हीं चुकूं लागलां, ह्मणजे मग जें तुमचें स्वतःचें व त्याच्याबरोबर आणखीही कित्येक लोकांचें

नुकसान होतें, तें तसें होऊं नये, तें होण्याला मूळ कारण जें आज्ञाभंग करणें, तें तुमच्या हातून घडूं नये, म्हणून तुमची वडील मंडळी तुम्हांला शिक्षा करते. त्या शिक्षेबद्दल तुम्हांला राग येऊं नये. तर त्या शिक्षेपासून तुम्ही आपल्या पुढील वर्तनांत सुधारणा करण्याचाच हेतु मनांत बागविला पाहिजे.

परंतु आपले हातून चुकी होऊन त्याबद्दल शिक्षा झाल्यानंतर मग त्या शिक्षेपासून आपल्या वर्तनांत सुधारणा करावयाची हा न्याय कुठला ? अशाच करण्यास द्राविडी प्राणायाम म्हणतात. समोरच्यासमोर हात उचलून प्राणायाम करावयाचा सोडून मानेमागून हात नेऊन मग पुढच्या बाजूस वेड्यावाकड्या तऱ्हेनें तो पुढें आणून नाक धरावयाचें ह्याचा अर्थ काय ? संकट आल्यानंतर तें मुकाट्यानें सोसून त्याच्यापासून शहाणपण शिकायचें त्याच्यापेक्षां संकट येईल असें वर्तनच न ठेवणें फार बरें. नव्हे काय ? रोग एकदां अंगीं जडल्यानंतर मग औषधोपचार करून तो काढावयाचा, त्याच्यापेक्षां रोग होऊंच नये अशी तजवीज ठेवणें अतिशय शहाणपणाचें नव्हे काय ? आड वाटेनें जाऊन पायांत कांटा मोडून घ्यायचा, त्यापेक्षां आड वाटेनें जाऊंच नये आणि कांटा पायांत मोडून घेऊंच नये, हा अधिक श्रेयस्कर मार्ग नव्हे काय ? आपण आपल्या कर्तव्यांत चुकून मग त्याच्याबद्दल शिक्षा भोगून शहाणें होणें, त्याच्यापेक्षां आपल्या कर्तव्यांत चुकूंच नये असें करणें सर्वथा श्रेयस्कर आहे. शत्रु दरवाजा फोडून घरांत शिरून त्यानें सर्व गोष्टी हस्तगत करून घेतल्यानंतर मग त्याला हांकलून देण्याच्या खटाटोपाला लागण्यापेक्षां त्याला आपल्या दारांत पाऊलसुद्धां घालूं देऊं नये हाच खरा मार्ग ! त्यांत मौज ही आहे कीं, असें करणें तुह्मांला फार सोपें आहे. ज्या वयांत हें सगळ्यांत सोपें असेंच तुमचें वय आहे. तुमचीं कर्तव्यें फार नाहींत, परंतु जीं आहेत तीं अशीं आहेत कीं, तीं तुमच्या पुढच्या सर्व आयुष्याच्या बियाप्रमाणेंच आहेत. सराटे पेरले असतां त्याला गहूं येण्याचा कधीं संभव नसतो. त्याचप्रमाणें पेरणीचें बीं योग्य प्रकारें जेथल्या तेथें पेरलें तरच त्याला

पुढें यथायोग्य अंकूर फुटून ते अंकूर जोरदार होऊन चांगलें पीक येतें; नाहीं तर सर्व श्रम व्यर्थ जातात. सगळ्या वयांत उत्तम वय म्हटलें म्हणजे बाळपण होय. त्यांत कोणच्याही प्रकारची काळजी बाळगण्याचें कारण नसतें. आपले हितचिंतक व वडील मंडळी ज्याप्रमाणें सांगतील त्याप्रमाणें बिनचूक बिनतकरार आपलें कर्तव्य बजाविलें असतां कोणच्याही प्रकारची जबाबदारी तुमचेवर रहात नाहीं. सगळ्यांत फार सुखाचा काळ कोणचा असें जर मला कोणीं विचारलें, तर बाळपणचा असेंच मी उत्तर देईन. आणि तुम्हालाही पण तसेंच वाटत असेल. तर अशा या उत्तम वयांत संख्येनें अतिशय थोडीं परंतु महत्त्वानें सगळ्यांत अधिक अशीं जीं तुमचीं कर्तव्यें, तीं पार पाडण्यासाठीं तुम्ही सदोदित मनःपूर्वक झटलें पाहिजे. तुमचीं कर्तव्यें थोडीं, परंतु तेवढींच तुम्ही आपल्या वडील मंडळीच्या मनाप्रमाणें करून टाकलींत ह्मणजे मग तुमच्या सुखाला पारावार नाहींसा होतो. हें तुमचें वय किती मजेचें आहे ! तुमच्या शरीरासंबंधीं, तुमच्या विद्येसंबंधीं—एकंदरींत तुमच्यासंबंधीं प्रत्येक गोष्टींत काळजीचा जो भाग आहे, तो वडील मंडळी आपल्या शिरावर घेतात. तुमचे अंगावर त्यांतील यत्किंचित् भागसुद्धां पडत नाहीं. मग तुमचेकडे कर्तव्य बजावण्याखेरीज काय उरतें याचा तुम्हीं विचार करा. तुम्हीं आपलीं कर्तव्यें केलींत म्हणजे, वडील मंडळीस आनंद होऊन तुम्हांस कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें त्यांना होऊन जातें व ती मंडळी थोड्याथोडक्या गोष्टीबद्दलसुद्धां तुमची स्तुति करितात.

ही जर गोष्ट खरी आहे, तर तुम्ही तरी आपल्या कर्तव्यांत दक्ष कां असूं नये ? तीं कर्तव्यें फारशीं कठिण नाहींत, परंतु फार महत्त्वाचीं आहेत, हें मी मघाशीं तुम्हांस सांगितलेंच. तीं किती सोपीं, किती थोडीं परंतु किती फार महत्त्वाचीं आहेत हें तुमच्या ध्यानांत आणून देण्याचा आज मीं विचार केला आहे.

तुमचें पहिलें कर्तव्य वडील मंडळीच्या आज्ञेंत वागणें हें होय.

या कर्तव्याला पहिला नंबर देतों याला मोठें कारण आहे. तें कारण हें कीं, इतर सर्व कर्तव्याचें मूळबीज या कर्तव्यांत आहे, इतकेंच नव्हे, तर हें कर्तव्य तुम्हांला साधलें, कीं, सर्व कर्तव्यें तुम्हांला साधलींच म्हणून समजावें. एक तर त्याच्या योगानें तुम्हांला आत्मसंयमनाचा धडा मिळतो. पुष्कळ वेळां असें होतें कीं, आपण आपल्या एखाद्या आवडत्या खेळांत गढून गेलेले असतों, आणि आपली वडील मंडळी येऊन आपणांस तें सोडून कांहीं तरी काम करण्यास सांगतात; अर्थातच आपल्यास अतिशय वाईट वाटतें. आपला भरांत आलेला खेळ टाकून कोणीकडे तरी लांब जाऊन कांहीं तरी कंटाळवाणें काम करावयाचें म्हणजे केवढें त्रासदायक काम! परंतु तें आपल्याला त्रासदायक व कंटाळवाणें वाटतें आणि जे आपल्याला तें करण्याबद्दल आज्ञा करितात, त्यांच्या दृष्टीनें तें अतिशय महत्त्वाचें असतें, अर्थातच आपणांस आपला विचार एकीकडे सारून आपला खेळ सोडून तें काम करण्यास जावें लागतें, आणि आपण जावें हेंच आपल्याला उचित. ज्याप्रमाणें आपण आजारी असतां वैद्याकडे जाऊन औषध मागतों; तो केव्हां केव्हां कडू कडू जहर असें औषध देतो; तें घेऊं नये असें आपल्याला वाटतें, फेकून देण्याची सुद्धां इच्छा होते, परंतु आपण फेकून देत नाहीं, मुकाट्यानें, डोळे मिटून नाक दाबून घेतों. कां? तर तें अंतीं फार गुणावह आहे, हें आपल्याला पक्कें ठाऊक असतें. न घेतलें तर आपलें फार मोठें नुकसान होईल, आपला रोग वाढेल, असें आपण जाणून असतों; पुढें फार मोठा फायदा आहे हें पक्कें जाणून तात्पुरता त्रास आपण कसाही सोसतों. हाच दृष्टांत लावून, तुम्हीं ही वडिलांची आज्ञा पाळली पाहिजे. तात्पुरता त्रास जरी झाला तरी तो मनांत न आणतां वडिलांनीं सांगितलेलें काम केलें पाहिजे. आज्ञाधारकपणा हा मोठा अतिशय किंमतीचा गुण प्रत्येक मुलाच्याच काय, पण प्रत्येक मनुष्याच्या अंगीं असला

पाहिजे. त्याखेरीज जगांतले व्यवहार कधींच चालावयाचे नाहींत. चाकरांनीं यजमानांचें, कनिष्ठांनीं वरिष्ठांचें ऐकलें नाहीं तर कसें चालणार ? कनिष्ठ अधिकारी आपल्या वरिष्ठ अधिकारी मंडळीच्या हुकुमाचें उल्लंघन जर करूं लागले, तर व्यवहार चालावयाचा नाहीं. सेनाधिपतीनें केलेला हुकूम आपल्या मनास येत नाहीं म्हणून सेनेंतला प्रत्येक शिपाई जर म्हणेल कीं, आपण आपल्याला वाटेल त्याप्रमाणेंच लढूं, तर कधीं कोणच्याही लढाईंत कोणालाच यश येणार नाहीं. फार कशाला ? तुम्हांला क्रिकेट खेळावयाची हौस असते. त्यांत तुमचा क्याप्टन् म्हणून जो मुख्य असतो, त्यानें ज्याला जेथें उभें राहण्यास सांगावें तेथें तो उभा राहून आपलें कर्तव्य बजावतो, म्हणूनच डाव सुरळीतपणें चालून बहार उडते. तेंच असें पहा कीं, प्रत्येकानें म्हटलें, " क्याप्टन कोण ? आह्माला जेथें वाटेल तेथें आम्ही उभे राहूं. आणि वाटेल तसे खेळूं. " तर कसें चालेल ? मुलांनो, सगळ्या गड्यांनीं असा विचार करून खेळास सुरुवात केली, तर तेथें कोणच्या प्राण्याच्या गोंधळास सुरुवात होईल याचा तुम्हीच विचार करा. तुमच्या तुमच्यांतच तुम्ही आपला क्याप्टन् म्हटलेल्या इसमाचें ऐकलें नाहीं, तर एवढा विरस होतो; मग ज्यांच्यावर आपलें सगळें जीवित अवलंबून, ज्यांचा आपल्यावर अतिशय मोठा अधिकार, अशा आपल्या आईबापांचें, वडील मंडळींचें व गुरूंचें जर आपण ऐकिलें नाहीं, तर आपल्या एकंदर आयुष्यक्रमाची केवढी धूळधाण होण्याचा संभव आहे, याचा विचार करा; म्हणजे आज्ञाधारकपणा आपण आपल्या अंगीं आणण्यासाठीं किती यत्न केला पाहिजे व कां केला पाहिजे, हें तुमचें तुम्हालाच उत्तम प्रकारें कळेल. परंतु आज्ञाधारकपणा कां पाहिजे, आपली वडील मंडळी जसें सांगतील तसें कां वागलें पाहिजे, याचा विचार करण्याचा तुमचा अधिकार नाहीं, आणि तसें करणें कोणच्याही प्रकारें उचितही नाहीं. वडील माणसांनीं आज्ञा केली कीं, अगदीं स्वाभाविकपणें हातचा खेळ अगर डाव दूर सारून उठून ' काय करूं ? ' असें विचारलें पाहिजे. मु-

त्यांनो, या तुमच्या वयांत तुम्ही आज्ञाधारक बनलां, आपली मर्जी एका बाजूला ठेवून वडिलांनीं सांगितलेलें काम करण्याची संवय तुम्हाला झाली कीं, कालांतरानें तुम्ही स्वतःच आज्ञा करणारांच्या पदवीस पोंचाल. आज जर का त्या गुणाच्या प्राप्तीकडे तुम्ही लक्ष्य दिलें नाहीं, तर मग आजन्म तुम्हांला आज्ञाधारक लोकांच्याच पदवींत राहवें लागेल; आज्ञा करणारांची पदवी कधींच लाभावयाची नाहीं. पेरावें तसें उगवतें, द्यावें तसें घ्यावें, हे न्याय रोजच्या अनुभवाचे आहेत, म्हणून कांहीं त्यांची किंमत कमी नाहीं. ते अगदीं अक्षरशः खरे आहेत. बाळपणीं जसें वळण लावावें तसेंच पुढें लागतें, आणि सर्व आयुष्यक्रम चांगला किंवा वाईट, सुखकारक किंवा दुःखकारक होणें, हें या बाळपणीं लावून घेतलेल्या संवयीवरच फार फार अवलंबून आहे.

तुम्ही दुसरा गुण आपल्या अंगीं अवश्य जडवून घेतला पाहिजे तो कर्तव्यतत्परता होय. वडिलांनीं अमुक एक काम सांगितलें, म्हणून तें आपलें कसें तरी केलें, असें जर कराल, तर आपलें व वडिलांचें अपरिमित नुकसान कराल. त्यापेक्षां तुम्हीं एखादें काम न केलेलें एकवार पत्करेल, पण कसें तरी दगडावर दगड ठेवून एखादें काम रेटाल, त्यांत लक्ष्य मुळींच घालणार नाहीं, तर त्याच्यासारखा मूर्खपणा दुसरा कोणचाही नाहीं. वडिलांनीं एखादें काम सांगितलें व तुम्ही तें करतों म्हटलें, म्हणजे तुम्ही तें करणार अशी त्यांची पक्की खात्री असते इतकेंच नव्हे, तर तें काम तुम्ही आपलें सगळें लक्ष्य लावून मोठ्या आस्थेनें कराल, अशीही त्यांची खात्री असते. अर्थातच ते तुमच्यावर विश्वासून त्या कामाविषयीं बेफिकीर राहतात. परंतु त्यांच्या खात्रीप्रमाणें तुम्ही आपलें काम न करितां कशी तरी वेळ मारून नेण्याजोगें काम केलेंत, तर किती नुकसान होईल याचा विचार करा. एक तर तें काम जसें व्हायला पाहिजे तसें झालें नाहीं म्हणजे व्यावहारिकदृष्ट्या नुकसान होईल. आणि दुसरें तुमच्यावरचा वडील मंडळीचा भरंवसा उडून जाईल. मग त्यांत काय राहिलें ? आणि

तिसरें, तुमच्या स्वत:च्या संबंधानें अतिशय महत्त्वाचें नुकसान म्हणजे जें काय काम येईल तें थातुरमातुर कसें तरी करून टाकून वेळ मारून नेण्याची दुष्ट खोड तुह्मांला लागेल हें होय. ही वाईट खोड एकदां का लहाणपणींच तुम्हांला लागली, कीं मग सर्व कांहीं संपलें. मग तुमच्या हातून कोणचीही गोष्ट धडपणें होईल अशी आशाच नको. एकदां ही चालढकलीची दुष्ट संवय लहानपणीं जडली म्हणजे सगळ्या आयुष्यक्रमाची आपली चाल-ढकलच होते, आणि अशी चालढकल झाली म्हणजे सगळ्या गोष्टींचें अगदीं पुरें मातेरेंच झालें म्हणून समजावें. मग तुमची किंमत पोतेऱ्यासारखी होईल.

कोणचें वाटेल तें काम असो, खेळाचें असो कीं अभ्यासाचें असो, किंवा दुसरें कसलेंही असो, त्यांत पुरतें लक्ष्य घालून तें काम केलें कीं, एक तर त्यांत कधीं अपयश येत नाहीं; त्याच्या पासून जितका ह्मणून आनंद व्हावयाचा तितका सगळा होतो, आणि आपल्याला उद्योगीपणाची संवय लागते. ती संवय एकदां लागली, म्हणजे मग अमुक काम नीट झालें नाहीं, असें म्हणून लोकांची माफी मागण्याची पाळीच येत नाहीं, कोणाचा बेभ-रंसा होत नाहीं, आणि आपलें सर्वस्वी कल्याण होतें. जेव्हां खे-ळांत गढलां असाल, तेव्हां पक्केपणीं त्यांत गढा. त्या वेळीं 'अरेरे! आपण खेळतों आहोंत खरे, पण आपला अमुक एक अभ्यास राहिला आहे,' असें मनांत येईल अशी स्थिति ठेवूंच नका. खेळ मन लावून खेळलां, तरच त्या खेळण्याच्या खऱ्या आनंदाचा पुरा पुरा लाभ तुम्हाला होणार. खेळ संपला आणि अभ्यासाची वेळ झाली कीं, लागलीच खेळ सोडून तितक्या उत्साहानें व आवेशानें आपल्या अभ्यासाकडे चित्त फिरवावें. आणि तें एकदां तिकडे फिरविलें कीं, मग तन्मयच होऊन जावें. मग आधींच्या आप-ल्या खेळांतल्या गोष्टी मनांतसुद्धां येऊं देऊं नये. खेळायचें तें मन लावून खेळा, अभ्यास करावयचा तोही त्याचप्रमाणें अगदीं मन लावून करा; आणि त्याखेरीज वडील मंडळींपैकीं कोणीं कांहीं काम करण्यास सांगितल्यास तेंही काम अगदीं यत्किंचित्

सुद्धां हलगर्जीपणा न करितां केलें पाहिजे. आपलें अमुक एक कर्तव्य आहे, तर तें वेळच्यावेळीं अगदीं पूर्ण उल्हासानें व उत्साहानें केलें, म्हणजे त्यापासून आपणास जो आनंद होतो, तो अनुभवानें जाणतां येईल. नुसता वर्णन करून सांगणें अगदीं अशक्य व व्यर्थ आहे. तुमच्यांपैकीं बहुतेकांना तो आनंद रोजच्या रोज होतच असेल. परंतु जर नसला होत, तर त्यांनीं त्याची प्राप्ति करून घ्यावी. मी त्यांना अगदीं खात्रीनें अंतःकरणपूर्वक सांगतों कीं, तो आनंद तुम्ही रात्रंदिवस घ्या, तुम्हांला मुळींसुद्धां–यत्किंचित्सुद्धां कंटाळा यायचा नाहीं, वीट यायचा नाहीं. या आनंदाची गोष्ट अशी आहे कीं, तो जितका जितका अधिक मिळवावा, तितका तितका त्याच्याबद्दलचा सोस वाढायचाच. मात्र एकवार त्याची चांगली गोडी लागली पाहिजे. आणि हा कर्तव्यतत्परतेचा–म्हणजे हातीं घेतलेलें काम अगदीं मन लावून, आपल्या अंगीं असेल नसेल तें सर्व मानसिक व शारीरिक बळ तिकडे लावून करावयाचा–गुण एकदां जडला, म्हणजे मग मोठेपणीं कधीं कोणच्याही कामाचा कंटाळा येत नाहीं, तें सहज उरकून टाकण्याची संवय होते. आणि अशी संवय लहानपणापासून पक्की अंगांत भिनलेली असली, म्हणजे मग, अमुक झालें नाहीं आणि तमुक झालें नाहीं म्हणून मोठें वाईट वाटतें, असें म्हणण्याचा प्रसंग कधींच यावयाचा नाहीं.

आज्ञाधारकपणा आणि **कर्तव्यतत्परता** हे गुण बाळपणींच अंगीं जडणें फार अवश्य, तसाच **व्यवस्थितपणा**ही अंगीं असणें अतिशय अवश्य व उपयोगी होय. नुसतें मन लावून काम करायला उद्युक्त झाल्यानें काम होत नाहीं. तर तें काम कांहीं तरी व्यवस्थितपणानें, पद्धतशीर केलें पाहिजे. कामाची व्यवस्था लागली नसली, आणि कितीही उल्हास किंवा उत्साह धरून कामाला हात घातला, तरी काय उपयोग होणार ? कांहीं नाहीं. अमुक कार्यभाग अशा रीतीनें करावा, आधीं अमुक करावें, मग त्याच्या पुढलें, असें कांहीं नियमितपणें काम केलें, तर त्याचा उपयोग. नाहीं तर काय ? पुष्कळ वेळां काम करून न करून सारखेंच

होतें. तर तसें उपयोगी नाहीं. जें काय करावयाचें त्याची वेळ नेमून तितक्या त्या पद्धतीनेंच तें करावें, म्हणजे कामही पुष्कळ होऊन कामाचा उत्तम प्रकारचा उरक जडतो. **नियमितपणा** हा व्यवस्थितपणाचाच अंगभूत आहे. काम व्यवस्थेशीर करणें म्हणजेच नियमितपणें करणें असें होतें. नाहीं तर आज दोन तास, तर उद्यां तीन, परवां वाटेल तितका वेळ, आणि त्याच्या तेरवांपासून कांहीं दिवस त्या कामाकडे मुळीं ढुंकूनसुद्धां पहावयाचें नाहीं. पुनः केव्हां तें काम हातीं घेण्याची सद्बुद्धि परमेश्वर देईल तो देवो, असा प्रकार बिलकूल होऊं देऊं नये. प्रत्येकानें आपापल्या दिनचर्येचें कोष्टक तयार करून ठेवावें. सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं झोंपीं जाण्याची वेळ होईपर्यंत सर्व वेळ यथायोग्य तऱ्हेनें विभागून व प्रत्येक विभागास जें जें काम करणें शक्य, तें तें नेमून ठेवणेंच अवश्य. नेमून ठेवणेंच अवश्य नव्हे, तर त्याप्रमाणें करणें अगदीं अवश्य. तुमच्या या वयांत तर असलें कोष्टक अगदीं साधें असावयाचें. कारण, तुमचीं कामें अगदीं परिमित व नियमितपणें सहज करण्याजोगीं अशीं आहेत. रोजचे स्नानभोजनादि विधि, खेळ व अभ्यास हीं तीन प्रकारचीं कामें. त्यांचा जम योग्य तऱ्हेनें बसवून ठेवला व त्याप्रमाणें वागण्याचा तुमचा निश्चय दृढ झाला, म्हणजे त्याच्या आड कोणीसुद्धां येत नाहीं. उलट तुम्ही फार नियमितपणें वागतां, वेळच्या वेळीं कामें करण्याची उत्तम संवय तुम्ही आपल्यास लावून घेतली आहे असें एकदां सगळ्यांना कळलें, म्हणजे कोणी तुमचा नियम मोडूं इच्छिणार नाहीं. वेळच्यावेळीं नियमितपणें काम केल्यापासून किती प्रकारचे फायदे आहेत ! एक तर 'मला वेळ झाला नाहीं,' ही जी आळशाची कांहीं काम न करण्याबद्दलची सबब, ती पुढें करण्याचें कधीं कारण पडत नाहीं. पतकरलेलें काम न केल्याबद्दलची जबाबदारी अंगावर येऊं नये म्हणून, 'मला वेळ झाला नाहीं' अशी सबब आणणाऱ्या शेंकडा नव्वद लोकांवर कोणी भरंसा ठेवीत नाहीं. सबब ऐकून घेतात, बोलत नाहींत, परंतु मनांत पक्कें समजतात कीं, या गृहस्थानें आळस केला, हयगय

केली. पण जो नियमितपणानें वागतो, त्याला कधीं वेळ सांपडत नाहीं असें होनच नाहीं. त्याचें काम कधीं मागसत नाहीं. त्याला कधीं गर्दी होत नाहीं. कधीं त्याची धांदल होत नाहीं. केव्हां एखादे वेळीं अगदीं अनपेक्षित कारणें होऊन त्याला आपला नियमितपणा सोडावा लागला, म्हणून त्याचा जिकडे तिकडे गोंधळ होत नाहीं. कारण, कित्येक दिवस पुरे असें काम करून ठेवलेलें त्याच्याजवळ शिल्लक असतें. उद्यांचें काम आज करावें, दुपारचें काम सकाळींच करून ठेवावें, या नियमाप्रमाणें आपोआपच त्याचें वर्तन होतें. मग कांहीं आकस्मिक विघ्न येऊन त्याच्या नियमितपणांत चलबिचल झाली, तरी ती तेवढ्या वेळेपुरतीच होते. दहा कामें असलीं तर दहाचीं दहा बंद पडलीं असेंच केवळ होत नाहीं. चार दोन कामें फार तर व्हायचीं त्या वेळीं होत नाहींत. कामाच्या धांदलीमुळें अनियमितपणा करण्याची पाळी तर त्याच्यावर मुळींच येत नाहीं ह्मटलें तर चालेल. नियमितपणा हें सुव्यवस्थितपणाचेंच एक अंग आहे हें मीं वर सांगितलेंच. तेव्हां नियमितपणानें वागणें, ह्मणजे सुव्यवस्थितपणानें वागणेंच होय हें उघडच आहे. वेळच्यावेळीं जें काय करावयाचें तें करीत गेल्यावर, 'करूं मग !' या शब्दांचा उच्चारसुद्धां न करतां सर्व कामें झाल्यावर सुव्यवस्थितपणा तो आणखी काय निराळा असतो ?

वेळेचा सदुपयोग करणें, ही आणखी एक फार महत्त्वाची गोष्ट तुम्हीं शिकून घेतली पाहिजे. तुमचीं अवश्य करावयाचीं तीं सर्व कामें संपून आणखी पुष्कळ वेळ तुम्हांला दररोज सांपडतो. तो वेळ कांहीं न करितां केवळ माशा मारीत घालविणें म्हणजे अगदीं वेडेपणा होय. कांहीं ना कांहीं तरी नवीन गोष्टीचें ज्ञान करून घेण्यांत त्या तशा वेळेचा उपयोग करून घ्यावा. जो अजून आपल्याला येत नसेल असा कांहीं नवीन खेळ शिकावा. अगर ज्या विद्येचा अगर खेळाचा आपणास विशेषतः नाद असेल, ती विद्या अगर तो खेळ दृढ करण्याकडे त्या वेळाचा उपयोग करावा. ज्ञान इतकें अपार

आणि अगाध आहे कीं, जितकें जितकें तें मिळवावें अगर घटवावें, तितकें तितकें तें अधिकच विस्तृत व खोल आहे असें दिसून येतें. नानाप्रकारचें ज्ञान असणें हें एक मोठें भूषण आहे. एक विद्या कोणची तरी चांगली यावी, परंतु अनेक विद्यांचें थोडें थोडें तरी ज्ञान असावें, म्हणजे मनुष्यास केव्हांही कंटाळवाणें वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर तो इतरांचेंही मन रंजवून त्यांस आनंद देतो. बारीक सारीक वेळ आपण किती तरी व्यर्थ घालवितों ! इकडे तिकडे सांपडलेला क्षण क्षण ह्मणतां ह्मणतां दिवसाच्या अखेरीला एखादा तास होतो. एक डाक्टर असे, तो आपल्या रोग्यांची तपासणी करण्यासाठीं गाडींतून जाई, तेव्हां जाण्यायेण्यास वेळ लागे तेवढ्याचाच उपयोग करून त्यानें ग्रीक भाषेंतील एक महाकाव्याचें भाषांतर करून टाकलें ! एक बाई होती, ती एका महाराणीच्या तैनातीस असे. महाराणी साहेबांच्या उठण्याच्या वेळीं त्यांच्या निजण्याच्या खोलीच्या बाहेर पंधरा मिनिटें तिला थांबावें लागत असे. तेवढ्या पंधरा मिनिटांचा उपयोग करून तिनें एक मोठा थोरला ग्रंथ लिहिला. अशीं पंधरा मिनिटें आपण रोज किती वेळां तरी व्यर्थ घालवितों ! आणि त्याबद्दल कांहींसुद्धां कधीं आपल्यास वाटत नाहीं. संस्कृतांत एक वाक्य आहे कीं, क्षणांक्षणांनीं विद्या आणि कणांकणांनीं द्रव्य हीं प्राप्त करून घ्यावीं. तें अगदीं खरें आहे. प्रत्येक क्षण अगदीं कुचकामाचा वाटतो, परंतु त्याच प्रत्येक क्षणांनीं मिळून मिनिटें, तास, प्रहर, दिवस, महिने, वर्षें, शतकें आणि युगें होतात, ही गोष्ट लक्ष्यांत धरली पाहिजे. थेंबाथेंबांनीं तळें सांचतें, कवडीकवडीनें खजिना भरतो. ज्याप्रमाणें पैसा थोडा असला ह्मणजे मनुष्य आपल्याकडून होईल तितकी काटकसर करतो, त्याचप्रमाणें वेळाची काटकसर केली पाहिजे. पैसा गेला तर मेहनत केली असतां पुनः मिळवितां येतो. परंतु वेळ जो गेला तो गेलाच. नदीचें पाणी आटलें, तळें कोरडें पडलें, तर पुनः पावसाळा सुरू झाल्यावर पाऊस पडला ह्मणजे नदीला पूर येतो, तळें तुडुंब भरतें. परंतु वेळाची गोष्ट तशी नाहीं. तो एकदां

गेला कीं गेलाच. तो कधीं परत येत नाहीं. वेळाचा पाऊस पडून त्यांत भर पडत नाहीं. इतका वेळ मोलवान आहे. त्याला किंमत नाहीं. मग तो वाटेल तसा खर्च करणें म्हणजे किती वेडेपणा होय! जर कोणच्या बाबतींत मनुष्यानें अतिशय कद्रू व्हावें, तर तें वेळाच्या बाबतींत व्हावें. कारण तो कितीही अनंत असला, तरी आपल्या वांट्याला तो अगदीं परिमितच आहे. तेव्हां त्याची आम्ही काटकसर केल्याखेरीज कसें चालेल? काटकसर नव्हे—त्याच्या बाबतींत अगदीं तिमार्जीनाइकी केली तरी सुद्धां कोणाचा दोष येणार नाहीं. कोणी त्या काटकसरीबद्दल निंदा करणार नाहीं. त्याची काटकसर करावयाची म्हणजे तो व्यर्थ खर्च करावयाचा नाहीं. आपल्याला उपयोगी पडेल असें कांहीं तरी ज्ञान प्राप्त करून घेण्याकडेच त्याचा व्यय करावयाचा. तो व्यय योग्यपणें झाला म्हणजे आणखी काय पाहिजे? सर्व कांहीं त्यांत लाभलें.

आपला नियमित अभ्यास व खेळ वगैरे सर्व होऊन जो वेळ केव्हां केव्हां उरेल, तो कांहीं तरी नवीन पुस्तक—ज्याच्या योगानें तुमचें मनोरंजन होऊन ज्ञान वाढेल असें पुस्तक—वाचण्यांत घालवावा. आपल्याला अगदीं एकलकोंड्यासारखें झालें, किंवा त्रास आला, तर त्यावेळीं पुस्तकासारखा दुसरा स्नेही नाहीं. सुंदर व हितकारी अशा पुस्तकाच्या वाचनांत वेळ गेला म्हणजे मनावर केवढा उत्तम परिणाम होतो! वाचनानें मनुष्यास एकटेंच बसण्याचा कधीं कंटाळा येत नाहीं. चांगलीं पुस्तकें तर जणूं काय अंतःकरणांत प्रकाश आणून सोडणाऱ्या खिडक्या. त्यांच्या द्वारानें मनुष्यास सर्व गोष्टी पहाण्याला सांपडतात. किती तरी गोष्टी अशा आहेत कीं, त्या सर्व आपल्याला स्वतःला पहाणें शक्य नसतें. एकाच व्यक्तीला सगळ्या जगांतले देखावे पहाण्यास सांपडणें शक्य नाहीं. एकाच मनुष्याला सगळे अनुभव येणें शक्य नाहीं. ते सर्व देखावे तेथें जाऊन न पहातां येथें आणणें शक्य असेल व घरांतल्या घरांत सगळ्या विश्वांतील नानाप्रकारचे चमत्कार पहाणें शक्य असेल, तर तें एक फक्त

पुस्तकांच्याच द्वारानें शक्य आहे, नाहीं तर नाहीं. मात्र कोणचें पुस्तक घ्यावें आणि कोणचें वाचावें, याचा विचार चांगल्या कोणास विचारल्याखेरीज करूं नये.

विशेषतः जे मोठे होऊन गेले, त्यांचीं चरित्रें व प्रवासवर्णनें वगैरे वाचावीं. विशेष थोरपणा पावलेल्या पुरुषांच्या चारित्रांच्या वाचनानें आपणास कोणत्या प्रसंगीं कसें वागावें आणि कोणत्या अडचणींच्या वेळीं कसें धैर्य धरावें हें चांगलें समजतें. तें समजल्यानें आपल्यास किती फायदा होतो तो सांगावयास नकोच. ज्याप्रमाणें शाळेंत अक्षर शिकावयाचें असल्यास सर्वांत उत्तम अक्षर ज्यांचें असेल त्यांचेपासून वळणें घालून घेतों, त्याचप्रमाणें आपला आयुःक्रम उत्तम व्हावा अशी इच्छा असल्यास थोर पुरुषांच्या चरित्रांचा कित्ता घ्यावा हें उघडच आहे. थोर पुरुष थोर होतात, ते आपल्या उत्तम वर्तनानेंच होतात. उगीच लोक त्यांस उत्तम ह्मणत नाहींत. त्यांच्या अंगीं थोरपणाचे गुण असतात. गुण त्यांचे अंगीं स्वभावतःच असतात परंतु स्वभावसिद्ध गुणांवरच त्यांचा मोठेपणा अवलंबून नसतो, तर मोठेपणा अंगीं आणण्यासाठीं त्यांचे प्रयत्नही तसेच जबरदस्त असतात. देवपण अंगीं येण्यास टाकीचे घाव सोसावे लागतात, तसा मोठेपणा मिळविण्यास अनेक प्रकारचे श्रम करावे लागतात. कित्येक प्रकारची घस सोसावी लागते. त्याखेरीज मोठेपणा येणें शक्यच नाहीं. आपल्या आधीं जे होऊन गेले, ज्यांनीं जगावर अनेक उपकार करून ठेविले, त्यांचीं चरित्रें वाचल्यानें त्यांच्या अंगचे गुण सर्वथा आपल्या अंगांत उतरतील हें तर शक्य नाहींच, परंतु अंशतः तरी त्यांच्या गुणांचें अनुकरण आपल्या हातून व्हावें, अशी बुद्धि आपल्या मनांत उत्पन्न होते आणि तशी बुद्धि झाली ह्मणजे सर्वथा जरी नाहीं, तरी अंशतः तरी आपण त्यांचा कित्ता वळवायला लागून आपला फायदा करून घेतों. एवढ्याकरितां थोर पुरुषांचीं चरित्रें वाचावीं, त्यांच्या कथा ऐकाव्या, आणि नेहमीं त्यासंबंधाच्या गोष्टी बोलत रहावें.

प्रवासवर्णनाचीं पुस्तकें वाचल्यानें मनुष्यास बहुश्रुतपणा येतो. त्याचें मन संकोचित रहात नाहीं. लहानशा विहिरींतल्या बेडकाला जशी त्याची विहीर तेवढेंच काय तें जग वाटतें, त्याच्याबाहेर विश्व म्हणून कांहीं आहे असें त्याला वाटतच नसतें, तो आपला तेवढ्यांतल्या तेवढ्यांत गिरक्या घेतो, बुड्या मारतो, आणि डरांव् डरांव् करतो, तेवढ्यानेंच त्याला आपण पृथ्वीप्रदक्षिणा करून आलों असें वाटतें, तशीच आपल्या मनाची स्थिति असते. परंतु निरनिराळ्या साहसी पुरुषांनीं अनेक देशपर्यटनें करून मिळविलेल्या माहितीनें भरलेलीं पुस्तकें वाचलीं, म्हणजे आपल्या मनाचा संकोचितपणा थोडाबहुत नाहींसा होऊन त्याला एकप्रकारचा विशालपणा येतो. आपल्या बाहेर व आपल्या गांवाच्या आणि देशाच्या बाहेर जग फार मोठें विस्तृत आहे. आपण कधीं स्वप्नस्वप्नांतरींसुद्धां ज्या गोष्टी पाहिल्या किंवा ऐकल्या नाहींत, अशा अनेकविध गोष्टी जगांत आहेत, हें कळूं लागतें आणि आपल्या ज्ञानांत तेवढी भर पडते.

ज्याप्रमाणें व्यक्तींचीं चरित्रें, त्याचप्रमाणें देशांचीं चरित्रें म्हणजे त्यांचे इतिहासही अवश्य वाचावे. इतिहास इतिहास म्हणजे काय आहे ? एका राष्ट्राचें अगर देशाचें चरित्रच होय. ज्याप्रमाणें आपल्यांत होऊन गेलेल्या थोर पुरुषांचें चरित्र वाचल्यापासून अनेक तऱ्हांनीं आपला फायदा होतो, त्याचप्रमाणें आपल्या देशाचा प्राचीन व अर्वाचीन–जुना व नवा–इतिहास वाचल्यानें आपलें फार हित होतें. पुष्कळ सुज्ञ, धोरणी, शूर व साहसी पुरुषांनीं आपल्या कुळाचा, जातीचा, देशाचा व राष्ट्राचा अभिमान धरून जीं काय थोर कृत्यें आपल्या देशाला मोठेपणा आणावा म्हणून केलीं, त्या सर्वांचा इतिहास म्हणजेच राष्ट्राचा इतिहास होय, राष्ट्राचा इतिहास कांहीं निराळा नव्हे. त्यांतील व्यक्तींनीं आपलें स्वतःचें हिताहित अगदीं विसरून जाऊन सार्वजनिक हितासाठीं आपलें द्रव्य, आपलें ज्ञान, आपलें बळ हीं सर्व वेंचलीं, त्या त्यांच्या कृत्यांचा व साहसांचा इतिहास. ते इतिहास वाचले म्हणजे देश कशानें उदयास येतो याचें चांगलें दिग्दर्शन होतें. आणि तसें दिग्दर्शन झालें म्हणजे आपल्याही

मनांत देशाभिमानाचा योग्य संचार होतो. आपल्या कुटुंबाचा, आपल्या कुळाचा, व आपल्या देशाचा अभिमान आपल्या अंतःकरणांत सदोदित जागृत असणें हें फारच इष्ट आहे. आणि तें साधण्यासाठीं आपल्या देशाच्या थोरपणाचा इतिहास वाचावा. त्याचप्रमाणें इतर देशांतील थोर पुरुषांनीं आपले देशास कोणच्या उपायांनीं व कोणच्या साहसादिकांनीं ऊर्जित दशेला नेलें तें जाणण्यासाठीं इतर देशांचे इतिहासही वाचावे. विशेषतः इंग्लंड देशाचा इतिहास फार लक्ष्य लावून वाचावा; म्हणजे तो देश आज या विलक्षण वैभवाला चढण्याला काय काय कारणें झालीं, त्या देशांतील लोकांच्या अंगीं कोणकोणचे विशेष गुण आहेत, कीं ज्यांच्या योगानें त्यांनीं ज्या त्या कामांत जय मिळवून आज सर्व पृथ्वी आपलीशी करून टाकली आहे, हें सर्व आपणास समजेल. सुमारें आठशें वर्षांपूर्वी ज्या इंग्लंडच्या राज्यावर चार सहा महिन्यांनीं एखादे दिवशीं सूर्य प्रकाशत असे, त्याच इंग्लंडच्या राज्यावर आज तिन्ही त्रिकाळ सूर्य सारखा तळपत आहे, कधींच मावळत नाहीं. अशी स्थिति ज्यांनीं केवळ आठशें वर्षांत आपल्या देशाला आणली, ते आज आमच्यावर राज्य करीत आहेत. त्यांच्या न्यायी छत्राखालीं आपण आज सुखशांतींत नांदतों आहोंत. तेव्हां त्यांचा इतिहास आपण अगदीं अवश्य वाचून चांगला ध्यानांत घेतला पाहिजे. आज दोनशें अडीचशें वर्षें झालीं आपल्या देशाचा व त्यांचा संबंध जडला आहे. हा संबंध जडला हें जाणणें अवश्य आहे. दोन्ही देशांचे इतिहास हल्लीं मराठींत झाले आहेत. तेव्हां ज्यांना इंग्रजींत वाचण्याइतकें इंग्रजीचें ज्ञान नाहीं त्यांनीं मराठींत ते इतिहास जरूर वाचावे. त्याचप्रमाणें फ्रान्स व जर्मनी या दोन देशांचे इतिहास मराठींत झाले आहेत तेही डोळ्यांखालून घालावे.

आपल्या नेहमींच्या अभ्यासाचे विषय नेहमीं जय्यत ठेवून या इतर पुस्तकांचें वाचन करणें ह्मणजे एका प्रकारचा आल्हाद देणारा मानसिक व्यायामच आहे. खेळणें शरीराला व्यायाम होऊन मनाला आल्हाद देणारें असें खेळावें आणि वाचन करावयाचें तें मनाला आल्हाद होऊन व्यायाम होईल असें असावें.

वर सांगितलीं हीं पुस्तकें केवळ दिशा दाखविण्याकरितां म्हणून सांगितलीं. आणखीही अनेक विषयांवर—विशेषतः इंग्रजी भाषेंत पुस्तकें आहेत, तीं, ज्यांना इंग्रजींत समजण्याइतकें ज्ञान आहे, अशा इंग्रजी चवथ्या पांचव्या यत्तेपासून वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांनीं अवश्य वाचावीं. ज्यांस इंग्रजी समजत नाहीं त्यांचे साठीं मराठींतही पुस्तकें आहेत, तीं त्यांनीं वाचावीं.

जो रिकामा वेळ सांपडेल तो केवळ पुस्तककीटकाप्रमाणें पुस्तकांत डोकें खुपसूनच घालवावा असें माझें म्हणणें मुळींच नाहीं. नानाप्रकारच्या खेळांतही कांहीं रिकामा वेळ घालवावा. विशेषतः ज्यांत शरीरसामर्थ्य वाढेल, अंगांत कंटकपणा येईल असले खेळ खेळावे. घरकोंबडेपणाचे खेळ होतां होईल तो खेळूं नये. बुद्धिबळांचा खेळ जरूर शिकावा. इंग्रजी व मराठी पत्ते, गंजिफा खेळण्याची माहिती असावी. परंतु या बैठ्या खेळांचे ठिकाणीं भक्ति असूं नये. होतां होईल तों मर्दुमकीचे, ज्यांच्या योगानें तनदुरुस्ती उत्तम राहील, असेच खेळ खेळावे. शरीरसंरक्षणच नव्हे, तर शरीरसंवर्धन हें आपल्या मुख्य कर्तव्यांपैकीं एक आहे. शरीराची जतन काय, नाजूकपणा करूनही होते. पण पुरुषांनीं नाजूकपणा करूं नये. मुद्दाम उनांत जाऊन काम करीत रहावें असें कधींच कोणी सांगावयाचें नाहीं. परंतु उनांत काम करण्याचा अगर खेळण्याचा प्रसंग आला असतां थोडक्याच वेळांत कोमेजून जाणें, अगर त्यामुळें कपाळ दुखून आजारी पडणें, हा नाजूकपणा अगदीं अनिष्ट. सोशिकपणा चांगला अंगीं आला पाहिजे. त्याचप्रमाणें श्रम करण्याचीही ताकद अंगांत आली पाहिजे. परंतु कोणचीही गोष्ट बेसुमार करूं नये. अगदीं व्यवस्थितपणें व नेमस्तपणेंच करावी. तथापि नाजूकपणाही बेसुमार असूं नये. तो पुरुषांना शोभत नाहीं. कित्येकांना तो भूषण वाटतो, परंतु खरोखर पहातां फाजील नाजूकपणा म्हणजे एक दूषण आहे असें पक्कें समजावें. खाण्यापिण्यांतही फाजील नाजूकपणा बिलकूल नसावा. फाजील अचरटपणाही नसावा. वयाच्या मानानें खाणें असणें हें चांगलें. त्यांत थट्टा करण्याजोगें

कांहीं नाहीं. तेव्हां अगदीं थोडें जेवणें यांत मोठेपणा आहे, असें जर तुमच्यांपैकीं कोणास वाटत असेल, तर तें अगदीं गैर. तुमच्या वयाला शोभे असें तुमचें शरीर पाहिजे, आणि तसें तें ठेवावयाचें असल्यास योग्य तिनकें खाऊन तें पचवावें, मात्र अधाशीपणा करूं नये. आणि खेळ खेळावयाचे ते शरीराला फायदा करतील असे धांवपळीचे मोकळ्या हवेंतले खेळावे. परंतु आडदांडपणाचे व अचरटपणाचे खेळूं नयेत.

येथवर तुम्ही काय करावें, या वयांत तुमचें कर्तव्य काय, या बद्दल मी सर्व प्रकारांनीं सांगितलें. आतां आणखी विशेष असें कांहीं सांगावयाचें नाहीं. जें सांगितलें त्याचें चांगलें मनन करा. प्रत्येक गोष्ट चांगली ध्यानांत धरा. तिचा आपल्या मनाशीं पुरा मिलाफ करून टाका, ह्मणजे केव्हांही तुम्हांला नावें ठेवण्यास कारण सांपडणार नाहीं. आज्ञाधारकपणा तुमचे अंगीं पक्का बाणला असला, म्हणजे मग वडील मंडळीसंबंधानें आदर व प्रेम वगैरे गुण तुमच्या अंगांत पुरतेपणीं भिनले असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. त्या आज्ञाधारकपणापासून तुमच्या मनास आत्मसंयमनाचा गोडाच धडा मिळेल, तो धडा शिकलांत म्हणजे मग तुम्हांला कधींच कांहीं अडचण पडणार नाहीं. तुमच्या हातून गैरवाजवी कृत्य होणार नाहीं. कर्तव्यतत्परता अंगीं आल्यानें कोणच्याच कामाचा कंटाळा तुम्हांस येणार नाहीं. आणि सर्व कार्यें उत्तम रीतीनें तुमच्या हातून पार पडत जातील. व्यवस्थितपणा व नियमितपणा अंगीं आला म्हणजे पुढल्या एकंदर आयुष्यक्रमांत जीं जीं कामें तुमचे अंगावर पडतील, तीं तीं करण्यास लागणाऱ्या साधनांपैकीं सगळ्यांत श्रेष्ठ अशीं साधनें तुमच्या हातीं येऊन तुमचें अर्धें काम झालें असें समजावें. अभ्यास, वाचन, खेळ वगैरे बाबतींत जें कांहीं आतां सांगितलें आहे, तें ध्यानांत ठेवलेंत, त्याप्रमाणें वागलांत, म्हणजे तुमचें शरीर व मन हीं दोन्ही तुमच्या वडील मंडळीस व गुरूंस अभिमान वाटण्याजोगींच होतील. तसें होवो, एवढेंच माझें परमेश्वराजवळ मागणें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६६२

मुलांस थोडा उपदेश.

गुणेन स्पृहणीयः स्यान्न रूपेण युतो जनः
सौगन्ध्यवर्ज्यं नादेयं पुष्पं कान्तमपि क्वचित्

[अंगीं गुण असले तरच मनुष्य मान्य होतो. केवळ रूपानें होत नाहीं. फूल दिसण्यांत पुष्कळ सुंदर आहे पण त्याला सुगंध मुळींच नाहीं. त्याला कोण हात लावतो ?]

७

मुलांनो,

ज्याप्रमाणें वर्षांत, त्याचप्रमाणें आपल्या आयुष्यांतही नांगरणीचे, पेरणीचे व सुगीचे दिवस असतात. साधारणतः ठोकळ मानानें पाहिलें तर उन्हाळा म्हणजे नांगरणीचा काळ होय. या उन्हाळ्याच्या अखेरीअखेरीस व पावसाळ्याच्या प्रारंभास पेरणीचा काळ होय. पावसाळ्यांत त्या पेरलेल्या बियाण्यास पाणी वगैरे मिळालें म्हणजे पीक चांगलें येऊन हिंवाळ्यांत त्या पिकाची कापणी, मळणी वगैरे करून धान्य तयार करावयाचें. त्या दिवसांस सुगीचे दिवस म्हणतात. आपल्या आयुष्यांतही याच प्रमाणें नांगरणीपेरणीचे व सुगीचे दिवस असतात. तुह्मी ज्या वयांत आहांत, तें वय नांगरणीचें व पेरणीचें होय. तुमचें मन या वेळीं जमिनीसारखें असतें. त्याची नीट नांगरणी करून त्यांत बीं पेरण्याचें वय हें आजचें होय. ज्याप्रमाणें चांगली नांगरणी होऊन त्यांत चांगलें बीं पेरलें व योग्य मशागत झाली म्हणजे चांगलें पीक येतें, त्याप्रमाणेंच तुमच्या या वयांत तुमच्या मनाची स्थिति आहे. आज जें बीं पेराल आणि जशी त्याची मशागत कराल, तशीं फळें व धान्यें चांगलीं येतील. नांगरणी-पे-

रणीच्या दिवसांत जर का बिघडलें, तर सगळें पीक बिघडलें; सगळें वर्ष बिघडलें. असेंच तुमचें आहे. आज या लहान वयांत जर का बिघडलें, जर का हयगय झाली, तर सगळ्या आयुष्याची धूळधाण झाली असें समजावें.

असें आहे म्हणूनच तुम्हांस विद्या किंवा गुण या वयांत शिकविण्यासाठीं तुमचे आईबाप व तुमचे गुरु अतिशय काळजी घेत असतात. सर्व वर्षभर सुखांत जावें अशी इच्छा असली, तर योग्य वेळीं नांगरणी केली पाहिजे आणि त्यांत चांगलें बीं पेरलें पाहिजे. असें नाहीं केलें, शेत तसेंच पडूं दिलें, तर त्यांत गवत मात्र माजेल. तशीच सध्याच्या वयांत तुमच्या मनाची स्थिति आहे. आज त्याची जर चांगली नांगरणी केली, आणि त्यांत सुविचारांचें बियाणें पेरलें, तर सर्व आयुष्य तुम्हांस व तुमच्याशीं ज्यांचा संबंध आहे त्यांस मोठें सुखाचें जाईल.

इमारत बांधावयाची, तर पाया चांगला पाहिजे. आणि पाया भरावयाचा, तो सगळ्यांच्या आधीं भरला पाहिजे. पुढच्या आयुष्याची सर्व इमारत, या वयांत तुह्मी पाया भराल, त्यावर उभी राहणार आहे. आज पाया चांगला भक्कम व शुद्ध असला, तर इमारतीची मुळींच काळजी नको.

या सर्व गोष्टी तुम्ही ध्यानांत धरल्यात, म्हणजे तुम्हाला आह्मी क्षणोक्षणीं उपदेश कां करीत असतों, त्याचें कारण सहज तुमच्या ध्यानांत येणार आहे. जितका तुह्मांला उपदेश करावा, तितका या वयांत थोडाच आहे. कारण, चांगल्या गोष्टी कितीही वेळां सांगितल्या, तरी त्या ध्यानांत राहण्यास मोठ्या कठिण असतात. त्यांची आवृत्ति किती वेळां जरी झाली, तरी पाहिजेच असते.

या वयांत ज्या विषयांची पेरणी तुमच्या मनांत झाली पाहिजे, त्यांत अगदीं मुख्य स्थान सत्याच्या बियास दिलें पाहिजे. सत्याची आवड ही फार अवश्य आहे. परंतु ती जितकी अवश्य आहे, तितकीच ती दुर्लभही असते. अगदीं क्षुल्लक कारणाकरितां खोटें बोलावेंसें वाटतें. आणि या खोटें बोलण्याच्या संवयीचें आणखी एक मोठें वाईट लक्षण असें आहे कीं, तें जसजसें बोलत जावें,

तसतसें त्याच्याबद्दलचें प्रेम वाढतच जातें. एकदां बोललें, कीं, दुसऱ्यानें बोलावेंसें वाटतें. दुसऱ्यानें बोललें, कीं तिसऱ्यानें. तिसऱ्यानें बोललें, कीं चवथ्यानें. होतां होतां खरें बोलणें ह्मणजे एक फारच कठिण गोष्ट होऊन रहातें. बरें, खोटें बोलण्यास नेहमींच कांहीं तशीं कारणें लागतात असेंही नाहीं. पहिल्या प्रथम कारणानें प्रारंभ होत असतो. आपल्या हातून एखादा अपराध होतो. हा अपराध आपल्या हातून झाला हें कळलें, तर आपणास शिक्षा होईल असें भय वाटतें, आणि ती शिक्षा टाळावी अशी सहज इच्छा उत्पन्न होते. आपल्या हातून तो अपराध मुळींच झाला नाहीं असें सांगितलें व तो छपवला ह्मणजे काम झालें असें वाटून अर्थात्च पहिलें खोटें बोलणें सुरू होतें. त्या खोटें बोलण्यानें आपलें काम झालें, म्हणजे मग अर्थात्च दुसऱ्या खेपेस तीच इच्छा अधिक जोरानें पुढें सरसावते. पहिल्या खेपेस नुसतें खोटें सुचवून किंवा कांहीं दुटप्पी बोलून काम झालें असलें, तर या दुसऱ्या खेपेस साफ नाहीं म्हणून बोलून उठून आपलें काम साधून घेण्यास कांहींसुद्धां वाटत नाहीं.

मुलांनो, एवढ्यानेंच हें गाडें थांबत नाहीं. प्रथमतः आपल्या हातून घडलेला अपराध अगदीं सहजीं, न जाणतां घडलेला असतो; परंतु तो आपल्या हातून घडला असें कळलें, तर आपल्याला शिक्षा होईल, ती होऊं नये म्हणून आपण तो अपराध केला नाहीं, असें खोटें बोलून ती शिक्षा टाळतों. पण दोन चार वेळां ती आपल्या खोटें बोलण्यानें टळली, म्हणजे पांचव्या वेळेस आपण मुद्दाम एखादा अपराध करण्यास तयार होतों. तो अपराध आपण केला असें कोणास कळलें नाहीं म्हणजे झालें, असें आपल्या मनांत येतें. आणि आतांपर्यंत जसें खोटें बोलत आलों, त्याप्रमाणेंच जर बेमालुम खोटें बोललों, तर काम होतेंच आहे, असा अनुभव आला असल्याकारणानें अपराध करून तो लपविण्यास आपण कमी करीत नाहीं. एका मुलानें प्रथमतः सहजीं सांपडलेल्या पैशाचें बाजारांत कांहीं विकत घेऊन खाल्लें. पुढें घरीं ज्याचा पैसा हरवला होता त्यानें, माझा असा असा पैसा कोठें

तरी पडला होता, कोणास सांपडला काय, असा शोध चालविला असतां अर्थात्च या मुलास मोठी पंचाईत पडली. सांपडला म्हणावें, तर तो कुठें आहे असा प्रश्न येणार आणि बाजारांत कांहीं घेऊन खाल्लें म्हटलें, तर अर्थात्च कांहीं शिक्षा होणार; निदान बोल तरी बसणार. तेव्हां आपण कांहींच बोलूं नये असा त्यानें बेत केला. परंतु तितक्यांत ज्याचा पैसा हरवला होता, त्यानें इतरांस विचारतां विचारतां त्यासही विचारलें. जोंपर्यंत मुद्दाम विचारलें नव्हतें, आपला सहजीं शोध चालला होता, तोंपर्यंत कांहीं न बोलणें साजलें; परंतु प्रत्यक्ष विचारल्यानंतर होय किंवा नाहीं असें स्पष्ट उत्तर देणें भागच होतें. 'होय' म्हटलें; तर "इतका वेळ कां बोलला नाहींस ?" आणि "पैशाचें काय केलेंस ?" हे दोन प्रश्न आलेच. त्या प्रश्नांचीं उत्तरें धड देतां यायचीं नाहींत, आणि दिलीं, तर शिक्षा होणार ! इतकी खटपट पाहिजे कशाला? साफ 'नाहीं' असें उत्तर दिलें, कीं सारीच खटपट चुकली. असा तात्पुरता विचार करून त्यानें साफ "नाहीं" असें उत्तर ठोकून दिलें. त्यावेळची शिक्षा चुकली. त्याला पैसा सांपडला असून त्यानें तो बाजारांत त्याचा खाऊ विकत घेऊन खाऊन टाकला असून, केवळ खोटें बोलण्यानें, केवळ एकवार "नाहीं" ह्मणण्यानें काम भागलें, मग आणखी काय पाहिजे ? तें "नाहीं" म्हणतांना, तो खोटें बोलण्याचा पहिलाच प्रसंग असल्याकारणानें त्याच्या मनानें पुष्कळ आढेवेढे घेतले, परंतु तसें ह्मटल्यानें आपलें काम झालें असें दिसतांच दुसऱ्या खेपेस त्याच्या मनाला आढेवेढेसुद्धां घेण्याची जरूरी राहिली नाहीं. इतकेंच नव्हे; तर पैसा सांपडण्यापर्यंत आतां त्यानें वाट पाहिली नाहीं. पैसा जेथें असण्याचा संभव तेथें जाऊन त्यानें तो आपणास मुद्दाम सांपडविला, आणि त्याचीही त्या पहिल्या पैशाप्रमाणेंच वासलात लावून, घरांत अमक्या खणांत ठेवलेल्या पैशांपैकीं पैसा गेला, तो कोणी नेला अशी चौकशी सुरू झाली असतां, आपणास कांहींसुद्धां ठाऊक नाहीं असें कोणी न विचारतां आपणच मुद्दाम ह्मणण्यास व असा पैसा कसा गेला, कोणाला तुम्हीं दिला असून आतां तु-

झाला आठवण नसेल, असें सुचविण्यास त्या मुलाला मुळींसुद्धां दिक्कत वाटली नाहीं.

ही या मुलाची गोष्ट किती घरांतून तरी घडते. अशा तऱ्हेनें सहजीं घडलेल्या अपराधावर खोटें बोलण्यानें एकदोन वेळां पांघरूण पडल्याकारणानें तसें खोटें बोलण्याची उमेद येऊन चोऱ्यामाऱ्यासारख्या अपराधांपर्यंत मजल गेल्याचीं उदाहरणें थोडींथोडकीं घडतात असें नाहीं. परंतु त्यांचे परिणाम कधींही बरे झालेले नाहींत. लवकरच त्यांचें तें कृत्य, त्यांची ती संवय बाहेर पडून सगळ्या जगभर फट्फजिती होते. त्यांच्या नजरेस पडेल अशा रीतीनें कोणी कोणताही जिन्नस ठेवीत नाहीं. त्यांच्या बोलण्यावर कोणीही भरंवसा ठेवीत नाहीं. तुमच्या पहिल्या कीं दुसऱ्या पुस्तकांत सांगितलेल्या धनगराच्या पोराच्या गोष्टीप्रमाणें त्यांची अवस्था होते. त्यांचें नांव निघालें कीं, जो तो नाक मुरडतो, त्यांची संगत आपणांस नको असें म्हणतो आणि त्यांस टाळीत असतो. आपल्या मुलांस अशा मुलांची संगत लागूं नये म्हणून आपल्या मुलांपासून त्यांस दूर राखतो. सारांश, एखाद्यास फार अमंगळ असा रोग झाला असतां त्यास लोक ज्या तऱ्हेनें वागवूं लागतात, त्याच तऱ्हेनें यांस वागवूं लागतात. रोग झालेल्या माणसाची ज्यास त्यास दया तरी येते; परंतु या असत्याच्या रोगानें पिडलेल्या माणसाची कोणास दयासुद्धां येत नाहीं. जो तो त्याचा तिट्कारा करतो. हें असत्य—खोटें बोलणें इतकें वाईट आहे. याच्यापासून सर्व अपराधांची उत्पत्ति होते आणि याचें बीं जर अंगीं रुजूं दिलें नाहीं, तर कोणचाही अपराध, कोणचाही गुन्हा, कोणचेंही वाईट कृत्य करण्याची बुद्धि होत नाहीं. एवढ्याकरितां अगदीं लहानपणापासून आपल्या अंगीं सत्यनिष्ठा, म्हणजे सत्याची आवड ही अगदीं रुजवून घेतली पाहिजे आणि असत्याचा अगदीं मनापासून तिटकारा केला पाहिजे. मुलगा स्वरूपानें चांगला असणें हें त्याच्या हातचें नाहीं, परंतु तो मनानें चांगला असणें हें अगदीं त्याच्या हातचें आहे. पाणीदार व मोठाले डोळे नसेनात, पण त्यांत सत्याचें

पाणी चमकलें पाहिजे. असत्यानें ते आकुंचित होतां कामा नयेत. खोटें बोलणारा कधीं वर तोंड करून बोलत नाहीं. त्याचे डोळे मोठाले असले, तरी ते पुरेतेपणीं उघडून सरळ पाहून बोलण्याची त्याला लाज वाटते. तो खालीं पाहतो. आणि ज्याला खोट्याचें वारेंही नसतें, त्याला लाजून खालीं पाहण्याचें कारणच नसतें. मुलगा असा असावा कीं, त्याच्या नखशिखांत खरें बोलणें भिनलें आहे असें पाहणारास वाटावें. दुसऱ्यास फसवणें, खरी गोष्ट एक असून ती दुसऱ्याला निराळ्याच तऱ्हेनें भासविणें इत्यादि गोष्टींचा तिट्कारा तुमच्या अंगीं किती आहे, हें अगदीं तुमच्या प्रत्येक हालचालींत बोलण्यावरण्यांत दिसलें पाहिजे. अमुक एक प्रसंगीं खोटें बोललें म्हणून काय झालें, असा विचार तुमच्या मनांत कधींहि येऊं नये. पुष्कळ वेळां आपण असे उद्गार काढतों, "कायहो, थट्टेंत खोटें बोललें म्हणून काय झालें ? खेळांत खोटें बोललें म्हणून काय झालें ?" परंतु जो थट्टेंत वाटेल तसें खोटें बोलण्यास दबकत नाहीं, तो एरवींही दबकावयाचा नाहीं. खेळांत इतरांना फसविण्यांत ज्याला कांहीं वाटत नाहीं, तो केव्हांही आपल्या फायद्यासाठीं इतरांना फसविण्यास चुकावयाचा नाहीं. एवढ्याकरितां खोटें बोलण्याचा अवगुण थट्टेंत, खेळांत, किंबहुना स्वप्नांतसुद्धां आपल्या अंगांत शिरूं देतां कामा नये. तो अवगुण गोचिडासारखा आहे. एकदां त्याचें डोकें खुपसूं दिलें, कीं त्यानें पक्कें ठाणें दिलेंच आणि आपली प्रजा—म्हणजे नानाप्रकारचे इतर अवगुण त्यानें आपल्या मागोमाग आणलेच म्हणून समजावें. तेव्हां त्याचें बीं रुजूं न देण्यांतच कायती खबरदारी घेणें जरूर आहे. चिखल अंगाला लागल्यानंतर धुण्यापेक्षां चिखल लागूं न देणें यांतच शहाणपणा आहे. ज्या मुलाचे अंगीं हा अवगुण नसतो, तो मुलगा सर्वथा चांगला असावयाचा, असें धरून चालण्यास मुळींच हरकत नाहीं. त्याच्या डोळ्यांत प्रामाणिकपणा दिसतो. त्याच्या अंगीं सत्याचें तेज असतें. त्याचें अंतःकरण शुद्ध असतें. त्याच्या चेहऱ्यावर आल्हाद देणारें असें स्मित नेहमीं असतें आणि त्यानें कांहीं सांगितलें

किंवा अमुक एक करतों म्हणून वचन दिलें, तर त्यावर सर्वांचा विश्वास असतो. त्याचा कधीं कोणी तिरस्कारा करीत नाहीं. त्याला जो तो जवळच करतो. एका सत्याच्या अंगीं इतक्या सर्व उत्कृष्ट गोष्टी आहेत, यावरून त्याची थोरवी केवढी आहे, याचा विचार तुम्हींच करा. आणि तें सत्य आपल्या अंगोंअंगीं बाणून जाईल अशी खबरदारी घ्या.

स्पष्टपणें खोटें बोललें नाहीं, परंतु खोटें भासविलें, तरी तें अतिशय वाईटच. खोटें तेंच खरें असें भासविण्याचा एक प्रकार, खरें काय आहे तें न सांगणें हा होय. आपल्या हातून कांहीं अपराध झाला, तर आपल्या वडील मंडळीकडे अगर गुरूकडे चट्कन जाऊन तो कबूल करणें म्हणजे खरी सत्यनिष्ठा दाखविणें होय. परंतु तो अपराध निराळ्या मार्गांनीं लोकांस उमगेपर्यंत आपण जणूं काय त्या वाटेचींच नव्हों असें भासविणें म्हणजे खोटें बोलल्याप्रमाणेंच झालें असें समजावें. कां कीं, आपल्या मुक्यास्यानें बसण्याचा हेतु आपल्या हातून तो अपराध झाला असें लोकांस कळूं नये एवढाच होय. हा हेतु कांहीं चांगला नव्हे. जें आपल्या हातून झालें, तें मोकळ्या मनानें आणि उघडपणानें कबूल करण्यांतच खरी सत्याची आवड व खरें धैर्य दिसतें. ती आवड व तें धैर्य आपल्या अंगीं असण्याची नेहमीं इच्छा बाळगावी व तसाच प्रयत्न असावा.

असत्य शब्द उच्चारावयाचे नाहींत असा बाणा बाळगावयाचा, त्याचप्रमाणें अमंगळ शब्द उच्चारावयाचे नाहींत किंवा ऐकावयाचे नाहींत असाही बाणा बाळगावा. असत्य शब्दांच्या इतकेच अमंगळ शब्दही वाईट असतात. त्यांचें वारेंसुद्धां आपणास लागूं देऊं नये. जे शब्द आपल्या परमपूज्य अशा वडील मंडळीच्या देखत उच्चारावयास आपणास लाज वाटेल व भय वाटेल असे शब्द केव्हांही उच्चारणार नाहीं, असा प्रत्येकानें निश्चय करावा. कित्येक मुलांना एकमेकांस शिव्या देण्याची फार संवय असते. अभद्र भाषण बोलण्यांत, अमंगळ थट्टा करण्यांत त्यांना मौज वाटते, परंतु तें अतिशय वाईट. नासक्या कुचक्या पदार्थांची व घाणेरड्या

वस्तूची दुर्गंधि जशी कोणास कधीं बरी वाटत नाहीं, तशींच घाणेरड्या शब्दांची दुर्गंधिही अतिशय तिट्कारा आणणारी असते. ते शब्द आपल्या जिव्हेपासून तर दूर ठेवावेतच, परंतु कानापासूनही दूर ठेवावेत. म्हणजे आपल्या देखत कोणी मुलानें तसे शब्द उच्चारूं नयेत असें करण्याची खटपट करावी, यांतच चांगुलपणा आहे.

सत्याची आवड आणि अमंगळ शब्दांचा तिट्कारा या दोन गोष्टी मुलांनीं आपल्या अंगीं रुजतील अशाबद्दल खबरदारी घेतली म्हणजे बाकी किती तरी चांगल्या गोष्टी त्यांच्या अंगीं आपोआप येतात. उदाहरणार्थ, आपलीं कर्तव्यें करण्याची आवड त्यांच्या अंगीं आपोआपच उत्पन्न होते. कारण, आपण आपलें काम अमुक वेळीं करावयाचें असून केलें नाहीं असें वारंवार ह्मणण्याची लाजच वाटते. अपराध कबूल करणें हें चांगलें खरें, परंतु उठल्यासुटल्या हातून अपराध होणें, आणि ते कबूल करून वाईट वाटून मान खालीं घालण्याची पाळी येणें, हें कांहीं चांगलें नव्हे. त्यांत कांहीं भूषण नाहीं. अर्थात् असे अपराध आपल्या हातून होऊंच नयेत, असें वारंवार वाटून मनुष्य आपलीं कर्तव्यें करण्यांत जागरूक राहतोच.

आणि आपलीं कर्तव्यें करण्याची संवय एकदां लागली कीं, मग तीं वेळच्या वेळीं करण्याचीही इच्छा उभी राहून नियमितपणा अंगीं येतो. मग कोणत्याही प्रकारचें कर्तव्य अंगावर येऊन पडलें तरी तें मी कसें करूं आणि केव्हां करूं, असें होऊन त्याची तारांबळ उडत नाहीं. तुम्हां मुलांचीं कर्तव्यें तीं किती ! शाळेंतील अभ्यास करावयाचा, शरीरप्रकृति नीट रहावी म्हणून व्यायाम करावयाचा, खेळ खेळावयाचे आणि आईबापांच्या व इतर वडील मंडळीच्या सांगण्याप्रमाणें वागावयाचें. या तीन गोष्टी झाल्या, म्हणजे तुमच्या कर्तव्यांची यादी संपली ही गोष्ट खरी. परंतु या तीन कर्तव्यांतच सर्व कर्तव्यांचें सार आलें आहे, कसें तें पहा:—

वर सांगितलेली सत्याची आवड, अमंगळ शब्दांची नावड, नियमितपणें कर्तव्य करण्याची संवय, या सगळ्या गोष्टी जरी

साधाव्या, तरी त्या आपल्याला व इतरांना आनंद होईल अशा तऱ्हेनें साधण्यांत विशेष भूषण आहे. समजा कीं, तुम्ही कांहीं खेळ खेळण्याच्या अगदीं भरांत आलां आहां आणि इतक्यांत कांहीं कामासाठीं तुमच्या आईनें तुह्मांस खेळ टाकून बोलाविलें, तर कर्तव्य करावयाचें, आईचें ऐकावयाचें, म्हणून तुम्ही जालच. पण जाण्याजाण्यांत फरक आहे, याचा विचार करा. जो मुलगा चडफडत तडफडत जाईल, पाय आपटीत जाईल, कपाळाला आंठ्या घालून "काय बोआ तुझा त्रास आहे, आम्हाला सुखाचं खेळूंसुद्धां देत नाहींस" असें म्हणून तिच्या भोंवतीं भुणभुण लावांत बसेल, किंवा तिनें सांगितलेलें काम आदळआपट करून करील, त्याच्याबद्दल त्याच्या आईस काय वाटेल ? तिला त्याच्याकडे पहाण्यापासून, त्याची भुणभुण ऐकल्यापासून, किंवा त्यानें केलेल्या त्या कामापासून यत्किंचित् तरी समाधान वाटेल काय ? याला बोलावणें नको, आणि याचें हें कामही नको, असें वाटणार नाहीं काय ?

उलट पक्षीं समजा, दुसरा मुलगा मोठ्या हौसेनें उल्हासित वृत्तीनें धांवत जाऊन 'काय काम आहे?' म्हणून आईला विचारील, काय काम असेल तें शांतपणें ऐकून घेऊन सुखासमाधानानें करील, 'आणखी काम आहे काय?' असें विचारील, आणि "तुला मदत करण्यांत मला खरोखर किती तरी आनंद वाटतो" असें आईला वाटवील, त्या मुलापासून सगळ्यांना किती सुख होणार आहे! त्याच्या हंसतमुखाकडे पाहून, त्याच्या उल्हासाकडे पाहून, आपल्याला मदत करण्याविषयींची त्याची उत्सुकता पाहून, त्या आईस किती धन्यता वाटणार आहे ! तुह्मीच पहा, आपल्या मनापुढें हीं दोन चित्रें उभीं करा. एके बाजूस त्या कुरटून त्रासून कपाळाला आंठ्या घालून पुटपुटत भुणभुणत चाललेल्या मुलाच्या चेहऱ्याकडे पहा. आणि दुसऱ्या बाजूस त्या दुसऱ्या मुलाच्या हंसणाऱ्या, उल्हसित अशा चेहऱ्याकडे पहा. कोणच्या चेहऱ्याकडे पाहिल्यानें तुम्हांस आनंद होईल याचा विचार करा. आणि अशा प्रसंगीं आपला चेहरा कसा असावा, हेंही आपल्या मनाशीं ठरवा.

आपलीं कर्तव्यें कशीं तरी त्रासून जाजावून करून टाकण्यांत भूषण नाहीं, तर तीं करीत असतां आपल्या स्वतःस किंवा दुसऱ्या कोणास त्रास न वाटतां उलट आनंदच वाटावा, अशा तऱ्हेनें तीं कर्तव्यें केलीं पाहिजेत हें लक्ष्यांत धरा. आणि हें लक्ष्यांत धरून मोठ्या उल्हासित वृत्तीनें आपलीं कर्तव्यें करीत गेलां, तरच त्यांत खरें भूषण, खरें सुख, खरें समाधान आहे. आपलें कर्तव्य अंतःकरणपूर्वक केलें पाहिजे ही आणखी एक गोष्ट लक्ष्यांत धरली पाहिजे. काम करायाचें आहे, तें कसें तरी सारून टाकायचें, हें अगदीं अप्रशस्त. आपलें सगळें चित्त, आपला सगळा उत्साह हीं त्या कामांत घातलीं, तरच तें काम केल्याचें सार्थक आणि तरच तें काम उत्तम प्रकारें जसें व्हायला पाहिजे तसें होतें. कामांत मन नाहीं, आणि काम केलें, तर कांहीं सुद्धां उपयोग होणार नाहीं, हें सांगायला पाहिजे असें नाहीं. चोख काम करायचें, तर त्यांत आपलें मन पूर्णपणें लावूनच तें केलें पाहिजे. ग्लाडस्टनसाहेबांचें नांव तुम्ही ऐकलें असेल. हे एक या शतकांत इंग्लंड देशांत फार थोर मुत्सद्दी होऊन गेले. ते नेहमीं ह्मणत, 'मी जेव्हां जें काम करीत असेन त्यांत पूर्णपणें गढलेला असतों; खेळत असतों, तेव्हां खेळाखेरीज कोणच्याही दुसऱ्या गोष्टीकडे माझें चित्त नसतें; कांहीं लिहित असलों, तर त्यांतच पूर्णपणें चित्त असतें; वाचतांना तसेंच. कोणचेंही काम करीत असतांना अगदीं तसेंच असतें.' ते ज्या थोर पदवीस जाऊन पोहोंचले, व त्यानीं फार मोठा नांवलौकिक मिळविला, तो मिळविण्यास अनेक कारणें झालीं; परंतु त्या सर्वांत एक मोठें कारण होतें तें हा त्यांच्या अंगचा चित्त लावून काम करण्याचा गुण होय, यांत मुळीच शंका नाहीं.

चांगला मुलगा असें ह्मणवून घेण्यास अंगीं लागणाऱ्या गुणांत दुसऱ्यावर दया करण्याची अथवा आपल्या हातून होईल तितकी दुसऱ्यास मदत करण्याची बुद्धि हा एक गुण अवश्य असावा लागतो. आईबापांनीं किंवा गुरूंनीं आपणांस सांगितलेलीं कामें, किंवा जीं आम्हीं केलीं पाहिजेत असें त्यांस वाटत असतें तीं

कामें केल्यानें आम्ही आपल्या कर्तव्याला जागलों असें होतें खरें; परंतु कोणी हुकूम केला म्हणून नव्हे, तर आपल्याच सद्बुद्धीला वाटलें म्हणून आपण जीं कामें करतों, त्या कामांपासून होणारा आनंद कांहीं निराळाच असतो. अडल्या माणसाच्या उपयोगीं पडल्यानें त्यास जे उपकार वाटतात, ते कांहीं निराळेच असतात, आणि त्या वेळीं त्याच्या तोंडून जे आपल्याला आशीर्वादपर व स्तुतिपर उद्गार निघतात त्यांनीं मनाला आनंद होतो तो कांहीं निराळाच होय. त्या आनंदाचें वर्णन करणें शक्यच नाहीं. एवढ्याकरितां आपण नेहमीं दुसऱ्याच्या उपयोगीं कोणच्या तऱ्हेनें पडूं याचा विचार करीत असावें. घरांतल्या घरांत का होईना, पण कोणाला काय हवें; कोणाला कोणच्या वेळीं आपण मदत करण्यास गेलों, तर आनंद होणार आहे, इत्यादि गोष्टींचा विचार करून दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्यास झटत असावें. बारीक गोष्टींत सुद्धां केव्हां केव्हां आपल्याला दुसऱ्याच्या उपयोगीं कसें पडतां येतें, याचें एक थोडक्यांत तुम्हांला उदाहरण सांगतों. एके दिवशीं मी आपल्या घरांत माडीच्या खिडकींत उभा होतों. आणि एक हमाल बिचारा धान्याच्या पोत्यानें अगदीं वांकलेला असा आमच्या समोरच्या घराच्या दारांत गेला. त्यानें त्या दाराला आपल्या हातांनीं मागें लोटून आपण आपलें पोतें सांवरून आंत शिरण्यास जावें तर तीं दारें एकदम येऊन लागत. असें तीन वेळां झालें. तेव्हां मी खालीं जाऊन दार उघडून धरून त्यानें आंत जाण्याची तजवीज करावी म्हणून निघालों. मी आपल्या दारांत गेलों, तों रस्त्यानें जाणाऱ्या एका मुलानें तेथें जाऊन दारें उघडून धरून हमालास आंत जाण्याची तजवीज केली. तें पहातांच मला त्या मुलाच्या कनवाळूपणाबद्दल फार कौतुक वाटलें. बारीकसारीक गोष्टींत कनवाळूपणा बाळगणें, हा गुण फार योग्यतेचा आहे, तो याचमुळें. त्या हमालाच्या पाठीवर एवढी गोणी होती, परंतु आपळा कनवाळा करून त्या मुलानें दारें उघडून धरिल्याबद्दल त्याला किती तरी उपकार झाल्यासारखें वाटलें! त्यानें आपल्या त्या दमलेल्या आवाजानेंच कां होईना, पण त्या मुलास किती तरी आशीर्वाद

दिले. गोष्टी उगीच बारीक असतात, पण तेवढ्यांतच थोडी आणि वेळेवर अशी मदत जर मिळाली, तर मनुष्यास किती तरी उपकार वाटतात. हीं कामें अशीं असतात कीं, तीं केल्यानें आपणास कांहीं विशेष श्रम पडतात असें नाहीं, पण ज्याला मदत म्हणून तीं करावीं त्यास मात्र त्यांचें फारच ओझें वाटतें. आपण अशाच बारिकसारीक गोष्टींकरितां नडून बसलों, तर आपल्याला अशी मदत करण्याचें कोणाचे तरी मनांत येऊन आपल्याला दुसरे लोक असेच मदत करण्यास तयार होतील. रस्त्यानें जाणाऱ्या आंधळ्याला हातीं धरून वाटेला लावणें, किंवा पाय घसरून पडणाऱ्यास हात देऊन सांवरणें, ओझें उतरून विश्रांति घेऊन पुन: ओझें उचलण्यास कोणी मिळेल काय म्हणून इकडून तिकडे पहाणाऱ्या गरीब ओझेकऱ्यास मदत करून त्याचे डोईवर ओझें देणें, या गोष्टी कित्येकांस अगदीं हलक्या वाटतात; परंतु वस्तुत: अशा प्रकारानें नडलेल्यांस मदत करणें म्हणजे लहानपणाचें काम नव्हे, इतकेंच नव्हे, तर मोठेपणा देणारें आहे म्हटलें तरी चालेल. म्हणून सांगतों कीं, अशा कामीं तुम्ही कधींसुद्धां मागें घेऊं नका. पुढें होऊन हातभार लावीत जा. तसें केल्यानें तुम्हांस आनंद होईल व तुमच्या स्नेह्यांसोबत्यांस व घरच्या मंडळींससुद्धां तुमच्याबद्दल चांगलेंच वाटेल. आपल्यापासून दुसऱ्यास उपयोग झाला नाहीं, आपल्यापुरतें आपण पाहिलें, तर त्या जिण्यांत अर्थ काय ?

परीक्षा चालली आहे, तुम्ही आपलीं प्रश्नपत्रें घेऊन उत्तरें लिहितां आहां, अशा वेळीं एखाद्या मुलानें तुम्हांस उत्तरें विचारलीं, किंवा कापी करण्यासाठीं तुमचे कागद मागितले, तर ते तुम्ही देणें किंवा अशा वेळीं मदत करणें अगदीं गैर होईल, यांत तिलप्राय संशय नाहीं. तसें तुम्ही करूंच नये. कां कीं, तें गुरूंच्या आज्ञेविरुद्ध आणि फसवणारांस त्यांच्या फसवणुकीच्या कामीं मदत केल्याप्रमाणें होणारें आहे. परीक्षेचे वेळीं प्रत्येक विद्यार्थ्यानें त्या वेळेपर्यंत काय काय तयारी केली आहे तें पहाण्याचें काम असतें. दुसऱ्याच्या मदतीनें उत्तरें दिल्यास त्यांत खरी परीक्षा होत नाहीं

अर्थातच अशा प्रसंगीं मदत करणें म्हणजे खोटें काम करण्यास मदत केल्यासारखेंच होतें. परंतु ज्या वेळीं असें कांहीं नसतें, एखादें टांचण एखादा उतरून घेण्यास चुकला, किंवा एकादें उदाहरण मास्तरांनीं समजवून दिलें, पण एखाद्यास समजलें नाहीं, किंवा तसेंच दुसरें उदाहरण सोडवितांना रीत बरोबर लागली नाहीं, अशा वेळीं त्यानें आपल्या स्नेह्यास विचारलें, तर त्याला तें समजवून देणें हें आपलें काम आहे असें समजावें. आपलें ज्ञान हें आपल्याजवळच ठेवल्यानें कधीं वाढत नाहीं. तर तें दुसऱ्यास दिल्यानेंच वाढतें. कित्येक मुलांची अशी चाल असते कीं, आपल्याला येत असेल तें मुद्दाम लपवून ठेवावयाचें, आणि आयत्या वेळीं काढून वर नंबर मारावयाचा. यांत एक प्रकारचा मत्सर, एक प्रकारचा आप्पलपोटेपणा मात्र दिसतो. दुसरें तर कांहींसुद्धां दिसत नाहीं. आपल्याबरोबरीचा विद्यार्थी का असेना, जर त्याला येत नाहीं म्हणून तो विचारतो आहे, तर अगदीं मनापासून त्यास सांगावें; त्याला येत नाहीं म्हणून तो विचारतो आहे, तर त्याला सांगावयाचें नाहीं किंवा खोटेंच सांगावयाचें हें बरें नव्हे; खोटेंच सांगावयाचें हें तर अगदींच नीचपणाचें काम. तें तुम्ही कधीं करूं नये. नंबर वर मारणें चांगलें खरें, परंतु तो सरळपणानें वागून मारला तरच त्यांत पुरुषार्थ नाहीं तर कसला पुरुषार्थ आला आहे ? मुलांनीं कसें अगदीं निष्कपटपणें उघड मनानें एकमेकांशीं वागावें यांतच मोठेपणा आहे. आपलें ज्ञान चोरून आपल्या टिपणवह्या कोणाला द्यावयाच्या नाहींत, आपलें पुस्तक दाखवयाचें नाहीं, असें करून कधींही कोणी चांगलें म्हणावयाचें नाहीं. आणि तसें करणें हें माणुसकीला शोभतही नाहीं.

या असल्या बारीकसारीक प्रसंगीं जर तुम्ही दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याचा धडा शिकाल, तरच तो गुण तुमच्या अंगीं ठसणार आहे. कां कीं, मी पहिल्यानेंच तुम्हाला सांगितलें आहे कीं, जे काय गुण तुम्हांला शिकावयाचे आहेत, पुढच्या आपल्या आयुष्यक्रमांत उपयोगीं पडण्यासाठीं ज्या ज्या गुणांची सामग्री

तुम्हास तयार करून ठेवावयाची असेल, ती सर्व आज या तुमच्या वयांतच करणें जरूर आहे. आज या गुणांची पेरणी झाली नाहीं, तर पुढें कधींही होणें नाहीं असें पक्कें समजा. आणि आज कित्येक वर्षें जो आह्मी तुम्हांस उपदेश करीत आलों आणि नेहमीं करतों, त्याचें पूर्ण स्मरण ठेवून आज ज्या ज्या गुणांविषयीं विशेष खुलाशानें आतां तुम्हांस सांगितलें आहे, ते ते गुण आपल्या अंगीं आणण्यास झटा. इतकेंच सांगून तुम्हांस सुटी देतों. या सुटींत सर्वच वेळ खेळूं नका. कांहीं वेळ उजळणी करण्यासाठीं, कांहीं वेळ नवीन ज्ञान मिळविण्यासाठीं खर्चून बाकीच्या वेळांत वर सांगितल्या नियमांना अनुसरून मौज करा व खेळा.

वाचन.

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।
व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥

१. प्रत्यक्षरीत्या म्हणा, परोक्षरीत्या म्हणा, मनुष्य शिक्षित होत असतो. तो स्वतः आपल्या खटपटींनीं शिक्षित होतो; इतकेंच नाहीं, परंतु ज्या गोष्टी घडणें अगर न घडणें हें त्याच्या हातचें नाहीं त्या गोष्टींपासूनदेखील त्याला शिक्षण मिळत असतें. त्याच्या एकंदर ज्ञानापैकीं उपजत ज्ञानाचा अंश काढूं म्हटलें तर तो इतका थोडा सांपडेल कीं, तो जमेंतदेखील धरतां येणार नाहीं. त्याच्या ज्ञानांतील बहुतांश अनुभवजन्य असतो. जगांत आल्यानंतर अनेकविध व्यापार व व्यवहार पाहून तो ज्ञानी होतो. असल्या तऱ्हेचे व्यापार व व्यवहार पाहून जें अनुभवजन्य ज्ञान त्याला येतें त्यामुळेंच त्याच्यांत व इतर प्राण्यांत ज्ञानाच्या संबंधानें फरक पडला आहे. अस्तु.

वर सांगितलेलें अनुभवजन्य ज्ञान द्विविध आहे. एक स्वतःच्या अनुभवापासून प्राप्त होणारें व दुसरें दुसऱ्याच्या अनुभवापासून प्राप्त होणारें. इतर पशूंत व मनुष्यप्राण्यांत शहाणपणाच्या कामीं इतका थोरला फरक पडण्याचें कारण परानुभवजन्य ज्ञानच होय. मनुष्यास काय किंवा इतर प्राण्यास काय, सृष्टींत आल्यापासून स्वतःचा अनुभव हा आहेच आहे. परंतु मनुष्य स्वतःच्या अनुभवाचा फायदा करून घेऊन इतरांस आपला अनुभव सांगतो व आपण इतरांचा घेतो, यामुळें त्याच्या ज्ञानांत पराकाष्टेची भर पडते. पशूंचें तसें नाहीं. एखादें ढोर एखाद्या मार्गानें जातानां पडलें तर तें स्वतः पुनरपि कधींही त्या वाटेनें जाणार नाहीं; परंतु हा आपला अनुभव दुसऱ्या ढोरास त्याला सांगतां

येत नाहीं; किंवा दुसऱ्याचा अनुभव त्यास कळत नाहीं; ही गोष्ट ध्यानांत आणिली ह्मणजे आपणास सहज असें दिसून येईल कीं, मनुष्याचें उपजत अथवा सहज ज्ञान अत्यंत थोडें आहे. इतकेंच नाहीं, तर त्याचें स्वानुभवजन्य ज्ञानही अत्यंत थोडेंच आहे. परानुभव जाणून घेण्याची अक्कल नसती तर तो पशूइतका शहाणा राहिला असता; परंतु दैवयोगानें तशी गोष्ट नाहीं. इतकेंच नव्हे, तर उलट परानुभव आपल्यास कळावा व आपला अनुभव दुसऱ्यास जाणवावा म्हणून अनेक साधनें व युक्त्या तो काढीत आहे व त्या काढण्याची त्याची अक्कल उत्तरोत्तर वाढतही आहे. पराचा अनुभव आपणांस कळावा म्हणून ज्या काय गोष्टी त्यानें बनविल्या आहेत त्यांपैकीं 'भाषा' ही एक सर्वांत महत्वाची गोष्ट आहे. ही भाषा जर नसती तर परानुभव-जन्य-ज्ञान नेत्रादि इंद्रियांच्या द्वारें मिळतें तेवढेंच. आणि तें किती मित असतें हे येथें विस्तारानें सांगावयाची अवश्यकता नाहीं. तें मित असतें इतकेंच नाहीं परंतु अपुरेंही असतें. परानुभव पहातांना जो काय मनावर ठसा उमटेल त्याप्रमाणें आपलें ज्ञान व्हावयाचें. मग आपल्या पाहण्यांत चुकी झाल्यास त्या ज्ञानांतही चूक होण्याचा अर्थात्च संभव आहे. याप्रमाणें एक तर तें ज्ञान अत्यंत थोडें व पुष्कळदां चुकलेलें असावयाचें; परंतु भाषेचें जबर साधन आपल्या जवळ असल्यानें दुसऱ्याचा अनुभव हवा तसा कळून घेण्यास अत्यंत सुखकर असें साधन आपणाजवळ झालें आहे. 'भाषा' असल्याकारणानें गुरुमुखाचा केवढा तरी आपणास फायदा होतो! किंबहुना ज्या वेळीं लेखनकला मुळीं अस्तित्वांतच नव्हती त्या वेळीं केवळ 'श्रुति' व 'स्मृति' हींच कायतीं ज्ञान संपादनाचीं साधनें. प्राचीन ऋषींचे व विद्वानांचे विचार श्रुति व स्मृति यांच्या परंपरेनेंच पुढील पिढ्यांस कळावयाचे. अशा वेळीं गुरुमुख हेंच कायतें परानुभवज्ञान मिळवून देणारें मुख्यतम साधन. पुढें निव्वळ एवढ्याच साधनानें भागत नाहींसें पाहून अडचण आली कीं, ती दूर करण्यांत मोठा तक्षक असा जो मानवप्राणी त्यानें 'लेखनकला' काढिली. त्या लेखनकलेनें मनुष्याचें ज्ञान

तितकें वाढेना असें दिसूं लागल्यावर अर्थातच ' मुद्रणकला ' निघाली; आणि ही शेवटची कला निघाल्यापासून थोड्याच अवकाशांत मनुष्याच्या ज्ञानांत जी भर पडली आहे, तितकी प्राचीन कालीं कधींही पडली नव्हती. इतकेंच नव्हे तर, ही ' मुद्रणकला ' प्राचीन कालीं नव्हती असें सांगितल्यास ' मनुष्य प्राण्याला प्राचीनकालीं ज्ञान नव्हतें ' असें सांगण्यासारखेंच वाटूं लागण्याचा हल्लीं प्रसंग आला आहे. कां कीं, हल्लीं परानुभवानें व विचारानें भरलेलीं पोथ्यापुस्तकें इतकीं मुबलक झालीं आहेत कीं, मुद्रणकला पृथ्वीच्या उत्पत्तीबरोबरच निघाली होती कीं काय असें वाटूं लागलें आहे. अस्तु. अशी स्थिति आज असल्यामुळें पराचा अनुभव करून घेण्यास अत्यंत उपयोगी असें एक साधन आज आपणाजवळ झालें आहे. तें साधन इतकें जबरदस्त आहे कीं त्याच्या पुढें **स्वानुभव**, गुरुमुख, किंबहुना **विचार** हीं जीं ज्ञान संपादनाचीं प्राचीन कालीं अत्यंत श्रेष्ठ अशीं मानलेलीं साधनें तीं एक पायरी खालीं गेलीं आहेत. त्यांपैकीं श्रेष्ठानें आपली जागा **वाचनास** दिली आहे. वाचनापासून जगाच्या ज्ञानास किती भर पडली आहे हें जाणण्याची ज्याला इच्छा असेल त्यानें एक क्षणभर जगांतील सर्व छापखाने, तारायंत्रें वगैरे बंद झालीं आहेत अशी कल्पना करावी आणि मग त्यापासून काय अनर्थ होतात तें कल्पनेनें पुढें आणावें; म्हणजे त्यास दुसरें कोणी वर्णन करून सांगण्यास नको. मला वाटतें अशी वर सांगितलेली कल्पना करणेंच आधीं मोठें दुरापास्त होईल. कां कीं, मुद्रणकला नाहींशी होणें म्हणजे काय, हेंच कोणाच्या लक्षांत येणार नाहीं.

२. याप्रमाणें वाचनास आज केवढें महत्व आलें आहे व तें कसें आलें हें सांगितलें. तेव्हां आतां त्यापासून ज्ञानप्राप्ति होते असें सांगणें अत्यंत अनावश्यक आहे. त्याच प्रमाणें आज पर्यंत होऊन गेलेले सर्व, किंबहुना शंभरांपैकीं नव्याण्णव विद्वान, ग्रंथांच्या वाचनानें ज्ञान संपादन करूनच त्या पदवीस चढले, हेंही येथें सांगण्याची आवश्यकता नाहीं असें वाटतें.

निव्वळ स्वबुद्धिबळाच्या जोरानें विद्वान झालेले लोक फारच थोडे, ह्मणजे लक्ष दहालक्षांत एखादा, या प्रमाणानें आढळले तर आढळतील; परंतु असले निबंध ज्या अर्थी साधारण लोकांकरितां आहेत, त्यांच्या सारख्याकरितां नाहींत, त्या अर्थी त्यांच्या विषयीं आपणांस विचारच करावयाचा नाहीं. साधारण मनुष्यास ज्ञान मिळवायाचें असल्यास राष्ट्राच्या ग्रंथसंग्रहाकडेच वळलें पाहिजे. त्यांतून स्वतःच्या प्रयत्नानेंच ज्याला ज्ञान संपादन करावयाचें त्याला दुसरा मार्गच नाहीं. त्याचें गुरुमुख '**पुस्तक**' व विचार हीं होत. राष्ट्रीय ग्रंथसंग्रहाखेरीज राष्ट्रांतील मोठ्या लोकांचे विचार कळण्यास दुसरा मार्ग आहे कोणचा? लाखो कोसावर असणाऱ्या, किंवा फार प्राचीन काळच्या विद्वानानें मनुष्याच्या सुखासाठीं केलेल्या, विचारांचें ज्ञान त्याच्या ग्रंथद्वारें मिळावयाचें नाहीं तर मिळावयाचें तरी कोठून? स्वानुभवानें? बिचाऱ्या एकट्या मनुष्य प्राण्याचा तो अनुभव काय असणार! कोणी एका महागणित्याची गोष्ट सांगतात कीं, तो पुस्तकापासून दूर असतां त्यानें यंत्रशास्त्राबद्दल कांहीं नियम शोधून काढले; परंतु पुढें एका पुस्तकालयांत पुस्तकें पहातांना त्यास तेच नियम एका पुस्तकांत सांपडले. त्या वेळीं त्या विचाऱ्यास किती वाईट वाटलें असेल बरें! पहा कीं प्रत्येक मनुष्य जर आपल्या अनुभवानें मात्र ज्ञान संपादन करीन असें म्हणत बसेल तर आज त्याची क्षणोक्षणीं किती फजीती उडेल! ज्यास वाचन नाहीं त्याला पाठीमागल्या लोकांचें सर्व ज्ञान, त्यांचे सर्व विचार हीं सर्व शून्याकार आहेत. आपल्या आधीं लोक होते आणि नव्हते हें सर्व त्याला सारखेंच. आज घरेंदारें इत्यादि सुखानें राहण्याचीं साधनें असतां जर एखादा म्हणेल कीं मी आपला रानांत जाऊन राहीन घरांत राहणार नाहीं, तर त्याचा मूर्खपणा आणि पुस्तकें असून मी त्यांजपासून ज्ञानप्राप्ति करून घेणार नाहीं असें म्हणणारांचा मूर्खपणा दोनही सारखेच. साळीचें शेत पिकलेलें आहे; त्याला कोणी मालक नाहीं; राखण नाहीं; असें असून जर हरिणें म्हणतील कीं आम्ही त्यापैकीं एका कण-

त्यालाही शिवणार नाहीं, तर त्यांत शेताचें काय नुकसान होणार आहे ! बिचारी हरिणें मात्र त्या सुखाला अंतरून, न जाणो भुकेनें तडफडून प्राणासही मुकतील.

आजपर्यंत जगांत सुधारणेच्या प्रचंड लाटा मोठ्या जोरानें उचंबळल्या तरी कस कशा थबकल्या, त्यांस कोण कोणच्या भयंकर खडकांनीं पुढें येऊं दिलें नाहीं, त्या कोठें कोठें मागें फिरवल्या गेल्या, कोठें कोठें त्यांचा जोर कमी झाला, इत्यादि गोष्टी, व इतकेंही असून शेवटीं विजय मिळवीत त्या खडकांस डोंगरांस वगैरे सान्यांस गुंडाळून ठेऊन वरवरच कशा उचंबळत गेल्या, हें जाणण्याची ज्याला इच्छा असेल, त्यानें पुस्तकांचें वाचन केलेंच पाहिजे. ज्याला आपण कालगती म्हणतो किंवा

' नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण '

असें म्हणून ज्यांबद्दल आपलें समाधान करून घेतों अशा ज्या राष्ट्राच्या उच्चनीच स्थिती, त्यांचीं वास्तवीक कारणें काय व त्यांची उपपत्ती कशी, हें जाणण्याचें जो मनांत आणील त्यास पुस्तकांवांचून गत्यंतर नाहीं. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर आपला अंमल कसा बसविला व त्याला कारणें काय झालीं; मानवी जातींची एकंदर उत्पत्ती कसकशी होत गेली; एका वेळीं सुधारणेच्या व उन्नतीच्या धवलागिरीवर बसून आनंदांत गढून गेलेला हिंदुस्थान देश आजच्या स्थितीला कां आला; प्राचीन काळीं सर्व ज्ञात पृथ्वीवर ज्यांनीं सार्वभौमत्व गाजविलें असे रोम व ग्रीस देश हल्लींच्या दुरवस्थेला येण्याचीं कारणें काय झालीं; इराण, आरबस्थान इत्यादि देशांचीं वैभवें विलयाला कशीं गेलीं; त्याचप्रमाणें ज्या लोकांचें नांवही या पृथ्वीवर निघत नव्हतें, व जे अंगाला रंग लावून आपल्या टीचभर बेटांत सैरावैरा हिंडत होते, तेच लोक आज ' ज्यांच्या राज्यावर सूर्य केव्हांही मावळत नाहीं ' असें होण्याचीं कारणें काय; अत्यंत उच्च स्थितीला जाऊन पोहोंचलेलें राष्ट्र अगदीं यःकश्चित् अशा एकाद्या संकटानें अगदीं चित झालें, असें जें दिसतें त्याचीं अंतस्थ कारणें काय; इत्यादि गोष्टी; त्याच प्रमाणें जें जें म्हणून दृग्गोचर

होतें त्याच्या त्याच्या स्थितींत फरक पडतात हे कसे व कां; प्रचंड वादळ होण्याला पूर्वी बहुत करून हवेंत अत्यंत शांत असतें यांचें कारण काय; झाडांच्या, कीटकांच्या, पशूंच्या व मनुष्यांच्याही निरनिराळ्या जाती झाल्या कशा; इत्यादि गोष्टी इतिहासादि तीं तीं शास्त्रें वाचल्याखेरीज कशा कळाव्या ?

ज्याप्रमाणें राष्ट्रांचा इतिहास वाचल्याखेरीज किंवा तीं तीं शास्त्रें वाचल्याखेरीज ज्ञानप्राप्ति व्हावयाची नाहीं व तें ज्ञान मिळाल्या कारणानें प्रसंगविशेषीं मनुष्य शहाणपणानें वागूं शकत नाहीं, त्याच प्रमाणें व्यक्तिव्यक्तीच्या इतिहासांचीही गोष्ट होय. किंबहुना साधारण मनुष्यास कीं ज्याचा राज्यकारस्थानादि गोष्टींत तादृश संबंध नाहीं, त्यास राष्ट्रचरित्रापेक्षां व्यक्तिचरित्राचेंच वाचन विशेष श्रेयस्कर व हितकर होय. तीं चरित्रेंही वाचण्यास मनुष्यानें अवश्य झटावें. कां कीं संसार हा प्रत्येक मनुष्यास, मग तो मोठा असो वा लहान असो, लागलेला आहेच. जे विद्वान व शाहणे झाले त्यांजवर संसारांतील बिकट प्रसंग पडले असतां ते कसे वागले हें जाणणें आपल्यास हितावह नाहीं असें कोण म्हणेल ? विद्वानांचीं चरित्रें तर अवश्य पहावीं. कारण, तीं बहुतेक दारिद्र्यानें भरलेलीं. साधारण लोकांत तरी श्रीमंतीपेक्षां दारिद्र्यच फार. तेव्हां ते लोक आपल्या दारिद्र्यरूप शत्रूशीं कसे झगडले, हें कळलें, ह्मणजे आपणासही थोडा बहुत धीर पोचतो. दुसरें असें पहा, शरीराच्या पोषणाप्रमाणेंच मनाचें पोषण केलें पाहिजे. शरीराच्या भागास सुदृढपणा येण्याला ज्याप्रमाणें पोटांत अन्न घालून त्याचे परिपोषक रस करून ते जिकडे तिकडे पोंचावे लागतात, त्याच प्रमाणें मनाचेंही आहे. मनाचें अन्न ज्ञान होय. तें ज्ञान वाचनानें मनास देऊन विचाराकडून त्याचें परिपोषण केलें पाहिजे. त्याखेरीज मनास सुदृढपणा कधींही यावयाचा नाहीं. किंचित् अप्रस्तुत भासलें तरी तुलना पूर्ण करण्याकरितां येथें येवढें सांगितलें पाहिजे कीं, लहानपणीं ज्याप्रमाणें शरीरसंवर्धनास परिणामानें जास्त परिपोषक अन्न लागतें, त्याप्रमाणें मनासही त्यावेळीं ज्ञानाची मोठी हाव असते. ती योग्य तऱ्हेनें पुरविणें म्हणजे मुला-

कडून योग्य पुस्तकें वाचविणें होय. हें वाचनापासून होणाऱ्या ज्ञानप्राप्तीविषयीं झालें.

३. वाचनापासून दुसरा एक फायदा होतो, तो प्राचीन काळच्या किंवा सांप्रतच्याही मोठमोठ्या विद्वद्वरांशीं, कविवरांशीं, इतिहासकारांशीं, कादंबरीकारांशीं व शास्त्रतत्ववेत्त्यांशीं आपला दृढ परिचय होतो हा होय. जे, आतां कांहींही केलें तरी कधींही आपल्या दृष्टीस पडावयाचे नाहींत, ते आज चार आठ आण्यांत, फार तर रुपया दोन रुपयांत आपल्या घरींदारीं पाहिजे तेथें आपली गांठ घेतात फक्त वाचतां मात्र आलें पाहिजे. मोठमोठे ग्रंथकार हे अतिउत्तम व नाजूक अशा वाद्यांसारखे आहेत. जो वाचनकलानिपुण आहे त्याला त्याच्या कलेप्रमाणें उत्तरें देतात. तो जर फार छेडून विचारील तर त्याला समाधानकारक उत्तरें ते देतानच. ज्याप्रमाणें एखादा उत्तम बीनकार बीनांतून हवे ते बोल काढतो व त्या ब्रह्मानंदांत तल्लीन होऊन जातो, त्याप्रमाणेंच उत्तम वाचणारा उत्तम ग्रंथकारापासून आपल्याला आनंदकारक बोल काढतो. चंदन जितकें घांसावें तितकें सुगंध अधिकच देतें, तद्वत् कालिदास, शेक्सपिअर, व्हिक्टर ह्युगो, डांटे इत्यादि ग्रंथकारांचें आहे. केव्हां केव्हां ते नवजलधराप्रमाणेंही वर्तन करतात. ह्मणजे नवजलधर ज्याप्रमाणें सर्वांस पाणी देतो किंवा चंद्र सूर्य ज्याप्रमाणें साऱ्यांस सारखा प्रकाश देतात, त्याप्रमाणेंच हे आपलें ज्ञानामृत त्यां सर्वांस पाजतात. जो एखादा हतभाग्य, घुबडाप्रमाणें झाडाच्या ढोलींत सत्तावीस फूट खोल बसेल, त्याला सूर्य तरी काय करणार आणि कोण काय करणार ! परंतु जो प्रकाशाची इच्छा धरील त्यास चंद्रसूर्य प्रकाश देतातच. वर सांगितल्याप्रकारचे ग्रंथकारसूर्यही वाचननिष्णातांस ज्ञानप्रकाश दिल्याखेरीज कधीं राहत नाहींत. दुसरी मजा ही कीं, ते शरीरानें मृत, परंतु त्यांनीं आपलीं अंतःकरणें आमचे स्वाधीन करून ठेविलीं आहेत. कालिदास, रघुवंशाचा इतिहास शकुंतलेचें पुण्यचरित जर आपल्या मधुर मधुर अशा वाणीनें आम्हांस पाहिजे त्या वेळीं व पाहिजे तेथें सांगतो आहे तर त्यास मृत असें म्हणावें तरी कसें ! आपलीं छत्तीस

सदतीस नाटकें घेऊन मनुष्यमात्राच्या अंतःकरणांतील खडा-नूखडा माहिती जर शेक्स्पिअर देतो आहे तर त्याचें प्रेत अॅव्हन नदीच्या कांठीं पुरलें आहे ह्मणून शोक करावा कशाला ? मनु आपलें ज्ञान केव्हां पाहिजे तेव्हां सादर करितो आहे, तर त्याला प्राचीन असें ह्मणावें कोणी ? वाचनप्रिय मनुष्यानें क्षणभर आपल्या सभोंवार पाहिलें, तर त्यास काय बरें दिसणार आहे ? कोठें शेक्सपिअर आपलीं सर्वमान्य नाटकें पुढें करून **प्रास्पेरो**च्या गुहेंत नेऊन पिशाचें व जादू पाहण्यास अगर डेन्मार्कमध्यें नेऊन **हॅामलेट**ची दुरवस्था पाहण्यास, लागलींच मनुष्य-द्वेष्ट्या **टैमन**चे उद्गार ऐकण्यास व क्षणानें **डेस्डिमोना, ज्युलियेट** इत्यादिकांचें अव्याज प्रेम पाहण्यास विनंती करीत आहे. पलीकडे कालिदासानें एकमेकींस विनोदपर भाषणें बोलणाऱ्या सख्यांसह **शकुंतला** उभी केलीच आहे. भवभूति **सीतारामां**चें व **मालतीमाधवां**चे प्रेमोद्गार ऐकविण्यास तयार आहेच. तिकडे अर्वाचीन काळचा **शेक्सपिअरच** जो **व्हिक्टर ह्यूगो** तो तीनशें वर्षांपूर्वीचा **स्पेन** देशाचा मानीपणा व सत्यप्रियता हीं दाखवायाला अगदीं उत्कंठित आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या नेपोलियननें केलेल्या अनन्वित कृत्यांचें वर्णनही पहाण्यास सांगत आहे. तिकडे **मॅान्टेन**ही गप्पा सांगण्यास बसला आहे. हवी ती गोष्ट त्याजजवळ काढा तो तुम्हाला कांहींना कांहीं तरी नवें ज्ञान देणारच. **रोम**चा उत्कर्ष व अपकर्ष कसा झाला, हें सांगण्यास **गिबननें** आपला इतिहास पुढें केला आहे. **ग्रीस** देशाचा इतिहास **ग्रोट** घेऊन उभा आहेच. मन थोडेंबहुत दुःखित झालें असल्यास **मोलिएर** हंसवून आनंदित करणार. **जॉन् स्टुअर्ट मिल्ल**सारखे तत्त्ववेत्ते बुद्धिवाद करण्यास 'या' असें म्हणत आहेत. जे विचार आणखी दोनतीनशें वर्षांनीं सर्वसाधारण होतील असे विचार आपल्या अर्थगांभीर्यानें ओथंबलेल्या कवितेच्या द्वारें **शेले** तुम्हापुढें ठेवित आहे. असें एक कीं, दोन ? हवे तेवढे महात्मे वाचनप्रिय माणसांची सेवा करण्यास तयार आहेत. चिचाऱ्यांनीं आपल्या बायकामुलांशीं आनंदानें

घालवावयाचा वेळ आम्हासाठीं कष्टांत घालवून एवढाले प्रचंड उदात्तरमणीय ग्रंथ निर्माण केले. परंतु आम्हीं कसले कृतघ्न! ते उघडण्याचे देखील कष्ट घेत नाहीं. केव्हां केव्हां आपणास आळस पछाडतो व आपल्या उद्योगित्वाचा खग्रास करितो त्या वेळीं सहज जरी यांचेकडे वळलें तरी केवढा बरें फायदा होतो! त्यांतला एखादा चट्कन् सांगतो. "बाबारे, एका ईश्वराखेरीज रिकामपण कोणासही नाहीं." दुसरा म्हणतो: "या पृथ्वीवर मनुष्याला कां उत्पन्न केलें आहे? उद्योगासाठीं, समजलास?" तेव्हां वाचनापासून उपदेशप्राप्ति हाही एक फायदा आहे. त्याचप्रमाणें आपल्यास नवे नवे विचार सुचतात हा केवढा फायदा आहे! मागील लोकांचें ज्ञान मिळालें म्हणजे नवीन गोष्टींचें ज्ञान संपादन करण्यास व आपल्या पुढील पिढीस तें देण्यास आपल्यास कितीं सोपें जातें! असें नवीन ज्ञान संपादून पुढील लोकांस तें पोचतें करणें हें आपलें कर्तव्य—इतकेंच नव्हे फार जबाबदारीचें कर्तव्य—आहे. जो तसें करीत नाहीं तो पिढीजाद् संपत्तीचा अपव्यय करणारा होय. ज्याला आपलें ज्ञान पुढील लोकांस द्यावयाचें आहे, त्याला मागचें ज्ञान संपादलेंच पाहिजे. त्याखेरीज त्याला आपलें कर्तव्य योग्य तऱ्हेनें करतां येणार नाहीं. आजपर्यंत जे जे मोठाले ग्रंथकार झाले, ते ते मागील ज्ञानाच्या मदतीवांचून झाले नाहींत. विचारास तर वाचनाखेरीज गत्यंतरच नाहीं. अन्न खाल्लें नाहीं तर जठरांत पचन होणार कशाचें? वाचन नसेल तर विचार करणार कशाचा?

४. वाचनापासून आणखी एक फायदा आहे तो मनोरंजन हा होय. मनुष्य प्राण्यास कंटाळा हा यावयाचाच. ज्या अर्थी कंटाळा हा यावयाचाच, त्या अर्थी मनाची करमणूक करून घेण्याची हाव असावयाचीच; आणि ह्मणूनच घेरवाईट असे अनेकविध मनोरंजनाचे प्रकार काढले आहेत. वाचन हा मनोरंजनाच्या उत्कृष्टप्रकारांपैकीं एक, किंबहुना सर्वांत उत्कृष्ट प्रकार आहे. जे विद्वान् व शहाणे असतात ते बहुशः काव्यशास्त्रांच्या वाचनांत काळ घालवितात. मूर्ख असतात ते निरनि-

राळ्या व्यसनांत किंवा झोंपेंत काळ घालवितात. एकच एक काम अष्टौप्रहर करीत बसलें तर तें कामही चांगलें होत नाहीं, व मनही आनंदवृत्तींत असत नाहीं. त्याला कांहीं तरी विरंगुळा पाहिजे; म्हणजे तें ताजें तवानें होतें. व्यसनांच्या योगानें तें ताजें तवानें न होतां उलट त्याचा नाश मात्र होत असतो. तात्कालिक सुख होतें तेवढ्यावर भुलून मनुष्य त्यांच्या नादीं लागतो खरा, परंतु तें सुख क्षणिक व नाशवंत आहे हें ध्यानांत आणलें पाहिजे. वाचनाचें तसें नाहीं. सत्समागमास जर कोणी वाईट ह्मणेल, तर वाचनास वाईट म्हणावें. सत्समागमानें जर मनुष्यास फायदा आहे तर वाचनापासूनही आहे. चांगल्या पुस्तकांचें वाचन हें सत्समागमाप्रमाणें नव्हे—तर प्रत्यक्ष सत्समागमच आहे.

५. एवढा वेळ वाचन व त्यापासून मिळणारे फायदे यांविषयीं झालें. परंतु वाचन म्हणजे जें तावडींत येईल तें पुस्तक वाचलें असतां झालें कीं काय याचा विचार करूं. आतांच वर ह्मटलें आहे कीं चांगल्या पुस्तकांचें वाचन म्हणजे सत्समागम होय. ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. परंतु त्याबरोबर हेंही लक्षांत धरावें कीं वाईट पुस्तकांचें वाचन हें दुःसमागमच होय. कुसंगतीनें मनुष्य बिघडतो त्याप्रमाणेंच दुष्ट पुस्तकांनींहीं बिघडतो. तेव्हां ज्याप्रमाणें संसारांत भल्याची संगती करावी लागते त्याचप्रमाणें वाचनांत चांगल्या ग्रंथांची निवड केली पाहिजे. ज्यांस आपल्या वडिलांनीं वगैरे चांगला म्हटला त्याची संगती आपण करतों; तसेंच आपल्याहून जे वडील आहेत त्यांनीं ज्या ग्रंथांस चांगलें म्हटलें आहे त्या ग्रंथांची संगति करण्यास आपण तत्पर असावें. ग्रंथ हे औषधाप्रमाणें मानावे. चांगल्या वैद्यानें औषध दिलें म्हणजे आपण तें घेतों, तसेंच ग्रंथ चांगल्या माणसाकडून निवडून घ्यावे.

६. याचप्रमाणें चांगल्या ग्रंथाचें वाचन करावयाचें तें शिस्तवार करावें. घे पुस्तक, कीं उलट पानें, असें केल्यानें ज्ञानप्राप्ति तर एकीकडेच राहिली परंतु मन ‘ ज्ञानलवदुर्विदग्ध ’ होऊन त्याचें रंजन करण्यांत प्रत्यक्ष ब्रम्हदेवासही हात टेकावे लाग-

तात. एका वेळीं एकच पुस्तक परंतु तें नीट मन लावून वाचून त्याजवर विचार करून, त्यांत शंका असतील त्यांचें दुसऱ्या कोणापासून निरसन करून नंतर दुसरें घ्यावें. वरवर पुस्तक वाचणारा, आणि सृष्टिसौंदर्य पहाण्यासाठीं रानांत जाऊन डोळे मिटून झोंप घेणारा, किंवा मैलाचे दगड मोजून माघारी येणारा दोघेही सारखेच. जर खरें सौंदर्य पहावयाचें तर वरवर पाहून काय होणार ? त्या पुस्तकाच्या अंतःकरणांत शिरलें पाहिजे. सतार हातांत घेऊन नुसत्या तारा हालवल्या तर काय होणार आहे ? ती बोल कसे काढते हें जाणण्यास मन लावून वाजवून पाहिलें पाहिजे. त्याचप्रमाणें जिज्ञासु मनुष्यानें रोज नियमानें वाचन केलें पाहिजे. तसें केलें नाहीं तर ज्ञानप्राप्ति फार दुष्कर आहे.

तिसरी गोष्ट ही कीं, वाचणें तें समजून वाचलें पाहिजे. पुष्कळ सावकाश वाचलें, वर्षांत चार पानें वाचलीं, पण आपण काय वाचलें हें जर समजलें नाहीं, तर उपयोग काय ?

व्यर्थ भाराभर । केलें पाठांतर ॥

असेंच व्हावयाचें. पुष्कळ लोकांस गीता पाठ करण्याची संवय असते; परंतु त्या पाठापासून उपयोग कांहींच होत नाहीं. गीतेसारखें उत्कृष्ट पुस्तक जगांत सांपडावयाचें नाहीं. पण न कळतां कितीही वाचलें म्हणून उपयोग काय ! अमुक पुस्तक वाचलें आहे अशा बद्दल फक्त डौलच ज्यांस मारावयाचा असेल, त्यांची गोष्ट निराळी. त्यांच्याकरितां हें सांगणेंच नव्हे.

७. आमच्या लोकांत पेशवाईच्या काळीं किंवा त्याच्या पूर्वी कांहीं वाचनाची अभिरुचि फारशी नव्हती. सांप्रतची स्थिति त्याहून भिन्न आहे, असें म्हणण्यासही अजून जागा झाली नाहीं. याविषयीं जें लिहावयाचें तें गुरुवर्य विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं थोडें बहुत लिहिलेंच आहे. शेवटीं **सर जॉन हर्शेलचें** पुढील वाक्य ध्यानांत धरून व तोच वर ईश्वरापाशीं मागून कालिदास शेक्सपिअरादिकांच्या समागमाचा लाभ करून घ्यावा एवढी विनंती करतों.

" If I were to pray for a taste, " says Sir John Herchel, " which should stand me instead under every variety of circumstances, and be a source of happiness and cheerfulness to me through life, and a shield against its ills, however things might go amiss and the world frown upon me, it would be a taste for reading."

वेळ कसा घालवावा ?

" जाऊं द्या कीं हो ! त्यांत काय आहे ? एका पांच मिनिटांनीं काय होतं आहे! " असे आपण काढलेले किंवा दुसऱ्या कोणीं काढलेले उद्गार आपण किती वेळां ऐकतों ? मला वाटतें, त्याला कांहीं गणतीच नाहीं. दिवसांतून एक लाख वेळां असले उद्गार आपल्या मुखांतून किंवा आपल्या देखत दुसऱ्याच्या मुखांतून निघत असतील. परंतु त्यां पांच मिनिटांत काय होईल आणि काय नाहीं याचा आपण कधीं विचार केला आहे ? तींच पांच मिनिटें उपयोगाला लाविलीं असतां आपला अतिशय फायदा होणार नाहीं असें कशावरून ? एक पांच मिनिटांच्या उशीरानें जग नेपोलियनच्या तडाक्यांतून सुटलें. तीं पांच मिनिटें मार्शल ग्रूशनें वायां जाऊं दिलीं नसतीं तर आज जो आपण जगाचा इतिहास वाचतों तोच वाचतों ना. त्यांत फार फरक पडला असता. हें त्या पांच मिनिटांचें मोल आहे. मनुष्य प्राणी जन्मल्यापासून अतिशय मोलाची आणि मुबलक अशी जी काय गोष्ट त्याला मिळते ती वेळ ही होय. एका अर्थी हिच्या इतकी मुबलक गोष्ट कोणचीच नाहीं; दुसऱ्या अर्थी हिच्या इतकी अत्यंत थोडी अशी गोष्ट नाहीं. कवि ह्मणतातः "काल अगदीं अमर्याद आहे."

कालोह्ययं निरवधिः

होय कबूल आहे; परंतु त्या अनंत काळाचा कितवा हिस्सा आमच्या प्रत्येकाच्या वांट्यास येतो ? विश्वाचें उत्क्रमण होऊं लागल्यापूर्वींपासून काल हा आहेच. त्याला मर्यादा नाहीं. पुढें ही असेंच उत्क्रमण होतां होतां विश्वाचा नाश झाला किंवा दुसरें कांहीं स्वरूप त्याला आलें तरी काल हा रहाणारच. तेव्हां इतका हा काल चमत्कारिक असतां त्याला आम्हीं " अल्प " " थोडा " असें कां म्हणतों ? सकृद्दर्शनीं प्रश्न मोठा समर्पक

दिसतो ? परंतु आपणांपैकीं प्रत्येकाच्या वांट्यास या अनंत काळांपैकीं कितवा भाग येतो ? असा प्रश्न विचारला असतां त्याला उत्तर कोण काय देणार आहे ? असें असून आपण आपला काळ घालवितों कसा ? याचा कधीं विचार करतों काय ? मला वाटतें या प्रश्नाचें उत्तर 'होय' असें देण्यास फारच थोडे सिद्ध असतील. अनंत काळांपैकीं आपल्या वाट्यास आलेला काळ किती ? हा प्रश्न आणि पृथ्वीवरील वालुकाराशींतून एक कण घेऊन हा त्या राशीचा कितवा हिस्सा, किंवा परमाणु घेऊन तो सर्व विश्वाचा कितवा हिस्सा या प्रश्नाप्रमाणेंच उपहासात्मक आहे. सहज आपण एकांतीं बसावें आणि आपल्या मनांतच असा प्रश्न करावा कीं, मी म्हणजे या जलस्थलादि चराचर विश्वाचा कितवा भाग ! वाहवा ! असा विचार जर मनुष्यप्राणी रोज करील तर त्याच्या अंगची अहंमन्यता तेव्हांच निघून जाईल.

इतका अल्प जो आपल्या वांट्याला आलेला वेळ त्याचा विनियोग आपण करितों कसा ? याचा कांहीं तरी विचार करतों काय ? आपल्यापैकीं बहुतेक 'नाहीं' असेंच उत्तर देतील. आपल्या वांट्याला आलेला काळाचा हिस्सा अत्यंत कमी; त्याचा विनियोग होतां होईल तों चांगल्या तऱ्हेनें केलाच पाहिजे असें समजून जो या जगांत वर्तन ठेवील तोच शहाणा. परंतु जगाचें नशीब इतकें चांगलें नसल्यामुळें, त्यांत असे शहाणे फारच थोडे निपजतात. आजपर्यंत तत्वज्ञानी व नीतिशास्त्रज्ञ यांनीं ज्या गोष्टीचा काथ्याकूट अतिशय केला आहे, ती गोष्ट 'आयुष्याचें अल्पत्व' ही होय. कोणी म्हणतो आपलें आयुष्य आळवाच्या पानावरील पाण्याप्रमाणें आहे. तें जसें केव्हांच निसटून जाईल हें कळत नाहीं तद्वतच आयुष्याची गोष्ट आहे. कोणी म्हणतो आयुष्य हें पाण्याच्या बुडबुडयासारखें; कोणी म्हणतो स्वप्नाप्रमाणें आहे. असे अनेक दाखले व उदाहरणें देऊन तत्वज्ञान्यांनीं व साधुसंतांनीं आपल्यास आयुष्याच्या अल्पत्वाविषयीं सांगितलें आहे, परंतु आपण कसले निगर्गट्ट ! आपल्यास त्याचें

कांहींच वाटत नाहीं. त्यांनीं असें सांगितलें म्हणजे आपण मान डोलवण्यास कमी करीत नाहीं. किंबहुना आपल्या आपल्या मनाचीही खात्री होते कीं, त्यांचें बोलणें खरें आहे. इतकेंच नाहीं, आपण स्वतः तें जाणत असतों, व त्याचा लोकांस उपदेश करतों; परंतु हीं सर्व पुराणांतलीं वांगीं पुराणांतच रहातात. घरीं आणलीं त [illegible] तार फार तर त्यांची चमचमित भाजी होऊन या लोलुप [illegible]जभेला भेटतात. याच्या पलीकडे त्यांची गति नाहीं. कांहीं गोष्टी करीत असतांना आपण व्यवहारांत असेंच समजतों कीं, आपल्या जवळ लागेल तितका वेळ आहे. मारुतीच्या शेंपटाप्रमाणें किंवा **गोरखनाथा**च्या कमंडलूंतील गंगेप्रमाणें तो अनंत आहे असें वाटतें. " अमुक अमुक गोष्टना ? राहूं द्या कीं, आजच काय तिचं अडलं आहे ? करूं उद्यां. " जणूं काय उद्यां ती गोष्ट करण्याला कांहीं अडथळे यायचेच नाहींत. कोणीकडून आजचा वेळ टाळावयाचा. दुसरें कांहीं नाहीं. एकंदरींत मनुष्यप्राणी विश्रांतीचा मोठा चाहता दिसतो. काम करणें हें त्याच्या स्वभावास आवडतच नाहीं. पहा कीं. या जगांत तो होतां होईल तों काम करणें टाळतो इतकेंच नाहीं तर त्याच्या, ' मरणानंतर काय होतें ? ' मनुष्य प्राणी कोठें जातो ? ' इत्यादि संबंधानें ज्या ज्या कल्पना आहेत त्याही अशा आहेत कीं त्यांपासून त्याचें विश्रांतिलोलुपत्व सहज दिसून येतें. त्याच्या पुढील स्थितीच्या कल्पना काय ? तर तींत श्रम न करितां सुख. तिला तो स्वर्ग म्हणतो. स्वर्ग याचा अर्थ काय ? तर केवळ सुखाचें स्थान. ज्यांपासून म्हणून दुःखाचें वारें उत्पन्न होईल त्या गोष्टी तेथें नसावयाच्या, अशी आपली कल्पना. कोणच्याही धर्म-पुस्तकांत बघा. पुढें ज्या जगांत जायचें आहे त्या जगांत अत्यंत काम आहे, खाणें नाहीं; पिणें नाहीं; भूक नाहीं; तहान नाहीं; तेथें जाऊन फक्त श्रम करायाचे आहेत; असें कोणी कधीं सांगत नाहीं. हें बरें वाईट हा भाग निराळा; परंतु आहे ही गोष्ट अशी आहे खरी. तेव्हां मनुष्यानें विश्रांति घेण्याकरितां झटणें हें त्याच्या स्वभावा-

स योग्य आहे असें दिसतें. परंतु एक असा विचार करा कीं मनुष्य प्राण्याची जी काय एवढी खटपट चालली आहे, ती कशा करितां? याचें उत्तर एका शब्दांत आणि तें एकच आहे. तो शब्द 'सुखा करितां हा होय असें कोण म्हणणार नाहीं? आपल्याला दुःख व्हावें म्हणून कोणी तरी खटपटी करतो आहे काय ? खरोखर आपल्यास दुःख व्हावें अशी इच्छा धरून, त्या इच्छेची सफलता करून घेण्याकरितां' एकही प्राणी झटत नाहीं. जी काय खटपट चालते, ती फक्त सुखाकरितां. असें जर आहे, आणि वेळ व्यर्थ न दवडतां सत्कारणीं लावल्यानें जर सुखोत्पत्ति आहे हें खरें आहे, तर मग मनुष्य वेळ व्यर्थ कां दवडतो ? जगांतील बहुतेक लोक वेळेचा दुरुपयोग करितात हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक प्राणी निव्वळ स्वसुखाकरितां झटत असतो. सुखप्राप्ति व्हावी यासारखी त्याला, दुसरी बलवत्तर इच्छा कोणचीही नाहीं, हेंही निर्विवाद आहे. वेळेचा सदुपयोग केला तर सुखप्राप्ति होते हेंही प्रत्येक जण कबूल करील. असें असतां वेळेचा दुरुपयोग काय म्हणून होतो ? हा प्रश्न मोठा चमत्कारिक आहे. इतक्या तिन्ही गोष्टी निर्विवाद असतां त्यांचा संयोग कां होत नाहीं ? या वेळेच्या दुरुपयोगाचें कारण काय? कारण कांहीं तरी बलवत्तम असलें पाहिजे कांकीं, त्यापासून सुखोत्पत्ति नसून व मानवी प्राण्यास सुखेच्छा बलवत्तम असून तो वेळेचा दुरुपयोगच करतो. याला कारणें दोन देतां येतील. एक अविचार. आपण स्थूल मानानें सुखाचे दोन वर्ग पाडूं.एक **तात्कालिक** व **क्षणिक** सुख; दुसरें **दूरवर्ती** परंतु **सततसुख**. सर्व प्राणी तात्कालिक किंवा अदूरवर्ती सुखाला भुलतात. तें क्षणिक आहे याचा विचार करीत नाहींत. दूरवर्ती सुख सततचें खरें, तें मिळण्याची इच्छा खरी, परंतु तें हातीं येईपर्यंत थांबण्याला कोणाला धीर होत नाहीं. त्याच्यांत मोठा दोष कायतो दूरवर्तित्वाचा. याला आपण एक अगदीं व्यवहारांतलें उदाहरण घेऊं. लहानपणीं मुलाला गोड खावयास दिलें, म्हणजे तें खाऊन त्याला आणखी मागण्याची इच्छा होते. त्याच्या शरीरसंवर्धनाला साखरेची जितकी अवश्यकता असते

त्याच्यापेक्षां जास्त खाण्याची इच्छा होते, ही कां तर तात्कालिक सुखाची इच्छा. तें क्षणिक आहे हा विचारच नाहीं. जिभेवर ठेवल्याबरोबर जें काय मनाला वाटणारें समाधान तेंच त्याला त्या वेळीं दिसत असतें; परंतु पुढें या अति खाण्यापासून पोटांत कृमी उत्पन्न होतील, आपल्यास त्यांपासून त्रास होईल, हा विचारच नाहीं. मुलास विचार नाहीं असें आपण ह्मणतों परंतु आपली स्थिति त्याच्या स्थितीहून कांहीं भिन्न नाहीं. त्याच्या प्रमाणेंच आपण अविचारी आहों. पण नाहीं. आपण त्याच्यापेक्षां एका गोष्टींत भिन्न आहोंत. ती गोष्ट ही. तें अजाण आणि आपण सुजाण. त्याला, 'पुढें आपल्याला या आतां सुख वाटणाऱ्या गोष्टींपासून दुःख होणार ' हें ठाऊक नसतें. आपली गोष्ट तशी नाहीं. आपण या तात्कालिक सुखांत अर्थ नाहीं, हें जाणत असून त्याला लोलुप होतों व सतत सुख सोडून देतों. हा जो अविचार तोच आपल्या " वेळेच्या दुरुपयोगा " चें कारण. " जाऊंद्याहो ! आजच काय झालें आहे ? करून टाकूं तें काम उद्यां. " असें म्हणण्यांत आपण दाखवितों काय तर **सतत** परंतु **दूरवर्ति** सुखाला झुगारून **क्षणिक** परंतु **अदूरवर्ति** अशा सुखाकरितां आपण यत्न करीत आहोंत. आजचें काम आज केल्यानें आपणांस तें काम करतांना तत्काळ श्रम होतात; श्रम करीत असतांना सुख वाटत नाहीं. जें सद्यःसुखकर नाहीं तें करून त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दूरवर्ति सुखाची इच्छा धरणें हें होत नाहीं. अर्थात् या वेळीं सुखांत (विश्रांतींत) आहोंत, ते उठून पुढें होणाऱ्या सुखाकरितां श्रम करीत बसणें म्हणजे आतांचें सुख टाकून दूरच्या सुखाकरितां खटपट करणें आहे. तें व्हावें कसें ! तें होत नाहीं (इच्छा असो. नसो.) म्हणून तर वेळेचा दुरुपयोग होतो. हा जो अविचार तो त्या दुरुपयोगाचें किंवा निरुपयोगाचें कारण आहे. दुसरें कारण; आपलें कर्तव्य काय ? आपण या जगांत येऊन करावयाचें काय ? या व या अर्थाच्या इतर प्रश्नांचें समर्पक उत्तर देतां न येणें, किंवा न समजणें हें होय. अविचार याचा अर्थ पूर्णपणें म-

नांत घेतला तर हें दुसरें म्हणून जें कारण दिलें आहे तें त्या पहिल्या कारणाखालींच येतें असें सहज दिसून येईल. लहानपणापासून आपल्याला या संबंधानें शिक्षणच ठीक मिळत नाहीं. आपलें या जगांत आल्यावर 'उद्योग' हें कर्तव्य आहे असें आपणास नीट शिकविलें नाहीं. वेळेचा उपयोग करून घेत असावें असें सांगतात पुष्कळ; परंतु उदाहरणें मिळत नाहींत मुळींच. जो वरील उपदेश सांगतो तोच घटकेनें पाहिलें असतां वेळ कशी तरी कंठतांना दिसतो. अशामुळें आपल्या मनावर त्या उपदेशाचें कांहींच वजन पडत नाहीं. शाळांतून व इतरत्रही आपलें शिक्षक आपल्याला मध्य आफ्रिकेंतील लोकांचे रीतिरिवाज काय आहेत त्यांचें ज्ञान करून देतात; मिसिसिपी नदीचा उगम कुठें आहे तें सांगतात; त्याचे नकाशे दाखवितात; राजव्यवस्था कशी असावी ? निरानिराळ्या कलांचें महत्व काय ? इत्यादि सर्व गोष्टींचें शिक्षण ओतप्रोत मिळतें; परंतु वेळेचें मोल काय हें कोणी शिकवीत नाहीं. तोंडानें तें उगीच कांहीं तरी शिकवितात. पण उदाहरणांनीं कोणीच शिकवीत नाहीं; त्याचा नकाशा कोणीच दाखवीत नाहीं. माझ्या मतें नीतिशिक्षणाचा हा फार मोठा भाग आहे. सदुद्योगांत काळ कसा घालवावा हें शिकविणें जर नीतिशिक्षणांत येत नसेल तर, कोणचें येतें तें सांगणें मोठें कठीण आहे. प्रत्येक क्षणाची किंमत काय आहे हें, कोणी मुलांच्या मनावर ठसवीत नाहीं. " बाबारे, प्रत्येक क्षण चांगल्या तऱ्हेनें घालीव म्हणजे दिवस चांगल्या तऱ्हेनें जातील कीं नाहीं याची तुला काळजी करायला नको " असें क्षणोक्षणीं मनावर ठसविलें पाहिजे. शाळेंत काय, घरीं काय, इतर ठिकाणीं काय, " जाऊंद्या कीं, पांचच मिनिटें गेलींना ? ", असे उद्गार ऐकूं येतात. कोणी असें म्हणत नाहीं " हा क्षणना ? व्यर्थ घालवूं नका ? या. हें करा. " सकाळीं, संध्याकाळीं, माडीवर, खालीं जाण्यापूर्वीं, जेवणानंतर, जेवणाच्या वेळीं, केव्हांही पहा, " जाऊंद्या, उद्यां पाहूं " हें ऐकूं येतें. " उद्यां पाहूं ! " मला तर वाटतें आजपर्यंत जीं जगांत दुःखें आलीं आणखी पुढें

येतील, तीं या एका शब्दानेंच आणलीं. ' उद्यां ' ' उद्यां ' हें जे दिवशीं सरून जाईल आणि त्याच्या जागीं ' आज ' हा शब्द जेव्हां येईल तो दिवस सोन्याचा, सर्व जगाच्या मुक्ततेचा पण तो दिवस लवकर येईल असें दिसत नाहीं. इतकेंच नाहीं, तर तो दिवस कधींही यावयाचा नाहीं असें म्हणावें लागतें. बरें मी म्हणतों " उद्यां " येईल. पण उपयोग काय ? जी आजची रडकथा तीच उद्यां. उद्यां कांहीं आपण नवे थोडेच होणार आहोंत ! इतकेंही असो. ' उद्यां ' चा दिवस आला, आपण तें काम केलें असें धरूं या. पण जो दिवस गेला त्यानें केलेलें नुकसान भरून येईल काय ? आजचा दिवस व्यर्थ घालविला हा पुन्हां येणार आहे काय ? छे ! छे !

असम्भिवृत्यै तदतीतमेव.

हें वाक्य जर कशाविषयीं पूर्णपणें खरें असेल, तर तें या निघून गेलेल्या वेळाविषयींच आहे, असें कोण म्हणणार नाहीं ? आमच्यासारखे कांहीं लोक एखादेवेळीं रोजनिशींत रोजची हकीकत ल्याहावयास बसले ह्मणजे त्यांत त्यांना ल्याहायला काय असतें? तर "कांहीं केलें नाहीं. वेळ सारा व्यर्थ गेला. हा आला गप्पा झाल्या, असें होतां उपयोगीं नाहीं. आपल्याला जगांत जर नांव मिळवावयाचें आहे तर उद्योग केलाच पाहिजे. उद्यांपासून असें होऊं देतां उपयोगी नाहीं. निश्चय ! निश्चय ! निश्चय ! " एवढेच शब्द ! हे उद्गार एखाद्यानें पाहिले ह्मणजे त्याला असें वाटेल कीं हा गृहस्थ खरोखरच उद्यांपासून फार उद्योगी व वेळेचें मोल जाणणारा होणार आहे. उद्यांपासून हा अत्यंत उद्योग करणार, पण त्यानें दुसरे दिवशीं रोजनिशी उघडून पहावी. त्यांत त्या दिवसाबद्दल कांहीं लिहिलेलें असलें (नसतें असें पुष्कळदां होतें) तर असें असावयाचें " कालच्या सारखेंच आज झालें. हें फार वाईट! " अशा तऱ्हेनें वर्षाच्या प्रारंभापासून अखेरीपर्यंत चालत " बाबा ! काळ गेलारे गेला !" हें जें वाक्य आहे तें ज्याच्या बसलें असेल, तोच मनुष्य कांहीं करील तें करील. असे मनुष्य कितीक सांपडणार आहेत? योग्य वेळीं

काम न केल्यामुळें फाजित पावलेल्या माणसासारखे फजीतखोर माणूस दुसरें नाहीं; पण चमत्कार काय कीं अशी फजीतखोर माणसेंच फार. दुसरा एक चमत्कार पहा. अशा तऱ्हेनें वेळ घालवून मग कामाचा खूप बोजा झाला म्हणजे " काय करावें वेळच मिळत नाहीं, " अशी कुरकूर करीत बसणारे लोक फार. इतकेंच नाहीं, कांहीं लोक किंबहुना पुष्कळ लोक उद्योग नसतांना वेळेच्या टंचाईविषयीं कुरकूर करतात ! मला वाटतें त्यांना रिकामपणामुळें वेळ नसतो. किंवा विश्रांति, आळस, यालाच जर ते उद्योग ह्मणत असतील तर त्यांना वेळ नसेल खरा. कांहीं **काळ** ह्मणून जेवढा त्यांच्या ताब्यांत आहे तितका सगळा ते आपल्या मतानें रिकामपणाच्या रूपानें उद्योगांतच घालवीत असतात. रिकामपणाला किंवा विश्रांतीला उद्योग समजून " आपल्यासारखे उद्योगी कोणी नाहींत " असें म्हणणाऱ्या लोकांविषयीं आपल्यास विचार करावयाचा नाहीं. ज्यांना असें वाटत असेल कीं आपल्या हातून वेळेचा निरुपयोग होतो आहे, त्यांचे करतांच हें लिहिणें आहे. हो, वेळेची किंमत समजवून द्यावयाची कोणाला ? ज्यांना ती समजत नसेल त्यांना; इतरांस काय करावयाचें आहे ? वेळाच्या टंचाईबद्दलची कुरकूर टाळणें म्हणजे वेळच्या वेळीं काम करणें. आणि वेळच्या वेळीं काम करणें म्हणजे सतत सुखाची प्राप्ति करून घेणें आहे. असें आहे तर मग आपण नित्य नेमानें वेळच्या वेळीं काम करण्यास कां झटत नाहीं ? पहा, त्यापासून अनेक फायदे आहेत. खरी गोष्ट मुळीं अशीच आहे. शिस्तवार काम करण्यानें वेळाची टंचाई ही कधींच पडत नाहीं. प्रत्येक गोष्टीचा वेळ नेमा व ती त्या वेळीं करा म्हणजे कधींही अडचण पडणार नाहीं. कारकुनानें आपले कागद सारे कसे तरी गोळा करून ठेवले, म्हणजे एखादा विशेष कागद सांपडण्याला त्याला जशी अडचण पडते तशीच वेळच्या वेळीं काम न करण्याची गोष्ट आहे. त्या [illegible] कुनाजवळ कागद मागायाला जा. त्याला हें हुसक तें [illegible] ! " पहा तें पहा असें करावें लागून सारी त्रेधा तिरपिट आणखी पुढें

वेळ. या वेळीं काम न करणाऱ्याची गोष्ट. आयत्या वेळीं हें करूं कीं तें करूं ही त्रेधा. काळाचा सदुपयोग करावयाचा असा ज्या दिवशीं निश्चय करावयाचा त्याच वेळीं त्याची शिस्तवार वांटणी करून त्याप्रमाणें वर्तन ठेवावयाचें असाही निश्चय केला पाहिजे. तरच कांहीं उपयोग होणार आहे. माझें असें म्हणणें नाहीं कीं आपण अगदीं मोकळीक ठेवूं नये. मोकळीक ही पाहिजेच. वेळ हा आपला दास केला पाहिजे. वेळाचे आपण दास होऊं देतां उपयोगी नाहीं. काळाची शेंडी धरून त्यास आपण वांकविलें पाहिजे. आपली शेंडी धरून त्यानें आपणास वांकवितां कामा नये. 'जसें वेळेस होईल तसें करूं.' 'त्याचा काय नेम, त्या वेळीं काय होईल आणि काय नाहीं' हीं व अशा अर्थाचीं वाक्यें होतां होईल तों मनांतून हांकलून लाविलीं पाहिजेत. त्याच्या जागीं 'अमूक वेळीं अमूकच करीन.' 'त्या वेळीं अमूक संकट येईल तें टाळून मला जें पाहिजे तेंच करीन' असें म्हटलें पाहिजे. त्या वेळीं होईल तें होईल हें उपयोगीं नाहीं. "ह्मणेन त्या वेळीं करीन" असें सतत म्हणत असलें पाहिजे. असें म्हणत असलें पाहिजे हें खरें, पण त्यापासून असें समजायाचें नाहीं कीं ज्या त्या वेळीं जें सुचेल तें म्हणेन आणि मग करीन. असें जो करील त्याच्यासारखा मूर्ख कोणीच नाहीं. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा. प्रत्येकानें पुढील काळाकरितां आधीं काम नेमावें व तें काम त्याचवेळीं लाखों संकटें आलीं तरी टाळून शेवटास नेईन, असें ह्मणत असावें "म्हणेन त्यावेळीं करीन" याचा अर्थ असा. उगीच यःकश्चित्-कारणांनीं तें एकीकडे ठेवूं नये. नाहीं तर 'काय करावं बोवा मला आतां तें काम करायचं होतं पण झोंपच आली' असें म्हणावें म्हणजे झालें. वा ! काय पण काम टाळण्याला कारण ! झोंप आली तर झोंपेच्या वेळीं झोंप घ्या. कामाच्या वेळीं कां ? कांहीं अनपेक्षित अशींच कारणें झालीं व वेळच्या नेमलेल्या कामापेक्षां अत्यंत महत्वाचें काम आलें तर गोष्ट निराळी, पण तसें कांहीं कारण नसून यत्किंचित् कारणांनीं नियमित काम टाळणें

काम न केल्यामुळें फाजित पावलेल्या माणसासारखे फजीतखोर माणूस दुसरें नाहीं; पण चमत्कार काय कीं अशी फजीतखोर माणसेंच फार. दुसरा एक चमत्कार पहा. अशा तऱ्हेनें वेळ घालवून मग कामाचा खूप बोजा झाला म्हणजे " काय करावें वेळच मिळत नाहीं, " अशी कुरकूर करीत बसणारे लोक फार. इतकेंच नाहीं, कांहीं लोक किंबहुना पुष्कळ लोक उद्योग नसतांना वेळेच्या टंचाईविषयीं कुरकूर करतात ! मला वाटतें त्यांना रिकामपणामुळें वेळ नसतो. किंवा विश्रांति, आळस, यालाच जर ते उद्योग ह्मणत असतील तर त्यांना वेळ नसेल खरा. कांहीं **काळ** ह्मणून जेवढा त्यांच्या ताब्यांत आहे तितका सगळा ते आपल्या मतानें रिकामपणाच्या रूपानें उद्योगांतच घालवीत असतात. रिकामपणाला किंवा विश्रांतीला उद्योग समजून " आपल्यासारखे उद्योगी कोणी नाहींत " असें म्हणणाऱ्या लोकांविषयीं आपल्यास विचार करावयाचा नाहीं. ज्यांना असें वाटत असेल कीं आपल्या हातून वेळेचा निरुपयोग होतो आहे, त्यांचे करतांच हें लिहिणें आहे. हो, वेळेची किंमत समजवून द्यावयाची कोणाला ? ज्यांना ती समजत नसेल त्यांना; इतरांस काय करावयाचें आहे ? वेळाच्या टंचाईबद्दलची कुरकूर टाळणें म्हणजे वेळच्या वेळीं काम करणें. आणि वेळच्या वेळीं काम करणें म्हणजे सतत सुखाची प्राप्ति करून घेणें आहे. असें आहे तर मग आपण नित्य नेमानें वेळच्या वेळीं काम करण्यास कां झटत नाहीं ? पहा, त्यापासून अनेक फायदे आहेत. खरी गोष्ट मुळीं अशीच आहे. शिस्तवार काम करण्यानें वेळाची टंचाई ही कधींच पडत नाहीं. प्रत्येक गोष्टीचा वेळ नेमा व ती त्या वेळीं करा म्हणजे कधींही अडचण पडणार नाहीं. कारकुनानें आपले कागद सारे कसे तरी गोळा करून ठेवले, म्हणजे एखादा विशेष कागद सांपडण्याला त्याला जशी अडचण पडते तशीच वेळच्या वेळीं काम न करण्याची गोष्ट आहे. त्या हांहीं कुनाजवळ कागद मागायाला जा. त्याला हें हुसक तें पाहूं ! " पहा तें पहा असें करावें लागून सारी त्रेधा तिरपिट आणखी पुढें

त्या वेळीं काम न करणाऱ्याची गोष्ट. आयत्या वेळीं हें करूं कीं करूं ही त्रेधा. काळाचा सदुपयोग करावयाचा असा ज्या शीं निश्चय करावयाचा त्याच वेळीं त्याची शिस्तवारअगर शी-त त्याप्रमाणें वर्तन ठेवावयाचें असाही निश्चय केला अधिक रच कांहीं उपयोग होणार आहे. माझें असें म्हणणें नाहीं कीं आपण अगदीं मोकळीक ठेवूं नये. मोकळीक ही पाहिजेच. वेळ हा आपला दास केला पाहिजे. वेळाचे आपण दास होऊं देतां उपयोगी नाहीं. काळाची शेंडी धरून त्यास आपण वांकविलें पाहिजे. आपली शेंडी धरून त्यानें आपणास वांकवितां कामा नये. ‘ जसें वेळेस होईल तसें करूं. ’ ‘ त्याचा काय नेम, त्या वेळीं काय होईल आणि काय नाहीं ’ हीं व अशा अर्थाचीं वाक्यें होतां होईल तों मनांतून हांकलून लाविलीं पाहिजेत. त्याच्या जागीं ‘ अमूक वेळीं अमूकच करीन. ’ ‘ त्या वेळीं अमूक संकट येईल तें टाळून मला जें पाहिजे तेंच करीन ’ असें म्हटलें पाहिजे. त्या वेळीं होईल तें होईल हें उपयोगीं नाहीं. “ ह्मणेन त्या वेळीं करीन ” असें सतत म्हणत असलें पाहिजे. असें म्हणत असलें पाहिजे हें खरें, पण त्यापासून असें समजायाचें नाहीं कीं ज्या त्या वेळीं जें सुचेल तें म्हणेन आणि मग करीन. असें जो करील त्याच्यासारखा मूर्ख कोणीच नाहीं. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा. प्रत्येकानें पुढील काळाकरितां आधीं काम नेमावें व तें काम त्याचवेळीं लाखों संकटें आलीं तरी टाळून शेवटास नेईन, असें ह्मणत असावें “ म्हणेन त्यावेळीं करीन ” याचा अर्थ असा. उगीच यःकश्चित्-कारणांनीं तें एकीकडे ठेवूं नये. नाहीं तर ‘ काय करावं बोवा मला आतां तें काम करायचं होतं पण झोंपच आली ’ असें म्हणावें म्हणजे झालें. वा ! काय पण काम टाळण्याला कारण ! झोंप आली तर झोंपेच्या वेळीं झोंप घ्या. कामाच्या वेळीं कां ? कांहीं अनपेक्षित अशींच कारणें झालीं व वेळच्या नेमलेल्या का-मापेक्षां अत्यंत महत्वाचें काम आलें तर गोष्ट निराळी, पण तसें कांहीं कारण नसून यत्किंचित् कारणांनीं नियमित काम टाळणें,

म्हणजे आपल्या हातानेंच आपल्या पायावर धोंडा पाडून तिखेर आहे. एखाद्या मनुष्याचे हातून जितकें काम आठ दिवसांतून तखेर [illegible]नकेंच काम दुसरा एखादा एकाच दिवसांत करतो. अ वेळ [illegible] घालव[illegible] काय थोडीं सांपडतात ? मला वाटतें इतका एकांत्करावें दुसेऱ्यांत फरक पडण्याला मुख्य कारण वेळाचा उपयोग कर-ण्याची शिस्त हें होय. शक्ति व बुद्धि हीं कांहीं अंशीं कारणभूत असतील. परंतु त्यांचेकडे कारणसर्वस्वत्व देणें म्हणजे पदार्थ सोडून छायेला प्रधानत्व देणें आहे. हें उघडच आहे कीं काम करण्याची शक्ति आहे पण वेळेचा यथायोग्य विनियोग करण्याची बुद्धि नाहीं तर काय उपयोग होणार आहे ! नेम-लेल्या जागीं जाऊन पोंचण्याची शक्ती सशांत नव्हती असें कधींही कोणीं म्हटलें नाहीं. बरें, त्यास कासवानें मागें टाकलें म्हणून कासवाच्या अंगीं सशाच्या इतकी पळण्याची शक्ति आली असेंही कोणी म्हणत नाहीं. नेमलेल्या ठिकाणापासून निघून ने-मलेल्या ठिकाणापर्यंत जाण्याला लागणारा जो वेळ तो वास्त-विक त्याच कमाकडे लावणें हें उचित. तसें ज्यानें केलें तें कास-व विजय पावलें. त्याच वेळेचें तें काम सशानें ‘ जाऊं द्या कीं ’ असें म्हणून आळसावर टाकलें व झोंप घेतली; आणि मग ती वेळ गेल्यावर फजितखोराप्रमाणें तो धडपडून उठला. आणि पळत सुटला. पण तशा धडपडीनें काय होणार होतें ? विश्रांति पाहिजे, नको ह्मणतो कोण ? पण आधीं झोंप न घेतां ससा नेमलेल्या जागीं जाऊन मग उरलेल्या वेळीं झोंप घेता तर त्याच्या मूर्खपणाचें उदाहरण देऊन जगास शहाणें करण्याचें कारण इसापास कधींही पडलें नसतें. ज्याला एकदां उद्योगाची चटक लागली, तो आधीं कधीं विश्रांति विश्रांति म्हणून ओरड करणारच नाहीं. त्याला विश्रांतीची आठवणच होणार नाहीं. त्याची विश्रांति म्हणजे एका विषयाकडून दुसऱ्या विषयाकडे वळणें. इतिहास टाकून काव्य घेणें किंवा खुर्ची करावयाची टाकून टेबल करा-वयास घेणें. अत्यंत श्रमाचे कामाचा कंटाळा आला म्हणजे अगदीं थोड्या श्रमाचें काम घेणें. इतिहासाचें वाचन फार श्रम-

क त्याचा कंटाळा आला. एकादें वर्तमानपत्र घ्या. त्याचा
ळा आला एकादी चटकदार कादंबरी घ्या. नाटक
. हीच खरी विश्रांति. रिकाम्या चकाट्या पिटणें अगर श-
च्या उत्कृष्ट संगोपनाला आवश्यक असेल त्यापेक्षां अधिक झोप घेणें यासारखें मौर्ख्य कोणचेंच नाहीं. त्यापासून आरोग्यशास्त्रदृष्ट्या जे तोटे होतील ते निराळेच, त्यांचा विचार आपणास आतां करणें नलगे; परंतु ज्या विषयाविषयीं आपण आतां इतका विचार करीत आहों त्या विषयाच्या दृष्टीनें पाहतांही आपणास दिसून येईल कीं, वरच्याप्रमाणें करणें म्हणजे वेळेच्या किंमतीविषयीं आपण कधींच विचार केला नाहीं असें दाखविणें आहे. जो त्याजविषयीं नेहमीं विचार करीत असेल व त्याविचारापासून उत्पन्न झालेलें सुफळ ज्यानें चाखलें असेल, तो वरच्यासारख्या कृती कधींही करणार नाहीं. वेळेचा निरुपयोग म्हणजे 'विश्रांति' असें त्यास स्वप्नस्वप्नांतरींही वाटणार नाहीं. वर सांगितल्या तऱ्हेची रिकामटेकडेपणांत वेळ घालविण्याची विश्रांती कोणाला ? ज्याला आळसावारी कसे तरी दिवस लोटायचे आहेत त्याला. वर सांगितलेंच आहे कीं अशा आळशाला—अंहं चुकलों ' विश्रांति ' घेण्याचें अत्यंत महत्वाचें व जबाबदारीचें काम सतत व अगदीं अविहत करणाऱ्याला उद्योग करावयास वेळच नसतो. या बेट्या विश्रांतींत अशी कांहीं भयंकर प्रसरण शक्ति आहे कीं कांहीं पुसूंच नका.

ती एकदां जोर करूं लागली म्हणजे विश्रांतीला इतकी वाढविते कीं, कित्येकांचीं आयुष्येंचीं आयुष्यें विश्रांतींतच जातात. आणि म्हणूनच त्यांस दुःखें सोसावीं लागतात. सुखदुःख हें मनावर अवलंबून विशेष. ज्याचें मन उद्योगांत गूढ त्याला आपल्या दुःखाविषयीं अगर गरजांविषयीं विचार करण्याला अवकाशच नसतो. ज्याला काम ना धंदा त्याचें मन हवें तिकडे जाण्यास मोकळें; त्याला दुःखावर विचार करण्यास हवा तितका अवकाश. असें असल्यावर दुःखाची काय उणीव? पर्वताएवढें तर काय ,परंतु सृष्टीएवढें होऊनही तें त्यांच्यापुढें उभें राहील. वास्तविक म्हटलें म्हणजे

हें जग उद्योगाकरितां आहे. जो उद्योग करीत नाहीं केव्हांच ठार होणार. जीवनार्थ कलह मोठ्या झपाट्यानें चालू आहे. त्यांत योग्यतम ठरतील तेच अवशिष्ट होतील. बाकीचे केव्हांच ठणठण करीत जातील. योग्य नम्रता अंगीं आणण्याचें साधन उद्योग, आणि तोही वेळच्या वेळीं केलेला. लढाई जोरानें चालली आहे. आणि त्या वेळीं कायमची जी थोडबिहुत कुमक यावयाची ती आली नाहीं. अपजय होऊन शत्रूंनीं लोक धरून नेल्यावर तीच कुमक आल्यास करावयाचें काय? ज्या होमांत पहिले लोक पडले त्याच होमांत हे नवेही पडतील. ज्यांनीं योग्य वेळीं आपल्या शक्तीचा उपयोग केला ते राहिले. जयी झाले. ज्यांनीं तसा उपयोग केला नाहीं ते विजयवाद्य वाजवीत गेले. तेच नाहींसें झाले. परीक्षेस दहा महिने असतां आजपासून अभ्यास न करितां दोन महिने राहिले म्हणजे अपजयाच्या खात्रीबद्दल मोठा थोरला पुरावा नको आहे. तेव्हांपासून अभ्यास करून सिद्धि मिळविण्याची आशा करणें म्हणजे, काकतालीय न्यायाप्रमाणें आशा करीत बसणें आहे. आहे हा वेळ जाऊं देऊन पुढें करूं असें म्हणणारा एक अत्यंत मूर्ख तरी असला पाहिजे, नाहीं तर त्रिकालज्ञ तरी असला पाहिजे. दुसऱ्या तिसऱ्याची असें म्हणण्यास छाति होणार नाहीं. हो ज्या काळावर आपण भरंसा ठेऊन राहणार त्यांत अपरिहार्य अशीं विघ्नें येणार नाहींत कशावरून ? मूर्ख असेल तो असा प्रश्न विचारणारच नाहीं. किंबहुना तात्कालिक विश्रांति सुखाच्या रसाचे घुटके घेण्यात पूर्ण लय लागल्यामुळें त्याला हा प्रश्न सुचणारच नाहीं व असा प्रश्न सुचला नाहीं म्हणजे तो आजचें काम उद्यांवर ढकलील यांत नवल नाहीं. बरें, जो त्रिकालज्ञ असेल तो मुळीं पुढें विघ्नें येतील असें त्याच्या दिव्य दृष्टीस दिसलें तर तीं काढून टाकण्याची तजवीज करील आणि मग आजचें काम उद्यांवर ढकलील. धड आधें ना मधें असे जे आपण म्हणजे ज्यांच्या हातून काम तर वेळच्या वेळीं होत नाहीं, पण काय होईल कसें होईल, काय करावें कसें करावें असें ज्यांस नेहमीं होतें, त्यांची काय ती पंचाईत! पण असें पंचा-

चाईत म्हणत बसून काय उपयोग ! ती पंचाईत काढून याचा सतत प्रयत्न केला पाहिजे.

क्षणशः कणशश्चैव
विद्यामर्थंच साधयेत् ।
क्षणत्यागे कुतो विद्या
कणत्यागे कुतो धनम् ॥

एकसारखे चार सहा तास मिळाल्यावांचून अभ्यास करावयाचाच नाहीं असा जर कोणी विद्यार्थ्यानें निश्चय केला किंवा लाख रुपये मिळाल्याखेरीज धनसंग्रह करावयाचा नाहीं असा जर एकाद्या धनार्थ्यानें आग्रह धरिला, तर केवढें मौर्ख्य होणार आहे ? पहिल्याला विद्या आणि दुसऱ्याला धन हीं कधींच मिळणार नाहींत. जो क्षण आला तो उपयोगाला लावला पाहिजे. आणि जो कण मिळाला तो पदरीं गांठला पाहिजे. इकडे चार क्षण सांपडले तिकडे चार क्षण सांपडले त्या सर्वांचा उपयोग योग्य तऱ्हेनें केल्यामुळें बहुतेक मोठे लोक पदवीला चढले आहेत. कित्येकांनीं तर अशा तुटक क्षणांचा उपयोग करूनच मोठाले ग्रंथ लिहिले आहेत. आपण जो वेळ एवढासा ह्मणून टाकून देतों त्या एवढ्याशा वेळाचा उपयोग करूनच ते मोठे झाले. जकातीच्या नाक्यावरला जागरूक व प्रामाणिक जकातदार जसा कोणतेंही जकातीचें सामान जकात घेतल्यावांचून जाऊं देत नाहीं, त्याप्रमाणेंच मोठे लोक एका क्षणासही त्याच्यापासून उद्योगरूपानें योग्य तितका कर घेतल्यावांचून जाऊं देत नाहींत. डाक्तर कुईव्हिएर जो पुढें विख्यात प्राणिशास्त्रज्ञ झाला, तो आपल्या गाडींत बसून रोग्यांच्या घरोघर जातां जातां वाचन व विचार करीं; व त्या वाचनाच्या विचाराचें फळ पुढें शरीरशास्त्रावर एक मोठा ग्रंथ बाहेर पडला हें होय. हेन्री कर्कव्हाईट नांवाचा कवि घरून आपल्या कचेरींत जातांना व कचेरींतून घरीं येतांना, जो त्याला वेळ मिळे, तेवढ्या वेळांत ग्रीक भाषा शिकला ! डाक्टर मेसनगुड नांवाचा डाक्तर,

आपल्या एका रोग्याच्या घरून दुसऱ्या रोग्याच्या जातां जातांच जो त्याला वेळ मिळे तो वेळ लाटिन ग्रंथाच्या भाषांतरास लावी. व त्याप्रमाणें तें पांतर त्यानें केलें ही. हें भाषांतर त्याच्या नेहमीच्या वैद्यक विषयाचें नसून एका काव्यग्रंथाचें होतें हें विशेष. एके जर्मन डाक्तरानें अशाच वेळांत होमर कवीचें ईलियड सबंद पाठ केलें! डार्विन साहेबांनीं आपलीं शास्त्रीय काव्यें अशाच वेळीं लिहिलीं. ही सर्व मंडळी " क्षण झाला म्हणून व्यर्थ जाऊं देऊं नका, क्षणाक्षणांनींच आयुष्य बनलें आहे. कणाकणांचेच पर्वत झालेले आहेत. " असें सदैव मनांत समजून चालणारी होती, ह्यू मिलर जो पुढें एवढा मोठा ग्रंथकार झाला, तो आधीं पाथरवट होता ! आणि तें काम करतां करतां जो थोडथोडा वेळ मिळे, तेवढ्या वेळांत त्यानें भाषेचा अभ्यास केला. एलिहुबुरिट नांवाचा लोहार पुढें आपल्या विद्वत्तेमुळें " विद्वान् " या पदवीला आला तो अशा क्षणांचा उपयोग केल्यामुळेंच. अशा तुटक तुटक वेळींच अभ्यास करून त्यानें अठरा निरनिराळ्या भाषांचें व बाविस उपभाषांचें ज्ञान मिळविलें! अशीं आणखी किती तरी उदाहरणें देतां येतील. किंबहुना जो जो म्हणून स्वप्रयत्नांनीं मोठा गृहस्थ झाला आहे (मग तो कोणच्याही कारणानें होवो) त्याच्या त्याच्या आयुष्यक्रमांत अशा तुटक तुटक क्षणांचा उपयोग केल्यामुळेंच त्यास मोठेपणा प्राप्त झाला असें आढळेल. कित्येकांना तर नेहमीचा वेळ न पुरल्यामुळें झोंपेच्या वेळांतून वेळ कमी करावा लागत असे. हें करणें चांगलें असें कोणी म्हणणार नाहीं. परंतु जो वेळ वास्तविक कामांत घालवावयाचा तो झोंपेंत आळसांत घालविण्यापेक्षां, झोंपेचा वेळ उपयोगांत घालविणें पुष्कळच बरें असें कोण म्हणणार नाहीं?

क्षणाक्षणाचा उपयोग करून घेणें ही पहिली गोष्ट झाली. आतां शिस्तीकडे पाहूं.

आजपर्यंत या वेळाच्या उपयोगावर जितक्यांनीं म्हणून कांहीं लिहिलें आहे, तितक्यांनीं सर विलियम जोन्स यांचें उदा-

घेतल्यावांचून सोडलें नाहीं. अशी जरी गोष्ट आहे तरी तेंच उदाहरण घेऊन आम्ही काय म्हणतों तें स्पष्ट करणार. तें उदाहरणच असें आहे कीं, कितीही ठिकाणीं दूलेलें असू द्या, त्याचा मनावर परिणाम झाल्याखेरीज रहत नाहीं. त्यानें या अशा तुटक तुटक क्षणाक्षणांचा उपयोग करून वयास विसावें वर्ष लागलें नाहीं तोंच ग्रीक, ल्याटिन, इटालियन, स्प्यानिश व पोर्च्युगीज इतक्या भाषांचा अभ्यास उत्तम प्रकारचा केला होता. शिवाय तितक्याच काळांत आरबी व पारशी या भाषांचेंही बरें-चसें ज्ञान संपादलें होतें. त्याचे जितके म्हणून चरित्रकार झाले, त्या सर्वांनीं त्याच्या शिस्तीचें फार वर्णन केलें आहे. काम आणि त्याची वेळ हीं अगदीं बांधलेलीं. त्यानें आपल्या वेळेचा विनियोग पुढील प्रकारानें केला होता. तो विनियोग कसा करावा याबद्दल त्यानें एक पद्यच तयार केलें होतें त्याचा अर्थ असा: " कायद्यासंबंधी कामें करण्याला सात तास खर्चावे. आपल्यास विश्रांति देऊन पुनः ताजेतवाने करणारी अशी जी सुखनिद्रा तिला सात तास द्यावे. बाकी उरलेले दहा तास जगांत असल्याकारणानें अवश्य केलीं पाहिजेत अशा व इतर कामांकडे लावावे. " ईश्वरभजनाला तर काय अमुक वेळ अशी नेमावयासच नको. ज्याला ईश्वरभजन करणें तो कविराज वामन पंडित यांच्या उपदेशाप्रमाणें करीलच करील. हा वेळेचा जो विनियोग आहे, हा प्रत्येकानें घेण्याजोगा आहे. सर्वांना उपयोगी पडणारे असे वेळेचे विभाग पाडणें फारच कठीण. कारण कोणाला कोणची वेळ सोयीची पडते हें काय सांगावें! तरी सर विलिअम् जोन्स यांनीं आपल्या करितां केलेले वेळेचे विभाग फारच चांगले आहेत. त्याला अनुसरून चालण्याची आम्ही शिफारस करतों. लार्ड जेफ्रे यांनीं या अनेक भाषाकोविदाच्या विषयीं जे चार शब्द लिहिले आहेत ते येथें भाषांतर करून घेतले असतां वाचकांस कंटाळा येणार नाहीं अशी खात्री बाळगून ते उतरून घेतों:—

" मूळापासून पहा पाहिजे तर. तुम्हांला असेंच दिसून कीं त्यानें जबर उद्योग केला. आळस म्हणून यत्किंचित्ही नाहीं. लहानपणापासून त्यानें मुळीं असें केलें. अमुक एक शेष गुणाकरितां ह्मणून जो कोणी प्रसिद्ध असा सांपडला वेळ त्या गुणाकरितां त्यानें आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं उदाहरणें घेतलें. मग तें उदाहरण कधींही त्यानें आपल्या मनांतून ढळूं दिलें नाहीं. मनांतला निश्चय हा कीं मी त्या गुणांत त्याच्या सारखा होईन. असा पक्का निश्चय करून त्यानें त्या त्या गुणांची आपल्या अंगीं पूर्णता आणण्यास एवढीही कसूर केली नाहीं. त्याचा जन्म झाला म्हणजे साधारण गरीब स्थितींत असणाऱ्या आईबापांच्या पोटीं झालेला; पण त्यानें अभ्यास करून योग्य अशा तऱ्हेचें शिक्षण मिळविण्याचा व ज्ञानसंपन्न होण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें तो अमलांतही आणला. तो पुढें जज्जाच्या जागेवर गेला होता तर त्या जागेला लागणाऱ्या ज्ञानाचाही त्यानें अत्यंत संग्रह केला व त्या ज्ञानसंग्रहाची वृद्धि केली. नुसता विद्वान् म्हणून कीर्ति व्हावी एवढाच त्याचा हेतु नव्हता तर आपण जगाच्या कांहीं तरी वास्तविक उपयोगीं पडावें हा मुख्य हेतु. देशाभिमान तर काय नुसता त्याच्या मनांत प्रज्वलित होता. सद्गुणाचें तो केवळ माहेरघर व राजनीतींत त्याच्यासारखा कुशल विरळा. ज्याचें सदोदित उदाहरण घ्यावें व घ्यावें असा जो त्याचा उद्योग तो व त्याचा एकनिश्चय हीं दोन्हींही मोठें होऊं पहाणाऱ्यांनीं लक्ष्यांत धरलीं पाहिजेत. त्यानें आपल्या थोड्याशा आयुष्यक्रमांत ज्या काय गोष्टी केल्या त्या सर्व वरील दोन गोष्टींनीं त्यानें पार पाडल्या. हें मुळीं असेंच आहे कीं, ज्यांनीं ज्यांनीं आपलें नांव मागें ठेविलें आहे त्यांचा त्यांचा चरित्रक्रम जर आपण मुळापासून पहात गेलों तर आपणांस स्पष्ट दिसून येईल कीं जगांत अजरामर कीर्ति जर ठेवायची आहे व खरा मोठेपणा मिळवायचा आहे तर अत्यंत श्रम केल्यावांचून किंवा क्लेश भोगिल्यावांचून किंवा तो मिळण्याची योग्यता अंगीं आणल्यावांचून कांहींएक होत नाहीं; तसेंच त्या बरोबर हेंही दिसून

कीं, कोणच्याही गोष्टींत सिद्धि मिळविण्याला विलक्षण ां एकनिश्चय व उद्योगित्व हींच अधिक अवश्य होत. ” णत्याही गोष्टींत सिद्धि मिळविण्याचे जे फार महत्वाचे आहेत त्या सगळ्यांत वेळेचा शिस्तवार उपयोग करणें हा फार महत्वाचा मार्ग आहे. किंबहुना असेंही ह्मणतां येईल कीं तोच मार्ग काय तो सिद्धि देणारा आहे. कोलरिज् कवि म्हणतो “ ज्याला शिस्त ठाऊक नाहीं त्याला कांहींच ठाऊक नाहीं. ज्याला शिस्तीचा गुण नाहीं त्याला कोणचाच गुण नाहीं. कारण बाकीचे गुण असून नसून त्याला सारखेच. ज्याला शिस्त फार, जो अगदीं वेळेवर काम करण्यास कधींही चुकत नाहीं, त्याला आपण ‘ तो म्हणजे एक चालतें बोलतें घड्याळ आहे ’ असें म्हणतों. आपण असें म्हणतों खरे, पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. घड्याळ काय ? तुम्हांला वेळेचे नियमित विभाग दाखवितें याच्या पलीकडे कांहीं नाहीं. शिस्तवार मनुष्य तो वेळेचा विभाग आपलासा करून घेतो. त्याच्यापासून काम करून घेतो. आळशी मनुष्याविषयीं आपण म्हणतों, तो काय वेळ कशी तरी मारतो झालें. पण उद्योगी मनुष्य त्या वेळेंत कांहीं तरी जीव आणतो. तो काम करून त्या वेळेला विशिष्टता आणतो.

‘ वेळ म्हणजेच पैसा ’ अशी एक इंग्रजींत म्हण आहे. ही म्हण जर प्रत्येक मनुष्य ध्यानांत धरून वर्तन ठेवील तर किती बरें चांगलें होणार आहे ? पण होतें आहे कोठें ? वेळ म्हणजे पैसा इतकेंच नव्हे तर वेळ म्हणजे सौख्य, शांतता, समाधान, संतोष, सर्व कांहीं वेळ आहे. सुवर्ण हातीं असल्यावर जशीं हवीं तीं पात्रें करतां येतात तसेंच वेळाचें आहे. तो हातीं ठेवला म्हणजे काय हवें तें होतें. मूर्खाच्या हातीं जो वेळ असतो त्याचा तो आपल्या परीनें उपयोग करतो व त्या वेळीं असे कांहीं उद्योग करतो कीं जगाला त्यापासून त्रास व्हावा. तोच शहाण्याच्या हातचा वेळ जगाच्या कल्याणाकडे लागतो. एकाला वेळ अतिशय होतो; दुसऱ्याला पुरत नाहीं. एक आतां इतक्या वेळांत काय करूं असें म्हणतो; दुसरा इतक्या वेळांत अमुक क-

रीनच करीन असें म्हणून तें अमलांत आणतो.

ज्यांला वेळेचा उपयोग खरोखर करून घ्यावयाचा आहे गृहस्थांकरतां सदैव सारखे उपयोगी पडणारे असे चार पांच देणें श्रेयस्कर होईल असें वाटतें. ते नियम हेः—

एका वेळीं एकच गोष्ट करीत असावें.

जें आतां केलेंच पाहिजे तें तावडतोब करावेंच.

जें आज केलेंच पाहिजे तें उद्यांवर ढकलूं नये.

स्वतांला जें काम करतां येईल तें दुसऱ्यावर टाकूं नये.

विनाकारण गर्दी केली कीं काम लवकर व्हायचें नाहीं.

पण असे नियम वाचण्यापेक्षां उदाहरणें पहावीं तें चांगलें. आजपर्यंत जे जे मोठे लोक झाले त्यांचीं त्यांचीं चरित्रें वाचावीं व त्यांतून आपल्याला हवें तें घ्यावें. त्यांपासून जो फायदा होईल त्याच्या पुढें असे लाखों नियम आले तरी कुचकामाचे. अमुक अमुक मनुष्य फारच कीर्तिवंत झाला आहे असें ऐकलें कीं तो उद्योगानें व वेळेच्या शिस्तवार उपयोगानें झाला आहे म्हणून समजावें. अमुक एका गृहस्थानें आपल्या विद्वत्तेनें व शहाणपणानें आपल्या कुटुंबाचें किंवा शेजाऱ्याचें किंवा गांवाचें किंवा देशाचें बरें केलें असें ऐकलें कीं हें सर्व, वेळेच्या सदुपयोगानें त्यानें केलें असें समजावेंच. तर अशा लोकांचीं उदाहरणें घेऊन आपण वेळेचा उपयोग करण्यास शिकावें.

...लांस थोडा उपदेश.

खेळ.

मुलांनो,

आजचा हा दिवस तुमचा आहे. आजच्या दिवशीं तुमचे शिक्षक व तुमचे शाळाधिकारी तुम्हांला आपल्या मनाप्रमाणें नानाप्रकारचे खेळ खेळून मनमुराद आनंद करून घेण्यास मुभा देतात. हा दिवस क्रीडोत्सवाचा आहे. इतर दिवशीं अभ्यास मुख्य, आज खेळ मुख्य. इतर दिवशीं तुमचे शिक्षक व तुमचीं वडील माणसें यांची हुकमत तुमच्यावर विशेष प्रकारानें चालते. आज तुमच्या तुमच्या हुकमतीनें तुम्हीं आपला हा उत्सव पार पाडावा अशी तुम्हांला मोकळीक दिली जाते. इतर कांहीं सभा किंवा उत्सव झाले, तर तुम्ही केवळ प्रेक्षक असतां. आज तुमचीच सभा, तुमचाच उत्सव आणि आम्ही शिक्षक व वडील माणसें केवळ प्रेक्षक आहों. आज आम्हीं आपलें शिक्षकांचें नातें दूर ठेविलें आहे. आम्ही तुमच्याहून वडील हें विसरून गेलों आहों. कां ? तर तुम्ही आपल्या हुकमतीनें, तुम्ही आपल्या कर्तृत्वानें, तुमच्या तुमच्या शिस्तीनें तुमचें हें एक दिवसाचें आनंदसाम्राज्य कसें काय चालवितां हें पहावयाचें !

आतां मीं ह्मटलें कीं आज आम्हीं आपलें शिक्षकपण, आपलें वडीलपण हीं दूर ठेविलीं आहेत. पण तें पूर्णपणें खरें नाहीं. तुम्हांला वरून असें दिसतें आहे कीं आज आपणास आपल्या शिक्षकांनीं मनसोक्त खेळण्याची मुभा दिली आहे. आज अभ्यासाचें नांव नाहीं. परंतु खरी स्थिति तशी नाहीं. आज हा तुमचा उत्सव तुमचेकडूनच पार पाडण्यांत, व तुम्ही आपले खेळ खेळण्यांत आम्ही तुमचेकडून अभ्यास करवणार आहों. एवढी गोष्ट खरी कीं, आज तुमच्या हातांत आम्ही वाचनपुस्तकें देऊन वाचून घेत नाहीं; तुम्हांला भूगोल पाठ ह्मणावयाला लावीत नाहीं;

किंवा गणितांतलीं उदाहरणें करवून घेत नाहीं; परंतु कडून खेळाच्या मिषानें केवढ्या तरी महत्त्वाच्या गोष्टींचा करून घेणार आहों ! घाबरूं नका. अभ्यासाचें नांव काढलें कावरेबावरे होऊं नका. ‘ आजही हा अभ्यास आपल्याला नाहींच का ! ’ असें वाटून आपल्या आनंदांत विरस करून घेऊं ने हा अभ्यास आह्मी आजच तुमच्याकडून करून घेतों आहोंत असें समजूं नका. जेव्हां जेव्हां ह्मणून तुह्मांला खेळण्यास मुभा दिली जाते, आणि खेळ खेळूं दिले जातात, तेव्हां तेव्हां तुमच्याकडून कांहीं महत्त्वाच्या विषयांचा अभ्यासच करविला जातो. तुह्मांला मात्र समजत नाहीं कीं, आपण या वेळीं कांहीं शिकतों आहों. कित्येक वेळां मुलांना औषध देणें भाग पडतें. कडू, आंबट, तुरट असें औषध असलें ह्मणजे मुलें तें घेण्यास फार खळखळ करितात, हट्ट करितात, बळेंच पाजलें तर थुंकून टाकतात ! परंतु तेंच औषध साखरेंत घालून दिलें ह्मणजे मिटक्या मारून खातात ! तसाच हा प्रकार आहे. ज्या महत्त्वाच्या गोष्टी आह्मी तुम्हांला शिकवितों, त्या इतिहासभूगोलासारख्या पाठ करून, म्हणून अगर लिहून दाखविण्यासारख्या नाहींत; तर अंगांत मुरल्या पाहिजेत, मनांत बाणल्या पाहिजेत व हातून घडल्या पाहिजेत, अशा आहेत. मुलांनो, त्या गोष्टी आम्ही खेळांच्या द्वारानें तुम्हांला शिकवितों. त्या मोठेपणीं तुम्हांस फार उपयोगी पडणाऱ्या आहेत. कशा त्या पहा.

तुम्हीच विचार करा, खेळ म्हणजे आहे तरी काय ? आज तुह्मांला काय, किंवा पुष्कळ मोठ्या माणसांना काय, खेळ म्हणजे कांहीं महत्त्वाची बाब नाहीं असें वाटत असतें. पण खरी स्थिति तशी नाहीं. खेळ हा फार महत्त्वाचा विषय आहे असें, तुमचा तुह्मींच विचार केला, तर दिसून येईल. हा विचार करण्याला मी आज तुम्हांला मदत करतों. मुलांनो, तुह्मी एखादा खेळ खेळतां, तेव्हां अव्वलपासून अखेरपर्यंत काय काय करतां याचा विचार करा, ह्मणजे तुमचें तुम्हांलाच या विषयाचें महत्त्व समजून येईल. पहा, आपण एक खेळ–त्याची अशा प्रकारें तपासणी करावयाला–हातीं घेऊं. आजकाल तुम्हांला सर्वांना फार आवडता झालेलाच खेळ घेऊं.

क्रिकेट तुह्मांला फार प्रिय. यांतच तुम्ही काय काय करतां :—

प्रथम गडी वांटून घेतां.

२ नंतर आपआपल्या पक्षाला कोणी तरी एक नाईक नेमतां.

३ मग कोणत्या पक्षानें आधीं खेळावयास (बॅटीनें चेंडू मारणें हें या खेळाचें मुख्य अंग) प्रारंभ करावयाचा तें ठरवितां.

४ तुमचा नाईक कोणीं कोठें उभें रहावें व काय करावें तें ठरवून देता

५ खेळांत कांहीं शंका येऊन भांडणें होण्याचा प्रसंग आल्यास शंका काढून टाकून वाद मिटविण्यास लवाद (अंपायर) नेमतां.

६ खेळाच्या नियमांप्रमाणें खेळ खेळूं लागतां.

या क्रिकेटच्या खेळाच्या काय, किंवा दुसऱ्या कोणत्याही खेळाच्या काय मुळाशीं तत्त्वें एकच आहेत. तीं तत्त्वें हीं:—

१ दोन पक्ष असावयाचे.

२ ज्या त्या पक्षानें आपलें रक्षण करून दुसऱ्यावर सरशी करावयास झटावयाचें.

३ एकमेकांनीं एकमेकांच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करावयाच्या व त्या मागें सारून एकमेकांवर सरशी करावयाची. आपल्या पक्षाच्या माणसांस यश यावें ह्मणून त्यांस साहाय्य करावयाचें व ज्यानें त्यानें आपलें काम चोख करावयाचें.

हीं तत्त्वें ज्याच्या मुळाशीं नाहींत असा खेळच नाहीं. पहा, तुह्मीच सर्व खेळ तपासून पहा. घरांत बसून खेळावयाच्या गंजिफा, बुद्धिबळें वगैरे खेळापासून तों शिकार किंवा पोलोपर्यंत सगळे खेळ पहा. त्यांचीं तत्त्वें एक !

आणखी थोडा विचार करा ह्मणजे तुह्मांला असें दिसून येईल कीं हींच तत्त्वें मोठेपणच्या तुमच्या चरित्रक्रमाच्या मुळाशींही आहेत ! तुमचा पुढचा चरित्रक्रम ह्मणजे असाच आहे. त्यांत तुह्मांला जीं कार्यें करावीं लागतात, तीं अशींच आहेत.

१ या चरित्रक्रमांत बहुतकरून तुमचा तुम्हांला एक पक्ष निवडून घ्यावा लागतो.

२ आपलें स्वतःचें व आपल्या पक्षाचें तुम्हांला संरक्षण करावें लागतें.

३ आपल्या विरुद्धपक्षाचा पाडाव करून आपली सरशी होईल असें करावें लागतें.

४ तुमच्या मार्गांत अडचणी येतात त्या तुम्हांला दूर साराव्या लागतात. तुमच्या विरुद्धपक्षानें तशा अडचणी वाढवूं नयेत म्हणून त्यांच्या मार्गांत अडचणी तुम्ही घालतां.

५ आपल्या पक्षाच्या माणसांस यश यावें ह्मणून त्यांस साहाय्य करावें लागतें व आपण आपलें काम चोख करावें लागतें. असें तुह्मीं केलें तरच तुम्हांला व तुमच्या पक्षाला यश लाभतें व सर्वांचें कल्याण होतें.

तेव्हां तुम्ही खेळ खेळतां म्हणजे काय करतां तें पहा बरें ! पुढें तुमच्या अंगावर संसारव्यवहाराची जबाबदारी पडली म्हणजे त्या जबाबदारींतून नीट वहिवाटावें ह्मणून लागणारी सामग्री आज सांठवून ठेवतां. सालअखेरीला परीक्षा घेण्यास इन्स्पेक्टर आले ह्मणजे तींत पास होऊन बक्षीस मिळविण्यासाठीं जसे आपले इतिहास भूगोल पाठ करून जय्यत ठेवतां, तसेंच पुढल्या तुमच्या आयुष्यांत तुह्मी संसारव्यवहारांत पडलां म्हणजे यशस्वी होण्यासाठीं लागणारे गुण आज खेळांच्या मिषानें तुम्ही शिकून घेतां

मुलांनो, खेळाच्या मुळाशीं असणारीं आणि संसारव्यवहाराच्या मुळाशीं असणारीं तत्त्वें एकच आहेत, त्याप्रमाणें त्यांतून यशस्वी होऊन पार पडण्याला लागणारे गुणही एकच आहेत. याकरितां तुह्मांला खेळ खेळावयाला लावून ते गुण तुमच्या अंगीं उत्पन्न होतील असें आह्मी करतों ! तुम्हीच नीट विचार करून पहा. तुम्ही खेळ खेळतां म्हणजे काय करतां ? अगदीं लहानपणापासून तुम्ही जे खेळ खेळतां ते काय असतात ? पहा बरें ! तुमचे खेळ म्हणजे नकला नसतात काय ? अगदीं लहान मुलें खेळ खेळूं लागलीं म्हणजे काय करतात ? या प्रश्नाचें उत्तर एकच आहे. तीं जें पहातात त्याची नकल करतात ! मुलगा आपल्या बापाप्रमाणें करूं पहातो. बाप

चालूं इच्छितो. त्याचें पागोटें घालतो, त्याचा जोडा ...ची काठी घेतो; इतकेंच नव्हे तर त्याची चाळशी सुद्धां चढवितो ! त्याचें पुस्तक घेऊन वाचल्याची ऐट करतो. ...घेऊन तिचा घोडा करतो. तो घोडा जलदी चालावा म्हणून आपल्याच अंगावर चापट्या मारतो ! मुलगी काय करते ? भातुकली खेळते, चूलबोळकीं मांडते, स्वयंपाक करून सगळ्यांना वाढण्याचा आव घालते, घरांत शाळेंत जाणारी मंडळी असली, तर शाळेंत जाण्याचा व लिहिण्यावाचण्याचा आव घालते. सारांश काय, कीं ज्या गोष्टी वडील माणसें करतांना मुलें पहातात–ज्या गोष्टी त्यांना पुढें कराव्या लागतात–त्या गोष्टी नकलेच्या रूपानें मुलें लहानपणीं करतात. त्या त्यांच्या करण्यालाच खेळ म्हणतात. तेव्हां हे खेळ खेळतांना सहजच त्या त्या गोष्टींना लागणारे गुण मुलांकडून नकळत शिकले जातात.

अगदीं लहानपणच्या खेळांची ही गोष्ट झाली. परंतु तुम्ही थोडे मोठे झालां म्हणजे तुमचे खेळ तरी काय असतात ? तेही पुढें तुम्ही संसारव्यवहाराला लागण्याची वेळ आली म्हणजे तुम्हांला जीं कर्तव्यें करावीं लागतात, त्या कर्तव्यांच्याच नकला असतात ! आतां मीं सांगितलेंच कीं संसारव्यवहारांत करावीं लागणारीं कर्तव्यें चांगल्या प्रकारें पार पडावीं म्हणून जे गुण अंगीं असावे लागतात, तेच गुण तुमच्या खेळांतही तुह्मांला यश येऊन तुह्मीं नांव मिळवावें अशी तुमची इच्छा असल्यास तुह्मांला अंगीं बाणवावे लागतात. परंतु हे गुण काय असतात ते सांगण्यापूर्वी मला तुम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, ज्याप्रमाणें संसारव्यवहारांत त्याचप्रमाणें खेळांतही कांहीं प्रकारचीं बळें अंगीं असावीं लागतात.

कोणतेंही काम करावयाचें म्हटलें ह्मणजे तें करण्याला बळ लागतें. हें बळ चार प्रकारचें आहे. एकाच प्रकारचें नाहीं. साधारणतः बळ म्हटलें कीं आपण एक शरीरबळच काय तें समजतों. पण नुसत्या शरीरबळानें काम होत नाहीं. एखादा जिन्नस

इकडून तिकडे ठेवावयाचा असला, तर तें शरीरबळानें र एवढ्या बळानें काम भागत नाहीं. शरीरबळाबरोबर दुसरीं बळें आहेत. तीं सारीं बळें ज्याच्या अंगीं असतात तोच कामांत यशस्वी होतो. दुसऱ्यानीं ज्याचा कित्ता घ्यावा असा होतो. अनेक चांगलीं परोपकाराचीं कामें त्याच्या हातून होतात. त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या सर्व लोकांस त्याच्यापासून सुख होतें. हीं बळें चार प्रकारचीं आहेत.

१ शरीरबळ, २ ज्ञानबळ, ३ निश्चयबळ व ४ नीतिबळ. हीं चारही प्रकारचीं बळें आपल्या अंगीं असणें किती जरूर आहे पहाः—

आपणास एखादी गोष्ट करावीशी वाटली, परंतु ती करण्यास आपल्या अंगांत मुळींच बळ नाहीं, आपण अगदीं दुबळे आहों, तर ती गोष्ट आपल्या हातून होईल का ? कधीं व्हावयाची नाहीं. खेळाचीच गोष्ट घ्या. तुम्हांला आट्यापाट्या, खोखो, क्रिकेट वगैरे कांहीं खेळ खेळावेसे वाटले, पण तुमच्या अंगांत मुळींच ताकद नाहीं, तर त्या नुसत्या वाटण्याचा काय उपयोग ? म्हणून शरीरबळ आधीं मिळविलें पाहिजे.

पण मुलांनो, नुसत्या शरीरबळानेंच कामें होत नाहींत हो ! कोणतेंही काम करण्याला योग्य वेळ कोणती, कोणत्या युक्तीनें तें होईल, या गोष्टींचें ज्ञान पाहिजे. नुसत्या अंगबळाच्या जोरावर कामें करूं गेलेले लोक किती वेळां तरी अपयश पावतात ! कारण काय ? तर त्या शरीरबळाचा कोठें, केव्हां, आणखी कसा उपयोग करावयाचा हें समजलें पाहिजे. आपल्या प्रतिपक्षानें मारलेला चेंडू स्टंपांना लागूं न देतां बॅटीच्या फटकाऱ्यानें टोलवावयाचा खरा, तो दूर टोलवण्याला आपल्या मनगटांत बळही असेल, पण नुसत्या मनगटाच्या जोरानें काम होत नाहीं. तो जोर कसा कोठें लावावयाचा याचें ज्ञान पाहिजे. तर त्या बळाचा उपयोग योग्य प्रकारानें होतो ! नुसत्या अंगबळाचा कांहीं उपयोग होत नाहीं.

आणखी विचार करा. तुम्हांला कोणतेंही कार्य करावयाला अंगबळ आहे. तें कार्य कसें करावयाचें, त्याची युक्ति जाणण्याला ज्ञानबळही आहे, परंतु निश्चयबळ नाहीं, तर काय उपयोग ? अमुक एक गोष्ट

करणारच—कितीही संकटें वाटेंत आलीं, तरी त्यांना न डगमगतां तीं शेवटास नेणारच—असा निश्चय अंगीं पाहिजे. कित्येकांना कोणतेंही काम करण्यास लागणारें अंगबळ असतें. तें काम करण्याला लागणारें ज्ञानबळही असतें, परंतु काम करूं लागल्यावर तें शेवटास नेऊन पोंचविण्याला निश्चयबळ नसतें. ते लोक कांहीं वेळ धडपड करितात, आणखी लवकरच प्रयत्न सोडून देतात. एखादी अडचण वाटेंत आली कीं त्यांचा धीर सुटून ते आपण आरंभिलेलें काम अर्धेंच टाकून देतात. असें होऊं नये ह्मणून प्रत्येक मनुष्यानें अंगबळ व ज्ञानबळ यांचेबरोबर निश्चयबळही मिळविलें पाहिजे.

आणखी थोडा विचार करा. तुह्मांला अंगबळ आहे, ज्ञानबळ आहे, निश्चयबळही आहे. या तीन बळांच्या योगानें तुह्मी कोणतेंही काम उत्तम प्रकारें पार पाडूं शकतां; परंतु आणखी एक प्रकारचें बळ आहे तें तुह्मीं आपल्या ठिकाणीं आणिल्याखेरीज तुम्हांला चांगलें काम कोणतें, आणि वाईट कोणतें हें समजणें शक्यच नाहीं. या जगांत आपल्याला कामें करावयाचीं आहेत तीं कोणतीं तरी कामें करावयाचीं आहेत असें नव्हे, तर चांगलीं कामें करावयाचीं आहेत. आणि जर चांगलीं कामें करावयाचीं आहेत तर चांगलीं कोणतीं, आणि वाईट कोणतीं हें समजलें पाहिजे. हें समजण्याचें जें बळ त्यास नीतिबळ ह्मणतात. हेंही बळ आपल्यास असलें पाहिजे.

हीं चारही बळें असलीं ह्मणजे कसें होतें तें पहा.

१ नीतिबळानें—कोणतें काम चांगलें आणि कोणतें वाईट हें ठरवितां येतें.

२ निश्चयबळानें—तें काम आपण धीरानें आणि नेटानें, कोणत्याही अडचणींस मुळींच न जुमानतां, शेवटास नेतों.

३ ज्ञानबळानें—तें काम जशा युक्तीनें आणि खुबीनें करावयाचें तशा युक्तीनें व खुबीनें तें आपण करतों. आणि

४ अंगबळानें—त्या कामास लागणारे जे अंगाचे कष्ट ते आपण करून व त्यामुळें होणारा त्रास सोसून काम पार पाडतों.

मुलांनो, तुम्ही आज मुलें आहां. परंतु तुम्ही कांहीं सदा सर्वकाळ

मुलेंच रहाणार नाहीं. कोणी दहा वर्षांनीं, कोणी पांच वर्षांनीं मोठीं माणसें होणार आणि मोठीं माणसें झालां, म्हणजे तुम्हांला हजारों कामें करावीं लागणार. तीं कामें तुमच्या हातून चांगल्या प्रकारें पार पडावीं म्हणून तुम्हांला आतां सांगितलेलीं चारही प्रकारचीं बळें आपल्या ठिकाणीं आणलीं पाहिजेत. तीं तुम्हांला मिळतील अशा प्रकारें तुम्हांला आह्मीं गुरूंनीं व तुमच्या वडील मंडळींनें शिकविलें पाहिजे. तीं बळें तुह्मांला मिळावीं ह्मणून तुह्मांला शिक्षण देण्यासाठीं जे अनेक मार्ग आह्मी योजतों, त्यांतच तुमचे ' खेळ ' हा एक मार्ग आहे. तुम्ही पहा बरें, तुमच्या खेळापासून तुम्हांला हीं चार बळें कशीं लाभतात तीं !

ज्यांत पळावें, धांवावें लागतें, किंवा उड्या माराव्या लागतात असे ह्मणजे–खोखो, आट्यापाट्या, क्रिकेट, टेनिस–हे मैदानांत उघड्या हवेंत खेळावयाचे खेळ तुह्मांकडून रगड व्यायाम करवून चांगलें अंगबळ देतात.

हेच खेळ खेळण्यांत पुष्कळ अभ्यास करून युक्त्या योजून आपल्या विरुद्ध बाजूवर तुह्मी सरशी करतां, यामुळें तुम्हांस ज्ञानबळ लाभतें. नुसती धांव मारण्याची ताकद आहे एवढ्यानेंच कोणालाही कोणत्या खेळांत पटाईतपणा येत नाहीं. तर आपल्या त्या ताकदीचा केव्हां व कसा उपयोग करावयाचा तें समजून जेव्हां तिचा उपयोग करतां येतो, तेव्हांच कोणत्याही खेळांत पटाईतपणा येतो.

त्याचप्रमाणें कोणत्याही खेळांत पटाईतपणा मिळवावयाचा तर तो खेळ नेटानें व निश्चयानें खेळत राहिल्यानेंच मिळणें शक्य आहे. एक दिवस खेळलें, दोन दिवस नाहीं, असें केल्यानें तुटपुंजें ज्ञान होणार. तरबेजपणा किंवा पटाईतपणा येत नाहीं. एवढ्याकरितां खेळ खेळल्यापासून निश्चयबळही तुम्हांस लाभतें. मात्र जे खेळ खेळाल त्यांत तरबेज होण्याची ईर्ष्या तुह्मीं धरली पाहिजे.

तुह्मी ह्मणाल, खेळांत चांगलें वाईट तें काय असावयाचें ? पण तसें नाहीं. त्यांतही चांगलें वाईट आहेच. त्यांतही नीति आहे. आपल्या हातून झालेली चूक आपल्या विरुद्ध गड्यांच्या नजरेस आली

णजे ती मुकाट्यानें तशीच मारून नेऊन खेळ पुढें चालविणें ोरून ठेऊन हुकूम मारणें इत्यादि गोष्टी खेळांत लबाडीच्या ून गणल्या आहेत. अशा लबाड्या न करणें, प्रामाणिकपणानें वागणें हें नीतिबळानेंच येतें. यामुळें प्रत्येक गड्याच्या अंगीं नीतिबळ असावें लागतें. चांगलें कोणतें, वाईट कोणतें याचें ज्ञान–आणि तें ज्ञान झालें म्हणजे चांगलें तेंच धरून बसणें–यालाच नीतिबळ म्हणतात. हेंही योग्य तऱ्हेनें खेळ खेळल्यानेंच तुमच्या अंगीं येतें.

म्हणून तुमचे खेळ तुम्हांला तुमचीं वडील माणसें व गुरु खेळूं देतात. पुढें संसारव्यवहारांत लागणारीं हीं चार बळें या खेळापासून तुमच्या अंगीं येणार. तीं एकदां लहानपणीं खेळाच्या मार्गानें तुमच्या अंगीं आलीं म्हणजे अर्थातच तुमच्या अंगीं तीं बाणून जातील, कायम होतील आणि पुढें संसारव्यवहाराला तुम्ही लागलां म्हणजे तुम्हांला त्या बळाचा सर्व कामांत यशस्वी होण्याला फार फार उपयोग होईल.

तेव्हां मुलांनो, तुम्ही खेळ खेळतां म्हणजे करमणुकीखातर–वेळ घालविण्यासाठीं–आनंद करून घ्यावा म्हणून कांहीं तरी पळापळ, पकडापकड, फेंकाफेंक, मारझोड, सोंगढोंग करतां असें समजूं नका. तुमचे खेळ व्यर्थ रिकामटेकडे नव्हेत. ते फार महत्त्वाचे आहेत. ते अवश्य खेळा; मन लावून खेळा; निश्चयपूर्वक खेळा. कां कीं, तुमच्या पुढल्या आयुष्यक्रमांत जीं जीं महत्त्वाचीं, जबाबदारीचीं, आपल्या स्वतःच्या, आपल्या कुटुंबाच्या, स्नेह्यांच्या, गांवाच्या, देशाच्या व देवाच्यासंबंधानें कर्तव्यें तुम्हांला करावीं लागतील तीं सर्व उत्तम प्रकारें करण्याला तुम्हांला या चारही प्रकारच्या बळांची फार जरूरी लागते. तीं तुम्हांला या खेळांच्या द्वारानें मिळतात. कारण सर्व खेळ–शिस्तीनें बसविलेले खेळ–म्हणजे पुढल्या आयुष्यांत–तुम्ही मोठे झाल्यावर–संसारव्यवहाराच्या दगदगींत पडल्यावर तुम्हांला जी वागणूक करावी लागते त्या वागणुकीच्या नकला आहेत. अगदीं लहानपणचे खेळ घ्या, तरुणपणाचे खेळ घ्या किंवा पोक्त वयांतले करमणुकीचे खेळ घ्या–त्यांत काय आहे? दोन पक्ष आहेत, नियम

आहेत, शिस्त आहे, अडचणी आहेत, दुसऱ्यापासून मदत घेणें, दुसऱ्याला मदत देणें आहे, अभ्यास आहे, सचोटी आहे, अभि... आहे, शांति आहे, आशा आहे, सर्व कांहीं आहे. काय नाहीं ! सांगो... आपला आयुष्यक्रम उत्कृष्टपणें चालविण्याला, संसारांत यश मिळविण्याला आपलीं कर्तव्यें उत्तम प्रकारें करण्याला जे जे गुण अवश्य लागतात, ते ते गुण तुमच्या या खेळांपासून तुमच्या अंगीं उत्पन्न होतात. हे गुण कोणकोणते तें आपण आतां पाहूं.

या आजच्या व्याख्यानाच्या प्रारंभीं मीं सर्वांच्या तुमच्या आवडत्या खेळाचेंच उदाहरण घेऊन तुह्मी या खेळांत मूळापासून शेवटपर्यंत काय काय करतां तें सांगितलें. आतां तें करण्यांत तुह्मी कोणकोणते गुण शिकतां ते पहा.

१ खेळ खेळावयाचें तुह्मीं मनांत आणिलें म्हणजे पहिला गुण जो तुह्मांला धरावा लागतो, तो दुसऱ्याशीं **सलोखा** हा होय. हा तुमचा खेळ कांहीं एकट्यादुकट्याचा नव्हे. त्याला तुम्हांला अकरा गडी लागतात. तुह्मी अकराजण मिळतां आणि असें ठरवितां कीं आपण एकोप्यानें कांहीं डाव खेळूं. हा एकोपाच जर जुळला नाहीं, तर क्षणभर सुद्धां तुमचा खेळ जुळावयाचा नाहीं. कसा जुळणार ? एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस असें असून कधीं खेळ जमला आहे ! कधीं नाहीं. एकोपा पाहिजे ह्मणजे काय ? तर अकराजणांनीं तेवढ्या कामापुरतें आपलें त्यापैकीं कोणाशीं वांकडें वगैरे असलें तरी तें सारें विसरून एक मत करावयाचें आणि खेळ खेळावयाचे व आपणास आनंद करून घेऊन दुसऱ्यासही आनंद द्यावयाचा. **एकोपा** हें तर खेळाचें अगदीं मूळ. ज्या खेळगड्यांत एकोपा नाहीं, त्यांचा खेळ कधींच सुसंगत व आनंद देणारा व्हावयाचा नाहीं. कारण धुसफूस ही आनंदाचा नाश करणारी आहे. ज्या वेळीं तुमच्या मनांतून दुसऱ्या एखाद्या शाळेंतील खेळाडूंशीं सामना द्यावयाचा असेल, तेव्हां तर तुमच्यांत एकोपा, व जूट हीं किती तरी उत्तम पाहिजेत ! अर्थात् कांहीं थोडीबहुत आपसांतली धुसफुस असली तरी ती तुह्मीं विसरून–मनांतून काढून टाकून–

करतां आणि असा एकोपा केलात, तरच तुह्मांला त्या
त जय येतो.

या खेळांपासून तुह्मीं दुसरा गुण शिकतां तो **शिस्त** होय.
ताही खेळ घेतला तरी त्याला कांहीं नियम असतात. वाटेल त्यानें वाटेल तसें वागडावें आणि वाटेल तें करावें याला कोणी खेळ ह्मणत नाहींत. खेळ ह्मटला--त्यांतून तो एकापेक्षां अधिक माण-सांनीं खेळावयाचा खेळ ह्मटला--म्हणजे त्याला कांहीं तरी नियम, कांहीं धरबंद घालून दिलेले असतात. जो खेळ आपण आपल्या व्याख्यानांत दृष्टांतासाठीं घेतला आहे, त्यावर तर केवढालीं पुस्तकें झालीं आहेत ! हे जे खेळांचे नियम आहेत ते उत्तम तऱ्हेनें पाळणें म्हणजेच शिस्त होय. ज्या खेळांत नियम पाळले जात नाहींत, तो खेळ खेळणारांनाही आनंद द्यावयाचा नाहीं आणि पहाणारांनाही नाहीं. नि-मयबियम कांहीं मनांत न आणतां वाटेल त्यानें वाटेल तें बेशिस्तीनें करावें असा प्रकार ज्या खेळांत दिसेल, त्याला तुह्मी खेळ कांहीं ह्म-णणार नाहीं. तो लांबकान्यांचा गद्धेगोंधळच ह्मणाल. परंतु आपल्या खेळाला गद्धेगोंधळ असें कोणीं नांव देऊं नये अशीच ज्याची त्याची इच्छा असणार. तेव्हां जे ते शिस्तीनेंच चालणार.

३. जरी आपला खेळ शिस्तीनें चालावा अशी तुमची इच्छा अ-सली तरी ती शिस्त रहाते आहे कीं नाहीं हें पहाण्याला व मोडेल तेथें ती पुनः लावून सगळें सुव्यवस्थित करण्याला कोणी तरी एक पुढारी--ह्मोरक्या-नाईक--पाहिजे. ह्मणून तुह्मी काय करतां ? तर आपल्यापैकीं विचारानें पोक्त, खेळण्यांत कुशळ, आणि सर्वांचा ज्याच्यावर विश्वास आहे असा एकजण निवडून त्याला पुढारी--कॅप्टन--मुर्दुग्या नेमतां. सुव्यवस्थितपणा रहाण्याला पुढाऱ्याची व तो सांगेल तें बाकीच्यांनीं निमूटपणें ऐकण्याची जरूरी तुह्मांला स्पष्ट दिसते. यामुळें तुह्मी कॅप्टन नेमून त्याच्या आज्ञेंत रहातां. अर्थात् योग्य माणसाची निवड करून त्याला मोठेपणा देऊन तुम्ही त्याच्या आज्ञेंत राहण्याचा गुण ह्मणजे **आज्ञाधारकपणा** हा गुण आपण होऊन शिकतां ! इतर प्रसंगीं तुमच्या वडील माणसांनीं

तुम्हांला जर कांहीं आज्ञा केली तर केव्हां केव्हां तुम्ही हट्ट खोर ती मानीत नाहीं, परंतु खेळांत तुम्ही जसे कांहीं सूत ! खोर सांगेल–झोरप्या सांगेल–त्याच्या बाहेर जावयाचेंच नाहीं. गेलें वेळ खेळांतून दूर होण्याचें भय ! हा हुकूम तोडतो, शिस्त मोडवें म्हणून क्याप्टन व इतर खेळगडी आपल्यास हद्दपार करावयाचे ही भीति !

४. खेळ खेळूं लागलें, म्हणजे त्यांत पूर्ण चित्त ठेवावें लागतें. एकीकडे पहातो आहे, एकीकडे खेळतो आहे, मनांत एक चाललें आहे, हातून दुसरेंच घडतें आहे, अशी जर कोणा खेळगड्याची स्थिति झाली, तर कोणी त्याला खेळांत क्षणभर तरी उभा करील काय ? त्याची तेव्हांच रवानगी व्हावयाची ! यामुळें आणि आपल्यामुळें खेळांत कमीपणा येऊं नये अशी प्रत्येकाला पूर्ण इच्छा असल्यामुळें प्रत्येक खेळगडी एकचित्तानें आपलें काम करीत असतो. अर्थात् एक-चित्तता हा गुण त्याला साधावा लागतो.

५. परंतु नुसतें आपलें काम एकचित्तानें–मन लावून–करून निभत नाहीं. जेथें पुष्कळांच्याबरोबर आपणांस खेळावयाचें असतें, तेथें आपलें काम करण्यासाठीं एकचित्त ठेवून दुसऱ्यांचीं कामें काय व कशीं चाललीं आहेत, इकडेही लक्ष्य ठेवावें लागतें. म्हणजे काय, कीं खेळगड्यानें सावधान असावें लागतें. तेव्हां सावधानता हाही गुण अंगीं आणावा लागतो. आपलें काम एकमनानें करण्याचा गुण एकचित्तता. आपल्या सभोंवार काय चाललें आहे तिकडे पूर्ण लक्ष्य ठेवण्याचा गुण सावधानता. पुष्कळ वेळां खेळांत असें असतें कीं एकानें एक गोष्ट केली म्हणजे मग दुसऱ्यानें दुसरी गोष्ट करावयाची असते. तेव्हां प्रत्येक गड्यानें आपलें काम करण्याची वेळ केव्हां येते हें पहाण्यासाठीं जपलें पाहिजे. या जपण्यालाच सावधानता म्हणतात. हा गुण खेळांत–प्रत्येक खेळांत–किती बरें जरूरीचा असतो ? पत्ते, गंजिफा, बुद्धिबळें इत्यादि खेळांपासून तों अगदीं पोलो, शिकार, नाटकें वगैरे मोठ्या खेळांपर्यंत प्रत्येकांत साव-धानता जरूर जरूर लागते.

६. आपला व आपल्या बाजूची सरशी व्हावी अशी ईर्ष्या नेहमीं जागी पाहिजे. ज्याला ईर्ष्या नाहीं त्याला खेळांतसुद्धां कधीं यश यावयाचें नाहीं. अमुक गोष्ट झाली तर झाली, नाहीं तर नाहीं, त्यांत काय मोठेंसें ? असें म्हणणाऱ्या खेळगड्यास कोणी क्षणभरसुद्धां खेळांत राहूं देणार नाहीं. सगळे गडी कसे उमेद बाळगणारे पाहिजेत. ज्याला उमेद नाहीं, ईर्ष्या नाहीं, तो मुळीं माणूसच नव्हे. त्याच्या हातून कोणतेंही काम धड होणार नाहीं. मग कोणत्याही कामांत नांव मिळविणें तर लांबच राहिलें. ही ईर्ष्या खेळांत किती असते हें तुम्हांला अनुभवानें माहिती आहेच. ती नसेल तर कोणत्याच खेळांत मजा राहणार नाहीं.

७. तुम्हांला तुमचा **स्वतःचा अभिमान** पाहिजे. तुमच्या पक्षाचा बाजूचा—**अभिमान** पाहिजे. हा अभिमान नसला तर खेळांत तुमच्या हातून कधींही चांगलीं कामें होणार नाहींत. आपल्या हातून काय बोआ होणार ? आम्हांला काय खेळावयाला येतें आहे ? असा विचार ज्याच्या मनांत राहील, त्याला कोणतें काम करतां येणार आहे ? कोणतेंच नाहीं. कोणत्याही कामांत यश येण्याला, कोणतेंही काम सिद्ध होण्याला अभिमान पाहिजे. हा आपल्या **स्वतःबद्दलचा** व **आपल्या पक्षाबद्दलचा अभिमान** अगदीं जय्यत पाहिजे. साधारणतः पुष्कळ वेळां आपण ' अभिमान ' वाईट असें ह्मटलेलें ऐकतों, परंतु त्या वेळीं ' अभिमान ' या शब्दाचा अर्थ **फाजील** अभिमान, **खोटा** अभिमान किंवा **गर्व** असा करतों. आपल्या स्वतःबद्दलचा किंवा आपल्या पक्षाबद्दलचा योग्य तितका अभिमान जरूर असावा. खोटा अभिमान असूं नये. आपण तेवढे शहाणे, आपण तेवढे हुशार, बाकी सर्व लोक तुच्छ, आपला पक्ष तेवढा खरा, विरुद्धपक्ष अगदीं खोटा, आपल्या पक्षाचे लोक तेवढे सच्चे, विरुद्ध पक्षाचे लुच्चे असें आपल्यास वाटण्याइतका त्या अभिमानाचा फाजीलपणा होऊं नये. असा फाजील अभिमान झाला तर नाथांनीं ह्मटल्याप्रमाणें,

अभिमाना चढे तो बाहेरी पडे ॥
हातींचें जाय मग बडबडे ॥

अशी स्थिति होते. तेव्हां तसला फाजील अभिमान धरूं नये. आपल्या विरुद्ध पक्षाशीं आदराचें व प्रेमाचें वर्तन कायम ठेवून, त्यांचा तिरस्कार न करतां आपल्या स्वतःबद्दल, व स्वतःच्या पक्षाबद्दल अभिमान खुशाल बाळगावा. नव्हे, तो प्रत्येकानें बाळगलाच पाहिजे. खेळांत त्या अभिमानाची फार जरूरी, तेव्हां तो खेळापासून तुमच्या अंगीं उपजतो. तोच पुढें कायम राहिला पाहिजे.

८. मुलांनो, खेळाच्या कामीं तुह्मी कधीं आळशी नसतांच, तेव्हां त्यासंबंधानें कांहीं विशेष व्याख्यान करावयाला नको. त्याचप्रमाणें खेळाच्या कामीं तुह्मी मोठे दक्षही असतां, तेव्हां निरालस्य व दक्षता हे गुण खेळामुळें तुमच्या अंगीं कसे उपजतात हें तुह्मांला उलगडून सांगावयालाच नको. ते खेळांत मिळविलेले गुण पुढें अंगीं कायम ठेवा ह्मणजे झालें.

९. एकनाथमहाराजांनीं आपल्या चेंडूफळीच्या अभंगांत ह्मटलें आहे:–

अवघे गडी समान रहा ॥
येतां यावा सावध पहा ॥
गडियानें गडियाची न धरावी आस ॥
आपलीया बळें घालावी कास ॥

यांत काय सांगितलें आहे ? यांत फार मोठें तत्त्व सांगितलें आहे. यांत असें सांगितलें आहे कीं सगळ्या गड्यांनीं सारखें रहावें. सगळ्यांनीं आपापलें काम नीट करावें. परंतु केवळ एकमेकांवर रिकामें अवलंबून मात्र राहूं नये. यानें म्हणावें आलेला चेंडू तो झेलील, त्यानें म्हणावें हा झेलील–आणि असें करतां करतां यानेंही झेलूं नये व त्यानेंही झेलूं नये असें होतें. चेंडू मधल्या मध्येंच पडतो आणि खेळाचा विरस होतो. हें चांगलें कोण ह्मणेल ? तेव्हां ज्यानें त्यानें आपल्या कामापुरतें आपल्या स्वतःवर अवलंबून रहावें. दुसऱ्या गड्याची आस धरूं नये. आपल्या बळानें कास घालावी. स्वावलंबन तें हेंच. हा गुणही तुम्ही खेळांत शिकतां, कारण तो खेळास फार अवश्य आहे.

१०. आतां सांगितलें कीं तुह्मांला तुमच्या खेळांत स्वावलंबनाचा गुण शिकावा लागतो. त्या गुणाबरोबर तम्हांला दुसऱ्याला साहाय्य–मदत–करण्याचीही बुद्धि धरावी लागते. ती आपोआप उपजतेच. आपल्या गड्याला कांहीं लागलें, तो पडला, त्याला भोंवळ आली, तर त्याला मदत कोण करणार ? तुम्हीच. नुसतें माझें आपलें काम मीं केलें ह्मणजे झालें एवढें ह्मणून चालत नाहीं. दुसऱ्याचेंही काम करण्याची पाळी तुम्हांला येते. दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची जरूरी लागते. घस सोसणें जरूर पडतें. हा दुसऱ्याला उपयोगी पडण्याचा गुण तुमच्या तुमच्या पक्षापुरताच उपयोगांत येतो असें नाहीं. त्या गुणाचा उपयोग तुमच्या विरुद्धपक्षासही करून द्यावा लागतो. खेळांत चुरस. पण खेळांत दुसऱ्या कांहीं आगंतुक गोष्टींनीं अपघात झाला तर त्या चुरशीचा कांहीं संबंध नाहीं. त्या वेळीं सर्व एक. सर्वांची सर्वांना मदत अवश्य झालीच पाहिजे.

११. या खेळांच्या द्वारानें आणखी दोन फार मोठ्या गुणांची उपज तुमच्या अंगीं होते. ते गुण खरेपणा व न्यायीपणा हे होत. मुलांनो, तुमच्यापैकीं प्रत्येकानें खेळांत खरेपणा व न्यायीपणा किती ठेवावा लागतो याचा विचार करा. पत्ते खेळतांना पानें चोरणारा, किंवा लावणारा मुलगा अगदीं टाकाऊ ठरतो. जसें जगांत चोरास कोणी जवळ उभें करणार नाहीं, तसेंच खेळांत चोऱ्या लबाड्या करणाऱ्यासही कोणी जवळ उभें करीत नाहीं. आणि करूंही नये. कारण ज्याला खेळांत सुद्धां सचोटी संभाळवत नाहीं, तो पुढें मोठेपणीं किती सचोटी राखणार ? अशा चोर गड्याला तुह्मी बहिष्कार घालतां तो योग्य आहे. असें करण्यानें तुह्मी पुढल्या आयुष्यक्रमांत लागणाऱ्या दोन फार महत्वाच्या गुणांचें बीं आपल्या मनांत व वागणुकींत रुजवून घेतां. हे दोन गुण फार महत्वाचे आहेत. हे ज्यांच्या अंगीं पूर्णपणें आले, तो मोठा यशस्वी, पूज्य, थोर, देशभक्त, देवभक्त असा पुरुष निपजणार यांत मुळींच शंका नको. आणि खेळांत तर हे गुण फार अवश्य असतात. तेव्हां तेच पुढेपर्यंत

आपल्या सर्व कारभाराव्यवहारांत कायम ठेवावयाचे इतकेंच काय तें तुमचें काम आहे. सचोटी, प्रामाणिकपणा, न्यायनिष्ठा, सत्यनिष्ठा हे सर्व गुण जसे खेळांत तसे प्रत्येक कामांत फार फार जरूरीचे आहेत. या गुणांचें विशेष वर्णन तें काय करावें ?

१२. खेळांत आणखी एक मोठा गुण तुह्मी शिकतां. दुसऱ्यानें चुका केल्या—चुका, लबाड्या नव्हे हो— तर त्या शांतपणें पाहून स्वस्थ बसावें लागतें. त्याच्याबद्दल वलवल बडबड करून चालत नाहीं. आपल्या बाजूच्या लोकांच्या हातून चुका होऊन त्यामुळें आपल्या पक्षाचा पराभव जरी झाला तरी रागावतां कामा नये, शांतिच धरली पाहिजे. असे प्रसंग येतात. अमक्यानें अमूक चूक केली नसती, तर आपली सरशी झाली असती, असें मनांत येऊन कितीही जरी वाईट वाटलें,किती जरी राग आला, तरी आत्मसंयमन करून उलट " कांहीं हरकत नाहीं. आज नाहीं उद्यां आमची सरशी होईल" असें ह्मणून आपलें व आपल्या बाजूच्या मंडळींचें समाधान करावें लागतें. दुसऱ्याच्या चुकीनें आपलें नुकसान झालें, अमक्यानें अमकें चुकविलें ह्मणून आपली सर्वांची फजिती झाली, हे विचार मनांत आला कीं संताप काय ठेवलेला ! पण तो दाबून टाकावा लागतो. शांति धरावी लागते. हा गुण लहान नाहीं. फार महत्त्वाचा आहे. त्या गुणाचा उपयोग तुम्हांला मोठेपणीं तर फार होतो.

१३. समजा कीं तुमच्या पक्षाचा पराभव झाला, खेळांत तुमची सरशी झाली नाहीं, तर तुम्हांला वाईट वाटणें अगदीं साहजिक आहे. पण तेवढ्यामुळें नाउमेद होऊन, निराश होऊन तुह्मी बसतां काय ? नाहीं. पुनः आपण सामना करूं, आणि जो जय आपणास मिळाला नाहीं तो खास मिळवूं अशी उमेद, अशी आशा तुह्मी धरतां. हा 'फिरून यत्न करून पहाण्या'चा गुण व आज नाहीं उद्यां आपणास यश मिळेल अशी आशा धरण्याचा गुण तुह्मी या खेळापासून शिकतां. अभ्यास ह्मणजे काय ? दोनदां, तीनदां, दहादां यत्न करूनही एखादी गोष्ट साधली नाहीं तरी पुनः आपला यत्न करून ती गोष्ट आपणास साधे असें करावयाचें याचें नांव अभ्यास.

खेळांत तुह्मी काय करतां ? कोणताही खेळ तुह्मांला काय एकदम साधतो ? त्यांत तुम्ही एकदम पटाईत होतां? नाहीं. तुम्हांला अनेक वेळां त्याचा अभ्यास करावा लागतो. तेव्हां अभ्यास करण्याला लागणारा जो नेट, जो निश्चय, जो उत्साह लागतो, तोही या खेळांमुळेंच तुमच्या अंगीं येतो.

मुलांनो, आतांपर्यंत जे गुण तुम्ही आपल्या खेळांच्या द्वारें शिकतां ह्मणून दाखविले, ते मुख्य मुख्य म्हणून सांगितले. आणखी किती तरी गुण या खेळांच्या द्वारें तुम्ही शिकतां ! पण त्या सर्वांची मोजदाद करण्याची जरूरी नाहीं. मुख्य मुख्य सांगितले. चमत्कार हा कीं तुम्ही हे गुण खेळांत शिकतां आणि खेळांतच ठेवून देतां. तसें तुम्हीं करूं नये. हे गुण तुमच्या अंगीं खेळांच्या द्वारें पेरले जातात. ते तुम्हीं कायमपणानें अंगीं खिळवून ठेवले पाहिजेत. सोडतां कामा नयेत. हे सर्व गुण तुम्ही मोठे झाल्यानंतरच्या तुमच्या आयुष्यांत तुम्हांला कराव्या लागणाऱ्या कर्तव्यांत फार फार उपयोगीं पडतात. खेळ ह्मणजे केवळ खेळ नव्हेत, तर तुमच्या अंगीं फार उत्तम असे गुण उत्पन्न करण्याचीं साधनें आहेत. हें साधन बिनमोल आहे. या साधनाची योग्यता लहानसहान नाहीं. उगीच कांहीं तरी करमणूक करून वेळ घालविण्याचें साधन नव्हे. मनाला विरंगुळा पाहिजे ह्मणून कांहीं तरी योजिलेली मौज नव्हे. तर तुमचें शरीर आणि मन हीं दोनही सुदृढ व्हावीं, म्हणून योजलेले, हे सुंदर उपाय आहेत. तुमच्या शरीराला व मनाला पुष्टि व तुष्टि देणारीं हीं फार रुचकर अशीं औषधें आहेत. मात्र त्या औषधांनीं जो गुण येतो, तो आपल्या अंगीं कायम ठेवण्यासाठीं झटलें पाहिजे. त्यांत भलत्यासलत्या गोष्टी करून कुपथ्य करूं नये इतकेंच माझें तुम्हांला मोठ्या आग्रहाचें सांगणें आहे.

मुलांनो, जसे तुमचे खेळ उगीच कांहीं तरी करमणुकीचे प्रकार नव्हेत, त्यांचें महत्त्व फार मोठें आहे, तसेच तुम्ही स्वतः उगीच कांहीं तरी नाहीं, तुमचें महत्त्व फार मोठें आहे. तुम्हीच पुढच्या काळचे थोर पुरुष. तुमच्या हातून केवढालीं थोरलीं कामें व्हावयाचीं आहेत !

तुम्हांला किती प्रकारचीं तरी कर्तव्यें करावयाचीं आहेत ! पण तीं कर्तव्यें करावयाला, तीं कामें करावयाला, तुम्ही थोर पुरुष होण्याला जरूर लागणारे गुण तुम्हीं अंगीं आणिले पाहिजेत. ते तुमच्या खेळांच्या द्वारें तुमच्या अंगीं येतात. ते आले म्हणजे तुम्ही ते कायम मात्र ठेवा. ते कायम ठेवलेत कीं सर्व कांहीं सोपें झालें. आतांपर्यंत जे जे गुण तुमच्या अंगीं खेळांच्या द्वारानें येतात म्हणून सांगितले, ते ते सर्व गुण तुम्हांला थोर पुरुष बनविण्याला, तुमच्या हातून तुमचीं कामें उत्तम रीतीनें करविण्याला, तुमचीं जबरदारीचीं कर्तव्यें पार पाडण्याला फार अवश्य, फार उपयोगी आहेत.

तुह्मी मोठे झालां, व संसारव्यवहारांत शिरलां ह्मणजे तुह्मांला सहा प्रकारचीं कर्तव्यें करावीं लागतात. तीं कोणतीं तीं पहा:--

१ स्वतःसंबंधीं.	३ स्नेह्यांसंबंधीं.	५ देशासंबंधीं.
२ कुटुंबासंबंधीं.	४ गांवासंबंधीं.	६ देवासंबंधीं.

तुमचें स्वतःचें शरीर आणि तुमचें नांव चांगलें राहिलें पाहिजे. याकरितां कांहीं कामें करावीं लागणार.

तुह्मी संसाराला लागलां कीं तुमचें कुटुंब वाढणार, त्याचें पोषण, तुमच्या मुलांचें शिक्षण हीं यथायोग्य तऱ्हेनें होण्यासाठीं तुह्मांला कांहीं कामें करावें लागणार.

तुमचे स्नेही सोबती असतील किंवा होतील, त्यांचा तुमच्यावर, तुमच्या मदती वर व तुमच्या प्रेमावर हक्क आहेच. तेव्हां तशी मदत तुह्मीं त्यांना केली पाहिजे. आपल्या आयुष्यांत सगळा घेवाण देवाणाचा प्रकार आहे. आपण दुसऱ्यांना साहाय्य केलें पाहिजे. व दुसऱ्याचें साहाय्य आपण घेतलें पाहिजे.

ज्या गांवांत तुह्मी राहतां त्या गांवाचाही तुमच्या अंगबळावर, बुद्धिबळावर व द्रव्यबळावर हक्क आहे. तुमच्या स्वतःच्या, तुमच्या कुटुंबाच्या व तुमच्या स्नेह्यांच्याकरितां कामें कराल, तशींच तुमच्या गांवाकरितां तुम्हांला कामें करावीं लागणार. कां कीं जसें तुमचें घर सुव्यवस्थित व सुसंपन्न करण्याचें तुमचें कर्तव्य, तसाच तुमचा गांवही सुव्यवस्थित व सुसंपन्न करणें हें तुमचें कर्तव्य आहे.

जें मीं तुह्मांला तुमच्या गांवासंबंधानें सांगितलें, तेंच तुमच्या देशासंबंधानेंही खरें आहे, हें काय तुम्हांला सांगितलें पाहिजे? कोणासही तूं आपल्या आईवर प्रेम कर, तिला सुख दे, तिचें दुःख हरण कर,असें सांगण्याची जशी मुळींच जरूर नाहीं, तशीच कोणासही तूं आपल्या देशावर प्रेम कर, त्याला सुख दे, त्याचें दुःख हरण कर, असें सांगण्याची मुळींच जरूर नाहीं. ज्याला हें सांगून उपदेश करण्याची जरूर असेल तो मनुष्यच नव्हे. बायांनो, देशासंबंधाच्या कर्तव्यांत राजासंबंधाचें कर्तव्य येतें. देशाचे राजे हे देशांत शांतता राखून देश सुसंपन्न करण्यास झटत असतात. देशभक्तीच्याच पोटीं राजभक्ति अवश्य येते. आणि त्यासंबंधीं कर्तव्येंही तुम्हांला करावीं लागतात. आपण आपल्या कुटुंबाचे, आपल्या स्नेह्यांचे, आपल्या गांवाचे व आपल्या देशाचे व देशाच्या राजांचे फार मोठे ऋणी आहों. हें ऋण म्हणजे यांच्यासंबंधीं कर्तव्यांचा आपले डोक्यावर फार मोठा बोजा आहे. तो मोठ्या अभिमानानें वाहिला पाहिजे.

देवाचे तर आपण सर्वस्वी ऋणी आहों. त्याच्यासंबंधाचें आपलें कर्तव्य ह्मणजे त्याच्या ठिकाणीं अनन्यभक्ति ठेवून आपलीं कर्तव्यें बजावावयाचीं हें होय. आपणास जें कांहीं पाहिजे, किंवा जें कांहीं आपल्या हातून घडतें तें सर्व परमेश्वराच्या—देवाच्या—कृपेनेंच मिळतें किंवा घडतें. तेव्हां त्याला सदासर्वदा स्मरावें व त्याची करुणा भाकावी, त्याला कांहीं अर्पण करावें—हेंच आपलें देवासंबंधीं कर्तव्य आहे.

मुलांनो, तुह्मी मोठे झालां ह्मणजे हीं सर्व कर्तव्यें तुह्मी जितक्या उत्तम रीतीनें कराल, तितके तुह्मी उत्तम ठराल. परंतु तीं कर्तव्यें करण्याला जें बळ व जे गुण लागतात, तें बळ व ते गुण तुमच्या अंगांत आले पाहिजेत. तें बळ कोणतें व ते गुण कोणते हे आतांपर्यंत तुम्हांला सांगितलेंच आहे. तुम्हांला शरीरबळ पाहिजे, ज्ञानबळ पाहिजे, निश्चयबळ पाहिजे व नीतिबळ पाहिजे. त्याचप्रमाणें तुमच्या अंगीं दुसऱ्याशीं सलोख्यानें वागण्याचा गुण पाहिजे, तुम्हांला शिस्त पाहिजे, आज्ञाधारकपणा पाहिजे, एकचित्तता पाहिजे, सावधानता पाहिजे, ईर्ष्या

पाहिजे, अभिमान पाहिजे, उद्योगीपणा पाहिजे, दक्षपणा पाहिजे, स्वावलंबन पाहिजे, दुसऱ्यास मदत करण्याची बुद्धि पाहिजे, सचोटी पाहिजे, न्यायबुद्धि पाहिजे, सहनशीलता पाहिजे, शांति पाहिजे, धीर पाहिजे, नेट पाहिजे, उमेद पाहिजे, पुनः-पुनः यत्न करून पहाण्याची चिकाटी पाहिजे, हेंही तुह्मांला समजतेंच आहे. आज मीं तुम्हांला विशेष खुलाशानें जें काय सांगितलें तें एवढेंच कीं, तुमचे खेळ हे तुमच्या अंगीं या सर्व गुणांची पेरणी करण्याचें फार मोठें साधन आहे. तेव्हां त्याचें महत्त्व विसरूं नका. तुह्मी खेळ खेळूं लागतां, तेव्हां आपण उगीच कांहीं तरी करतों आहों असें समजून खेळूं नका. खेळणें म्हणजे इतर महत्त्वाच्या कामासारखेंच हें महत्त्वाचें काम आहे असें पक्कें ध्यानांत धरून, आपल्या खेळगड्यांशीं एकोपा ठेवून, शिस्तीनें, मन लावून, सावधानपणानें, अभिमानानें, नेटानें, कौशल्यानें, सचोटीनें, शांतपणें आपले खेळ खेळत जा. हें तुमचें वय खेळ खेळून हे गुण अंगांत उपजविण्याचें आहे. आतां खेळांत जर तुम्हांला हे गुण लागले नाहींत, तर पुढें कधीं व कसचे लागणार ? आतां हे गुण तुह्मी शिकलां तर मोठेपणीं संसारव्यवहारांत व नानाप्रकारचीं कर्तव्यें करावीं लागतील त्यांत तुम्हांला ते उपयोगी पडतील.

मात्र खेळांच्या द्वारानें तुमच्या अंगीं हे गुण येणार, ह्मणून किंवा तुम्ही आपल्या खेळांत कुशल बनलां तर ते तुमच्या अंगीं पूर्णपणें आले असें समजून फुशारून जाऊन तुम्हीं आजच आपण मोठे बनलों असें समजावयाला लागून ज्यांत तुमचा संबंध नाहीं अशा गोष्टींत पडत जाऊं नका. तुम्ही पुढें मोठे होणार, आज नाहीं. तुम्ही पुढें राष्ट्राचे आधारस्तंभ, आज नव्हेत. तुम्हीच विचार करा, एक चार वर्षांचा लहान मुलगा आहे, तो आपल्या बापाचें मोठें थोरलें पागोटें डोक्यावर घालून बसला, तर त्याचें ते विचित्र रूप पाहून क्षणभर मौज वाटेल. पण त्यानें आपण मोठेच आहों असा हट्ट धरून पागोटें प्रहरभर तसेंच डोक्यावर ठेविलें, तर काय होईल ! त्याची मान दुखूं लागेल, मोडेल आणि शेवटीं पागोटें खालीं पडून

तेही मोडेल. तशीच तुमची गोष्ट आहे. जोंपर्यंत तुम्ही कोण-तीही गोष्ट नक्कल म्हणून, खेळ म्हणून, कराल तोंपर्यंत तुह्मांला शिक्षण मिळण्याचें एक साधन म्हणून सर्व त्याबद्दल समाधान मानतील. पण आपला विद्यार्थीपणा विसरून, खेळकरपणा दूर टाकून, आजच तुह्मी राष्ट्राचे आधारस्तंभ ह्मणून राष्ट्राचा भार वाहण्याला लागलां ह्मणजे काय होईल ? तुमच्या माना मोडतील आणि राष्ट्र खालीं पडेल. यांत फायदा कोणता ? सागाच्या रोंपापासूनच पुढें दणगट तुळई देणारा वृक्ष होतो, तेव्हां रोंपाच्या अवस्थेंतच त्याला कोणी इमारतीला लावण्यासाठीं तोडून नेलें आणि इमारतीला लाविलें तर परिणाम काय होणार? त्याचे तुकडे होतील आणि इमारत जमीनदोस्त होईल. हाच दाखला तुह्मी आपल्या मनांत धरा. ज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें तुमची स्थिति अजून आहे.

हें चोख हें मैळ । ऐसें नेणोनियां बाळ ।
देखें तें केवळ । मुखींचि घाली ॥

एवढ्याकरितां आज तुमचें राज्य खेळापुरतें. त्यांत तुह्मीं आतां सांगितलेले गुण अंगीं आणलेत, ह्मणजे मोठेपणीं त्याच गुणांच्या बळानें तुह्मी खरे खरे थोर व्हाल.

आजच थोर झालों असें तुह्मी ह्मणूं लागलां आणि वेडे वेडे विचार करूं लागलां, तर ज्याला आईचें दूध पिऊन पचवतां येत नाहीं अशा मुलानें जिलब्या खाण्यासारखेंच होणार आहे. तसल्या भानगडींत तुम्ही पडत जाऊं नका. कोठें मोठ्या माणसांच्या समाजांत होतां होईतों कधीं जाऊं नका. तुम्हांला कोणी नेलेंच तर प्रेक्षक म्हणून स्वस्थ बसत जा.

जर तुम्हांला एवढ्या लहान वयांत एखादी आपल्या देशाला उपयोगी पडणारी गोष्ट करावी अशी इच्छा असली, तर तुह्मांला करतां येईल अशी एकच गोष्ट आहे. ती तुम्ही कराल ? पहा. कितीजण तयार आहां ती गोष्ट करावयाला तें सांगा. मुलांनो, आपल्याला जी विद्या येत असेल ती दुसऱ्याला द्यावी असें आहे. आपल्या देशांत ज्यांना लिहितां वाचतां येत नाहीं, जीं कधीं शाळेंत जाऊं

इच्छित नाहींत, जाण्यापासूनचे फायदे ज्यांना समजत नाहींत, अशीं गरीबांचीं मुलें पुष्कळ आहेत. तुमच्या घरीं न्हावी, धोबी नेहमीं येतात, कित्येकांच्या घरीं मोलकरीण व गडी असतात. त्यांचीं मुलें उगीच हिंडतात, तुम्ही असा निश्चय करा बरें कीं यापैकीं कोणाच्या तरी एका मुलाला आपण रोज पंधरा वीस मिनिटें खर्च करून अक्षरओळख करून द्यावयाची. तुम्ही दीडहजारजण आहां. प्रत्येकानें एका मुलाला एक वर्ष शिकवावयाचें म्हटलें, तर किती तरी गरीबांचीं मुलें सहज वाचूं लिहूं शकतील! यांत तुमचें कांहीं नुकसान नाहीं. विद्या हा एकच पदार्थ असा आहे कीं तो दुसऱ्याला दिल्यानें दुप्पट होतो. कोणाला विद्या दिल्याबद्दल कोणी तुम्हांला नांवें ठेवणार नाहींत. हें एक काम मीं तुम्हांला सहज सुचविलें आहे. पण माझा आजच्या व्याख्यानाचा हेतु एवढाच कीं खेळ म्हणून तुम्ही कसे तरी खेळत जाऊं नका. खेळाचे परिणाम फार महत्त्वाचे आहेत असें समजून ते खेळत जा. तुम्हीं वर सांगितलेले गुण अंगांत बाणवून आज खेळ खेळलांत तर त्याच गुणांच्या सामर्थ्यानें मोठीं देशकार्यें कराल व मोठी कीर्ति मिळवाल अशी माझी खात्री आहे, असा माझा तुम्हांला आशीर्वाद आहे. तुकारामानीं आपल्या मृदंगपाट्याच्या अभंगांत म्हटलेंच आहे कीं,

जिंकोनी डाव करीं ।
टाहो सत्ता आणिकांवरी ॥

मुलांस थोडा उपदेश.

मुलांनो, प्राचीनकाळीं अशी चाल असे कीं, कांहींही अभ्यास करण्याच्यापूर्वी किंवा उपदेश सांगण्याऐकण्यापूर्वी वक्ता आणि श्रोते, गुरु आणि शिष्य–किंवा उपदेश करणारा आणि उपदेश ऐकणारा दोघे मिळून शांतिमंत्र म्हणत असत. ती सुंदरचाल आज आपण पुनः घालूं. त्या शांतिमंत्रांपैकीं दोन मंत्र प्रथमतः वाचून व तुम्हांला त्यांचा अर्थ समजावून देऊन मग पुढें तुम्हांला काय सांगावयाचें तें सांगतों.

भद्रं कर्णेभिः श्रृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाँसस्तनूभिः। व्यशेम देवहितं यदायुः॥

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

हे देवांनो, जें कल्याणकारक तेवढेंच आमच्या कानांनीं ऐकूं द्या। ज्यांची आह्मी प्रार्थना करतों अशा देवांनो, जें कल्याणकारक तेवढें आमच्या डोळ्यांस दिसूं द्या । तुमची स्तुति करणाऱ्या आमचे अवयव व आमचीं शरीरें सुदृढ राहून देवांनीं नियमित ठरविलेलें तितकें पूर्ण आयुष्य आह्मांस मिळो ।

उपदेश करणारे व उपदेश ऐकणारे दोघांचेंही आपलें देव रक्षण करो । दोघांचेंही तो पालन करो । आपण दोघेही एकचित्तानें विद्यासामर्थ्याचा लाभ करून घेऊं । आपण जी विद्या स्वाधीन करून घेऊं ती तेजस्वी असो । परस्परांचा द्वेष आपणांत उत्पन्न न होवो ।

ओम् शान्तिः । शान्तिः । शान्तिः ॥

थोडे दिवसांपूर्वी तुमचा ‘ संमेलना’ चा दिवस झाला. त्या दिवशीं तुम्हीं पुष्कळ मौजा मारल्या. तुमचे खेळ झाले, जेवणीं–खाणीं झालीं. पुनः उडणें बागडणें झालें. सोंगें, संवाद व नाटकें पहाणें झालें. आणि

रसपानही झालें. एकंदरींत जितक्या म्हणून मौजा करून सुख घ्यावयाचें तितकें सर्व तुम्हीं घेतलें, आणि आतां परीक्षा वगैरे संपून तुम्ही महिना दीड महिना सुट्टीचा उपभोग घ्यावयाला जाणार तेव्हां आपल्या आज कित्येक वर्षांच्या रीतींप्रमाणें तुम्हांला उपदेशाच्या चार गोष्टी सांगण्याचें राहिलेलें काम आज करण्याचें योजिलें आहे. जेवून आंचवून पोटावरून हात फिरवून ढेंकर वगैरे देऊन स्वस्थ बसलें म्हणजे मुखशुद्धि म्हणून कांहीं तरीं तोंडांत टाकावें लागतें. तसा हा आजचा उपदेश तुम्हांला आहे. अंतरात्मा शांत असला ह्मणजे उपदेश वगैरे ऐकावयाला ठीक असतें. त्याप्रमाणें परीक्षा वगैरे होऊन गेल्या असल्या म्हणजेही उपदेश ऐकावयाला बरें असतें, आणि त्यांत पुढें लागलीच सुट्टी असली म्हणजे त्या उपदेशाचा विचार व जमल्यास त्याप्रमाणें आचार करण्यासही ठीक असतें. जेवण झालें म्हणजे मुखशुद्धीसाठीं तोंडांत टाकलेला पदार्थ मनुष्य बराच वेळ चघळीत बसतो व त्याच्यापासून आनंद करून घेतो. तसेंच तुम्हीं या उपदेशाचे बाबतींत करावें, अशी आमची फार इच्छा आहे. तुम्हांला आतां सुट्टी आहे. विश्रांति आहे. तेव्हां या उपदेशाचें चांगलें मनन करा, चर्वण करा, तें मनन व चर्वण झालें कीं तुमची मनःशुद्धि होईल. तुमचें मन शुद्ध झालें कीं मग तुमच्या हातून आचरणही चांगलें होईल. मुलांनो, आतां तुमच्यापैकीं प्रत्येकाला जर विचारलें कीं, " सुट्टी म्हणजे कायरे ? " तर काय बरें उत्तरें येतील ? परवांच एका मुलाला असा प्रश्न विचारला होता, तर त्यानें डोकें खाजवीत उत्तर दिलें: " सुट्टी म्हणजे काय, म्हणजे काय बोआ ? सुट्टी म्हणजे सुट्टी. ज्या त्या कामाबद्दल सुट्टी. कांहीं करायचें नाहीं, स्वस्थ बसायचें, रगड खेळायचें आणखी गंमत करायची. याचें नांव सुट्टी. " सुट्टीची व्याख्या तुह्मी सर्वजण अशीच देणार. पण खरें म्हटलें, तर ही सुट्टीची व्याख्या नाहीं, कांहीं करावयाचें नाहीं, ह्मणजे काय ? हातपाय हालवावयाचे नाहींत, विचार करावयाचा नाहीं, बोलावयाचें नाहीं, जेवावयाचें नाहीं असें थोडेंच आहे ! पण या सगळ्या गोष्टी अगदीं वेळच्या वेळेला, अगदीं नेमानें बांधल्याप्रमाणें कराव्या लागत तशा सुट्टींत करावयाला नकोत. मास्तरांचा धाक आणखी आईबापांचा तगादा, थोडा कमी.–मुळींच कमी ह्मटलें

तरी चालेल. याचें नांव सुट्टी आणि या असल्या सुट्टीचा तुह्मी उपभोग घेणार. आणि सुट्टी संपून तुह्मी परत आल्यावर तुमच्या मास्तरांनीं " कायरे बोआ ? सुट्टींत काय केलें ? " असें विचारलें ह्मणजे प्रत्येकजण असेंच सांगणार काय ? पुष्कळ वेळां सुट्टीनंतर मुलांना असा प्रश्न मास्तरांनीं विचारला म्हणजे त्याचें उत्तर " कांहीं नाहीं मास्तर केलें " असेंच येतें.

पण असें उत्तर देण्याची पाळी यावी हें चांगलें का ? आपल्याला हातपाय हे अवयव देवानें दिले आहेत, डोळे, कान वगैरे इंद्रियें दिलीं आहेत, विचारशक्ति दिली आहे, हीं काय उगीच दिलीं आहेत ? केव्हां-ही उगीच बसण्याकरितां का दिलीं आहेत ? तीं कधीं उगीच बसतील का ? सांगा बरें. तुह्मी तुमच्या या वयांत तरी कधीं उगीच बसूं शकतां का ? तुमच्या हातापायांला उगीच बसवतच नाहीं. तुमचें मन कधीं उगीच बसावयाचेंच नाहीं. तुमचे हात कांहीं तरी उद्योग करीत असतात. पाय एकसारखे धांवत, उड्या मारीत असतात. डोळे पहात असतात. कान ऐकत असतात. जीभ ही आपलें बोलण्याचें व चाख-ण्याचें काम करीत असते. तेव्हां तुमचें जें "सुट्टींत कांहीं केलें नाहीं " असें उत्तर येतें तें अगदीं व्यर्थ असतें. तें खरें नसतें. तुह्मी एकसारखें कांहीं तरी करीत असतां, पण तें असें करतां, कीं ' कांहीं केलें ' असें सांगण्याच्या किंमतीचें तें नसतें ! म्हणजे जें आपल्याला पुढें उपयोगी पडेल असें कांहीं तुम्ही करीत नाहीं. महिना दीड महिना तुम्ही असे उद्योग करतां कीं जे आपण केलेसेंही तुम्हांला वाटत नाहीं आणि शे-वटीं तुह्मांला असें ह्मणावायची पाळी येते कीं, "आमची सुट्टी वायां गेली ! "

' असें ह्मणण्याची पाळी चांगली का ? ' असें तुह्मांस विचारलें, तर तुम्ही 'नाहीं' असेंच उत्तर देणार. 'सगळी सुट्टी वायां गेली बोआ' असें ह्मणण्याची पाळी येणें अगदीं वाईट असेंच तुम्ही सांगाल. तेव्हां तशी पाळी येऊं नये अशाकरितां तुम्हांला कांहीं सांगावें असें वाटतें. मुलांनो, तुम्ही सुट्टी ह्मणजे " बांधलेले नाहीं अशी स्थिति " असा सुट्टीचा अर्थ न करतां " आपल्या आपल्या धोरणानें, इच्छेनें कांहीं तरी आनंद देणारें असें नवीन शिकण्याकरितां मिळालेला वेळ " असा अर्थ कराना बरें ? असा अर्थ केलांत, म्हणजे तुम्हांला सुट्टी वायां

गेली असें म्हणण्याची पाळी येणार नाहीं. मुलांनो, सुट्टी म्हणजे विश्रांति. पण खरी विश्रांति कशांत आहे ? हातपाय ताणून डोळे मिटून घोरत पडण्यांत आहे काय ? आहे असें धरून चाललें, तरी दिवसाच्या चोवीस तासांपैकीं असें किती तास निजाल, आणि पुष्कळ तास असें निजण्याचा क्रम किती दिवस चालेल ? सुट्टी सुरू झाल्यापासून एक दोन दिवस फार तर चार दिवस हा क्रम चालवाल, पण त्या क्रमाचा तेव्हांच तुह्माला कंटाळा येईल, आणि करमणुकीचे नवे नवे प्रकार तुम्ही पाहूं लागाल. हे जे नवे नवे प्रकार तुम्ही पहाणार, त्या पहाण्यांतच तुम्हांला मदत करावी असा या आजच्या उपदेशाचा उद्देश आहे. विश्रांति म्हणजे कार्यांत बदल. एकच एक प्रकारचें अन्न खाऊन माणसाला कंटाळा येतो; म्हणून माणूस तोंडपालट करतो. पदार्थांत फरक करतो. किंवा स्नेह्याचे घरीं जेवावयाला जातो; त्याचप्रमाणें एकाच एका जागीं फार राहून कंटाळा आला म्हणजे थारेपालट करतो. तसाच तुम्हीं आपल्या या सुट्टीचा उपयोग केला पाहिजे. चार सहा महिने ज्या विषयांच्या अभ्यासांत तुम्ही अगदीं गढून गेलां होतां, त्या विषयांच्या अभ्यासांचा तुम्हांला कंटाळा येणें अगदीं साहजिक आहे. आणि तसा कंटाळा येतो, म्हणूनच तुम्हांला ही सुट्टी दिली जाते. परंतु कंटाळा घालविण्यास, कांहीं न करतां अगदीं स्वस्थ बसणें, कांहीं न करणें हा उपाय नव्हे. अगदीं स्वस्थ बसणें अगर झोंपा घेणें हा उपाय जर तुम्हीं आपला कंटाळा घालविण्यास योजिला तर काय होईल, तुम्हांला माहीत आहे ? तो कंटाळा तुमच्या अंगांत अधिक अधिक मुरत जाईल. मुलांनो, तुम्हांला मागें पुष्कळदां लोकांनीं सांगितलें आहे, आणि रोज लोक सांगतही असतात, कीं वाईट संवयी अंगीं फार लवकर जडतात. तुह्मीं निवडुंग पाहिला आहेना ? त्या कांटेरी निवडुंगाचें पीक मोठें वेडें असतें. त्याचें फळ किंवा बीं तर काय पण त्याचा नुसता एक फड कोठें पडला आणि त्याला एक नखभर भुसभुशीत जमीन सांपडली, कीं त्यानें मूळ धरलेंच म्हणून समजा. मग तो खडकाच्या कुशींतून सुद्धां आपलीं मुळें सारून हात पाय पसरूं लागतो. आणखी आपला पसारा माजवितो. त्याच्या आसपास चांगलें झाड टिकावयाचें सुद्धां नाहीं.

वाईट संवयींचें या निवडुंगासारखें आहे. त्यांना मूळ धरावयाला फारसा वाव लागत नाहीं. एक नखभर जमीन सांपडली कीं त्यांनीं आपलें ठाण देऊन पसारा वाढविलाच म्हणून समजावें. स्वस्थ बसणें, कांहीं न करणें इत्यादिकांची आवड मनांत उत्पन्न होणें म्हणजे निवडुं-गाला आपलें मूळखंड खुपसावयाला जागा देण्यासारखेंच आहे. सुट्टी म्हणजे विश्रांतीची वेळ आणि विश्रांतीची वेळ म्हणजे कांहीं न करतां हातपाय ताणून, डोळे झांकून घोरत अगर लोळत पडण्याची वेळ अशी आपली समजूत करून घेऊं नका. स्वस्थ पडण्यास तुह्मांला रात्रीचे आठ दहा तास दिलेच आहेत. जागरणें करून धडपड करा असें कोणीच तुह्मांला म्हणत नाहीं. पण जे तास दिवसाचे, त्या तासांना रात्रीचे बनवूं नका. ते तास अंधाराचे नाहींत; उजेडाचे आहेत. तेव्हां तो उजेड कारणीं लावा. सूर्याचा उजेड तुमच्या मनांत ज्ञानाचा उजेड पडावा म्हणून उपयोगाला लावून घ्या. तुमचे नेहमींचे अभ्यासाचे विषय बाजूला ठेवा. आणखी तोंडपालट किंवा थारेपालट करा. तुमच्या अवयवांची–हातापायांची आणि इंद्रियांची– डोळे, नाक, कान यांची चटपट सारखी चालूं द्या. कांहीं तरी नवीन काम शिका, कांहीं तरी नवीन ज्ञान मिळवा, तुह्मी शाळेंत ज्या विषयांचा अभ्यास करतां, ते विषय कांहींच नाहींत. दुसरे हजारों विषय तुमच्या सभोंवार पसरलेले आहेत. त्यांचें ज्ञान किती तरी जरूरीनें तुह्मीं मिळविलें पाहिजे. आणि जर तुह्मी तें मिळविण्याची इच्छा धराल, जर तुह्मी चौकसबुद्धि ठेवाल तर तुम्हांला तें ज्ञान सहज मिळवितां येईल. पण चौकसबुद्धि ठेवून लोकांना विचारलें पाहिजे. खरें जर पुसाल, तर तुम्हीं आपल्या सभोंवार असलेल्या वस्तूंबद्दल माहिती मिळविण्याची कधीं तरी इच्छा दाखविली आहे काय? अगदीं रोजच्या उपयोगांतल्या जिनसा घ्या. तुमची पाटी घ्या. ही पाटी कशाची केलेली असते? ती उत्पन्न कोठें होते? ती तयार कशी करितात? ती परदेशांत होते कीं आपल्या देशांत करतात? त्याचप्रमाणें तुम्ही वापरतां त्या लकडी-पेन्सिली पहा. या कोठें होतात? कशा करितात? कधीं तुम्हीं चौकशी केली आहे? कागद घ्या. हे कागद तुम्ही रोजचे दहा फाडतां.

हजारों कागदांवर वर्तमानपत्रें छापलीं जातात. परंतु हे कागद बनतात कसे ? तुम्ही चौकशीच करावयाला निघालां, म्हणजे तुम्हांला तुमची वडील मंडळी, तुमच्या वडिलांची मित्रमंडळी, तुमचे शिक्षक तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन तुम्हांला ज्ञान देतील. हें तुमच्या कागद, शाई, दऊत, पाटया, पेन्सिली वगैरेंबद्दल झालें. पण तुमच्या घरीं माडीवर, तळमजल्यावर, अंगणांत, परसांत, बागेंत, शेतांत किती तरी वस्तु, झुडुपें, झाडें, फळें, पिकें, किडे, जनावरें वगैरे असतात ! त्यांच्याबद्दल आपल्याला कोणीं कांहीं माहिती विचारली तर कांहीं सांगतां येत नाहीं. फार कशाला ? तुह्मी जेवावयाला बसलां असतां तुमच्या पानांत जे पदार्थ असतात, त्यांबद्दल तुम्हांला माहिती असते काय ? तुमच्या पानांत असणाऱ्या भाजींत तेल, चिंच, गूळ, हिंग, तिखट, मीठ, मोहऱ्या वगैरे अनेक पदार्थ असतात. यांपैकीं वहुतेक जिन्नस निरनिराळ्या ठिकाणांतून आणले जाऊन तुमची भाजी वनते. ‘ कोंकणचें मीठ आणि देशावरले आंवळे ’ अशी एक म्हण आहेना ? त्या म्हणीचा अर्थ काय कीं, एकमेकांपासून शेंकडों कोसांवर असलेले जिन्नस एकत्र जमतात तेव्हां एखादें कार्य होत असतें. आतां त्या ‘ शेंकडों ’ शब्दाच्या जागीं ‘ हजारों ’ हा शब्द घातला पाहिजे. जेवणाच्या पदार्थांचीच गोष्ट चालली आहे तर त्यांतलेंच उदाहरण घेऊन मी ‘ शेंकडों ’ च्या जागीं ‘ हजारों ’ हा शब्द कसा घालावा लागतो तें दाखवितों. मुलांनो, तुह्मी श्रीखंड खातांना ? या श्रीखंडांत दहीं तुमच्या घरचें पण त्यांत साखर मॉरिशस बेटांतली आणि केशर स्पेन देशांतलें ! तेव्हां तुह्मीच पहा वरें, नुसत्या आपल्या खाण्याच्या पदार्थांबद्दल तुह्मीं चौकशी केलीत तरी सुद्धां तुम्हांला भूगोलाचें, वनस्पतिशास्त्राचें, शेतकीचें, व्यापारउदीमाचें, अर्थशास्त्राचें आणि दुसऱ्या अनेक गोष्टींचें किती ज्ञान होईल तें ! पण तुम्ही डोळे असून पहात नाहीं, तोंड असून बोलत नाहीं, कान असून ऐकत नाहीं आणि मन असून विचार करीत नाहीं. तुम्हांला देवानें डोळे दिले आहेत ते पहाण्याला दिले आहेत आणि तुमच्या सभोंवार हजारों—नव्हे अनंत—लहानथोर पदार्थ पसरले आहेत ते त्या डोळ्यांनीं तुह्मीं पहावे म्हणून आहेत. तुह्मीच पहा तुमच्या पायाखालीं जमीन आहे तीच

घ्या. तिच्यावर तुम्हांला काय दिसतें ? पाणी दिसतें, झाडें दिसतात, गवत दिसतें, दगड दिसतात, किडे दिसतात, दुसरे कांहीं प्राणी दिसतात. त्याचप्रमाणें वर आकाशाकडे तुह्मीं पाहिलें तर दिवसां सूर्य व अनंत आकाश दिसतें, परंतु रात्रीं असंख्य तारे दिसतात. पाण्यांत पाहिलेंत तरी त्यांतही तुम्हांला लहान मोठे प्राणी दिसतात, आणखीही कांहीं पदार्थ दिसतात. या सर्व प्राण्यांचें, झाडांझुडुपांचें, पदार्थांचें व तार्‍यांचें ज्ञान तुह्मीं मिळविण्याची हांव धरली तर तुमचे जन्मही पुरणार नाहींत. पण त्यांचें ज्ञान आपल्याला किती आहे याचा विचार केलांत, तर तुम्हांला "कांहीं नाहीं" असेंच उत्तर मनाला द्यावें लागणार आणि तसें उत्तर देतांना मनाला थोडी लाजही वाटणार. ज्ञान मिळविण्याचे विषय अनंत आहेत, म्हणून कशाचेंच ज्ञान मिळविण्याच्या खटाटोपांत पडूं नये असें तर कांहीं नाहीं. जितकें ज्याला शक्य तितकें त्यानें मिळविण्याच्या खटपटींत असावें; इतकेंच नव्हे, तर आपण आपलीं रोजचीं करावयाचीं तीं कामें केल्यावर, आपल्या रिकाम्या राहिलेल्या वेळांपैकीं कांहीं तरी वेळ कोणत्या तरी नवीन व निरनिराळ्या विषयाच्या अभ्यासाकडे घालवावा म्हणजे त्यांत त्यांचा स्वतःचा वेळ चांगल्या प्रकारें जाऊन इतरांनाही त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतां येतो.

हें इतकें सगळें तुम्हांला सांगण्याचा हेतु काय ? तर तुम्ही आपली ही सुट्टी उगीच व्यर्थ घालवूं नका. कोणत्या तरी एका विषयाचें थोडें तरी ज्ञान मीं या सुट्टींत मिळविलें, असें तुमच्या मनाला वाटेल, व कोणीं विचारलें तर त्याला सांगतां येईल अशा प्रकारानें सुट्टीचा वेळ घालवा. एखादा नवा खेळच का होईना, पण कांहीं तरी नवीन शिका व जुन्याची उजळणी करा. विश्रांति म्हणजे आपल्या अंगावर गंज चढूं देणें नव्हे तर थकवा काढून टाकून पुनः ताजेंतवानें होणें, आपल्या अंगाची तरतरी वाढविणें होय. हें ध्यानांत ठेवा. विश्रांति म्हणजे विस्तव विझविणें नव्हे, तर केव्हां वाटेल तेव्हां फुलवितां येईल अशा स्थितींत निखारे ठेवणें. नाहीं तर आपली राख चढून चढून विस्तव पार नाहींसाच व्हावयाचा. तें उपयोगी नाहीं. तुम्हांला तुमच्या अभ्यासाचा कंटाळा आलाना ? तो अभ्यास सोडून

तेव्हां कामकरी नांगर हंसून त्यास म्हणालाः " भाऊ, मला तुझ्या बोलण्याचें फार हंसूं येतें. अरे, तुझा स्वस्थपणाच तुझ्या या अशा स्थितीला कारण हें तुला कसें ठाऊक नाहीं ? 'बसला स्वस्थ तो झाला फस्त,' ही म्हण तुला कशी ठाऊक नाहीं ? तुला माझ्यासारखी चकाकी आणि तरतरी पाहिजे असली, तर मालकास सांगून तूं आपल्याला कामाला लावून घे, मग तुझी सगळी तांबविंब पार जाते कीं नाहीं पहा. "

त्या ‹ ‹नराप्रमाणेंच तुम्हीही ती म्हण ध्यानांत ठेवा. " बसला स्वस्थ तो झाला फस्त. " त्याचा ठावठिकाणसुद्धां सांपडावयाचा नाहीं. हे दिवस स्वस्थ बसावयाचे नाहींत. कामाचे आहेत. चळवळीचे, हालचालीचे आहेत. उद्योगाचे, ज्ञान मिळविण्याचे आहेत. एका विषयाचा कंटाळा आला, दुसरा, दुसऱ्याचा कंटाळा आला तिसरा. एका विद्येचा कंटाळा आला, दुसरी, दुसरीचा आला तिसरी. सारांश, विश्रांति ह्मणजे पालट पाहिजे. विश्रांति म्हणजे घोंगट नव्हे. सध्यांच्या काळीं आपल्या देशांत तर काम करणाऱ्या माणसांची इतकी जरूरी आहे कीं हिंदुस्थानांतली सगळी बत्तीसकोटि प्रजा कामाला लागली तरी तिला काम आहे. आणखी आपण विश्रांति घेऊन किंवा ज्ञानाचा कंटाळा करून कसें चालेल! भट्टी चालू ठेविली पाहिजे. आपला देश, आपले लोक चांगल्या स्थितीला आले पाहिजेत अशी तुमची इच्छा आहे ना ? मग तुह्मी स्वतःला आधीं उद्योगी बनवून चांगल्या स्थितीला न्या बरें ! आपण स्वतः काय करतों आणखी कसें करतों, याच्यावर नजर द्या बरें. सगळ्या कामांत—जें काम हातीं घ्याल, तें बारीक असो मोठें असो, पण त्यांत—आपलें मन पूर्णपणानें गढूं द्यावयाचें, सत्य सोडावयाचें नाहीं, आणि सरळ मार्गांतून काडीभरही ढळावयाचें नाहीं. असा निश्चय करा आणि त्या निश्चयाप्रमाणें वागा बरें. म्हणजे पहा काय होतें तें. तुमच्यापैकीं पुष्कळांना आपल्या पायांपुरतें पहाण्याची खोड असते ती टाकून द्या. आपलपोटेपणा अंगीं म्हणून राहूं द्यावयाचा नाहीं असा निश्चय करा. म्हणजे तुम्ही आपल्या भोंवतीं एक नंदनवनच बनविलें असें होईल कीं नाहीं पहा.

तुम्ही आज मुलें खरीं, पण तुम्ही सदैव मुलेंच राहणार नाहीं,

हें लक्ष्यांत धरा. आज जो तो तुम्हांला "मुलें तीं. त्यांना काय कळतें?" असें म्हणतो, परंतु तुम्ही मोठे झाल्यावरही लोकांनीं तुमच्यावद्दल असेंच म्हणावें, अशी तुमची इच्छा नाहींना ! मग आज तुम्हांला कळत नाहीं ते कळण्याचा उद्योग करा. जगाला आजच्यापेक्षां अधिक शहाणें करण्याचें काम तुमचें आहे. आजच्यापेक्षां अधिक सुखी करण्याचें काम तुमचें आहे. पण तें काम करावयाला तुम्ही केव्हां योग्य व्हाल? तुम्ही आज शहाणपणाचा, ज्ञानाचा आणि सुखाच्या साधनाचा आपला सांठा मुकाट्यानें वाढवाल तेव्हां, नाहीं तर 'वसला स्वस्थ तो झाला फस्त!' हें आहेच.

प्रारंभीं तुह्मांला सांगितलेंच, कीं स्वस्थ वसणें, कांहीं न करणें हें कांहीं विश्रांतीचें लक्षण नव्हे. विश्रांतीचें लक्षण सदा उद्योगांत असणें, पण कंटाळा न येणें. हा कंटाळा न येण्याला उपाय "कामपालट." वाचण्याचा कंटाळा आला, तर हातानें करण्याजोगेंच कांहीं काम काढावें, हातानें काम करावयाचा कंटाळा आला, झाडाझुडांची माहिती गोळा करण्यासाठीं हिंडावयालाच जावें. त्याचा कंटाळा आला, कांहीं नवीन खेळ—ज्यांत आपलें मन गढून जाईल, बुद्धि कामीं लागेल आणि शरीराला हितकर होईल, असा खेळ खेळावा. साधारणतः उगीच स्वस्थपणानें हात जोडून वसण्याची पाळी येईल असें घडूं देऊं नये अशी खबरदारी घ्यावी.

हाताच्या कुशलतेचीं कामें करणें हें थोडे दिवसांपूर्वींपर्यंत अगदीं कमीपणाचें समजत असत; परंतु आपल्या सुदैवानें त्यांत आतां फरक पडून हातांनीं काम करणें हें पुस्तकी विद्येपेक्षां कोणत्याही दृष्टीनें कमीपणा आणणारें नाहीं असें लोकांना समजूं लागलें आहे तेव्हां तुमच्या विश्रांतीच्या वेळांत तुम्ही हस्तकौशल्याचीं, कारागिरीचीं कांहीं कामें शिकलांत तरी सुद्धां तुम्हीं आपल्या सुट्टीचा उत्तम उपयोग केला असें होणार आहे. पण तसें कराल तर ! नुसत्या टवाळ्या करण्यांत किंवा स्वस्थ वसण्यांत वेळ घालवून उपयोग नाहीं. आपल्याला कोणती तरी एखादी विद्या अशी येत असली तर तिचा केव्ह उपयोग होईल याचा बिलकुल नेम नाहीं. तेव्हां कोणतीही विद्या आपल्या योग्यतेला कमीपणा आणणारी आहे असें समजूं नये. जी विद्या शिकण्याची संधि सांपडेल, ती विद्या जमल्यास आपण शि-

कावी. कधीं वायां जाणार नाहीं. आपल्याला जें माहीत नाहीं तें लोकांस विचारण्यासाठीं तोंड नेहमीं उघडें ठेवावें. ज्ञान मिळण्याच्या कामांत संकोच धरण्याचें कांहीं कारण नाहीं. मात्र असें ज्ञान मिळाल्यावर त्याविषयीं अहंपणा, अभिमान, गर्व हीं धरूं नयेत. कां कीं, अभिमानानें फार नुकसान होतें. गर्वानें मनुष्य कुचकामाचा निरुपयोगी होतो. त्याच्याजवळ कोणाला जावेंसेंसुद्धां वाटत नाहीं. त्याच्या ज्ञानाचा कोणाला उपयोग व्हावयाचा नाहीं. कारण त्याच्या ताठ्यामुळें कोणी त्याच्याजवळ जाऊं इच्छीत नाहीं. मग त्याच्या ज्ञानाला कोण पुसतो ?

इतका वेळ, सुट्टी म्हणजे स्वस्थ बसून फस्त होण्यासाठीं दिलेला अवकाश नव्हे, हें तुमच्या मनावर नानाप्रकारांनीं ठसविण्यासाठीं बरेंच सांगितलें, तें तुमच्या ध्यानांत राहीलच. आतां दुसरा एक अवगुण—ज्या अवगुणामुळें पुष्कळ मुलांचेंच नव्हे, तर पुष्कळ थोर माणसांचेंही नुकसान झालें आहे. असा अवगुण किती वाईट आहे यावद्दल थोडेंसें सांगतों. तो अवगुण " काम लांबणीवर टाकण्याचा. " आतां तुम्ही आपला अनुभव पहा. तुमच्यापैकीं जे गेल्या सहामाही परीक्षेत नापास झाले ते आणि दुसरेही बहुतकरून असा निश्चय करितात कीं, आतां सर्व सुट्टीचे दिवस फार उत्तम प्रकारें कामीं लावावयाचे. ते कसे ? प्रथम सुट्टीचे सर्व दिवस मोजून त्यावर अभ्यासाची वांटणी करावयाची. दिवसाच्या चोवीस तासांची वांटणी करावयाची. आठ तास झोंप. सकाळीं दोन तास तमूक. मग तासभर अमूक. त्यानंतर अर्धा तास अमूक. असें सगळ्या दिवसाचें अगदीं बरावर टाईमटेबल (वेळापत्रक) जमतें. आणि त्याप्रमाणें सुट्टीच्या आदले दिवशीं मनाची व्यवस्था व बेतवार तर बसतो. परंतु ज्या दिवसापासून तें वेळापत्रक अंमलांत यावयाचें त्या दिवशीं सकाळीं उठावयाच्या वेळीं, आळस हळूच कानांत गुणगुणतोः " अरे, आज तर सुट्टीचा पहिला दिवस आहे. आज लोळून घे. मग उठल्यावर पहातां येईल. अन् आजचा दिवस नाहीं टाईमटेबलाप्रमाणें झालें म्हणून काय हरकत आहे ? अजून चव्वेचाळीस दिवस आहेत. झालें. आळसानें आपली छाप बसवून तो दिवस खाल्ला आणि दुसरा उजाडल्यावर तोही खाल्ला. पुनः अजून त्रेचाळीस दिवस आहेत हा मंत्र आहेच. चालला एक एक दिवस कमी होत आणि तेवढा

वजा घालून बाकीचे तर आहेत असा जपही चालूच राहिला.असा क्रम बाकी पूज्य राहीपर्यंत चालतो! मुद्दी सारी संपते आणि डोळे न उघडतां त्यांत शेवटीं पाणी मात्र येतें! "आज एक दिवस जाऊंद्या, उद्यां-पासून करूं आतां ठीक व्यवस्था" हा महामंत्र आळसाचार्य आपल्या कानांत सकाळींच कुजबुजतात आणि तो आपल्या फार पथ्यावर पडतो. यांत सोमवार बेटा असा वस्ताद आहे, कीं तो आधींचे दोन चार दिवस खातो! बुधवार गुरुवारपर्यंत दिवस गेले, कीं शुक्रवारीं बहुत-करून 'आतां सोमवारपासून व्यवस्थितपणें वेळापत्रकाप्रमाणें वागूं' असें म्हणण्याला प्रारंभ होतो. शनिवार रविवार हे दिवस नेहमींचे सुट्टीचे, तेव्हां ते जमेस धरतां येत नाहींत. सोमवार फार चांगला. मोठा शुभ. आठवड्याच्या आरंभाचा! तेव्हां कोणत्याही व्यव-स्थित कामाचा आरंभ करण्याला तो फार उत्तम! पण तो साधतो कोठें? तो लाधला नाहीं कीं केव्हां केव्हां बुधवारावर उडी जाते व बुधवार टळला कीं पुनः सोमवार डोळ्यांसमोर येतो! मधले वार तुटलेल्या माळेंतल्या मण्यांप्रमाणें घळकर कोणी-कडे तरी जाऊन पुनः सोमवारापर्यंत वाट पहाण्याची स्फूर्ति होते! हा जो "उद्यां" "उद्यां" असा मंत्र आपण रोज जपतों, तो मोठा विलक्षण आहे. त्याला अंतच नाहीं. आपला अंत होईल, तेव्हांच त्याला अंत यावयाचा. सगळ्यांत हा अवगुण—काम लांबणीवर टाक-ण्याचा अवगुण—फार वाईट. तो तुह्मीं टाकावयाला निश्चयाचा मोठा जोर धरला पाहिजे. या अवगुणाशीं झगडावयाला मोठें धैर्य लागतें. एका कवीनें मोठ्या कळकळीनें केलेला उपदेश सदासर्वदा ध्यानांत ठेविला पाहिजे. तो म्हणतो:—

जाते घडिही अपुली साधा करा काय तें अतां करा।
चित्तामध्यें धैर्य धरारे हरिवरि ठेवा भाव पुरा॥

देवावर भार ठेवून चित्तांत धैर्य धरून, आळसाशीं आणखी दीर्घसूत्रीपणाशीं झगडलें पाहिजे. 'उद्यां' हा शब्द होतां होईतों मनांत व जिभेच्या टोंकाशीं येऊंच देतां उपयोगी नाहीं. उद्यांचीं मुलें-लेंकरें असंख्य आहेत. प्रत्येक उद्यांला आणखी एक उद्यां आहेच. 'आज' ला मात्र दुसरा 'आज' नाहीं. संस्कृतांत एक अगदीं

साधी म्हण आहे. ' दीर्घसूत्री विनश्यति '. कामें लांबणीवर टाकणारा कामाची उगीच लांबण लावणारा विनाश पावतो. हें किती खरें आहे. तेव्हां हा अवगुण अंगीं जडूं देऊं नये म्हणून फार फार काळजी घेतली पाहिजे. सावकाश सावकाश गिळीत जाणाऱ्या अजगरासारखा हा अवगुण आहे. सावकाश अंगांत भिनून जाऊन नाश करणाऱ्या विषासारखा त्याचा परिणाम होतो. एवढ्याकरितां त्याचें फार फार भय वाटूं द्या. तो एक साप आहे. त्याचें डोकें वेळींच ठेंचलें नाहीं तर तो विळखे घालून घालून दावून तुमचा श्वासोच्छ्वास कोंडून प्राण घेईल; यांत काडीमात्र संशय नाहीं. तुम्हांला या वयांत आम्ही इतका कळकळीनें हा उपदेश करतों याचें कारण तुम्ही अजून लहान आहां. पुढें होणाऱ्या मोठ्या वृक्षाचें तुम्ही मूळ आहां. मुळाला पाणी घातलें, म्हणजे तें सगळ्या वृक्षाला मिळतें. तुकाराममहाराजांनीं म्हटलें आहे:—

सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥

हें वाक्य तुम्हीही ध्यानांत ठेवा. आतांच तुम्हांला सांगितलें कीं, तुम्ही मूल म्हणजे मूळ आहां. मुळाला कीड लागली नाहीं, पाणी चांगलें मिळालें म्हणजे झाड चांगलें फोंफावतें. तीच तुमची गत आहे. चांगल्या संवयींचें पाणी आज तुम्हांला मिळालें, आळस, दीर्घसूत्रीपणा वगैरे अवगुणांची कीड तुम्हीं आपल्यापासून दूर ठेविली, म्हणजे तुमचें झाड फार उत्तम व जोरांत वाढेल, आणि त्याच्या छायेला हजारों माणसें बसून आपला ताप परिहार करतील. त्याचीं फळें हजारों माणसें चाखून तुम्हांला दुवा देतील. आणि तुमचें अनुकरण इतर अनेक मुलें करतील. याहून अधिक काय सांगूं? पुनः एकदां पहिल्या प्रथम दिलेली शांति वाचून दाखवून पुरे करतों.

भद्रं कर्णेभिः श्रृणुयाम देवाः । भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाँसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ॥
सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥
ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ॥

मुलांस थोडा उपदेश.

मुलांनो, सुट्टी झाली ह्मणजे ती कशी घालवावी, हा प्रश्न तुमच्या पुढें उभा रहात असेल नव्हे? त्यांतून दरसाल सुट्टी चांगली महिना दीड महिना असल्याकारणानें कोठें गांवीं जाऊन आपल्या इष्टमित्रांस भेटण्यास किंवा इतर ठिकाणें पहाण्यास वेळ तरी असे. चंद्राची सुट्टी अगदीं थोडी आहे. या सुट्टींत कोठें लांबचा प्रवास तुमच्या हातून होणें शक्य नाहीं, यामुळें तुमची कदाचित् निराशा होण्याचा संभव आहे; परंतु निराशा होऊं देऊं नका. लांबचा प्रवास करून दूरच्या मौजा पहाण्याची संधि गेली, तरी आज मी जवळच्याजवळ किती गोष्टी पहाण्याजोग्या आहेत आणि त्या कशा पाहिल्या ह्मणजे आपणांस अतिशय आनंद होतो, हें सांगणार आहें. तुह्मांला वाटेल कीं, जवळच्याजवळ तें काय पहाण्याजोगें असावयाचें? परंतु तसें समजूं नका. तसें समजाल तर चुकाल. आपल्या जवळच्याजवळ, अगदीं सभोंवार इतकें पहाण्याजोगें आहे कीं, तें पुरतेपणें पहाण्यास तुमचा जन्मसुद्धां पुरणार नाहीं, तें पहाण्यांत कित्येक विद्वानांनीं आपले जन्मचे जन्म खर्च केले आहेत. 'इतकें मोठें व महत्त्वाचें आपल्या सभोंवार आहे तरी काय? असा प्रश्न तुमच्या मनांत उभा राहिला असेल, नव्हे?' त्या प्रश्नाचेंच आज मी उत्तर देणार आहें, आजपर्यंत दर सुट्टीच्या वेळीं जे उपदेश केले, त्यांत तुह्मीं वागावें कसें आणि करावें काय हें सांगितलें. आजच्या या उपदेशांत तुह्मीं "**पहावें काय आणि तें कसें?**" हें सांगण्याचा विचार आहे.

मुलांनो, आपल्या सभोंवतालीं आपण पहात नाहीं, तोंपर्यंत आपल्या आजूबाजूला कांहीं पहाण्याजोगें आहे, हेंच आपल्यास समजत नाहीं. जें आपल्या दृष्टीस नित्य पडतें, तें आपण पहातों असें समजूं नये. सहज दृष्टीस पडणें आणि पहाणें यांत अंतर आहे. आगगाडींतून जातांना आपल्या दृष्टीस कितीतरी गांव पडतात. ह्मणून ते आपण पाहिले असें होत नाहीं; आणि जोंपर्यंत पहाण्या-

त्या उद्देशानें आपण ते पहात नाहीं, तोंपर्यंत आपल्याला त्या गांवांची खरी माहिती होत नाहीं. आग्रा शहरांत ताजमहाल नांवाची एक संगमरवरी दगडांनीं बांधलेली फारच सुरेख इमारत आहे. परंतु तिचा सुरेखपणा आपल्याला केव्हां कळावयाचा ? आपण जेव्हां तिच्या-जवळ जाऊं, तिची रचना कशी केली आहे हें नीट न्याहाळून पाहूं, तेव्हांच कळावयाचा. आगगाडींतून प्रवास करीत असतां आग्र्याच्या स्टेशनांतून गेलों व जातां जातां आपल्या डब्याच्या खिडकींतून मान लांब करून पहात असतां, त्या इमारतीचा घुमट आपल्यास दिसला, ह्मणजे आपण ताजमहाल पाहिला असें होत नाहीं. तीच स्थिति पदार्थमात्राची आहे. त्याची खरी माहिती होण्याला आपल्याला पदार्थ हातांत घेऊन, त्याची नीट तपासणी केली पाहिजे. किंवा आपल्याहून ज्याला अधिक ज्ञान असेल, त्याला विचारलें पाहिजे, तरच आपल्यास पुष्कळ गोष्टी समजतील.

मुलांनो, आपल्या सभोंवतीं केवढालीं तीन राज्यें पसरलीं आहेत, याची तुह्मांला कल्पना आहे ? तुह्मी नीट डोळे उघडून पहा ह्मणजे तुह्मांला तीं राज्यें कोणतीं हें समजेल. हीं राज्यें एवढालीं मोठीं आहेत कीं, त्यांचा प्रारंभ कोठें आणि शेवट कोठें हें आपल्यास समजतच नाहीं. या राज्यांत शिरून पहाण्याजोग्या वस्तु इतक्या आहेत कीं, त्या पहाण्याला आपला जन्म तर पुरावयाचा नाहींच, पण आजपर्यंत कित्येकांनीं आपले जन्म घालविले, तरी त्यांना पुरी माहिती झाली नाहीं. हीं असलीं राज्यें आहेत तरी कोणतीं, असें तुमच्या मनांत येऊन तुह्मांला मोठें आश्चर्य वाटत असेल कीं, आह्मी ज्या ब्रिटिश राज्यांत रहातों, त्याच्या इतकें मोठें राज्य दुसरें कोणतेंही नाहीं असें ह्मणतात, परंतु हीं तीन राज्यें ज्यांना कांहीं आदि नाहीं, अंत नाहीं, अशीं आहेत तरी कोणतीं ? पण मुलांनो, ब्रिटिश राज्याची गोष्ट निराळी आणि मी जीं राज्यें आतां तुह्मांला दाखविणार आहें, त्यांची गोष्ट निराळी. इंग्रज सरकारचें राज्य हें मनुष्यांनीं मिळविलेलें राज्य. मी राज्यें दाखविणार, तीं परमेश्वरानें आपणांस दिलेलीं राज्यें आहेत. तीं कोणतीं व कशीं आहेत, हें पहाण्यासाठीं तुह्मी अगदीं आतुर झालां आहांत असें दिसतें. बरें तर, त्या

राज्यात तुह्मला आतां नेऊन सोडतों. एवढेंच करा कीं, एक क्षणभर आपण थोडे त्या पलीकडल्या कुंडीजवळ जाऊं. या कुंडींत काय आहे ? हें गुलाबाचें रोप आहे. त्याला वर एक फूल आलें आहे, तें फूल अगदीं जवळ जाऊन पहा. त्यावर एक पतंग बसला आहे; त्याला जरा हात लावला, तर तो उडून दुसरीकडे जातो. बरें, खालीं कुंडींत पहावें तर आंत ओली माती आहे, दुसरें कांहीं नाहीं. आतां एकंदर जर तुह्मांला विचारलें कीं, ही कुंडी तुमच्यापुढें ठेविली आहे, हींत तुह्मीं काय पाहिलें ? तर तुह्मी काय उत्तर द्याल ? गोंधळूं नका. उत्तर कांहीं कठीण नाहीं. जें पाहिलें तेंच सांगा. कुंडींत ओली माती आहे, तींत गुलाबाचें झाड आहे, त्याला एक फूल आलें आहे व त्यावर एक पतंग आहे. हेंच तुमचें उत्तर येणार, आणि तें अगदीं बरोबर आहे. पण या उत्तरानें तुह्मीं काय सांगितलें तें तुह्मांला ठाऊक आहे ? नाहीं. कसें ठाऊक होणार ? तुह्मी कधीं या तीन वस्तूंची त्या तऱ्हेनें माहितीच करून घेतली नाहीं. पण आज ती करून घ्या. ह्या तीन वस्तु आपल्या या पृथ्वीवरल्या आहेत हें तर उघडच आहे. पण त्यांतल्या त्यांत त्या तीन राज्यांतल्या तीन आहेत. जितकी ह्मणून जमीन आणखी तिच्यावरलें पाणी, तेवढें सगळें मिळून पृथ्वी होते. पण कोणाच्या वाट्यांत कोणता भाग आहे हें स्पष्ट समजण्यासाठीं निरनिराळ्या भागांना निरनिराळीं नांवें आहेतना ? तुह्मीं एखादा पृथ्वीचा नकाशा घेतलात, तर त्याच्यावर हिंदुस्थान निराळें, इंग्लंड निराळें, अमेरिका निराळी व पुष्कळ देश निरनिराळे दाखविलेले दिसतील. तशाच पृथ्वीवर ज्या कांहीं वस्तु आहेत त्यांच्यांतील सारखेपणा पाहून त्यांचे तीन भाग पाडले आहेत. या भागांनाच राज्य असें ह्मटलें आहे. या कुंडींत तीं तिन्हीं राज्यें आहेत:—राज्यें आहेत ह्मणण्यापेक्षां त्या तिन्हीं राज्यांतल्या प्रजेपैकीं एक एक आहे असें ह्मटलें, तर जास्त खरें होणार आहे. पृथ्वींतल्या सगळ्या वस्तु कांहीं तुह्मीं अजून पाहिल्या नाहींत, पण जितक्या तुह्मीं पाहिल्या आहेत, त्यांतच या तीन वस्तु आहेत. त्या तुह्मी रोज पाहातां. पण त्यांची कधीं तपासणी केली आहे ? नाहीं. बरें तर आज करूं. सांगा, कुंडींतल्या

मातींत आणि आंतल्या झाडांत तुम्हांला काय फरक दिसतो ? पहा. कुंडींत जी एकदां माती टाकली ती पहिल्यापेक्षां अधिक झाली आहे का ? पहिल्यानें एक घमेलें भरून माती टाकली होती, ती चार दिवसांनीं आपली दीड घमेलें झाली, असें होतें काय ? कधीं नाहीं. पण त्या मातींत जेव्हां गुलाबाचें रोप लाविलें, तेव्हां तें केवढें असेल आणि आतां केवढें झालें आहे ? रोप वाढलें, माती वाढली नाहीं. माती, दगड हीं कधींच वाढत नाहींत. ढिगावर ढीग कोणी तरी करावे किंवा दगडावर दगड ठेवावा, तेव्हां ते मोठे उंच होणार; परंतु झाडाचें तसें नाहीं. तें आपलें कसें वाढत जातें, तें समजत नाहीं. आज उगीच लहानशी कोय रुजत घालावी, महिन्या पंधरा दिवसांनीं येऊन पहावें, तों त्या कोयींतून कोंब फुटून तो जमिनींतून डोकें वर काढून तयार. पुढें त्याला पानें येतात. आणखी वर्ष सहा महिन्यांनीं पहावें, तों त्याचें चांगलें लहानसर झाड बनतें ! आणि कांहीं वर्षांनीं त्याला मोहोर येऊन पुढें आंबे येतात ! दगड गोटा असा रुजत घातला, तर कधीं त्याला अंकुर फुटून वर आला आहे ! कधीं दगडाला दगड आले आहेत ? नाहीं. मुलांनो, तुम्हीं गतवर्षी जेवढे होतां, त्याच्यापेक्षां यंदां मोठे झालां. यंदां आहां त्याच्यापेक्षां पुढल्या सालीं आणखी मोठे होणार; तेव्हां तुमच्यांत व झाडांत आणि मातीदगडांत फरक आहेना ? तुम्हीं आपोआप वाढतां, झाडें वाढतात, पण माती, दगड, वगैरे पदार्थ वाढत नाहींत. अर्थातच आपोआप मोठे होत जाणारे पदार्थ आणि तसे मोठे होत नाहींत असे पदार्थ. दोन भाग झाले ना ? आतां आणखी एक मौज ध्यानांत घ्या. हें गुलाबाचें रोप आहे आणि हा पतंग किंवा यावर हा हिरवा आळीसारखा किडा आहे. या गुलाबाच्या झाडांत आणि या किड्यांत कांहीं फरक तुम्हांला दिसतो आहे ? गुलाबाचें झाड आजच्यापेक्षां चार दिवसांनीं थोडेंसें मोठें होतें, पण आज या कुंडींत येथें आहे, तें उद्यां आपलें एखाद्या दुसऱ्या कुंडींतच जाऊन बसलें असें कधीं कोणीं ऐकलें आहे ? नाहीं. झाड जेथें एकदां

लावावें तेथेंच तें राहणार. इकडे तिकडे हालचाल कधींच करणार नाहीं. परंतु तो पतंग पहा ! क्षणभर एका ठिकाणीं बसेल तर शपथ. मारे इकडून तिकडे तिकडून इकडे हिंडतो आहे. त्याचप्रमाणें हा किडा पहा, त्या पतंगाच्या इतका जलद तो हिंडत नाहीं, पण हळू हळू वाटेल तिकडे जात असतो. आतां पुनः एकदां या कुंडींतल्या तिन्ही वस्तूंतला फरक पहा. माती कोणी तरी तींत भर घातल्याखेरीज वाढत नाहीं व जागची हालत नाहीं. झाड आपोआप वाढत जातें पण जागचें हालत नाहीं आणि पतंग अथवा किडा आपोआप वाढतो व वाटेल तिकडे हिंडतो ! तीन निरनिराळे प्रकार झाले ना. या प्रकारांना राज्य असें नांव दिलें आहे. एक जमिनीचें राज्य. याच्या पोटांत मातीदगडांसारख्या आपोआप न वाढणाऱ्या आणि आपण होऊन न हालणाऱ्या सर्व वस्तु येतात. दुसरें झाडांचें राज्य. यांत सर्व झाडें येतात, आणि तिसरें प्राण्यांचें राज्य. यांत आपोआप वाढणारे व वाटेल तिकडे जाऊं शकणारे सर्व प्राणी येतात. पहा, तुह्मीं या कुंडीकडे पाहिलें नाहीं, तों तुह्मांला तीन राज्यें दिसलीं. या तीन राज्यांना आपण लहानसर नांवें देऊं. माती, जमीन याला संस्कृत शब्द भूमि असा आहे, आणि तिच्या पोटांत जें काय खणून सांपडतें, त्या सगळ्याला भूमिगत–ह्मणजे भूमींत असलेलें असें ह्मणूं. तेव्हां पहिलें राज्य कोणतें ? तर भूमिगतराज्य. दुसरें कोणतें ? वनस्पतिराज्य. तिसरें कोणतें ? प्राणिराज्य. खाणींतून सांपडणाऱ्या, ह्मणजे पृथ्वीच्या पोटांत खणून काढल्या जाणाऱ्या सगळ्या वस्तु आपण पहिल्या राज्यांतल्या समजतों. जमिनींत उगवून वाढत वाढत जाणारीं सर्व रोपें–शेवाळ, गवत वगैरेंपासून तों तहत वडापिंपळांपर्यंत सर्व झाडें, मग त्यांना पानें, फुलें, फळें येवोत किंवा न येवोत,--त्यांना आपण वनस्पतिराज्यांत धरतों. आणि बारीकसारीक किडामुंगींपासून तों तहत हत्तीपर्यंत आपण सगळ्यांना प्राणिराज्यांत घालतों.

मुलांनो, आतां या तीन राज्यांचा प्रत्येकाचा विस्तार केवढा असेल

याची कल्पना करा बरें! पृथ्वीच्या पोटीं किती प्रकारचे तरी पदार्थ सांपडतात! ते सगळे कोणी मोजूं लागलें, तर त्यांची मोजदाद होईल काय? होणार नाहीं. ह्मणूनच त्या राज्याला आपण अनंत ह्मणजे ज्याला अंत नाहीं, शेवट नाहीं, इतकें तें मोठें आहे, असें ह्मणतों. जशी पृथ्वीच्या पोटांतल्या पदार्थांच्या मोजणीची स्थिति आहे, तशीच झाडांच्या मोजणीचीही स्थिति आहे. त्याची मोजदाद व्हावी कशी? नुसत्या झाडांच्या एक एक जाती निरनिराळ्या मोजल्या, तरी त्या कोटि दीड कोटी भरणार! आणि प्राणिराज्यांत प्राणी किती आहेत? कल्पनेनें तरी त्यांची संख्या आपल्याला जाणतां येईल काय? नाहीं. ह्मणूनच यांना अनंत असें ह्मटलें. आपल्या अगदीं जवळ जवळ असणारे हे पदार्थ. आपलें त्यांच्यावांचून चालत नाहीं, असें असून आपल्याला त्यांच्याबद्दल काय माहिती आहे? ती माहिती मिळावी ह्मणून आपण कधीं खटपट केली आहे! आजपर्यंत केली नाहीं. पण आज थोडीशी करूं. मी आज तुम्हाला त्यांची इतक्या पुरतीच माहिती देतों कीं, ती ऐकून अधिक माहिती मिळविण्याची तुमची तुह्मांला इच्छा व्हावी व आपल्या वडील मंडळींच्या आणि गुरूंच्या मागें लागून तुह्मीं ती माहिती शिकून घ्यावी.

प्रथमचें राज्य कोणतें? प्रथम आपण कुंडींतली मातीच घेऊं.

भूमिगत राज्य. हें पहिलें राज्य. या राज्यांत काय वस्तु येनात बरें? जर आपण कोठें खणलें, तर आंत काय सांपडतें? माती आणि दगड. पुष्कळ खोल खणीत गेलें, तर खालीं कातळ किंवा खडक लागतो. त्यांतही आंत खणीत गेलें, तर कित्येक ठिकाणीं तांबूस रंगाचे दगड सांपडतात. त्या दगडांतून लोखंड सांपडतें. कित्येक ठिकाणीं दुसऱ्या कांहीं धातूंचे दगड सांपडतात. सोनें, रुपें, कथील, शिसें, लोखंड इत्यादि सर्व धातु; हिरे, माणकें, लाल, पाचू, नीळ, वगैरे रत्नें; दगडी कोळसे, स्लेटीचे दगड, खडू वगैरे पदार्थ पृथ्वीपोटांत सांपडतात. हे सर्व निरनिराळ्या प्रकारचे दगडच होत. या पृथ्वीवर दगडाची माती आणि मातीचे दगड असें एकसारखें चाललेलें असतें. माती घट्ट होत होत जबरदस्त दाबाखालीं सांपडून

तिच्यांत कांहीं विशेष पदार्थ अधिक असले, ह्मणजे ते त्या नऱ्हेचे दगड बनतात. ज्या दगडांत लोखंडाचा अंश फार असे दगड जेथें सांपडतील, त्या खाणीस लोखंडाची खाण ह्मणतात. रुपें जास्त असणारे दगड सांपडले ह्मणजे तीस रुप्याची खाण ह्मणतात. जेथें हिऱ्याचे दगड ह्मणजे गारगोटीसारखे दगड सांपडतात, तीस हिऱ्याची खाण ह्मणतात.कोठें गेरू सांपडतो, कोठें खडू सांपडतो, कोठें चुनखडी सांपडते,एकूण हे सर्व पदार्थ पृथ्वीच्या पोटांत किंवा डोंगराच्या पोटांत सांपडतात. यांना खनिज ह्मणजे खाणींत सांपडणारे पदार्थ असें ह्मणतात. या सगळ्या पदार्थांस मिळून खनिज राज्य अथवा भूमिगत राज्य ह्मणावें.

या दगडांच्या जातींविषयीं येथें थोडेंसें सांगतों.

दगडांविषयीं कांहींच माहिती सांगण्याजोगी नाहीं असें पुष्कळांस वाटतें. गारगोट्या, नदींतले बारीक बारीक खडे, त्याचप्रमाणें वाळू हीं सारीं कोठून येतात ?

" कोठून ह्मणजे ? नदींतच असतात, " असें कोणी सहज ह्मणतील हें खरें, पण नदींत कोठून येतात ? तें आपल्याला ठाऊक आहे काय ?

नदीच्या मध्यावर गेलें आणि तळाशीं बुडी मारून मू[illegible] भरून वर काढली, कीं हातांत कांहीं काळे गोटे, कांहीं गारगोट्या [illegible] कांहीं वाळू हीं येतात. हीं सर्व एकच असतात. नदी डोंगरापासून निघून खालीं समुद्राकडे जात असते. तिच्या ओघाबरोबर पुष्कळ दगड खालीं जातात व एकमेकांवर घांसून घांसून अगदीं गोटे बनतात. दगड मूळचे मोठे असले, तर घांसून घांसून गुळगुळीत होत होत लहान लहान होतात. जे मूळचेच लहान असतात, ते त्याचप्रमाणें घांसून घांसून बारीक पण गुळगुळीत गोट्यांप्रमाणें होतात, आणि जे फार लहान असतात, ते वाळूप्रमाणें बनतात. नदीच्या ओघाबरोबर जों जों खालीं जावें तों तों हे दगड अधिक गुळगुळित होत जातात आणि नदीच्या उगमाचे बाजूस जावें तों तों ते मूळच्या आकाराचे जसे नदींत पडले असतील तसे दिसतात. नदीला पूर आला कीं, ते सर्व खालीं समुद्राकडे वाहत जातात. हे

दगड घांसघांसून जें पीठ पडतें तें भरभरीत राहिलें, तर त्याला वाळू ह्मणतात. परंतु या पिठाचा कांहीं अंश इतका बारीक अगदीं वस्त्रगाळ बारीक होतो, कीं तो चिखलच बनतो.

ही मूठभर वाळू घेऊन पाहिली, ह्मणजे आपल्याला हींत काय काय दिसतें तें पहा. कांहीं बारीक बारीक-फारच बारीक असे गोटे दिसतात. परंतु कांहीं गोटे इतके गुळगुळीत नाहींत असे कणही तींत दिसतात. या वाळूंत कांहीं पारदर्शक व स्वच्छ पांढरे असेही कण दिसतात. ह्मणजे वाळूवाळूंतच तीन प्रकार झाले. एक बारीक बारीक गोळीबंद असे खडे, दुसरा प्रकार जिला आपण साधारणतः वाळू ह्मणतों ती वाळू आणि तिसरा कांचेसारखा पदार्थ दिसतो व चकाकतो तो. शिवाय वस्त्रगाळ असा चिखलाचा अंश असतो, तो निराळाच. या चिखलास नदींतला गाळ ह्मणतात. या गाळांत खडकाची पूडच असते. दुसरें कांहीं नाहीं.

हें नदींतल्या धोंड्यांबद्दल झालें. मुलांची पाटी कशाची असते? दगडाची, ठीक आहे. कित्येक देवळांतील मूर्ति कशाच्या आहेत? संगमरवराच्या. पण संगमरवर हा काय आहे? दगडच आहे. पण स्लेटीच्या दगडांत आणि संगमरवरांत कांहीं अंतर दिसतेंच. नुसत्या रंगांतच नव्हे, तर दुसऱ्या कांहीं बाबतींतही असतें. स्लेटीचा दगड ठिसूळ दिसतो. संगमरवर तितका ठिसूळ नाहीं, कठीण असतो. 'शाळेंत तुझे मास्तर फळ्यावर कशानें लिहितातरे,' असें एखाद्या मुलास विचारलें, तर तो 'खडूनें लिहितात,' असें ह्मणतो.

"खडू हें काय आहे?" असें विचारलें तर त्यास उत्तर सुचत नाहीं. 'खडू,' 'चूनखडू' हेही एक प्रकारचे दगडच आहेत. आगगाडीच्या एंजिनांत जाळतात त्याला 'दगडी' कोळसा ह्मणतात. कारण तो कोळसा खरा, पण दगडासारखा झालेला असतो.

तेव्हां वरील एकंदर मजकूर ध्यानांत आणल्यास आपणांस असें दिसून येईल कीं, १ डोंगरी दगड; हे खडकाचे तुकडे होत. २ खाणींतले दगड; यांत खडू, चूनखडू, संगमरवर, दगडी कोळसे हे येतात. डोंगरी दगडावर ह्मणजे खडकाच्या तुकड्यांवर जर कांहीं औषधें टाकलीं, तर त्यांना भंग होत नाहीं. पण खडू किंवा चूनखडू नुसत्या

पाण्यांत टाकला, तर तो विरघळून त्याच्यापासून कांहीं प्रकारच्या वाफा निघूं लागतात, आणि त्याचा साका होऊन खालीं बसतो. स्लेटीवर पाण्यानें तसा कांहीं परिणाम होत नाहीं, परंतु दुसऱ्या कांहीं औषधांचा—विशेषतः तेजाब नांवाच्या जालीम औषधांचा—परिणाम स्लेटीच्या दगडावर व संगमरवरावर होतो. दगडी कोळसे जळतात हें तर तुह्मीं पाहिलेंच आहे. तसे दुसरे दगड जळत नाहींत. ह्मणून दगडांच्या जाती साधारणतः अशा झाल्याः—-

१ ज्यांवर पाण्याचा किंवा औषधांचा प्रयोग होऊन त्यांपासून वाफा निघत नाहींत, ते आपले जसेचे तसेच राहतात असे दगड.

२ ज्यांवर पाण्याचा किंवा औषधांचा किंवा अग्नीचा परिणाम होऊन ज्यांचें रूप बदलतें, असे दगड. या दुसऱ्या वर्गांत स्लेट, खडू, संगमरवर वगैरे दगड येतात.

हे दगडांचे मुख्यतः दोन भाग झाले. यांच्या पोटांत भाग पाडले तर पुष्कळ आहेत. इतकें दगडांविषयीं झालें. सांगितलें एवढ्यावरून तुमच्या मनांत इतकें ठसलें कीं, दगड, माती वगैरे पदार्थसुद्धां शोध करण्याजोगे आहेत, तर या सांगण्याचें चीज झालें असें आह्मी समजूं.

आतां आपण माती सोडून वर झाडाकडे पाहूं. या गुलाबाच्या झाडामध्यें हा बुंधा किंवा देंठ आहे. याला या फांद्या आहेत. या फांद्यांना पानें आहेत. पुढें याला फूल आहे, आणि मातींत उकरून पाहिलें, तर आंत मुळें आहेत. बारीक शेवाळापासून, तों तहत मोठमोठाल्या वडापिंपळाच्या झाडांपर्यंत सर्व कांहीं वनस्पतिराज्यांत मोडतें. सर्वांची जात एक. या सर्वांना वनस्पति ह्मणतात. यांचीं मुळें असतात, तीं पाणी शोषून घेऊन आपल्या शरीरांत पोंचवितात. मातींतलें पाणी घेऊन हीं आपलें शरीर पुष्ट करितात. ज्याप्रमाणें आपण आपल्या जिभेनें पाणी शोषून घेतों, अन्न चाखतों, त्याचप्रमाणें या झाडांचें आहे. हीं आपलें अन्न मुळांच्या द्वारानें घेतात आणि त्यावर त्यांचें शरीर वाढतें. नथल्या बुंध्यांत झाडांचें रक्त बनतें. आपलें शरीर कोठेंही कापलें ह्मणजे ज्याप्रमाणें त्यांतून रक्त बाहेर निघतें. त्याप्रमाणेंच या झाडांना कोठेंही

कापलें तर त्यांचें रक्त निघतें. आपलें रक्त तांबडें असतें, तसें त्यांचें रक्त तांबडें नसतें, हिरवट असतें. परंतु त्या हिरवट रसानेंच झाडांचें पोषण होतें. त्या रसानेंच बुंधा होतो, त्याच्याच फांद्या होतात, त्याचेंच पुढें फुलें होतात. जसें आपण अन्न खाल्लें कीं त्याचें आपोआप रक्त बनतें, मांस बनतें आणि आपलें पोषण होतें, तसाच या झाडांचा प्रकार आहे. झाड–किंवा वनस्पति कितीही लहान असो किंवा मोठी असो, सर्वांमध्यें हा रस सारख्या तऱ्हेनें वाहतो व ज्या त्या झाडांत जें जरूर तें काम करतो. गुलाबाला फूल आणतो, तो तोच रस. आंब्याला आंबा येतो त्याच्याचमुळें. परमेश्वराच्या कृतीचा चमत्कार तो हाच. एकाच तऱ्हेच्या हिरवट रसानें तो मुळें तयार करतो, देंठ करतो व सुरेख रंगांचीं फुलें आणि फळें बनवितो! झाडांच्या जाती एकंदर पाहिल्या तर कोटीच्याही वर होतील कीं काय नकळे, परंतु अगदीं मुख्य खुणा ध्यानांत घेऊन वर्ग पाडले, तर ते तीन दिसतात.

१ फुलं नाहींत अशा वनस्पति. उदाहरणार्थ, शेवाळ.

२ ज्यांचे बुंधे आंतल्या आंत बनून त्यांना पेऱ्यांवर पेरीं असतात, अशा वनस्पति म्हणजे ऊंस, लव्हाळे, गहूं, बाजरी वगैरे.

३ ज्यांचे बुंधे त्वचा वाढत बनत जातात त्या वनस्पति म्हणजे आंबा, फणस, वगैरे झाडें.

या तिहींना मोठालीं शास्त्रीय नांवें आहेत, परंतु तीं येथें देत नाहीं. ज्याप्रमाणें दगडांचा त्याचप्रमाणें वनस्पतींचाही अभ्यास करणें फार चांगलें आहे व त्यांची पुष्कळ माहिती मिळविण्याजोगी आहे. ती मिळविण्याची इच्छा तुम्हांला होऊन तुम्हीं या गोष्टींची माहिती मिळविण्याच्या उद्योगांत लागलां तर फार बरें होईल. मी आतां सांगतों आहें ही माहिती कांहींच नाहीं. याहून किती तरी माहिती मिळविण्याजोगी आहे.

आपण काय, किंवा इतर प्राणी काय. या वनस्पतींवर किती तरी अवलंबून आहों. त्यांच्यावांचून आपलें मुळींच चालत नाहीं. तांदूळ, डाळ, गहूं, बाजरी, जोंधळे, राई, नाचण्या, हीं सर्व कोठून येतात? या वनस्पतींचाच हा आपल्यावर मोठा उपकार आहे. त्यांच्यामुळें

तर आपण जगतों आहोंत. तेव्हां त्यांचें ज्ञान आपणांस अगदीं जरूर आहे.

वनस्पतींचें राज्य सोडलें ह्मणजे तिसरें राज्य प्राण्यांचें होय. या राज्यांत इतर प्राण्यांबरोबर मनुष्य प्राणी ह्मणजे आपणही येतों. हें ऐकल्याबरोबर तुह्मांस थोडेंसें आश्चर्य वाटेल; परंतु गोष्ट अगदीं अक्षरशः खरी आहे. बारीकसारीक जीवजंतु आणि आपण श्रेष्ठ ह्मणवून घेण्यास आपली बुद्धि व विचारशक्ति हींच काय तीं कारण होत. बाकी शरीररचनेच्या दृष्टीनें पाहिलें असतां आपणांत व इतर प्राण्यांत विशेष अंतर नाहीं. मनुष्य, घोडा, कोंबडा, साप, मासा, हे व माशी, विंचू, कोळी, गोगलगाय, कांसव वगैरे प्राणी घ्या. प्राण्यांची प्रथमतः जी खूण सांगितली ती या सर्वांस लागू आहे. यांची वाढ आंतून आपोआप होत जाते व यांस वाटेल तिकडे हिंडतां फिरतां येतें. ही खूण सर्वांस सारखी लागू असल्याकारणानें आपण या सर्वांस प्राणीच ह्मणतों. परंतु यांतल्या यांतही फरक पाहूं गेलें असतां पुष्कळ सांपडतात. एक दोन फरकच आज थोडक्यांत सांगतों. वर सांगितलेले पहिले पांच प्राणी आपण नीट तपासून पाहिले, तर आपल्याला असें स्पष्ट दिसेल कीं, त्यांचे अंगांत तांबडें रक्त आहे आणि हाडांचा सांगाडा आहे. चुरडून टाकूं म्हटल्यानें त्यांचीं हाडें चुरडलीं जावयाचीं नाहींत. परंतु माशी वगैरे प्राणी तपासून पाहिले असतां, त्यांचे अंगांत तांबडें रक्त व हाडें नाहींत असेंच दिसून येईल. एवढ्या एका फरकावरून आपल्याला सहज इतकें ह्मणतां येईल कीं, प्राण्यांचे दोन वर्ग पाडतां येतील:– १ ज्यांना हाडें व तांबडें रक्त हीं आहेत ते; व २ ज्यांस हीं दोन नाहींत ते हे दोन मोठाले वर्ग झाले, परंतु असा परस्परांतील फरक किंवा सारखेपणा तपासून काढून त्यांचे वर्ग पाडीत गेल्यास किती वर्ग तरी पडणार आहेत! आणि त्या शास्त्राचा अभ्यास करणारांनीं तसे वर्ग पाडलेही आहेत. ते सर्व वर्ग आतां येथें सांगतां येत नाहींत. कारण ज्याप्रमाणें वनस्पति, त्याचप्रमाणें प्राणीही इतके असंख्य आहेत कीं, त्यांची गणना करणें अगदीं अशक्यच होय. जेवढे प्राणी दिसतात, तेवढेच प्राणी जगांत आहेत असें समजूं नये. आपल्या दृष्टीला दिसत नाहींत असेही प्राणी

या जगतांत किती तरी आहेत. आपल्या नुसत्या डोळ्यांनीं जें दिसत नाहीं, तें दिसेसें करण्यास एक कांचेचें यंत्र मिळतें. त्यास सूक्ष्मदर्शक ह्मणजे बारीकास मोठें करून दाखविणारें यंत्र असें ह्मणतात. या यंत्रांतून एक पाण्याचा थेंब पाहिला तर त्यांत इतके अगणित जंतु दिसतात कीं, हें पाणी आपण पितों तरी कसें व त्यालों असतां आपल्या पोटांत या प्राण्यांचा उपद्रव कसा होत नाहीं, याचेंच आश्चर्य वाटतें. त्यांपैकीं कित्येक प्राणी तर इतके अक्राळविक्राळ दिसतात कीं, ते त्या यंत्रांतून पाहिले असतांच थोडेंसें भय वाटतें. त्या अत्यंत सूक्ष्म प्राण्यांपासून तों तहत हत्ती किंवा देवमासा या अतिशय मोठ्या प्राण्यांपर्यंत सर्वांची गणती करूं गेल्यास ती कोणास करतां येणार आहे ?

प्रथमतःच सांगितलें आहे कीं, हीं तीनही राज्यें केवळ अनंत आहेत. त्यांचा आरंभ कोठें व शेवट कोठें हें अद्यापि कोणास समजलें नाहीं व कोणास कधीं समजेल, असेंही वाटत नाहीं. तथापि तीं इतकीं आपल्याजवळ आहेत कीं, त्यांची होईल तितकी माहिती करून घेणें हें आपलें कर्तव्यच आहे. शिवाय त्या माहितीपासून आनंदही होणार आहे. घड्याळ नुसतें चालतें हें पाहून आपल्यास किती तरी आनंद होतो ! परंतु तें कसें चालतें हें पहाण्यासाठीं चक्रांची माहिती करून घेतली असतां तोच आनंद दुणावतो. त्याचप्रमाणें आपल्याजवळचीं झाडें वाढतात, त्यांना फुलें येतात, त्यांचा आपण सुवास घेतों, फळें येतात, तीं खातों, यामुळें कितीही आनंद झाला तरी हीं झाडें कशीं वाढतात, यांच्या शरीरांची आंतली रचना कशी आहे, यांच्या जाती किती आहेत, यांच्या संबंधी कोणत्या आहेत, ही माहिती मिळविल्यानें खरोखर अधिक आनंद होईल, त्याचप्रमाणें आपण अनेक खनिज पदार्थांचा उपयोग करतों. दगडांचीं घरें बांधतों; संगमरवरी दगडाची फरशी करतों; मूर्ति बनवितों; चुन्याची सफेती करतों; मऊ दगडांच्या पाट्या करतों; दगडवजा कोळसा जाळतों; हिरे, माणकें वगैरेंचे दागिने करून अंगावर वापरतों; परंतु ते सर्व कोठून पैदा होतात याची कधीं चौकशी करीत नाहीं. ती चौकशी अवश्य करावी. कुत्र्यामांजरांसारखीं जनावरें, पोपट, मैना यांसारखे पक्षी आपण घरांत

बाळगतों; घोड्यांसारख्या जनावरांचा अनेक कामीं उपयोग करतों; साप, विंचू वगैरे प्राण्यांचा तिटकारा करतों. परंतु हे सर्व प्राणी ह्मणजे जगांतील एक चीजच होत. त्यांचीही माहिती मिळविली असतां उपयोग व आनंद हीं दोन्ही साधलीं जातात. हें सर्व जग म्हणजे एक अजब पदार्थांचें संग्रहालयच आहे. हें ज्यानें उत्पन्न केलें व सर्वांची सारखी काळजी वाहून ज्यांच्या त्यांच्या मानानें ज्यांच्या त्यांच्या पोषणाची ज्यानें सर्व व्यवस्था उत्तम तऱ्हेनें लावून दिली आहे त्या परमेश्वराची खरी थोरवी कळण्यास त्याच्या ह्या सृष्टीचें होईल तितकें ज्ञान करून घेणें फार जरूर आहे. तसें ज्ञान झालें ह्मणजे आपणांस त्याचा दयाळूपणा चांगला समजून येईल. तो अत्यंत दयाळू आहे. किडामुंगी-पासून तों आपल्यापर्यंत सर्वत्रांची त्यास काळजी आहे. त्याची भक्ति करावी तेवढी थोडी होय, त्यानें दिलेल्या डोळ्यांनीं नीट पाहून सर्व प्राणिमात्रांचें व वस्तूंचें ज्ञान करून घेणें, हें आपलें कर्तव्य होय. तें सदोदित तुह्मी करीत असावें ह्मणजे सदोदित तुमचें कल्याणच होईल.

६६२

मुलांस थोडा उपदेश.

मुलांनो, एक वर्षापूर्वी कुंडींत लाविलेलें गुलाबाचें रोप आज जर पाहिलेंत, तर तुह्मांला केवढें दिसेल! तें मोठें झालें आहे, त्याला आज फुलें येऊं लागलीं आहेत, आणि जो तो त्या फुलांची तारीफ करतो आहे. आज त्याला कोणी रोप ह्मणणार नाहीं. त्याला झाड ह्मणतील.

मुलांनो, हीच स्थिति तुमची आहे. आज तुह्मी मुलें. आणखी पांच दहा वर्षांनीं तुह्मी मुलें नाहींत. तुह्मी तरुण होणार. तुमच्या अंगावर जबाबदारीचीं कामें पडणार. ज्यांच्यायोगानें तुमचें, तुमच्या कुटुंबाचें व तुमच्या देशाचें हित होईल अशा प्रकारचीं कामें तुमचे हातून व्हावीं असें ज्याला त्याला व तुह्मांला स्वतःलाही वाटणार. परंतु त्या वेळीं तीं कामें अंगावर येऊन पडलीं ह्मणजे तीं योग्य

व उत्तम प्रकारें करण्याला तुमच्या अंगीं सामर्थ्य पाहिजे. हें सामर्थ्य एकदम कांहीं येत नाहीं. तें सामर्थ्य लहानपणापासून हळूहळूच येत असतें; आणि तें अंगीं आणण्यासाठीं प्रयत्न करावे लागतात. ज्याप्रमाणें नुसतें एखादें रोप आणून जमिनींत रोवून दिलें ह्मणजे तें वाढत नाहीं, त्याची मशागत करावी लागते; त्याला वेळच्या वेळीं पाणी घालावें लागतें; त्याच्या वाढीला योग्य असें खत घालावें लागतें; त्याच्या भोंवतीं आळें घालावें लागतें; त्याचप्रमाणें तुमचें आहे. तुह्मीं मोठेपणीं चांगलें व्हावें, त्या वयांत तुमच्या हातून आपल्या कुटुंबाच्या व देशाच्या हिताचीं मोठमोठीं कामें उत्तम प्रकारें व्हावीं ह्मणून तुमची या वयांत फार काळजी केली पाहिजे. ही काळजी तुमचे आईबाप आपल्या परीनें व आह्मी शिक्षक आपल्या परीनें घेत असतों. तुमचें शरीर चांगलें सुदृढ व्हावें, तुमची विद्या चांगली व्हावी, आणि तुमचें मन सुशील व्हावें, ह्मणुन तुमचे आईबाप आणि आह्मी शिक्षक जितकी काळजी घ्यावयाची तेवढी घेतों. माळ्यानें रोपांची चांगली मशागत केली तर तीं हटकून चांगलीं होतातच. परंतु रोपांत आणि तुह्मां मुलांत थोडासा भेद आहे. रोपाची वाढ स्वतःवर अवलंबून नाहीं. माळ्यानें काळजीपूर्वक त्याची जोपासना केली कीं तें आपलें वाढावयाचेंच. तुमचें केवळ तसें नाहीं. आह्मी शिक्षक किंवा तुमचे आईबाप तुमची काळजी घेतों, तुह्मांला शिक्षण देतों, एवढ्यानेंच तुमची उत्तम वाढ होणार नाहीं. ती होण्याला, आह्मी जी तुमची काळजी घेतों तिचें चीज होण्याला, तुमची इच्छा आणि तुमचा स्वतःचा प्रयत्न हीं फार अवश्य आहेत. आह्मीं पुष्कळ काळजी घेतली, तुमच्या आईबापांनीं फार प्रयत्न केले, आणि तुह्मीं आपल्याकडून कांहीं प्रयत्न केले नाहींत, किंवा इच्छा धरली नाहींत, तर आमच्या प्रयत्नांनीं किंवा काळजीनें काय होणार आहे? कांहीं होणार नाहीं. ह्मणून तुमचा तुह्मीं प्रयत्न कसा केला पाहिजे, आणखी तसा प्रयत्न करणें किती जरूर आहे, हें आज मीं तुह्मांला सांगण्याचा विचार केला आहे तेव्हां मी जें काय सांगेन तें लक्ष्यपूर्वक ऐका, आणखी त्याप्रमाणें वागा.

आतांच मीं तुह्मांला सांगितलें कीं, तुह्मी मोठे झालां म्हणजे तुमच्या अंगावर आपल्या कुटुंबाच्या व देशाच्या हिताचीं कामें

करण्याची जबाबदारी येणार. ही जबाबदारी आपल्यावर पुढें येणार हें तुह्मीं नेहमीं लक्ष्यांत ठेवलें पाहिजे; आणि ती जबाबदारी आपल्या अंगावर आली ह्मणजे आपण आपलीं कामें उत्तम प्रकारें करून आपलें कर्तव्य करूं अशी उमेद तुह्मीं मनांत राखिली पाहिजे.

कोणतेंही काम करण्याचा उद्देश धरिला, ह्मणजे अर्थातच तें काम करण्याला लागणारीं सगळीं साधनें आपण शोधूं लागतों. समजा कीं, आपल्याला तें काम करण्यासाठीं मुंबइला जावयाचें आहे तर आपण आधीं स्टेशनावर जाऊं. स्टेशनाची वाट ठाऊक नसली, तर दुसऱ्या कोणाला तेवढ्यापुरतें विचारूं. स्टेशनावर तिकीट काढून गाडींत बसूं. मुंबईस ज्या गृहस्थाकडे जाऊन तें काम करावयाचें त्याचा पत्ता माहीत नसला तर तो मिळवूं-त्याच्याकडे जाऊं. काम करून घेऊं. सारांश, आपलें काम करून घेण्यासाठीं ज्या काय गोष्टी करावयास पाहिजेत त्या सर्व करून आपलें काम करूं. अमुक प्रयत्न ह्मणजे करण्याचा ठेवूं असें नाहीं. इतकें जर एखाद्या कामाकरितां आपण करूं, तर आपल्या सर्व आयुष्याचें जें काम तें करण्यास आपण किती झटलें पाहिजे? त्याच्याकरितां जीं काय साधनें मिळवावयाचीं, तीं किती काळजीनें आणि आयासांनीं मिळविलीं पाहिजेत! हीं साधनें कोणतीं हें आधीं तुह्मांला सांगतों.

कोणतेंही काम करावयाचें ह्मटलें ह्मणजे तें करणाराचे अंगीं बळ लागतें. हें बळ जर नसलें, तर कोणाच्याही हातून कांहींही होणार नाहीं. हें बळ तीन प्रकारचें आहे. १ शरीरबळ, २ बुद्धिबळ आणि ३ ज्ञानबळ. असें एक सुद्धां काम नाहीं कीं, जें या बळांपैकीं एका किंवा सर्व बळांच्यावांचून होऊं शकेल. कांहीं कामें मुख्यत: शरीरबळावर अवलंबून असतात, कांहीं बुद्धिबळावर आणि कांहीं ज्ञानबळावर; आणि सर्व कामें या तीन प्रकारच्या बळांनींच होतात. एकाच बळावर अवलंबून राहून कोणतेंच काम नीटपणें व्हावयाचें नाहीं. याकरितां तुह्मांला हें तीन प्रकारचें बळ संपादिलें पाहिजे. हें संपादन करतांना आमचें शिकवणें जितकें अवश्य, तितकीच तुमची इच्छाही अवश्य आहे. तुमच्या मनांत नाहीं, आणि आह्मी

पुष्कळ प्रकारांनीं तुमच्या कानाशीं किटकिट करीत बसलों, उपयोग काय होणार ? एखादा दगड उचलून इकडचा तिकडे ठेवणें किंवा एखादें रोप लावून त्याची मशागत करणें, आणि तुह्मांला शिक्षण देणें, यांत अंतर आहे. दगड उचलणाराच्या अंगीं सामर्थ्य असलें तर तो चट्कन् दगड उचलील. दगड कांहीं त्याला अडथळा करणार नाहीं. त्याचप्रमाणें इकडलें रोप तिकडे न्यावयाचें झालें तर माळी तेव्हांच नेईल. तें रोप कांहीं त्याला विघ्न करणार नाहीं. पण ज्यांना स्वतःची इच्छा आहे, ज्यांना हातपाय हालवून इकडचें तिकडे जाण्याची शक्ति आहे, त्यांच्या मनांत एखादें काम करूं नये किंवा एखाद्या ठिकाणीं जाऊं नये असें आलें, तर तीं आपल्या मनाप्रमाणें करण्याकरितां धडपड करतीलच. कधीं सोडणार नाहींत. एवढ्याकरितां तुह्मांला जें काय प्रथमतः शिकलें पाहिजे तें हें कीं, आपली इच्छा नेहमीं चांगलें काम करण्याकडे असावी. तुमचें वय अद्यापि फार लहान आहे, तेव्हां चांगलें काम कोणतें, आणि वाईट काम कोणतें हें तुह्मांला कोणाच्या साहाय्यावांचून समजणार नाहीं. तुह्मांला कोठें जावयाचें आहे, तिकडे जाण्यासाठीं तुह्मी वाट चालूं लागलां; होतां होतां तुह्मी अशा ठिकाणीं आलां कीं, तेथें पुढें दोन वाटा फुटतात. आतां कोणत्या वाटेनें जावयाचें, ही पंचाईत आली. अशा वेळीं कोणी तेथें भेटला ह्मणजे त्याची मदत मागून तुह्मी आपलें काम करून घेतां; तो वाट दाखविणारा तुह्मांला बरोबर वाट दाखवितो, परंतु तुह्मांला पाठुंगळीस मारून तर कांहीं पोंचवीत नाहीं. वाट चालून जावयाचें तें तुमचें तुह्मांलाच जावें लागतें. हा दाखला दिला हा ध्यानांत धरा. आह्मी शिक्षक काय, किंवा तुमचे आईबाप किंवा पालक काय, आमचें काम तुह्मांला चांगला मार्ग दाखवून द्यावयाचा व या आयुष्यांत पुढें जें काय तुमचें कर्तव्य तें तुह्मांला स्पष्टपणें दाखवून द्यावयाचें; मग तें कर्तव्य अर्थातच करणें तुमच्यावर अवलंबून आहे. वैद्याचें काम काय ? रोग्याला जो रोग झाला असेल, तो दूर करण्यास लागणारें औषध सांगून द्यावयाचें, तयार करून द्यावयाचें. तें औषध घेणें हें कोणाचें काम ? वैद्याचें नव्हे, रोग्याचेंच. रोग्यानेंच तें औषध घेतलें तर त्याचा रोग दूर

होईल, आणि त्याला निरोगीपणा येईल. निरोगीपणा अंगीं आणणें, आपला रोग दूर करणें हें रोग्याच्या स्वतःच्याच हातीं आहे.

हें जसें खरें आहे, तसेंच हेंही पण खरें आहे कीं, तुह्मी आपल्या पुढच्या आयुष्यांत चांगले होऊन सर्व कर्तव्यें करण्याला समर्थ व्हावें अशी तुमची इच्छा असली, तर तसें होणें हें तुमचे हातीं आहे. सध्यां फक्त तुह्मी आपल्या आईबापांचें व आपल्या शिक्षकांचें निमूटपणें ऐकत जा. त्यांची आज्ञा ऐकण्याचें तुमचें पहिलें काम. तें काम तुह्मांला चांगलें साधलें, ह्मणजे पुढें सर्व कांहीं साधले ह्मणून समजा. त्यांचें तुह्मीं ऐकलें, तर शरिरबळ, बुद्धिबळ आणि ज्ञानबळ हीं तीनही प्रकारचीं बळें तुमच्या स्वाधीन झालीं असें समजा. हीं तीनही बळें तुह्मांला असावीं ही तुमच्या आईबापांला व आह्मांला रात्रंदिवस काळजी. त्यांचे व आमचे तेवढ्याकरितां तर एकसारखे प्रयत्न चाललेले आहेत. त्या प्रयत्नांस यश आणून देणें हें सर्व तुमच्या हातीं आहे. तर मग आजपासून तुह्मी पहिला निश्चय हा करा कीं, आपल्या वडिलांचें व गुरूंचें जें काय सांगणें असेल, तें अगदीं निमूटपणें ऐकावयाचें. ते जें काय सांगतील, तें केवळ तुमच्या हितासाठींच सांगतील, हा अगदीं पक्का विश्वास मनांत धरून त्यांची आज्ञा पाळावयाची. असा तुह्मीं निश्चय केलात कीं, तुह्मांला वरील तीनही बळें अगदीं मिळालींच – तुमच्या अंगीं आलींच–म्हणून समजा. तुह्मीं असा हा निश्चय केलात असें समजून मी तुह्मांला थोडासा उपदेश करितों, तो नीट ऐका आणि त्याप्रमाणें वागा, ह्मणजे तुम्हांला कधीं कोणत्याही गोष्टींत अपयश येणार नाहीं.

मुलांनो, आतां मीं तुम्हांला सांगितलेंच कीं, सध्यांचे तुमचे दिवस हे शिकण्याचे दिवस आहेत. कोणतीही गोष्ट शिकल्याशिवाय येत नाहीं. अभ्यास केल्याशिवाय पक्की ठसत नाहीं. तुम्हांला शरीरबळ पाहिजे म्हणजे तुमचें शरीर बळकट व्हावें अशी तुमची इच्छा पाहिजे. तुह्मांला बुद्धिबळ पाहिजे. कोणती गोष्ट चांगली आणि कोणती वाईट हें आपले आपल्याला समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें कोणी कांहीं सांगितलें, तर तें लवकर

समजलें पाहिजे आणि तिसरें ज्ञानबळ पाहिजे, ह्मणजे कोणती गोष्ट कशी करावी, आणि सहज साध्य होण्याला उत्तम व सोपा मार्ग कोणता हें समजलें पाहिजे. तुमचें शरीर चांगलें सुदृढ व्हावें अशी तुमची इच्छा आहे. तुमच्या मनांत चांगले विचार आले पाहिजेत व त्या विचारांनाच धरून बसण्याचा निश्चय तुमचे मनांत बाणला पाहिजे; आणि तुह्मांला विद्याही आली पाहिजे. कोणतें वाटेल तें काम करण्याचें तुह्मीं मनांत आणलें, तरी विद्येवांचून कधींच तुमचें चालावयाचें नाहीं, तेव्हां ती विद्या-अर्थात् ज्ञानबळ तुह्मांला पाहिजे.

प्रथम शरीरबळ पाहिजे. शरीर निरोगी ठेवलें पाहिजे, शरीर निरोगी असलें, तर बाकी सगळें साधणार. नाहीं तर काय साधणार आहे ! शरीर सबळ, तर बुद्धि सबळ; शरीर निरोगी, तर मनही निरोगी. आणि दुसरें असें पहा. शरीरबळ नाहीं तर किती तरी कामें अडण्याचा संभव आहे ! अमुक एक काम करावेंसें वाटतें, तें काम फार मोठें महत्त्वाचें आहे, उत्तम आहे, देशहिताचें आहे; परंतु तें करण्यास शरीरबळ पाहिजे व तें बळ तर आपल्या अंगीं नाहीं, तर उपयोग काय ! एवढ्याकरितां सगळ्या साधनांत उत्तम साधन जें शरीरबळ, तें आपल्या स्वाधीन करून घेण्याला आधीं झटा. तुह्मी आपल्या रोजच्या कृत्यांत नियमितपणा ठेवण्याचा निश्चय केलात, तर तें तुह्मांला सहज लाभेल. एवढ्याकरितां तुह्मी नियमितपणें कांहींना कांहीं तरी व्यायाम करीत जा. हा व्यायाम शरीर निरोगी ठेवण्याला फार अवश्य आहे. तो तुह्मी वेळच्या वेळीं केलात, तर तुमचें शरीर निरोगी राहील. व्यायाम करणें ह्मणजे खेळ खेळणेंच होय. पण तुमचे हातपाय ज्या खेळांत पुष्कळसे उपयोगांत येतील अशा प्रकारचे धांवण्यापळण्याचे खेळ पाहिजेत. घरकोंबड्याप्रमाणें बसून खेळण्याचे खेळ तुह्मी खेळूं लागलां, तर त्यापासून तुमचें शरीरबळ वाढण्यास कांहीं सुद्धां उपयोग होणार नाहीं. हा व्यायाम करावयाचा, तो प्रथमच पुष्कळसा करूं नये. नेमस्त करावा. एकदमच उन्हातान्हांत जाऊन करूं नये. तुमच्याकरितां येथें शाळेंत व्यायामाच्या जागा केल्या आहेत व तुमचा व्यायाम चांगला

सशास्त्र व्हावा, त्यांत तुह्मांला मौज वाटावी ह्मणून तुह्मांस शिकविण्यासाठीं एक शिक्षकही आहे; त्याचप्रमाणें तो व्यायाम नीटपणें होण्यास लागणारी सर्व सामग्रीही तयार आहे. सकाळीं तास अर्धा तास आणि संध्याकाळीं तास अर्धा तास तुह्मी येथें येऊन अगर आपल्या घरीं कांहीं तरी व्यायाम करींत जा. घरीं तुह्मांला हीं सर्व साधनें नसतील, पण स्नान झाल्यानंतर सुमारें पंधरा वीस मिनिटांत नमस्काराचीं दोन तीन आवर्तनें घालण्यास तर हरकत नाहीं ? संध्याकाळीं येथें तुमच्या आट्यापाट्या, तुमचा खोखो, तुमचा क्रिकेट हेही सर्व खेळ खेळण्यास येथें तुह्मांला सोयी करून ठेविल्याच आहेत. परंतु या सोयींचा उपयोग करून घेण्याची इच्छा तुमची तुह्मांलाच पाहिजे. आह्मा शिक्षकांच्या किंवा आईबापांच्या साहाय्यापेक्षां तुमचें तुह्मांलाच साहाय्य फार पाहिजे. शिक्षक किंवा आईबाप तुह्मांला मार्ग दाखविणारे. त्यांनीं दाखविल्या मार्गानें निमूटपणें जाणें हें काम तुमचें. वैद्याचें काम औषध देण्याचें. तें घेण्याचें काम कोणाचें ? रोग्याचें. मुलांनो, शरीरबळाचा संचय करणें आपलें शरीर निरोगी व बळकट ठेवणें हें तुमच्या मुख्य कर्तव्यापैकीं एक आहे. तें तुह्मी करण्यांत चुकलांत तर तुह्मांला स्वतःला जन्मभर दुःख होईल. आणि तुह्मी दुःखी ह्मणून तुमच्या मातापितरांनाही दुःख होईल. जो गुण बाळा तोच जन्मकाळा. एकदां लहानपणीं जर का तुमची शरीरप्रकृति बिघडली. या दिवसांत जर का तुमचे अंगीं रोग जडला, तर तो तुमच्या अंगीं कायमचा जडला ह्मणून समजा. या गोष्टीचा पक्केपणें विचार करा. ह्मणजे तुमचें तुह्मांलाच असें कळून येईल कीं, आपण शरीर बळकट राखण्याकरितां जपलें पाहिजे. तर आतांपासून नियमितपणा शिका. नेमस्तपणा शिका ह्मणजे तुमचीं शरीरें बळकट राहतील. शरीरबळ चांगलें ठेवण्याबद्दलचा उपदेश आधीं केला याचें कारण तें दुसऱ्या दोनही बळांच्या लाभाला कारण व साधन आहे. ज्याला शरीरबळ धड नाहीं त्याला कांहींही साधावयाचें ह्मणजे फार कठिण.

हें शरीरबळ संपादा ह्मणून सांगितलें ह्मणून तेवढें संपादणें एवढेंच तुमचें कर्तव्य असें समजूं नका. शरीरबळ हें एक बाकी अनेक

गोष्टींचा लाभ करून घेण्याला साधन आहे ह्मणून तें संपादावयाचें. ज्ञानबळ संपादावयाचें तरी त्याला शरीरबळ पाहिजे. ज्याला शरीरबळ नाहीं, तो ज्ञानबळ संपादण्याला समर्थ कसा होणार ? ज्ञानबळ हें एकदम येत नाहीं. आह्मी व तुमचे आईबाप तुह्मांला क्रमाक्रमानें तें देण्यासाठीं झटत असतात. शाळेंत निरनिराळ्या इयत्तांतून तुह्मांला पुस्तकांच्या द्वारानें व तोंडानें बोलून शिक्षक लोक तुह्मांला ज्ञान देतात, परंतु तें आपल्या मनांत कायम करण्याकरितां तुमचे तुह्मांलाच फार श्रम केले पाहिजेत. कोणत्याही गोष्टींत काय मार्ग दाखवून देणें एवढेंच खरोखर आह्मां शिक्षकांचें व तुमच्या आईबापांचें काम. परंतु असे मार्ग दाखविण्याचें काम आह्मीं जन्मभर थोडेंच करणार आहों ! केव्हांना केव्हां तरी तुह्मांला स्वतःच्या प्रयत्नावर अवलंबून राहिलें पाहिजे. दुसऱ्यावर अवलंबून राहतां उपयोगी नाहीं. पहा ! तुह्मीं अगदीं लहान होतां, तेव्हां तुह्मांला चालावयाला येत नव्हतें. तेव्हां तुमची आई तुमचें बोट धरून किंवा आपलीं बोटें तुह्मांला धरावयाला देऊन चालावयाला शिकवीत असे. त्या वेळीं तें शोभलें. ती वेळ तुह्मांला तिनें मार्ग दाखविण्याचीच होती. परंतु मोठेपणीं जर कोणीं चालतांना दुसऱ्याचें बोट धरून चालण्याची संवय ठेवील, तर त्याला तुह्मीं किती हंसाल ! कां ? तर भलत्याच वेळीं तो दुसऱ्यावर अवलंबून राहतो ह्मणून. हें जसें चालण्याच्या कामांत खरें आहे. तसेंच ज्ञानसंपादन करण्याच्या कामांतही हें खरें आहे, समजा कीं, तुह्मांला भूगोलाचा व गणिताचा असे दोन धडे करावयाचे आहेत. भूगोलाचा धडा तयार करणें नकाशाच्या सहाय्यानें सोपें जातें. नकाशा कसा पहावा हें एकदां दोनदां तुमच्या शिक्षकांनीं तुह्मांला शिकाविलें आहे. तर आतां पुनः तुह्मांला पाहिजे तीं ठिकाणें शिक्षकांनीं नकाशावर दाखविण्यासाठीं वाट पहात बसूं नये. आपण स्वतः नकाशा धुंडावा, निरनिराळीं ठिकाणें कोठें कोठें आहेत तीं पहावीं. नच सांपडल्यास शिक्षकाची मदत घ्यावी. तसें न करितां शिक्षकांनीं दाखविण्याची वाट पहात बसलां, तर तुमचें दुप्पट नुकसान होतें. एक तर वेळ फुकट जातो. आणि दुसरें स्वतः प्रयत्न

करण्याची मुळींच संवय लागत नाहीं. तीच स्थिति गणिताची. शिक्षकांनीं तुह्मांला एका प्रकाराचें उदाहरण समजावून दिलें कीं, तसल्या प्रकारचीं उदाहरणें आपण आपल्या स्वतःच्या प्रयत्नानें जितकीं करतां येतील, तितकीं केलींत, तरच चांगला अभ्यास होऊन कित्येक वेळां नवीन प्रकारचीं उदाहरणें सोडविण्यांतही तुमची मति आपोआप चालूं लागेल. एवढ्याकरितां स्वतःचा प्रयत्न करण्याचा धडा पहिल्यानें तुह्मी शिका. आपलीं कामें दुसऱ्यावर टाकूं नका. जोंपर्यंत तुमचें तुह्मांला कांहीं करतां येत नाहीं, तोंपर्यंत शिक्षक व वडील मंडळी तुमचीं कामें करावयाला तयार आहेतच. पण तुमचें तुह्मांला कांहीं करण्याला येऊं लागल्यावरही तुह्मी दुसऱ्याच्या सहाय्यासाठीं खुंटून बसाल, तर तुमचें तुह्मीच नुकसान करून घ्याल, दुसरें तिसरें कांहीं नाहीं. दुसऱ्यावर अवलंबून राहण्याच्या तुमच्या खोडीचीं एक दोन उदाहरणें तुह्मांला देतों. तुह्मी शाळेंतून घरीं गेलांत ह्मणजे एकीकडे आंगरखा, एकीकडे टोपी, एकीकडे पुस्तकें अशीं फेंकून देतां. नंतर दुसऱ्या जेवणाखाणाच्या कामाला लागतां. तुमचें भांडें तुम्हांला घेण्याची संवय नाहीं. तें तुम्हांला कोणी तरी आणूनच दिलें पाहिजे. तुमचें पाणी तुह्मांला घेतां येत नाहीं. तें तुमच्या भांड्यांत कोणी तरी आणून ओतलें पाहिजे. तुमचे कपडे तुम्हांला दुसऱ्याच्या सहाय्यावांचून सांपडत नाहींत. ते तुम्हांला दुसऱ्याच्या मदतीनेंच शोधले पाहिजे. त. असें कां? तर तुम्हांला व्यवस्थितपणा नाहीं. आणि स्वतःचा प्रयत्न करण्याची संवय किंवा इच्छा नाहीं. दुसरें उदाहरण घ्या. तुम्हांला कांहीं धडा वाचून येण्यास व त्यांतील शब्दांचा अर्थ कोशांतून काढून येण्यास सांगितलें आहे. तुम्हांला स्वतः प्रयत्न करून आपलें काम करण्याचा कंटाळा; तेव्हां दुसऱ्या कोणीं व्यवस्थित मुलानें प्रयत्न करून शब्दांचे अर्थ लिहून ठेविलेले असले, तर तुह्मी त्याच्याकडे जाऊन त्याची वही घेऊन भराभर कांहीं तरी उतरून घेतां; अर्थातच तुह्मांला स्वतः प्रयत्न करण्याचा कंटाळा येतो. आणि दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची वाईट चटक लागते! यांत किती नुकसान आहे हें आज तुह्मांला

समजत नाहीं. पण पुढें तें तुह्मांला अतिशय नडेल. तुह्मी दुसऱ्या मुलाची वही घेऊन शब्द उतरून आणतां त्यांत किती चुका व अपराध करतां तें पहां. एक तर शिक्षकांची आज्ञा मोडतां. कारण त्यांनीं तुमचे शब्द तुह्मीच काढून त्याचे अर्थ लिहून आणा ह्मणून सांगितलेलें असतें. दुसऱ्याच्या मेहनतीचा आपण उपयोग करून घेऊन या असें सांगितलेलें नसतें. दुसरें आपल्या शिक्षकांना फसवितां. कारण तुमची वही पाहिली ह्मणजे त्यांची समजूत सहजच अशी होते कीं, ही वही तुह्मीच मेहनत करून शब्द काढून लिहून काढली. आणि तुमची इच्छाही पण अशीच कीं, शिक्षकांची तशीच समजूत व्हावी, अर्थात् शिक्षक फसावे या हेतूनें तुह्मीं हें केलेलें असतें. तिसरी गोष्ट ही कीं, तुह्मांला दुसऱ्यावर अवलंबून रहाण्याची वाईट संवय लागते. आज दुसऱ्यानें मेहनत करून काढलेले शब्दांचे अर्थ उतरून घेतले आणि त्यावर मार्क मिळविले. उद्यां शिक्षकांनीं कांहीं उदाहरणें करावयला दिलीं तींहीं दुसऱ्याच्या वहीवरून उतरून घेतलीं. परवां परीक्षेचे वेळीं आपल्या अभ्यासी स्नेह्याच्या उत्तरांचे कागद घेऊन तीं उत्तरें लिहून दिलीं. असा एकदां तुह्मीं सपाटा चालविला म्हणजे लबाड्या करण्याचा तुमचा धंदाच झाला. मग तुह्मांला स्वतःला कांहींच करतां येणार नाहीं. कोणाची ना कोणाची तरी नेहमीं तुह्मांला मदत पाहिजे. हें किती वाईट आहे, याची तुम्हीच कल्पना करा. जें काय आपलें कर्तव्य म्हणून आपल्याला करावयाचें, तें तुह्मी स्वतः आपल्या श्रमांनीं करण्याची संवय आजपासून ठेविली तरच तुह्मांला पुढें स्वावलंबन ह्मणजे स्वतःचीं कामें स्वतः करण्याची उत्कृष्ट संवय लागेल. ती संवय लावून घेण्याची तुमची इच्छा असल्यास तुह्मांला आतांच जपलें पाहिजे. आजचा हा बाळपणचा वेळ गेला, ह्मणजे मग पुढें नवीन संवय जडवून घेणें केवळ अशक्य होणार आहे हें पक्कें ध्यानांत ठेवा. एवढ्याकरितां आजच्या तुमच्या वयांत प्रत्येक कामांत तुह्मी स्वतःच्या प्रयत्नांवर भिस्त ठेवा, ह्मणजे पुढें तुमचं कल्याण होईल.

इतका वेळ मी तुह्मांला शरीरबळ आणि ज्ञानबळ हीं किती अवश्यक आहेत आणि तीं मिळविण्यांत स्वावलंबन कसें राखावें हें

सांगितलें. परंतु मुलांनो, स्वावलंबन ह्मणजे दुसऱ्या कोणाचें कांहीं न ऐकतां आपल्या मनास येईल तसें वागणें हें मात्र नव्हे. अजून तुह्मी लहान आहां. कोणती गोष्ट चांगली आणि कोणती गोष्ट वाईट, हें तुम्हांला समजत नाहीं, एवढ्याकरितां तुह्मीं तुमच्या गुरूंवर आणि वडिलांवर पूर्ण श्रद्धा ठेवून व पूर्ण विश्वास ठेवूनच काय करणें तें केलें पाहिजे. जसें आईबाप किंवा शिक्षक सांगतील तसें निमूटपणें करण्याची प्रथम तुह्मांला संवय लागली, म्हणजे पुढें कोणती गोष्ट करणें चांगलें, आणि कोणती करणें चांगलें नाहीं, हें तुम्हांला सहज समजूं लागेल. ज्याप्रमाणें शरीराला हितकर कोणतें हें समजून घेण्याला तुम्हांला आमची मदत अतिशय अवश्य आहे, ज्याप्रमाणें कोणती विद्या शिकावी आणि कशी शिकावी हें प्रथम आम्हींच तुम्हांला सांगितलें पाहिजे, त्याचप्रमाणें कोणतें करणें चांगलें, आणि कोणतें वाईट हेंही तुह्मांला प्रथम प्रथम आह्मींच समजावून दिलें पाहिजे, आणि तुह्मीं तें जाणून घेतलें पाहिजे. म्हणजे पुढें तुमचें तुम्हांला तें आपोआप समजूं लागतें. पहा, लहान मूल असलें, म्हणजे त्याची आई प्रथम त्याला बोट धरून चालावयाला शिकविते. तो आपल्या पायावर उभा राहील, पडणार नाहीं असें तिला वाटूं लागलें, ह्मणजे आपलें बोट सोडून देऊन त्यास उभें रहावयास लाविते, आणि त्याला धीर देते. तसेंच हें आहे. जितक्यापुरती तुह्मांला मदत जरूर तितक्यापुरती आह्मी तुह्मांला देणार. आणि पुढें कांहीं गोष्टींत तुमचें तुम्हांलाच काय तें करूं देणार. पण तुह्मी काय करतां यावर आमचा डोळा असणारच. एकंदरींत आमची मोठी इच्छा काय, कीं तुह्मीं मुलांनीं होतां होईल तों स्वावलंबन राखावें, आमचें व आपल्या आइबापांचें मनोभावानें ऐकावें आणि अशा आमच्या व त्यांच्या साहाय्यानें शरीरबळ, ज्ञानबळ आणि बुद्धिबळ हीं संपादन करावीं. हीं तीनही यथास्थितपणें असल्या-खेरीज कोणीही आपलें, आपल्या कुळाचें व आपल्या देशाचें हित करूं शकत नाहीं. मुलांनो, तुमच्यावर आपल्या देशाची सगळी भिस्त. तुह्मी त्याचा उद्धार करणार. आज तुह्मी लहान आहां, परंतु आणखी दहा पांच वर्षांनीं तुह्मी मोठे होणार, तुम्हीं मोठमोठालीं कामें कर-

णार. तुम्ही मोठे कामगार होणार, मोठे डॉक्टर होणार, वकील होणार, मुत्सद्दी होणार, अधिकारी होणार, परंतु या सगळ्या अधिकारांच्या मुळाशीं तुमच्या आजच्या संवयी आहेत. आज जर तुम्हीं सतत उद्योग करण्याची, स्वतःवर अवलंबून रहाण्याची, आपल्याहून वरिष्ठ असतील त्यांचा मान राखून आज्ञा पाळण्याची संवय लावून घेतलीत तर ती संवय तुमच्या अंगीं जडून तुम्हांला नेहमीं कामीं पडणार. जर आतां ती संवय जडली नाहीं, तर पुढें ती तुह्मी आपल्याला लावूं गेल्यास बहुतकरून लागावयाची नाहीं. लागली तरी ती लावून घेण्यास फार फार कष्ट पडतील.

मुलांनो, आज कांहीं संवयी अंगीं जडवून घेणें फार सोपें आहे. कारण आज तुह्मांला जी संवय लागेल ती नवीनच संवय होणार आहे आणि अशा संवयी एकदां पक्क्या झाल्या ह्मणजे मग चांगलीं कामें करणें हाच तुमचा स्वभाव होय असें सहजच होऊन जाईल. ह्मणून ह्मणतों कीं, कांहीं गोष्टींत संवयी करून घेणें अगदीं जरूर आहे, आणि तुह्मी आतांपासून त्यासंवयी करून घेण्याला झटा. त्या संवयी कोणकोणत्या बाबतींत पाहिजेत, तें थोडक्यांत सांगतों.

१. आज्ञाधारकपणाविषयीं मघाशीं सांगितलेंच. तुमचे अंगीं आज्ञाधारकपणा असला कीं वडिलांविषयीं आदर असलाच पाहिजे हें उघड आहे. आईबाप व गुरु यांचा मोठा हेतु काय, कीं तुह्मीं चांगलें व्हावें. त्या हेतूमुळें ते तुमची काळजी वाहतात. तेव्हां ते जें सांगतील तें पूर्णपणें तुमच्या हितार्थेंच असणार हा दृढ विश्वास धरून तुह्मी त्यांची आज्ञा निमूटपणें ऐकत जा.

२. नियमितपणा—हा गुण तर तुह्मीं अवश्य अवश्य शिकला पाहिजे. मुलांनो, दिवसाचे तास चोवीस. सर्वांची वांटणी करून त्या त्या तासांत तीं तीं कामें करावीं. प्रत्येक कामाची वेळ नेमून टाकून होतां होईल तों त्या वेळीं तें काम करावेंच करावें. उगीच आळस करून वेळ व्यर्थ घालवूं नये. आणि मग भलत्याच वेळीं भलतेंच करीत बसण्याचा प्रसंग आपल्या अंगावर आणूं नये. कोणत्या वयांत किती झोंप घ्यावी, किती अभ्यास करावा, हें अर्थातच आपल्या शिक्षकास विचारून घेऊन आपल्या वेळाची वांटणी करावी.

आणि एकदां अमुक वेळीं अमुक काम करावयाचें असा नियम बांधला ह्मणजे होतां होईतों त्यांत बदल ह्मणून करूं नये किंवा टंगळमंगळ करूं नये. सकाळीं उठल्याबरोबर तोंड धुणें, स्नान वगैरे करून कांहीं नियमित काळ परमेश्वरभक्तींत घालवावा; कारण ती आपल्या सगळ्या कृत्यांना आधार आहे. आपणास सद्बुद्धि देणारा, आपले हेतु सिद्धीस नेणारा, आपले निश्चय चालविणारा तोच आहे. तेव्हां त्याची भक्ति करण्यांत दिवसाच्या प्रारंभींचा वेळ अवश्य घालवावा, नंतर आपल्या इतर कार्यांस लागणाऱ्या वेळाची वांटणी करावी.

३. नेमस्तपणा असावा. काम करावयाचें ह्मणजे खूप कामच काम, खेळावयाचें तेव्हां खेळच खेळ, झोंप घ्यावयाची म्हणजे झोंपच झोंप, असा प्रकार बिलकुल होऊं देऊं नये. नेमस्तपणा ठेवावा. अंगीं नियमितपणा बाणला, कीं नेमस्तपणा आपोआपच येतो. अधाशीपणा जसा खाण्याच्या कामांत वाईट, तसा तो प्रत्येक बाबतींत वाईटच. अभ्यासाच्या कामांत किंवा खेळण्याच्या कामांत अधाशीपणा केला, ह्मणजे हित होत नाहीं, उलट नुकसान होतें. करितां अधाशीपणा केव्हांही करूं नका.

या तीन गोष्टी ध्यानांत धरून तुह्मीं आपलें वर्तन ठेविलेंत ह्मणजे शरीरबळ, बुद्धिबळ, ज्ञानबळ हीं तीनही बळें तुह्मांला प्राप्त होऊन तुह्मी मोठ्या योग्यतेस चढाल, मोठे कर्ते पुरुष व्हाल, आपलें, आपल्या कुटुंबाचें व देशाचें हित साधाल.

मुलांस थोडा उपदेश.

मुलांनो, तुह्मी अक्षर लिहावयास बसलां ह्मणजे आपल्यापुढें काय ठेवितां हें तुमच्या लक्ष्यांत आहे काय ? तुह्मी आपल्यापुढें कित्ता ठेवितां, कित्ता म्हणजे ज्या कोणाचें अक्षर सुंदर, सुवाच्य, वळणदार असें असेल, त्याजकडून लिहविलेला कागद होय. हा कागद तुह्मी आपल्यापुढें ठेवतां याचें कारण, तुम्ही लिहितांना त्यांतला सुंदरपणा व वळणदारपणा लक्ष्यांत आणून तो आपल्या अक्षरांत उतरावा. कोणचीही गोष्ट जन्मतःच कोणाला उत्कृष्टपणें करतां येत नाहीं. दुसऱ्या कोणापासून ती शिकावी लागते, आणि ती एकदां, दोनदां, चारदां शिकून तिचा आपण अभ्यास केला, म्हणजे ती आपणास येते, एकदम येत नाहीं. तुम्ही लहान असतांना तुह्मांला चालतां येत नसे त्या वेळीं तुमची आई तुमचा हात धरून तुम्हांस उभें करी आणि चार पावलें टाकण्यास शिकवी. तशीं पावलें टाकतां टाकतां तुह्मांला चालतां येऊं लागलें. जी गोष्ट चालण्याची तीच बोलण्याची. जसें चालणें तसेंच बोलणेंही कोणास उपजत येत नाहीं. तेंही घरांतील मोठ्या माणसांपासूनच मुलें शिकतात. चालतां बोलतां येऊं लागलें म्हणजे थोडेच दिवसांत विद्या शिकण्याचीही सुरुवात होते. ती आपल्या शिक्षकांपासून आपण शिकूं लागतों. विद्या शिकणें ह्मणजे काय ? तर जें ज्याला उत्तम येत असेल, तें त्याच्यापासून आपण शिकणें होय. ती ती विद्या जाणणारा हा आपला त्या त्या विद्येपुरता कित्ता होय. हा कित्ता आपण नीटपणें गिरविला म्हणजे आपल्यास ती ती विद्या प्राप्त होते. आपण जो कित्ता पुढें ठेवूं, जो कित्ता मनापासून गिरवूं, त्या कित्त्याप्रमाणें आपलें अक्षर होतें हें उघडच आहे. म्हणून आपले शिक्षक व आपली वडील मंडळी आपल्यास उत्तम असाच कित्ता देतात. त्यांच्या मनाला असें वाटतें कीं, आपलें अक्षर उत्तम व्हावें. कित्ता उत्तम असला म्हणजे अक्षर उत्तम होण्यास एक मोठें उत्तम साधन

झालें. तोच तुम्हीं मनापासून वळविलात म्हणजे बऱ्याच अंशांनीं तुमचें अक्षर सुंदर व वळणदार होईल यांत शंका नाहीं.

मुलांनो, जशी अक्षराच्या संबंधांत व इतर विद्या शिकण्याच्या कामांत चांगला कित्ता असण्याची जरूरी आहे, तशीच ती दुसऱ्या अनेक संबंधांतही आहे. जें कांहीं आपणांस करावयाचें असेल तें उत्तम व निर्दोष व्हावें असें जर मनांत आहे, तर आपल्यापुढें उत्तम कित्ता धरला पाहिजे. आणि तसा कित्ता असला म्हणजे तो मनापासून वळविला पाहिजे; तरच आपण कांहीं तरी चांगले होऊं.

आपण जन्मल्यापासून कांहीं वर्षें गेलीं नाहींत तोंच आपल्यामागें आपलीं कर्तव्यें म्हणून कांहीं लागतात, आणि तीं कर्तव्यें आपण उत्तम प्रकारें केलीं पाहिजेत असें आपले आईबाप, आपले गुरु व आपली इतर वडील मंडळी आपल्या मनावर ठसवूं लागतात. हीं कर्तव्यें कोणकोणतीं आणि तीं आपण कां केलीं पाहिजेत, याचा आज आपण विचार करूं.

लहानपणीं आपलें मुख्य कर्तव्य आपल्या आईबापांच्या संबंधाचें होय. ज्यांनीं आपल्याला जन्म दिला व आपलें फार प्रेमानें पालनपोषण केलें, त्यांच्या आज्ञेंत वागणें हें आपलें पहिलें कर्तव्य. तें कर्तव्य करण्यांत कधींही टंगळमंगळ करतां कामा नये. परंतु मुलांनो, तुम्हीं घटकाभर आपल्या रोजच्या वागणुकीकडे लक्ष्य द्या बरें ? तुमच्या आईनें किंवा बापानें तुम्हांला किती तरी गोष्टी करावयास सांगितल्या, आणि तुम्हीं त्यांपैकीं किती गोष्टी बिनतक्रार, मुकाट्यानें केल्या हें एकदां आठवा पाहूं. फार नको. एक दिवसाचीच हजिरी घ्या. सकाळीं सहा वाजतां उठल्यापासून रात्रीं झोंपीं जाईपर्यंत किती गोष्टी त्यांनीं आपल्यास सांगितल्या आणि त्यांपैकीं किती आपण बिनबोभाट केल्या, याची जर मोजणी केली तर तुमचें तुम्हांलाच दिसून येईल कीं, निम्मेपेक्षां अधिक गोष्टींत वडील मंडळींच्या सांगण्याप्रमाणें करूं नये असेंच वाटून तुम्ही ‘ करीत नाहीं ’ म्हणून हट्ट धरून बसलां. माराच्या धाकानें त्याही कदाचित् तुम्हीं अखेरीस केल्या असतील, पण एकदम आनंदानें कांहीं तुम्हीं त्या केल्या नसतील हें खचित. असें कां ? वडिलांनीं ज्या गोष्टी तुम्हांला करण्यास सांगि-

बोलत जा, खोटें बोलत जाऊं नको, याही गोष्टी कधीं सांगण्याची जरूरी रहाणार नाहीं. कारण ज्यानें आईबापांच्या आज्ञेचें उल्लंघन केलें नाहीं, त्यास सत्याचें उल्लंघन करणें शक्यच नाहीं. लहानपणीं आपल्यास आपली वडील मंडळी ज्या कांहीं आज्ञा करितात त्यांत " सत्य सोडूं नकोस, " " खोटें बोलूं नकोस " ही आज्ञा अगदीं पहिली असावयाची. ती पहिली आज्ञा कधीं कोणी मोडील काय? तेव्हां आपल्या वडील मंडळींची आज्ञा पाळावयाची, हें तुमचें पहिलें कर्तव्य. हें पहिलें कर्तव्य ज्या प्रकारें बजावाल, त्या प्रकारेंच तुमचें भावी आयुष्य जाणार. कारण पुढच्या आयुष्यांत आज्ञा करण्यापेक्षां आज्ञा पाळण्याचेच प्रसंग तुमच्यावर फार येणार. लहानपणीं जर तुह्मी आज्ञापालन शिकलांत, तर मोठेपणीं तुह्मांस तें मुळींच जड जाणार नाहीं. सेनाधिपति थोडे, शिपाई फार. मालक थोडे, नोकर फार. शिपाई होण्याचाच प्रसंग बहुतेकांवर येणार. सेनाधिपति होणारा एखादा. चारचौघांचें पालनपोषण करणारा क्वचित्. आपलें व आपल्या कुटुंबाचें पालनपोषण करणारेच बहुतेक. तेव्हां बहुतेकांस शिपाईच व्हावें लागतें. अर्थात् सेनाधिपतिपणा फार थोड्यांस मिळावयाचा. दुसऱ्याच्या हाताखालीं कामें करण्याचाच प्रसंग फार जणांना पडणार आणि सेनाधिपति जरी झाला, तरी काय त्याला कोणाचीना कोणाची तरी–राजांची–आज्ञा पाळावीच लागते. राजा झाला, तरी या दिवसांत त्याला लोकांचें मत धुडकावून देतां येत नाहीं, आपलाच हेका धरून बसतां येत नाहीं, स्वतःची मर्जी बाजूला ठेवून लोकमताप्रमाणें करावें लागतें. अर्थातच आज्ञाधारकपणा या गुणाची जरूरी ज्याला त्याला असणार. ह्मणून हा गुण पहिल्याप्रथम शिकला पाहिजे असें तुह्मांस सांगितलें.

आतां मीं तुह्मांला सांगितलेंच कीं, आज्ञाधारकपणा हा गुण अंगीं आला, ह्मणजे दुसरे पुष्कळ गुण आपोआप संपादले जातात. आत्मसंयमन हा गुण त्यांतलाच आहे. दुसऱ्याची आज्ञा पाळणें हें नेहमींच मनाला बरें वाटत नाहीं. कित्येक वेळां आपल्याला बरें वाटत नाहीं असें करण्याची पाळी येते. अर्थातच **आत्मसंयमन** करावें लागतें. आपले वडील किंवा वरिष्ठ आपल्याला अमुक गोष्ट करण्या-

ला कां सांगतात हें समजत नाहीं. आपलें मन उलट बाजूकडे ओढत असतें अशा वेळीं आपलें मन बाजूला ठेवून वडिलांचें ऐकावें, त्यांनीं आपणास अमुक गोष्ट करण्यास कां सांगितलें तें कांहीं वेळानें समजतें आणि मग आपण त्यांची आज्ञा पाळल्याबद्दल समाधान होतें. तेव्हां आत्मसंयमनाचा गुण सहजगत्या आपल्यास जडतो. हा गुण फार महत्त्वाचा आहे. आपल्यास आपल्या वडिलांसंबंधीं जीं कर्तव्यें करावीं लागतात, त्यांत आज्ञाधारकपणा हा गुण मुख्य ह्मणून त्याचा विचार झाला.

आपल्या वडील मंडळींची भक्ति व सेवा करणें हें आपलें दुसरें कर्तव्य होय. त्यांनीं सांगितलेली गोष्ट अगदीं निमूटपणें ऐकल्यानें त्यांना जो आनंद होतो, तो आनंद त्यांची आपण भक्तिपुरःसर सेवा केल्यानें दुणावतो. मातृभक्ति आणि पितृभक्ति—एकंदरींत वडील माणसांविषयींची भक्ति—हा गुण फारच महत्त्वाचा आहे. जेथें ही भक्ति अतिशय असेल, तेथें आज्ञाधारकपणा आपोआपच येतो. श्रीरामचंद्राचे अंगीं हा गुण असल्यामुळें, त्यानें राज्याचीही पर्वा न करतां वनवास पत्करिला. दशरथ राजाची आज्ञा झाली कीं, " वनवासास जावें. " वास्तविक पहातां राज्य सोडून वनांत जाणें कोणास तरी आवडेल काय ! परंतु आपल्या आईची इच्छा आणि बापाची आज्ञा, हीं दोन्हीही मोडण्याचें स्वप्नांतसुद्धां न आणतां श्रीरामचंद्रानें वनवास पतकरिला. दशरथाचे ठिकाणीं त्याची भक्तिच तशी होती. श्रावणानें आपल्या अंध मातापितरांस वर्षानुवर्षें खांद्यावर वागविलें. भीष्मानें पित्याच्या इच्छेस्तव आजन्म अविवाहित राहण्याचें व्रत स्वीकारलें. हीं व आणखी किती तरी उदाहरणें आपल्या पुराणांतून व इतिहासांतून आपल्यास सांपडतील. जेथें भक्ति आहे तेथें बाकी सर्व कांहीं आहेच. वडील जनांची सेवा हें लहानांचें फार मोठ्या कर्तव्यांपैकींच एक होय. ही सेवा आपण केली, तर त्यांत मोठें शतकृत्य झालें, असें कोणीच समजावयास नको. कारण एका तऱ्हेनें पाहिलें, तर असें दिसून येईल कीं, आपण वडिलांची सेवा करणें ह्मणजे त्यांचें कर्ज फेडणें होय. आपणांस जन्म देऊन त्यांनीं आपल्या पालनपोषणाचीही नेहमीं अनोनात

काळजी घेतली, तर आपण त्यांची सेवा करणेंही आपल्या हातून होऊं नये कीं काय ! परंतु जेथें मातापित्यांचा संबंध आहे तेथें कर्ज आणि त्याची फेड वगैरे विचार येणें म्हणजेच वेडेपणा होय. त्यांची भक्ति व सेवा करणें हें केवळ कर्तव्य म्हणूनच आपण मानलें पाहिजे.

ज्याप्रमाणें मातापितरांचें त्याचप्रमाणें आपल्या घरांतील इतर वडील मंडळींचेंही आहे. त्यांच्यासंबंधानें लहान मुलांनीं फार पूज्य-बुद्धि बाळगून त्यांची सेवा केली पाहिजे; त्यांची भक्ति केली पाहिजे. आपल्या कुटुंबांत जी मंडळी आपल्याहून लहान असतील, त्यांना आपण मदत करणें व त्यांच्या ठिकाणीं प्रेम ठेवून त्यांच्याशीं वागणें हें तुमचें कर्तव्य आहे. आपल्या लहान बहिणींस किंवा भावांस रडवूं नये, चिडवूं नये, त्यांच्याशीं भांडूं नये. या गोष्टी तुम्हांला घरांतली मंडळी कितीदां तरी सांगतात. परंतु तुम्हांला पुष्कळदां आपल्या लहान भावंडांना रडविण्यांतच मौज वाटते. नको नको म्हणून वारलें, तरी तुम्ही त्यांच्या हातची खेळण्याची अगर खाण्याची जिन्नस काढून घेऊन त्यांना रडवितां व ओरडवितां. त्या करण्यापासून सर्वांना त्रास,—त्या मुलाला त्रास, तुमच्या वडील मंडळीला त्रास, सुख कोणालाच नाहीं. सुख म्हटलेंच तर क्षणभर तुम्ही हंसाल तेवढें तुम्हांलाच. परंतु दुसऱ्यास त्रास देण्याचें हें सुख जितकें कमी भोगलें तेवढेंच बरें नव्हे काय ! असली वेडगळ गंमत किंवा मौज बिलकुल उपयोगी नाहीं.

आईबापांच्यासंबंधाचीं जशीं हीं कर्तव्यें तुम्हांला सांगितलीं तशींच व तितकींच तुमच्या गुरूच्यासंबंधानेंही तुमचीं कर्तव्यें आहेत. ज्याप्रमाणें तुम्हांस जन्मापासून अन्नदानादि देऊन तुमचीं मातापितरें तुमचें पालनपोषण करितात, तुम्हांस बोलावयाला, चालावयाला शिकवितात, त्याचप्रमाणें पुढें तुम्ही विद्या शिकण्याला योग्य झालां म्हणजे तुम्हांला आईबाप तुमच्या गुरूच्या स्वाधीन करितात, ते गुरु तुमच्या मनाचें पोषण करितात. तुम्हांला विद्यारूप अमृत पाजितात. तुमच्या शरीरास कोणत्याही प्रकारचे रोग होऊं नयेत म्हणून तुमचीं मातापितरें ज्याप्रमाणें काळजी वहा-

तात व कांहीं रोग होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच उपाय योजितात. त्याचप्रमाणें तुमच्या मनाला जर कांहीं वाईट रोग होऊं लागले, तर तुमचे गुरु त्यांजबद्दल फार काळजी घेऊन ते रोग होऊं नयेत अशी योजना करितात. मनाचे रोग ह्मणजे अर्थातच वाईट विचार, आळस, दुष्ट बुद्धि वगैरे होत. एक वेळ शरीराचे रोग बरे ह्मणावे, परंतु हे मनाचे रोग फार वाईट. ते जडूं नयेत ह्मणून जितकी काळजी घ्यावी तेवढी थोडीच ह्मटली पाहिजे. ही काळजी आईबाप नेहमीं घेतातच. परंतु तुमच्या शिक्षकांवर यासंबंधाची जबाबदारी फार असते. ती ते जाणतात आणि ह्मणूनच ते तुम्हांला जेव्हां तेव्हां उपदेश करीत असतात, कीं बाबांनो, तुह्मी आपल्या मनांत वाईट विचारांना कधींही थारा देऊं नका. लहान वयांत जर तुह्मी वाईट विचारांना आपल्या मनांत थारा देऊं लागाल, तर तुमचा सर्व जन्म पुढें वाईट दशेंत जाईल. तुमचें वय ह्मणजे तुमच्या मनरूप व शरीररूप शेताचे पेरणीचे दिवस होत. या दिवसांत जर भलतेंच बियाणें तुह्मीं आपल्या शेतांत पडूं दिलें, तर पीक कसें येईल हें काय सांगावयास पाहिजे! सराटे पेरले, तर कधीं कोणाच्या शेतांत गहूं उगवले आहेत काय? रोगाचें बीं पेरून कधीं निरोगीपणा प्राप्त होणार आहे काय? जर नाहीं, तर शहाण्या शेतकऱ्याप्रमाणें आपण आपल्या शेतांत काय पेरावयाचें याचा विचार ज्यानें त्यानें करावयास पाहिजे हें तुह्मी विसरूं नका. लहान वय हें प्रत्येक मनुष्याच्या आयुष्याचे पेरणीचे दिवस होत. पेरणीच्या दिवसांतच शेतकऱ्यानें जर पेरणी करून टाकली नाहीं, तर पुढें त्याच्या शेतांत कांहीं तरी उत्पन्न होण्याचा संभव आहे काय? नाहींच. तोच दाखला आपल्याकडे घ्या. तुमचें वय ह्मणजे पेरणीचें वय. या वयांत जर चांगल्या शिक्षणाचें आणि सद्गुणाचें बीं तुह्मीं आपल्या आईबापांकडून व गुरूंकडून पेरून घेतलें नाहीं, जर तुमचें मन वाटेल तसें बहकूं दिलेंत तर तुमची सगळ्या जन्मभर धूळधाण झाली ह्मणून समजा. तेव्हां तुमचें, तुमच्या गुरूंविषयींचें कर्तव्य ह्मणजे आपलें स्वतःचें हित करून घेण्याबद्दलचें–अर्थात् स्वतःच्या हिताविषयींचेंच कर्तव्य होय. तेव्हां 'आपल्या गुरूंविषयींचें

आपलें कर्तव्य करा ' असें सांगण्यानें मी ' तुह्मी आपलें कायमचें हित करून घ्या ' असेंच सांगतों आहें. तुमचे गुरु तुम्हांस जें जें करावयास सांगतात, तें तें तुमच्या हितासाठीं ह्मणून सांगतात. त्यांत त्यांचें स्वतःचें हित कांहींसुद्धां नाहीं. तुह्मी हुशार झाल्यानें त्यांस मूठभर मांस येतें. त्यांस खरा आनंद होतो. तेव्हां त्यांची आज्ञा पाळणें हें तुमच्या मुख्य कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य आहे. त्यांचीही आज्ञा तुह्मीं पाळली पाहिजे. तुमच्या खेळाचा विरस करून ते तुह्मांला केव्हां केव्हां अभ्यास करण्यास बसवितात यामुळें तुम्हांला असें वाटतें कीं, मास्तर आपल्यास विनाकारण त्रास देतात, छळतात; परंतु मुलांनो, हा तुह्मांला त्रास नव्हे किंवा हा तुमचा छळही नव्हे, तुमच्या हिताखेरीज कांहींही त्यापासून उत्पन्न होणार नाहीं. तुह्मी योग्य वेळीं योग्य तितका अभ्यास कराल, तर कोणी तुमच्या खेळाचा विरस करावयाला येणार नाहीं. कारण तुमच्या या लहान वयांत तुह्मांला जसा अभ्यास, तसाच खेळही अवश्य आहे हें सर्वांस समजतें. परंतु तुह्मांला जसें वाटतें कीं, सगळा वेळ खेळच पाहिजे तसें मात्र तुमच्या गुरूंना अथवा वडील मंडळींना वाटत नाहीं. त्यांना असें वाटतें कीं, तुह्मीं नियमित वेळपर्यंत अभ्यास केला, ह्मणजे बाकीच्या वेळांत खेळावें. त्या वेळीं तुमच्या आड कोणी येणार नाहीं. विद्या आज केली नाहींत, तर सगळ्या जन्माचा खेळच होईल हें तुम्हांला दिसत नाहीं. तें तुमच्या नजरेला यावें म्हणून किंवा तुमच्या नजरेला जरी आलें तरी या वेळीं तुमच्या मनाविरुद्ध तुमच्याकडून अभ्यास करवावा ह्मणून सर्वांचा–ज्यांना ज्यांना म्हणून तुमचें हित व्हावें अशी इच्छा असते त्यांचा त्यांचा–प्रयत्न चाललेला असतो. अशा तुमच्या हितचिंतकांत मुख्य ह्मटले म्हणजे गुरु होत हें लक्ष्यांत ठेविलें, म्हणजे तुमचें तुह्मांला समजून येईल कीं. आपल्या मातापितरांप्रमाणेंच आपल्या गुरूंची आज्ञा पाळली पाहिजे आणि त्यांच्यावर प्रेम व भक्ति ठेवून त्यांचा सन्मान राखला पाहिजे. मघाशीं मीं बोलतां बोलतां तुम्हांला सांगितलें कीं, आपण आपल्या मातापितरांचें एक प्रकारें ऋण लागत असतों हें जसें खरें आहे, तसेंच हेंही खरें आहे कीं आपल्या गुरूंचेही आपण ऋणी आहों. गुरूंनीं आपल्याला

विद्यादान देऊन जे आपल्यावर महदुपकार करून ठेविले आहेत, ते आपण त्यांच्यापासून घेतलेलें ऋणच होय. परंतु मातापितरांपासून किंवा गुरूंच्यापासून घेतलेल्या ऋणाची फेड इतर कर्जांच्या फेडी-प्रमाण होत नसते. एकानें दुसऱ्यापासून कांहीं पैका उसना घेतला, किंवा कांहीं जिन्नस उसना घेतला, तर तो पैका किंवा जिन्नस परत दिला म्हणजे त्या कर्जाची फेड होते; परंतु मातापितरांचें ऋण तसें फेडल्यानें फिटणारें नव्हे. त्याचप्रमाणें गुरूंचेंही ऋण तसें फेडूं गेल्यानें फिटणारें नव्हे. त्या ऋणाची फेड पैक्यानें किंवा कांहीं जिन्नस दिल्या-घेतल्यानें होत नाहीं. हीं ऋणें केवळ भक्तीनेंच फेडावयाचीं असतात. आपल्या उत्तम वर्तणुकीनें व मनास समाधान होईल अशा प्रकारच्या वर्तनानेंच या ऋणाची फेड होणें शक्य आहे; दुसऱ्या कशानेंही होणें नाहीं. तुह्मी फार सद्गुणी निघालां, तुम्ही पुष्कळ लोकांचे पोशिंदे झालां, तुमच्या हातून लोकांवर उपकार होन गेल्या-कारणानें लोकांत तुमची मानमान्यता झाली, हें ऐकून तुमच्या मातापितरांस व गुरूंस जो आनंद होईल त्या आनंदानें जशी त्यांच्या तुमच्यावरील उपकारांची फेड होईल तशी दुसऱ्या कशानेंही होत नाहीं. म्हणून तुम्ही नेहमीं असा यत्न करा कीं, ज्यायोगानें तुमच्या मातापितरांस व गुरूंस आनंद होईल.

तुम्ही आपल्या आईबापांच्या व गुरूंच्या संबंधाचीं आपलीं कर्तव्यें करून सदाचार व थोडीशी विद्या यांनीं संपन्न झालांत म्हणजे तुम्हांला आपल्या कुटुंबासंबंधाचीं कर्तव्यें करावीं लागतात. कांहीं एका वयापर्यंत तुम्हीं लोकांचा—सज्जनांचा—कित्ता घेऊन वर्तन केलें पाहिजे; परंतु त्यापुढें तुम्हीं दुसरी ही गोष्ट मनांत धरली पाहिजे कीं, तुम्ही दुसऱ्यांस कित्ते होतां. तुह्मी थोडे वयानें मोटे झालां म्हणजे तुमच्याहून लहान मंडळीला तुमचें वर्तन कित्त्यासारखें होतें. अर्थातच त्या लहान मंडळींच्या हातन कोणत्याही प्रकारें वाईट वर्तन होऊं नये, याची जबाबदारी तुमच्यावर येते. ही जबाब-दारी तुम्हीं ओळखून असलें पाहिजे. तुह्मांपैकीं पुष्कळांना लहान बहिणी व लहान भाऊ असतील. तुम्ही थोरले दादा, म्हणून तीं नेहमीं तुमच्या मागें मागें असणार. तुम्ही जसें कराल, तसें कर-

ण्याला पहाणार. तुम्हीं जें बोलाल, तेंच तीं बोलण्याचा यत्न करणार. सारांश काय कीं, जसे तुम्ही वागत असाल, तशी त्या मंडळीची वागणूक होणार तेव्हां तुम्ही आपली वर्तणूक अतिशय उत्तम ठेवणें, हें तुमचें त्यांच्यासंबंधाचें मोठें जबाबदारीचें कर्तव्य आहे. तें तुम्हीं फार दक्षतेनें आणि काळजीपूर्वक केलें पाहिजे. ज्याप्रमाणें आपल्या आईबापांसंबंधीं, ज्याप्रमाणें आपल्या गुरूंसंबंधीं, त्याचप्रमाणें आपल्या कुटुंबासंबंधींही हें आतां सांगितलेलें एक कर्तव्य तुम्हीं केलें पाहिजे. परंतु याच्याहीपेक्षां फार महत्त्वाचें असें तुमचें कुटुंबासंबंधाचें कर्तव्य म्हणजे आपल्या कुटुंबाचा नांवलौकिक राखावा व वाढवावा हें होय. आपलें वर्तन असें असावें कीं, जेणेंकरून आपल्या कुटुंबाची चारचौघांत वाखाणणी होईल. हा अमक्या कुटुंबांतला मुलगा? वा फार चांगला आहे. तें कुटुंबच चांगलें, असें लोकांनीं म्हणावें, असें आपलें वागणें असावें.

जसें, कुटुंबाचा नांवलौकिक राखणें व तो वाढविणें हें तुमचें कर्तव्य आहे, तसेंच आपल्या शाळेचा नांवलौकिक राखणें व वाढविणें हें तुमचें कर्तव्य आहे. आपलें कुटुंब चांगलें म्हणून वाखाणलें जावें व चांगल्या नांवलौकिकास चढावें अशाबद्दल नेहमीं प्रयत्न करावा हें जसें तुमच्या कर्तव्यांपैकीं एक, तसेंच आपण ज्या शाळेंत विद्यामृताचा पहिला घुटका घेतला, त्या आपल्या शाळेची भरभराट व्हावी, तिचा नांवलौकिक दूरवर जावा; हीं मुलें अमक्या शाळेंत जातात ना? त्यांच्या हातून वाईट काम कधीं व्हावयाचेंच नाहीं; अशी लोकांना खात्री वाटावी अशा तऱ्हेची वागणूक तुमची असली पाहिजे.

मुलांनो, शाळा म्हणजे कोण? तुम्ही सारे म्हणजेच शाळा. तुम्ही सारे चांगले म्हणजेच शाळा चांगली. जसें तुमचें सगळ्यांचें वर्तन असेल, तसा शाळेचा नांवलौकिक व्हावयाचा. तो चांगला करणें तुमच्या हातचें आहे. तें तुमचें कर्तव्य आहे. फार महत्त्वाच्या कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य आहे. ही गोष्ट पूर्णपणें लक्ष्यांत धरा.

ज्याप्रमाणें आईबापांसंबंधाचीं, गुरूंच्यासंबंधाचीं, कुटुंबाच्यासंबंधाचीं आणि शाळेच्यासंबंधाचीं, त्याचप्रमाणें ज्या देशांत तुम्ही

जन्म घेतला आहे, त्या देशाच्यासंबंधाचींही तुमचीं कर्तव्यें आहेत. आपल्या आईबापांचा, गुरूंचा, कुटुंबाचा, शाळेचा, त्याचप्रमाणें आपल्या देशाचा नांवलौकिक वाढविणें हें तुमचें मोठें कर्तव्य आहे. हें सगळ्यांत महत्त्वाचें कर्तव्य आहे. तें उत्तमपणें बजावितां येण्यास पूर्वी सांगितलेलीं सर्व कर्तव्यें तुम्ही आधीं उत्तमपणें बजावलीं पाहिजेत. आधींचीं चार कर्तव्यें चांगल्या प्रकारें या वयांत बजावलींत म्हणजे हें देशासंबंधीं कर्तव्य तुमच्या हातन पुढें थोर वयांत अगदीं सहजगत्या होईल. तुम्हांला तें स्वभावसिद्धच वाटेल. आणि तुम्ही तें इतर स्वभावसिद्ध कामांप्रमाणें कराल, याबद्दल मला शंका नाहीं. देशासंबंधीं तुमचीं कर्तव्यें काय आहेत, हीं समजावून सांगण्याजोगें तुमचें अजून वय झालें नाहीं. म्हणून त्यांचें विस्तारपूर्वक वर्णन मी करीत नाहीं. एवढेंच सांगून ठेवतों कीं, तुम्ही ज्या या देशांत जन्मलां, त्याच्यासंबंधानें अभिमान बाळगणें, त्याच्याविषयीं प्रेम ठेवणें, त्याच्या हिताकरितां कायावाचामनानें व धनानें झटणें हें तुमचें एक फार महत्त्वाचें कर्तव्य आहे, तें तुमच्या हातून पार पाडण्यास तुमचे अंगीं योग्यता आली पाहिजे. ती योग्यता अंगीं आणण्यास प्रथम सांगितलेलीं चार कर्तव्यें तुह्मीं उत्तम प्रकारें केलीं पाहिजेत. ती योग्यता अंगीं आली कीं, तुम्ही उत्तम नागरिक व उत्तम देशभक्त झालांत असें समजा.

मुलांनो, तुम्हांला प्रारंभीं मीं सांगितलेंच कीं, कोणतीही विद्या संपादन करावयाची तर त्या विद्येंत अगदीं पारंगत अशा माणसांचा कित्ता घेतला पाहिजे. तो कित्ता तुम्ही गिरविला—निदान तो नेहमीं नजरेसमोर ठेविला—म्हणजे ती विद्या संपादन करण्यास एक उत्कृष्ट साधन तुम्ही आपल्या स्वाधीन करून घेतल्याप्रमाणें होणार आहे. आपलीं कर्तव्यें योग्य तऱ्हेनें, बिनबोभाट करण्याची तरी एक कलाच आहे. ही कला ज्यांस आपल्यापूर्वीं साध्य झाली आहे, त्यांचा कित्ता आपल्या नजरेपुढें ठेवावा. लहानपणीं आपलीं कर्तव्यें करितांना, तीं करूं नयेत अशाबद्दल त्यांनाही अनेक प्रसंगीं मोह पडले असतील, परंतु त्या मोहाच्या जाळ्यांत न सांपडतां त्यांनीं एक निश्चयानें आपलीं कर्तव्यें केलीं, मोह दूर सारला आणि आपला,

आपल्या कुटुंबाचा, आपल्या शाळेचा, आपल्या आईबापांचा, आपल्या गुरूंचा नांवलौकिक वाढविला व आपल्या देशाचें व समाजाचें हित साधलें. अशा पुण्य पुरुषांचीं चरित्रें वाचावीं म्हणजे तींच आपल्यास कित्त्याप्रमाणें उपयोगीं पडणार आहेत. सारांश, मला तुम्हांला यंदा जें सांगावयाचें तें एवढेंच कीं, तुम्ही सज्जनांचा कित्ता गिरवा आणि आपल्या मातापितरांसंबंधीं, गुरूसंबंधीं, कुटुंबासंबंधीं, शाळेसंबंधीं, समाजासंबंधीं व देशासंबंधीं जीं काय कर्तव्यें करावयाचीं, तीं कायावाचामनानें करण्यास झटा.

दा. क. ६६२
(वाचक प्रत)
REFBK-0000662